**(सभापतीस्थानी - माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.: नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी एकूण दोन सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी एक सूचना कालही देण्यात आली होती.तीच आजही देण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री. चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर, परशुराम उपरकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल यांनी "केंद्रीय दक्षता आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आलेल्या श्री.पी.जे.थॉमस यांच्या नियुक्तीबाबत पंतप्रधान कार्यालयाचे तत्कालीन राज्यमंत्री व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्रीय दक्षता आयुक्तांची नियुक्ती करताना व्हिजिलन्स क्लिअरन्सची जबाबदारी केरळ सरकारची असल्याचे स्पष्टीकरण करणे व केरळ राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी श्री.पी.जे.थॉमस यांच्या घोटाळ्या बाबतची माहिती त्यांची नियुक्ती केंद्रीय दक्षता आयुक्त पदी होण्याआधीच पंतप्रधान कार्यालयात दिल्याचे जाहीर करणे. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्याच्यां विषयी संशयाचे वातावरण निर्माण झाल्याने त्यांनी या संदर्भात तातडीने खुलासा करणेबाबत" या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करण्याची सूचना दिलेली आहे.

तसेच नियम 289 अन्वये सर्वश्री. रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, नागो गाणार यांनी दुसरी सूचना दिलेली आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"संसदीय कामकाजामध्ये महत्वपूर्ण असलेल्या व कामकाज पत्रिकेत सुरुवातीला घेण्यात येणाऱ्या प्रश्नोत्तराचा तास अनेक वेळा गोंधळ होऊन न होणे, त्यावर शासनाचे लाखो रुपये खर्च होणे, राज्य सभेमध्ये प्रश्नोत्तराचा तास बदलण्याचा निर्णय होणे, त्याच धर्तीवर राज्य विधानमंडळातील प्रश्नोत्तराचा तास वाया जाऊ नये म्हणून करावयाची उपाययोजना" या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करण्याची सूचना दिलेली आहे. अशा प्रकारे नियम 289 अन्वये दोन सूचना देण्यात आलेल्या आहेत. याठिकाणी पहिली नियम 289 अन्वये जी सूचना देण्यात आलेली आहे, त्याबाबत मी कालच निर्णय दिलेला आहे आणि . .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही आजही याबाबतीत नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. आम्हाला आमचे म्हणणे मांडू द्यावे.



**सभापती** : हा विषय महाराष्ट्र राज्याशी संबंधित नसल्यामुळे मी कालच ही सूचना नाकारलेला आहे.आज सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.दिवाकर रावते,माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि मी या सर्वांची माझ्या दालनामध्ये बैठक झाली. त्यामध्ये असे ठरले की, या विषयाच्या अनुषंगाने याठिकाणी सन्माननीय संसदीय कामकाज मंत्री महोदयांनी घोषणा करावी आणि सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी येत्या एक-दोन दिवसामध्ये नियम पहिली 289 अन्वये देण्यात आलेली जी पहिली सूचना आहे, त्याबाबत निवेदन करावे. हे चर्चा होऊन एकमताने ठरलेले आहे. त्याप्रमाणे माननीय संसदीय कामकाम मंत्री सदनामध्ये आल्यानंतर घोषणा करतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ते ठीक आहे. पण कोणी उठत नाही.

**सभापती** : संसदीय कामकाज मंत्री माननीय श्री.हर्षवर्धन पाटील हे घोषणा करणार आहेत. परंतु मघाशी जी बैठक झाली, त्यावेळी ते उपस्थित नव्हते.

श्री.दिवकर रावते : सभापती महोदय, आपल्या दालनामध्ये जी बैठक झाली, त्यामध्ये ठरल्याप्रमाणे माननीय संसदीय कामकाज मंत्री महोदयांनी सदनामध्ये येऊन निवेदन करावयाचे असे ठरलेले आहे. त्याप्रमाणे ते दुपारी 12.00 वाजता विधान परिषदेचे सभागृह सुरु होत असताना सदनामध्ये येणार होते.

**सभापती** : विधानसभेमध्ये दुपारी 12.00 वाजता प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर माननीय संसदीय कामकाज मंत्री तेथे या विषयाच्या बाबतीत निवेदन करणार होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विधान सभेतील प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. त्यानंतर या सदनामध्ये येतो असे सांगितले होते.

**सभापती** : अगोदर माननीय मंत्री महोदय विधानसभेमध्ये निवेदन करणारे होते. त्यानंतर विधान परिषद सभागृहामध्ये येऊन निवेदन करणार होते. त्यामुळे त्यांना विधानसभेमधून विधान परिषदेमध्ये येण्यासाठी 3-4 मिनिटांचा वेळ लागण्याची शक्यता आहे.

अनेक सन्माननीय सदस्य : तोपर्यंत सभागृह स्थगित करण्यात यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विधानसभेमध्ये स्वत: माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मग विधान परिषद हे दुय्यम आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : बैठकीमध्ये ठरल्यानुसार दुपारी 11.00 ते 12.00 या कालावधीत विधानसभेतील प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर माननीय संसदीय कामकाज मंत्री महोदय तेथे या विषयाच्या बाबतीत निवेदन करणार आहेत आणि मग तातडीने विधान परिषदेमध्ये येतील. त्यामुळे माननीय संसदीय ..



**सभापती** . . . .

कामकाज मंत्री महोदय हे चार-पाच मिनिटांमध्ये येथे येणार आहेत. त्यानंतर ते निवेदन करतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, विधानसभेमध्ये प्रश्नोत्तराचा तास संपून पाच मिनिटे झालेली आहेत.

**सभापती** : पाच मिनिटे नाही तर तीनच मिनिटे झालेली आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. परंतु त्यावेळी सभागृहामध्ये गोंधळ सुरु असल्यामुळे आपण त्यावेळी जो निर्णय दिला, तो मला समजला नाही.

**सभापती** : मी त्याबाबतीत काल असा निर्णय दिला की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे, त्यातील विषय अत्यंत महत्वाचा आहे व ती सूचना मी स्वीकारलेली नसली तरी यावर सदनामध्ये नक्की चर्चा घेण्यात येईल. कारण हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आमचे एवढेच म्हणणे आहे की, विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यामुळे आपण माननीय संसदीय कामकाज मंत्री महोदयांना या सभागृहामध्ये बोलवावे. त्यांनी दोन मिनिटामध्ये स्टेटमेंट केल्यानंतर सदरहू विषय संपेल. त्यामुळे पाच मिनिटे सभागृहाचे कामकाज थांबवावे अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : माननीय संसदीय कामकाज मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना तातडीने सभागृहामध्ये बोलविण्याच्या दृष्टीने व्यवस्था करावी.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्री महोदयांकडून निरोप आलेला असून ते लवकरात लवकर सदनामध्ये येत आहेत.

**सभापती** : यानंतर प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माननीय संसदीय कामकाज मंत्री सभागृहात येईपर्यंत सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे तहकूब करण्यात यावे आणि प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 10 मिनिटे वाढवून देण्यात यावा.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास सुरु होऊन पाच मिनिटे झालेली असल्यामुळे मी प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ फक्त पाच मिनिटे वाढवून देईन.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 289 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेतील विषय अत्यंत महत्वाचा आहे. सभागृहाचे कामकाज सुरु होऊन 5 मिनिटे झालेली आहेत. सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे तहकूब करण्यात यावे आणि 10 मिनिटात माननीय संसदीय मंत्र्यांना या ठिकाणी बोलावण्यात यावे. त्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 10 मिनिटे वाढवून देण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटे तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.05 ते 12.10 वाजेपर्यंत तहकूब झाली. )

----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आज आपल्याच दालनामध्ये माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, दोन्ही सदनातील माननीय विरोधी पक्ष नेते आणि सर्व गट नेते यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये केंद्रीय दक्षता आयोगाच्या प्रमुखांच्या नियुक्तीच्या संदर्भामध्ये याही सभागृहामध्ये जो मुद्दा उपस्थित केला गेला होता आणि यासंदर्भामध्ये माननीय मुख्यमंत्री यांच्या बाबतीत जे आक्षेप घेण्यात आले होते त्या बाबतीत ही बैठक आपल्या उपस्थितीमध्ये पार पडली. माननीय मुख्यमंत्र्यांविरुध्द जे आक्षेप घेतलेले आहेत त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री यासंदर्भातील आपले स्पष्टीकरण योग्य वेळी या सदनामध्ये देतील असे या बैठकीमध्ये ठरले आहे. हे मी सभागृहाच्या माहितीकरिता मी सांगू इच्छितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : दोन दिवसात स्पष्टीकरण करतील असे ठरले होते.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपल्या उपस्थितीत चर्चा झाल्याप्रमाणे निश्चितपणे आपण ठरवून द्याल त्या वेळी माननीय मुख्यमंत्री या संदर्भात निवेदन करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 2 दिवसात निवेदन करण्याचे ठरले होते.

**सभापती** : आपल्या चर्चेमध्ये दोन-तीन दिवसांमध्ये अशा पध्दतीचे निवेदन सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही सभागृहामध्ये करावे असे ठरले होते. त्या अनुषंगाने माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी या ठिकाणी सांगितलेले आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**सभापती** : आता तारांकित प्रश्न क्रमांक 13753 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझी आपल्याला एक विनंती आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये कोणतीही विनंती किंवा अन्य मुद्दा उपस्थित न करता आपण प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपला मुद्दा मांडावा.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत मुंबईच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यासंबंधीचा महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे आपण तो प्रश्न आधी घ्यावा किंवा तो प्रश्न चर्चेला येईपर्यंत प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ वाढवावी.

**सभापती** : त्याबाबत कसे करावयाचे ते आपण बघू.

**मुंबईच्या सांताक्रुझ (पूर्व) उपनगरातील सिटी सर्व्हे क्रमांक १३ अंतर्गत मिलिट्रीसाठी राखीव असलेल्या भूखंडावर होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत**

**(१) * १३७५३ श्री.रामदास कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ९८५६ ला दिनांक १ डिसेंबर, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या सांताक्रुझ पूर्व उपनगरातील सिटी सर्व्हे क्रमांक १३ अंतर्गत मिलिट्रीसाठी राखीव असलेल्या भूखंडावर होत असलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचेकडून सविस्तर अहवाल शासनास सादर केला गेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, अहवालानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, अहवाल प्राप्त झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचकरिता :** (१) होय.
(२) मौजे वांद्रे (पूर्व) येथील न.भू.क्र.१३ च्या मालमत्ता पत्रकावर धारक महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाच्या नावाची नोंद असून, मूळ धारक महाराष्ट्र शासन अशी नोंद आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस दिनांक २०.०८.२००९ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून एकूण ११२५८२.०२ चौ.मी. क्षेत्रासाठी आशयपत्र पारित करण्यात आले आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये केंद्र शासनाच्या मालकीचे कोणतेही क्षेत्र समाविष्ट करण्यात आलेले नाही. तसेच गलिच्छ वस्ती घोषित न केलेल्या क्षेत्राचा समावेश योजनेत करण्यात आलेला नाही व योजनेमध्ये असणारे कोणतेही आरक्षण रद्द करण्यात आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

...3...

RDB/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र. 13753 .......

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण मला थोडा अधिक वेळ द्यावा. थ्री के चा हा विषय आहे. जवळजवळ 140 एकर जागेमध्ये शासनाने ही नियमबाह्य परवानगी दिलेली आहे. या ठिकाणी शासनाने ही जागा डिफेंसची नाही असे जे म्हटले आहे ते चुकीचे आहे. मी सगळी कागदपत्रे या ठिकाणी आणलेली आहेत. नगरविकास खात्याची टिप्पणी माझ्याकडे आहे, ती मी आपल्याकडे पाठवितो. त्यामध्ये नगरविकास खात्याने असे म्हटले आहे की, प्राधिकरण एसआरए योजनाव्दारे बहुमजली इमारती बांधून 27 हजार झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्याचे काम करीत आहे, ते बेकायदेशीर आहे. नगरविकास खाते असे म्हणत आहे की, हे बेकायदेशीर आहे. माझ्याकडे झोपडपट्टी पुनर्वसनाच्या संदर्भात जी अधिकृत माहिती आहे त्यांच्या टिप्पणीमध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, 38 एकर जागा केंद्र शासनाची आहे. यामध्ये खाजगी जागा 12400 चौ.मी., म्हाडा 6 हजार चौ.मी., राज्य सरकार 5500 चौ.मी. आणि केंद्र सरकार 7 हजार चौ.मी. असा उल्लेख केलेला आहे. ही टिप्पणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची अधिकृत टिप्पणी आहे. ही टिप्पणी माझी नाही. या मध्ये एक बाब अशी आहे की, स्पेक्ट्रम घोटाळ्यामध्ये ज्या नीरा राडिया यांचे नाव होते त्यांनी या योजनेमध्ये 750 कोटी रुपये गुंतविले आहेत असे माझ्याकडे दिल्लीच्या आयकर विभागाचे टॉप सिक्रेट पत्र आहे. त्याची प्रत मी आपल्याकडे पाठवितो. 750 कोटी रुपये निरा राडिया यांनी यामध्ये गुंतविले. जो टेलिफोन टॅप केला होता त्यामधून हे आढळून आले. आयकर अधिका-यांच्या टॉप सिक्रेट पत्राची जी प्रत आहे ती मी मुद्दाम आपल्याकडे पाठवितो, म्हणजे यातील गांभीर्य आपल्या लक्षात येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13753.... श्री.रामदास कदम...

माझ्याकडे आयकर विभागाचे टॉप सिक्रेट असलेले पत्र आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, "या योजनेत हवालाचे 750 कोटी रुपये गुंतविण्यात आले आहेत."

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपला प्रश्न विचारावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या योजनेमध्ये हवालाचे पैसे गुंतविण्यात आल्यामुळे हा विषय किती गांभीर्याने घेतला पाहिजे ते मी सांगत आहे. माझ्याकडे डिफेन्स डिपार्टमेंटचे पत्रही आहे. त्या पत्रात असे नमूद केले आहे की, " 1962 पासून ही जागा डिफेन्सची आहे. हे पत्र देखील मी आपल्याकडे पाठवित आहे. डिफेन्सच्या जागेवर हा प्लान दाखविलेला आहे. सिटी सर्व्हे क्रमांक 13 वर डिफेन्सची जागा दाखविलेली आहे. ती जागा या योजनेत समाविष्ट केलेली आहे. या योजनेमध्ये 10 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. हा प्लॅन मी आपल्याकडे पाठवित आहे. यासंदर्भात डिफेन्सने निर्मलनगर पोलीस ठाण्यामध्ये एफआयआर दाखल करावा असे पत्रात नमूद केलेले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, डिफेन्सच्या जागेवर 18 हजार झोपडपट्टया असून त्या जागेवर या इमारती तयार झाल्या आहेत. रेल्वेने सुध्दा याबाबतीत पत्र दिलेले आहे की, रेल्वे लाईनपासून 100 मीटर जागा न सोडता रेल्वे लाईनला लागून इमारती उभ्या केल्या असल्यामुळे त्यासंबंधी एफआयआर दाखल करावा. ते पत्र सुध्दा मी आपल्याकडे पाठवित आहे. माझ्याकडे डिफेन्सची 5 पत्रे आहेत की, ज्यामध्ये 1962-1964 साली ही जागा वायू सेनेला जागा कशी दिली गेली ते नमूद केलेले आहे. त्यापैकी 500 फूट जागा 1982 साली महाराष्ट्र शासनाला दिली होती त्याचा देखील या पत्रात उल्लेख आहे. म्हणून ही बाब अतिशय गंभीर आहे. या प्रकरणात हवालाचे 750 कोटी रुपये गुंतविण्यात आले आहेत. या प्रकरणात 140 एकर जागा गुंतलेली आहे. त्याठिकाणी गुंडांचा वापर करण्यात आला आहे. ज्या लोकांनी या योजनेला विरोध केला आहे त्यांच्या तडीपारीच्या ऑर्डर्स काढण्यात आल्या आहेत. त्याची प्रतही मी आपल्याकडे पाठवित आहे. म्हणजे साम, दाम, दंड, भेद या सर्व प्रकारांचा यामध्ये वापर करण्यात येत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सर्व कागदपत्रे माझ्याकडे द्यावीत.

2...

NTK/ KGS/ KTG/

ता.प्र.क्र.13753....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी सर्व कागदपत्रे आपल्याकडे पाठवित आहे. 'आदर्श'पेक्षा दहापटीने हा मोठा घोटाळा आहे. मी ही जी माहिती दिलेली आहे त्याबाबत तत्काळ न्यायालयीन चौकशी केली जाईल काय, या घोटाळ्यांबाबत मी जे पत्र दिलेले आहे त्यातील नीरा राडिया यांनी 750 कोटी रुपये गुंतविलेले आहेत, त्यामध्ये त्यांचे जे पार्टनर्स आहेत त्यांच्याविरुध्द आजच्या आज गुन्हा दाखल केला जाईल काय ? यासंबंधी मी आपल्याकडे केंद्र शासनाचे गोपनीय पत्र देत आहे. माझ्याकडे सर्व्हेची प्रत आहे. त्यामध्ये ही सर्व जागा डिफेन्सची आहे असे म्हटलेले आहे. सभागृहात माननीय मुख्यमंत्री आलेले आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, या प्रश्नातील विषयात 10 हजार कोटींचा घोटाळा झालेला आहे. नीरा राडिया यांनी या योजनेत 750 कोटी रुपये गुंतविलेले आहेत, असे आयकर खात्याच्या पत्रातच नमूद केलेले आहे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या एका विधानाची मला आठवण करुन द्यावयाची आहे. त्यांनी एकदा असे म्हटले होते की, जे घोटाळे करतात त्यांना मी सोडणार नाही. परंतु पुढे काहीच झाले नाही, असे या प्रकरणाच्या बाबतीत होता कामा नये. म्हणून याबाबतीत तत्काळ न्यायालयीन चौकशी मान्य करण्यात येईल का, या योजनेला तत्काळ स्थगिती दिली जाईल काय, नीरा राडिया यांनी हवालाचे 750 कोटी रुपये गुंतविलेले आहेत, त्यामध्ये शिवालिक यांचा ट्रस्ट आहे, या ट्रस्टच्या सर्व पदाधिकाऱ्यांवर आजच्या आज गुन्हे दाखल केले जातील काय ?

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांची कोठे तरी गल्लत होत आहे. विशेषत: सर्व्हे क्र.13 वरील जागा डिफेन्सची आहे असा ते सातत्याने युक्तिवाद करीत आहेत. यासंबंधी सिटी सिव्हील कोर्टात सुध्दा दावा दाखल करण्यात आला होता, त्यावेळी सुध्दा ही जागा डिफेन्सची नसून म्हाडाची आहे ते स्पष्ट झालेले आहे. सर्व्हे क्र.12 ही निश्चितपणे डिफेन्सची जागा आहे. यासंबंधी शासनाने असे स्पष्टपणे निर्देश दिलेले आहेत की, जोपर्यंत डिफेन्सचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणार नाही तोपर्यंत त्या परिसरामध्ये कोणतेही बांधकाम करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मग राज्य शासन असेल किंवा एसआरए असेल यांच्याकडून परवानगी दिलेली नाही किंवा भविष्य काळामध्ये दिली जाणार नाही. न्यायालयाने निवाडा दिल्यामुळे या प्रकरणाबाबत न्यायालयीन चौकशीची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

यानंतर श्री.शिगम...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13753...... ...श्री. सचिन अहिर....

सन्माननीय सदस्यांनी एन्फोर्समेंट आणि इन्कमटॅक्स डिपार्टमेंट संबंधी प्रश्न विचारला. हा केन्द्र शासनाच्या स्तरावरील प्रश्न आहे. त्यांनी चौकशी केल्यानंतर राज्य शासन त्याबाबतीत निश्चितपणे सहकार्य करील. परंतु हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारित येत नाही.

डॉ. दीपक सावंत : सांताक्रुझ पूर्व मधील गोळीबार येथील झोपडपट्टीचा हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सर्व कागदपत्रे पुरावा म्हणून आपणाकडे सादर केलेली आहेत. तरी देखील माझ्या मनामध्ये दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, सुरुवातीला नेव्हीने आणि संरक्षण खात्याने "ही आमची जागा आहे" अशा प्रकारचा दावा कोणत्या आधारावर केला ? "हा प्रश्न केन्द्र शासनाच्या अखत्यारितील आहे. तसेच या जागेवर सध्या बांधकाम सुरु नाही." असे मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगितले. म्हणून माझा दुसरा प्रश्न असा आहे की, त्या जागेची सद्य:स्थिती काय आहे आणि तेथील लोकांचे ॲग्रीमेंट झालेले आहे काय ?

श्री. सचिन अहिर : कोणत्याही प्रकल्पाला मान्यता देत असताना 70 टक्क्या पेक्षा जास्त लोकांची संमती घेण्यात येते. या प्रकरणी तशी संमती घेण्याचे काम झालेले आहे. तेथील बांधकाम म्हाडाच्या आणि खाजगी जमिनीवर झालेले आहे. माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार कोणत्याही मिलिटरीच्या जागेवर बांधकाम झालेले नाही.

श्री. रामदास कदम : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, माझ्याकडे अधिकृत नकाशे आहेत. त्यानुसार सीटी सर्व्हे क्रमांक 13 ही डिफेन्सची जागा आहे. मी माननीय मंत्री महोदयांकडे ही कागदपत्रे देत आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणाने असे म्हटले आहे की हे काम कायदेशीर असून त्याला मान्यता दिलेली आहे. मी नगर विकास खात्याची टिपणी आपणास वाचून दाखविली. त्यामध्ये असा उल्लेख आहे की 18 हजार झोपड्या मिलिटरीच्या जागेवर आहेत. एकूण 62 एकर जागेपैकी 32 एकर जागेवर झोपड्या आहेत. शासनाच्याच परिपत्रकामध्ये असे म्हटलेले आहे. म्हणून या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : न्यायालयीन चौकशीची गरज नाही. सन्माननीय सदस्यांनी अधिकची माहिती उपलब्ध करुन दिली तर त्याची निश्चित चौकशी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणी वारंवार आपल्या तक्रारींची नोंद केलेली आहे. त्याबाबतीत संपूर्ण चौकशी करण्याची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भूमिका शासनाने घेतलेली होती आणि त्यासंबंधीचा अहवाल सन्माननीय सदस्यांना पाठविण्याचे कामही झालेले आहे. आता आणखी काही अतिरिक्त माहिती सन्माननीय सदस्य या सदनाच्या माध्यमातून देत असतील तर त्याचीही चौकशी करण्यात येईल.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, डिफेन्सच्या जागेवर शासनाकडून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण होत आहे. तरी देखील या प्रकरणी न्यायालयीन चौकशी न करण्याच्या शासनाच्या भूमिकेचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रासाठी स्थापन केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमावलीबाबत**

**(२) * १३९९१ श्री.मोहन जोशी , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रासाठी स्थापन केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमावलीस अंतिम स्वरुप देण्याचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन मा.राज्यमंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियमावली पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) अद्याप, याबाबतची नियमावली पूर्ण झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सुधारित विशेष नियमावली प्रसिध्द करुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७ (१) अन्वये आवश्यक ती कार्यवाही करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळण्यासाठीचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण समितीच्या सदस्यांकडे सादर केला आहे.

श्री. मोहन जोशी : पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवड परिसरामध्ये ५० टक्क्या पेक्षा अधिक लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहातात. तरीही गेली अनेक वर्षे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियमावली तयार झालेली नाही. या सदनामध्ये मी ८-९ महिन्यापूर्वी यासंबंधीचा प्रश्न विचारला होता त्यावेळी एक महिन्याच्या आत ही नियमावली तयार करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. या घटनेला ८-९ महिने उलटून गेले तरी नियमावली तयार करण्याच्या बाबतीत कोणतीच हालचाल झालेली नाही. मुंबई शहरामध्ये ही योजना मोठ्या प्रमाणावर यशस्वी होत आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड सारख्या शहरामध्ये ५० टक्क्या पेक्षा जास्त लोक हे झोपडपट्ट्यांमध्ये राहात असताना देखील नियमावली तयार करण्यास विलंब होत आहे. माझा प्रश्न असा आहे की, येत्या १५ दिवसात ही नियमावली शासन मंजूर करुन जाहीर करणार आहे काय ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13991........... श्री.मोहन जोशी........

दुसरा प्रश्न असा आहे की, या दोन्ही महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांची संख्या किती आहे? महानगरपालिकेचे आयुक्त हे या प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. महापालिका आयुक्तांचे कामाचे स्वरुप प्रचंड असल्यामुळे ते प्राधिकरणाच्या बैठकीला उपस्थित राहू शकत नाहीत. या बाबीचा विचार करुन या प्राधिकरणासाठी स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक केली जाईल काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, नियम 37 (अ) (ब) एका महिन्याच्या आत लागू करण्यात येईल. नगरविकास विभागाकडून ज्या सूचना यावयाच्या आहेत त्यासाठी प्रतिक्षा करण्यात येत आहे. अन्यथा 15 दिवसात अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेता येईल. पुढील एका महिन्यात हा निर्णय घेण्यात येईल. हा निर्णय घेतल्यानंतर कोणताही अडथळा येणार नाही याची दक्षता घेतली जाईल. या महापालिका क्षेत्रात एकूण 564 झोपडपट्टया असून 2 लाखापेक्षा अधिक झ ाोपडपट्टीधारक आहेत. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा देखील शासन स्तरावर विचार केला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील एसआरए योजनांच्या संदर्भात आम्ही अनेकदा पालकमंत्र्यांपुढे आमचे म्हणणे मांडले आहे. प्रश्न असा आहे की, कोणत्याही एसआरए योजनेच्या संदर्भात नियमावली बदलली जाते त्यावेळी त्यामध्ये पारदर्शकता अपेक्षित आहे. हा प्रश्न अनेकदा चर्चिला गेला आहे. एसआरए योजनेच्या संदर्भात पुणे महापालिकेकडून विधानसभा सदस्यांना बैठकीला बोलावले जात असताना काही सदस्यांना बोलावले जाते तर काहींना वगळण्यात येते. आम्हाला एसआरए योजनेच्या संदर्भात घेण्यात येणाऱ्या बैठकीला बोलावले जात नाही. सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत माननीय मंत्री महोदयांनी एका महिन्यात निर्णय घेऊ असे उत्तर दिले आहे. अधिवेशन सुरु असताना पुण्यातील विधिमंडळ सदस्यांच्या एसआरए योजनेबाबत ज्या तक्रारी आहेत त्या संदर्भात त्यांच्यासमवेत आढावा बैठक घेण्यात येईल काय?

श्री.सचिन अहिर : बैठक घेतली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13991...........

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. झोपडपट्ट्या पुन्हा निर्माण होऊ नयेत यासाठी यापुढे ज्या वॉर्डमध्ये झोपडपट्टी निर्माण होईल तेथील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे अनेकदा शासनाकडून या सभागृहात उत्तर दिले गेले आहे. या संदर्भात नवीन धोरण तयार करुन 1995 किंवा 2000 नंतर ज्या झोपड्या निर्माण झाल्या आहेत किंवा आता निर्माण होत आहेत त्याठिकाणच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले जाईल काय?

श्री.सचिन अहिर : यापूर्वी देखील असे धोरण आखले गेले आहे. धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्याची भूमिका वेळोवेळी घेतली आहे. ज्या ज्याठिकाणी अशा अनधिकृत झोपड्या निर्माण होतात त्या निष्कासित करण्याची कारवाई वेळोवेळी केली जाते.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, शासकीय जमिनीवर ज्या झोपडपट्टया आहेत त्यांचा पुनर्विकास खाजगी विकासकांमार्फत न करता म्हाडा वा तत्सम शासकीय संस्थांमार्फत करण्याची योजना राबविण्यात येईल काय? जेणेकरुन विस्थापित होणाऱ्या लोकांसाठी अतिरिक्त घरे उपलब्ध होऊ शकतील.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, या कारणासाठीच एसपीपीएल कंपनीची स्थापना केली आहे. शासकीय वा म्हाडाच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्टीतील 70 टक्क्यापेक्षा जास्त रहिवासी शासनाच्या अटी मान्य करायला तयार असतील तर निश्चितपणे तेथे शासनातर्फे पुनर्विकास योजना राबविली जाईल.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, विधानसभा सदस्य या प्राधिकरणाचे सदस्य आहेत. मात्र विधानपरिषद सदस्यांना या प्राधिकरणाच्या बैठकीला निमंत्रित केले जात नाहीत. यापूर्वी मंत्री महोदयांनी सभागृहात उत्तर दिले होते की, यापुढील काळात प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीला विधानपरिषद सदस्यांना निमंत्रित केले जाईल. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. यापुढच्या काळात प्राधिकरणाच्या प्रत्येक बैठकीला विधानपरिषद सदस्यांना देखील बोलावले जाईल असे माननीय मुख्यमंत्री जाहीर करतील काय?

नंतर जी.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13991.........

श्री. सचिन अहिर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्यानुसार अशा बैठकीला विधान परिषदेच्या माननीय सदस्यांनाही बोलावण्यात येईल.

**सभापती** : माननीय सदस्यांची अशी सूचना आहे की, ज्याप्रमाणे आपण विधानसभा सदस्यांना अशा बैठकांसाठी पाचारण करता तसे विधान परिषद सदस्यांनाही बोलाविणे आवश्यक आहे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आपण सूचना केल्याप्रमाणे निश्चितच विधान परिषद सदस्यांनाही अशा बैठकीसाठी बोलावले जाईल.

---------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. भोगले....... 12:35

**मुंबईतील विक्रोळी येथील महात्मा फुले रुग्णालयाबाबत**

**(3) * 12920 श्रीमती अलका देसाई , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्रीमती दिप्ती चवधरी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील विक्रोळी येथील महात्मा फुले रुग्णालयात खाटांची अपुरी संख्या औषधांचा तुटवडा, डॉक्टरांची व कर्मचारी वर्गाची कमतरता यामुळे या रुग्णालयाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असल्याचे माहे डिसेंबर, 2010 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्याबाबत व औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच डॉक्टर व कर्मचारी यांची असलेली रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1) व (2) सदर रुग्णालयाची अवस्था अत्यंत दयनीय झाली हे खरे नाही. रुग्णालयात औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. गंभीर रूग्णासाठी नवीन अतिदक्षता विभाग येत्या काही महिन्यातच कार्यान्वित होणार आहे. तसेच महापालिकेच्या नियमित भरती प्रक्रियेनुसार डॉक्टराची व कर्मचारी वर्गाची रिक्त पदे भरण्यात येत आहेत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : महोदय, या निमित्ताने मी फक्त दोनच प्रश्न उपस्थित करणार आहे. तत्पूर्वी उत्तरात म्हटले आहे की, "या रुग्णालयाची दयनीय अवस्था नाही, तसेच औषध पुरवठा वेळेवर होत आहे" याकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते. तसेच मुंबई महानगर पालिकेकडून जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती दिशाभूल करणारी आहे .व खरी माहिती दडवून ठेवण्यात आलेली आहे. कारण मी देखील याच कॉलनीतील रहिवासी असून मी स्वत: वस्तुस्थिती जाणते. या रुग्णालयात डॉक्टर्स, नर्सेस, स्टाफ आणि औषधे देखील नाहीत, अशी परिस्थिती आहे. याबाबत खरी माहिती शासन देणार काय ? त्याचबरोबर सकाळच्या वेळेस ओपीडीचे पेशंट्स आपले औषध घेण्यासाठी येतात तेव्हा जो स्टाफ कार्यरत आहे तो गप्पांमध्ये रंगलेला असतो किंवा इतरत्र फिरताना दिसतो. वास्तविक औषधे घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांची अवस्था अत्यंत बिकट असते तरीही त्यांना वेळेवर औषधे मिळत नाहीत. यासंबंधी शासन काय कारवाई करणार आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12920........

श्री. पृथ्वीराज चव्हाण : उत्तरात दिल्याप्रमाणे विक्रोळी येथील महात्मा फुले रुग्णालय 130 बेडस असून तेथे औषधे मिळत नाहीत, रिक्त पदे भरपूर आहेत असे आरोप केले आहेत. त्यासंबंधीची वस्तुस्थिती अशी आहे की, या रुग्णालयातील एकूण 207 पदांपैकी 171 पदे सध्या कार्यरत असून 36 पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरण्यासंबंधीची कार्यवाही चालू आहे. औषधांच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, बजेटमध्ये केलेल्या तरतुदीनुसार संपूर्ण औषधे घेतली असून ती रुग्णालयात वाटप केली जातात अशी माहिती उपलब्ध झालेली आहे. तरी देखील सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून त्यांच्या तक्रारीची चौकशी करण्यात येईल व आणखी औषधांची गरज असेल तर ती देखील पुरविण्यात येतील. त्याचप्रमाणे दुसरा मुद्दा असा आहे की, या रुग्णालयात सन 2010 मध्ये 20 हजार बाह्य रुग्ण आणि 560 आंतररुग्णांवर उपचार करण्यात आले. तसेच या रुग्णालयात एक नवीन 10 खाटांचा अती दक्षता विभाग देखील लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या रुग्णालयात 36 जागा रिक्त असल्याची माहिती दिली. पण या 36 जागा किती कालावधीपासून भरलेल्या नाहीत, याची माहिती शासन देणार काय?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : या रुग्णालयातील 36 जागांवैकी 5 जागा प्रशासकीय स्वरुपाच्या आहेत, निम्न वैद्यकीय 10 पदे रिक्त आहेत आणि कक्ष परिचरची 19 पदे रिक्त आहेत, वैद्यकीय अधिकारी व निवासी वैद्यकीय अधिकाऱ्याची एकही जागा रिक्त नाही. मानसेवी डॉक्टर्सच्या 2 रिक्त पदांकरिता दि. 24.2.2011 रोजी मुलाखती झालेल्या आहेत. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या भरतीची प्रक्रिया एप्रिल, 2011 पासून सुरु होणार आहे. निम्न वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक सरळ सेवा भरती प्रक्रियेच्या माध्यमातून दि. 27 व 29 जानेवारी, 2011 रोजी झालेली आहे.

श्री. राजन तेली : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय सविस्तर असे उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, डॉक्टर्सची रिक्त पदे केवळ मुंबईतच आहेत असे नाही तर संपूर्ण राज्यातील ग्रामीण रुग्णालये तसेच शासकीय रुग्णालयांमध्ये ही पदे रिक्त आहेत, तसेच कार्यरत असलेल्या डॉक्टर्सची संख्या 50 टक्के पेक्षा कमी आहे. यासाठी सभागृहात सातत्याने

....4.....



PFK/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. भोगले....... 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12920......... श्री. राजन तेली .......

सांगण्यात येते की, अशा भरतीची प्रक्रिया सुरु आहे. परंतु संपूर्ण राज्यातील डॉक्टर्स व अन्य आवश्यक पदे भरण्यासंबंधी शासन एक वेगळे धोरण आखून त्याची अमलबजावणी करणार आहे काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 12920** ........

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, अनेक रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांच्या बाबतीतील परिस्थिती समाधानकारक आहे अशी वस्तुस्थिती नाही. त्यामुळे डॉक्टरांची 1200 पदे भरण्याचा निर्णय शासनाने नुकताच घेतला असून ही पदे भरण्यात आलेली आहेत. विशेषत: ग्रामीण आणि मागासलेल्या भागात डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात शासनाचा धोरणात्मक विचार सुरु आहे. आता डॉक्टरांची जी 1200 पदे भरण्यात आलेली आहेत त्यामुळे काही प्रमाणात परिस्थिती सुधारण्याची शक्यता आहे. परंतु यामध्ये अजून भरपूर काम करण्यास वाव आहे हे मी मान्य करतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## मुंबई महानगरपालिकेच्या मूलभूत विकासासाठी राखून ठेवलेल्या निधीचा गैरवापर केल्याबाबत

**(4) * 12880 श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.हुसेन दलवाई , प्रा.सुरेश नवले** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील लहान-मोठ्या नाल्यांची सफाई करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येऊनही नाल्यांची सफाई समाधानकारक होत नसल्याने नाल्यांतील पाणी रस्त्यावर व इतरत्र पसरले जावून नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, 2011 रोजी वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, नाले सफाईच्या कामात करण्यात आलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच नालेसफाईचे काम करणाऱ्या कामगारांना दिले जाणारे अपुरे वेतन याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(2) महानगरपालिकेतर्फे गाळ काढण्याच्या निविदा मागवून कंत्राटदारामार्फत मोठ्या व छोट्या नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम करून घेण्यात येते. ज्या ठिकाणी कंत्राटदाराने कंत्राटामध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यात कुचराई व दिरंगाई केल्याचे निदर्शनास आले. त्या ठिकाणी निविदेतील अटी व शर्तीनुसार काम करवून घेवून कंत्राटदारावर 2010-11 मध्ये रू.21,32,574/- इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच मोठया व छोटया नाल्यांच्या सफाईचे काम ठेकेदारांमार्फत करण्यात येत असल्यामुळे कंत्राटी सफाई कामगारांना वेतन ठेकेदारांमार्फत दिले जाते. तसेच रस्त्यालगतची गटारे व लोखंडी जाळयांची सफाई अशासकीय संस्थांतर्फे कामगार नियुक्त करून केली जाते अशा पद्धतीने काम करून घेताना किमान वेतन कायद्याची अमंलबजावणी करण्याची अट ठेवण्यात येते.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 12880 च्या संदर्भात जे उत्तर देण्यात आलेले आहे त्या उत्तरालाच माझी हरकत आहे. पहिला प्रश्न असा विचारण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक : 12880.....

आलेला आहे की, "मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील लहान मोठया नाल्यांची सफाई करण्यासाठी कोटयावधी रुपये खर्च करण्यात येऊनही नाल्यांची सफाई समाधानकारक होत नसल्याने नाल्यातील पाणी रस्त्यावर व इतरत्र पसरले जावून नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, 2011 रोजी वा त्या दरम्यान आढळून आले आहे काय"? या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "अशी बाब निदर्शनास आली नाही." तसेच दुस-या उत्तरात असे म्हटले आहे की, "ज्या ठिकाणी कंत्राटदाराने अटी व शर्तीचे पालन करण्यात कुचराई व दिरंगाई केल्याचे निदर्शनास आले आहे त्यांना दंड आकारण्यात आलेला आहे." त्यामुळे माझे म्हणणे असे आहे की, या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये विसंगती असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात यावा किंवा सदनापुढे या प्रश्नाचे योग्य उत्तर यावे, एवढयापुरताच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात काही ठिकाणी त्रुटी आढळून आलेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. किती कि.मी. सफाई झाली व किती कि.मी. सफाई झ ाली नाही हा विषय फार मोठा आहे. प्रत्येक ठिकाणी समाधान होईलच असे काही नाही. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात महानगरपालिकेने पावसाळ्यापूर्वी सफाई करण्याचा तसेच गाळ काढण्याचा प्रयत्न केलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांनी आधीच्या व या प्रश्नाला चांगल्या प्रकारे उत्तर दिलेले आहे तसेच त्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भातील शासनाची भूमिका स्पष्ट करण्याचा तपशीलवार प्रयत्न केला असल्यामुळे मी त्यांचे आभार मानते. यासंदर्भात आमच्याकडे अशी माहिती आली आहे की, मुंबईच्या महापौर सन्माननीय श्रध्दा जाधव यांनी या प्रश्नाच्या तसेच अन्य महत्वाच्या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांची भेट मागितली आहे. या विषयाच्या संदर्भात आम्ही असे वाचले आहे की, मुंबईच्या महापौरांना माननीय मुख्यमंत्र्याची भेट मिळत नसल्यामुळे त्या सामान्य नागरिकांच्या रांगेत उभ्या राहून माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, मुंबईच्या सन्माननीय महापौरांना आपल्याला भेटण्यासाठी आपण वेळ देणार आहात काय ? अन्यथा त्यांनी सामान्य नागरिकांच्या रांगेत उभे राहून आपली भेट घेण्याची तयारी दाखवलेलीच आहे.

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक : 12880.....

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हे खरे आहे की, सन्माननीय महापौरांनी काल एका विशिष्ट मुद्याकरिता माझी भेट मागितली होती परंतु मला काल त्यांच्यासाठी वेळ देता आला नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु आज मी त्यांना भेटण्यासाठी वेळ दिलेला आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या विकासासाठी राखून ठेवलेल्या निधीचा गैरवापर होत आहे त्याबाबत असे सांगण्यात आले आहे की, मुंबई महानगर पालिकेच्या सफाई कामगारांना कंत्राटी पध्दतीने वेतन देण्यात येते. तसेच मागच्या वर्षी मुंबईतील वडाळा येथे गटारे साफ करीत असतांना ठेकेदाराच्या कामगारांचा मृत्यू झाला होता तसेच 3 कामगारांना रुग्णालयात भरती सुध्दा करण्यात आले होते. अशा पध्दतीने निधीचा गैरवापर करुन हेच ठेकेदार मुंबई महानगरपालिकेत वर्षानुवर्षे कामे करीत आहेत.

यानंतर श्री. गायकवाड ......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.12880 श्री.किरण पावसकर.

त्या संदर्भात चौकशी केली आहे काय , संबंधित कंत्राटदाराला ब्लॅक लिस्ट करण्यात आले आहे काय, काही कंत्राटदार नाल्याची सफाई करण्यासाठी लहान मुलांचा सर्रास वापर करीत असतात त्यां कंत्राटदारावर कारवाई करण्यात आली आहे काय , नाला सफाईच्या कामासाठी या कंत्राटदाराना वर्षाला किती कोटी रुपयांचा निधी देण्यात आला होता , त्याचबरोबर नाल्यांची सफाई करत असतांना सेफ्टी व सिक्युरिटी कीटस न वापरणा-या कंत्राटदारांना ब्लॅक लिस्ट करण्यात आले आहे काय , दहा ते पंधरा वर्षापासून कंत्राटदार अशा प्रकारे काम करीत असतील तर त्यांना ब्लॅक लिस्ट करण्यात आले आहे काय वा त्यांना काढून टाकण्यात आले आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मघाशी मी माहिती दिली होती की, पावसाळयापूर्वी मोठया प्रमाणावर नाल्यांच्या सफाईची कामे होत असतात व ही कामे करण्यासाठी कंत्राटे देण्यात येतात. मी आपल्याला आकडेवारी सांगू इच्छितो की, जवळजवळ 292 किलोमीटर्स लांबीच्या नाल्यातून 4 लाख 28 हजार घन मीटर गाळ काढण्यात आला होता. त्याचबरोबर मी सुरुवातीलाच सांगितले होते की, काही कंत्राटदाराविरुध्द कारवाई करण्यात आली होती. वेळेत काम न करणे,गाळ काढल्यानंतर त्यावर सुगंधी द्रव्याची फवारणी न करणे, गाळ वाहून नेत असताना अच्छादित न करणे, कामाच्या ठिकाणी कामाचे फलक न लावणे, गाळ वेळेवर न उचलणे इत्यादी बाबीकरिता संबंधित कंत्राटदाराच्या विरुध्द कारवाई करता येते . तसेच दिरंगाई केल्यामुळे दंडात्मक कारवाई देखील करता येते. सफाईचे काम करीत असतांना कांमगाराचा मृत्यू झाल्यासबंधीची माहिती आता माझ्याकडे नाही. मी ही माहिती सन्माननीय सदस्यांना नंतर देईन. परंतु कामात कुचराई केल्याबद्दल आतापर्यत जवळजवळ 21 लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे आणि चुकीच्या पध्दतीने जर कंत्राटदाराने काम केले असेल तर निश्चितपणे त्याला ब्लॅक लिस्ट करण्याच्या बाबतीत आदेश देण्यात येतील.

------

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अकोला महानगरपालिकेतील भूमिगत गटार योजनेचे काम वाढीव दराने मंजूर केल्याबाबत**

**(5) * 12811 श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अकोला (जि.अकोला) महानगरपालिकेत भूमिगत गटार योजनेचे काम मे.रामकी या कंपनीस देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर काम 230 टक्के जास्त दराने देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर काम वाढीव दराने देताना शासनाची परवानगी घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1) होय.

(2),(3) व (4) प्रस्तुत योजनेचे काम कंत्राटदारास गैरवाजवी दराने दिल्याबाबत शासनाकडे तक्रार प्राप्त झाली असून त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेशी सबंधित हा प्रश्न असून अकोला महानगरपालिकेतील भूमिगत गटार योजना राबविण्यात आली होती त्यावेळी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी 132 कोटी रुपयांच्या योजनेला मान्यता दिली होती परंतु ज्यावेळी टेंडर निघाले त्यावेळी रामकी कंपनीला काम देते वेळी सर्व नियम धाब्यावर बसवून राज्य सरकारची परवानगी न घेता कार्यकारी अभियंता आणि तत्कालीन आयुक्त यांनी संगनमत करुन 320 टक्के जास्त दराने टेंडर दिले होते. प्रथम 132 कोटी रुपयांच्या योजनेला शासनाने मान्यता दिली होती त्याच्या 230 टक्के जास्त दराने या कंपनीला निविदा दिली म्हणजेच या कामामध्ये जवळजवळ 188 कोटी गैरव्यवहार झाला असून जास्त दराची निविदा मंजूर करण्यात आली होती त्यावेळी सीएसआर लावण्यात आला नव्हता. ज्यावेळी हे टेंडर मंजूर करण्यात आले होते त्यावेळी या महानगरपालिकेचे आयुक्त रजेवर होते. त्यांचे पत्रसुध्दा माझ्याकडे असून त्या पत्रात त्यांनी असे म्हटले होते की," मी आजारी असल्यामुळे वैद्यकीय उपचारासाठी दिनांक 11.1.2010 पासून वैद्यकीय रजेवर होतो आता माझी प्रकृती ठीक असून रजा उपभोगून मी दिनांक 17.2.2010

3..



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 12.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12811 श्री.पांडुरंग फुंडकर....

रोजी मध्यान्ह पूर्व आयुक्त,महानगरपालिका या पदावर रुजू होत आहे " .11 तारखेपासून आयुक्त सुट्टीवर गेलेले असतांना 25 जानेवारी 2010 रोजी टेंडर काढण्यात आले होते त्यावर त्या आयुक्तांनी सही केली होती .रजेवर असतांना त्याचा पदभार ज्या आयुक्ताकडे सोपविण्यात आला होता त्याची सुध्दा सही होती. भूमिगत गटार योजनेच्या 132 कोटी रुपयाच्या कामाला शासनाने मान्यता दिली असतांना 320 कोटी रुपयांचे टेंडर मंजूर कसे करण्यात आले होते, त्याला शासनाची मंजुरी घेतली होती काय, त्याचबरोबर नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी मान्यता घेतली होती काय, त्यावेळी सीएसआर लावला होता काय, जास्त दराने टेंडर मंजूर केले असल्यामुळे 188 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे त्याबद्दल संबंधित कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन ही निविदा शासन रद्द करणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12811....

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, प्रस्तुत योजनेची निविदा प्रक्रिया जानेवारी 2010 मध्ये पूर्ण करण्यात आली. त्यामध्ये विसंगती नाही परंतु प्रक्रियेला वेळ लागला आहे. सन 2006-07 च्या डीएसआर प्रमाणे 132 कोटींची निविदा होती. परंतु सन 2009-10 च्या डीएसआरप्रमाणे 290 कोटींचे आकलन करण्यात आले होते. त्यामुळे 290 आणि 315 मध्ये जास्त विसंगती नसल्यामुळे ही निविदा त्यावेळी मान्य करण्यात आली. या निविदा प्रक्रियेमध्ये तीन कंपन्यांनी सहभाग घेतला होता त्यापैकी एका कंपनीची निविदा मान्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतीत इतर निविदा भरणाऱ्या कंपन्यांनी आणि अनेक लोकप्रतिनिधींनी तक्रारी केल्या. यामध्ये लोकसभा सदस्यांपासून मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांपर्यंत बऱ्याच लोकांनी तक्रारी केल्या. त्यामुळे शासनाने 9 फेब्रुवारी 2011 रोजी आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश दिले आहेत. त्याच बरोबर 21.6.2010 रोजी नगरपालिका संचालकांनी आयुक्त, अकोला महानगरपालिका यांना या कंपनीला मोबिलायझेशन ॲडव्हान्स देऊ नये असे निदेश दिले आहेत. सदर तक्रारी बाबत आयुक्त आणि संचालक यांच्यामार्फत चौकशी सुरु असून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर शासन पुढील निर्णय घेईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ही योजना सुरुवातीपासून वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. केंद्र सरकारने युआयडीएसएस अंतर्गत 57 कोटी रुपये अकोला महानगरपालिकेला पाठविले आहेत. मागील दोन वर्षापासून ही रक्कम करंट अकाऊंटमध्ये पडली आहे. अशा परिस्थितीत 132 कोटींची योजना मे.रामकी कंस्ट्रक्शन कंपनीला देण्यात आली. हिवाळी अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी ही योजना 316 कोटींची झाली असल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे या योजनेकरिता 184 कोटी रुपये इतकी वाढीव रक्कम केंद्र सरकार देणार आहे की नाही? दुसरा प्रश्न असा की, अकोला महानगरपालिकेने 132 कोटी रुपयांच्या ठरावाला मंजूरी दिली होती परंतु त्या ठरावाचे अद्यापही कन्फर्मेशन झाले नाही. त्यांनी शासनाला विनंती केली आहे की, आम्हाला कन्फर्मेशन करावयाचे आहे तरीसुध्दा शासनाने अजून परवानगी दिलेली नाही. अशाप्रकारचा घोळ या योजनेमध्ये आहे. या योजनेबाबत सर्व पक्षांच्या लोकप्रतिनिधींनी, आमदारांनी, खासदारांनी, नगरसेवकांनी शासनाला वारंवार विनंती केली आहे. कॉस्टीटयुशनल प्रोव्हिजनमध्ये काही त्रुटी असल्यामुळे हा घोळ झालेला आहे. याकरिता आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

ता.प्र.क्र. 12811....

श्री. गोपीकिसन बाजोरिया....

आपल्या दालनामध्ये बैठक घेऊन ही योजना मार्गी लावण्यासाठी कोणती उपाय योजना करणार आहात, तसेच बाकीच्या निविदा प्रक्रिया आपण रद्द करुन त्यांची चौकशी करणार काय?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, या बाबत निश्चितपणे तक्रारी आलेल्या आहेत. सन 2006-07 च्या डीएसआरप्रमाणे 132 कोटींची किंमत होती परंतु सन 2009-10 च्या डीएसआरप्रमाणे 290 कोटींचे आकलन करण्यात आले आणि 315 कोटींना ही निविदा मान्य करण्यात आली. याबाबत तक्रारी करण्यात आल्यामुळे शासनाने फेब्रुवारी 2011 मध्ये चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचबरोबर मोबिलायझेशन ॲडव्हान्स देऊ नये असे सांगितले आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत निश्चिपणे मार्ग काढण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, 230 कोटींचे अबाऊ एस्टिमेट तयार करणारे अधिकारी कोण होते? 215 टक्के अधिकचे टेंडर असेल तर फेरनिविदा काढावी असा नियम आहे. म्हणून माझी विनंती आहे की, 230 टक्के अधिकचे टेंडर आपण स्वीकारावयास लागलो तर ते बरोबर होणार नाही. त्याठिकाणी कुकरे नावाचे आयुक्त होते त्यांना या सभागृहामध्ये तीन वेळा निलंबित केले आहे. याकरिता हे सभागृह एक दिवस बंद केले होते.अशी या अकोला महानगरपालिकेची परिस्थिती आहे. मी या महिन्यात तीन वेळा अकोल्याला गेलो आहे. त्याठिकाणी कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नाहीत. त्याठिकाणी कचरा उचलायला कुणी तयार होत नाही अशी या अकोला महानगरपालिकेची अतिशय वाईट परिस्थिती झाली आहे. आज तेथील लोक असे म्हणत आहेत की, आमची नगरपालिका बरी होती परंतु ही महानगरपालिका आम्हाला नको. तेव्हा या अकोला महानगरपालिकेचे "क" वर्ग नगरपालिकेमध्ये रुपांतर करण्याचा शासन विचार करील काय?

(यानंतर श्री. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:55

ता.प्र.क्र.12811

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, पहिल्यांदा मी केंद्र शासनाच्या योजनेबद्दल माहिती देतो. जर किंमत वाढली तर ती देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असते. राज्य शासन 50 टक्के वाढीव रकमेसाठी मदत करीत असते. पण मला सांगण्यात आले की, या विषयाच्या बाबतीत संपूर्णपणे चौकशी सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहेत. त्यामुळे याबाबतीत बऱ्याच लोकप्रतिनिधींनी तक्रारी केलेल्या आहेत. याबाबत संपूर्ण चौकशी सुरु असून जो दोषी अधिकारी असेल, त्याच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. मला वाटते की, सन्माननीय सदस्यांचे मुद्दे गंभीर स्वरुपाचे आहेत आणि चौकशी सुरु असल्यामुळे त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कारवाई केली जाईल असे मी आश्वासन देतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, याबाबत चौकशी सुरु आहे. जेव्हा मागच्या वेळेस हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, तेव्हा देखील चौकशी सुरु आहे असेच उत्तर देण्यात आले होते. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, हे काम 320 कोटी रुपयांना देण्यात आले आणि 230 टक्क्यांनी हे काम वाढवून दिलेले आहे. यासाठी शासनाची परवानगी घेण्यात आली होती काय, तसेच जोपर्यंत ही चौकशी पूर्ण होत नाही तोपर्यंत हे काम थांबविण्यात येणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्येच सांगितले होते की, मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्याची जी पध्दत आहे, ती थांबविण्यात आली आहे. त्यामुळे या कंपनीला हे काम दिले जाणार नाही. कारण त्यांना मोबिलायझेशन ॲडव्हान्सच दिलेला नाही. त्यामुळे याबाबतीत लवकरात लवकर चौकशी पूर्ण करुन ॲक्शन घेतली जाईल असे मी आश्वासन दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरहू कंपनीला 230 टक्क्यांनी काम वाढवून देण्यात आले, त्यावेळी शासनाची परवानगी घेण्यात आली होती काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्याला सांगितले की, 2006 चे डीएसआर रेट 232 कोटी रुपये होते हे खरे आहे.परंतु 2009 चे डीएसआर रेट प्रमाणे ती किंमत 290 कोटी रुपये होती. त्यामुळे 315 कोटी रुपयांच्या बाबतीत सांगावयाचे तर यातील फरकाचे अंतर 220 टक्के नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

-----

. . . K 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना रेशनकार्ड देण्याबाबत**

**(6) * 14064 श्री. एस. क्यू. ज़मा** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील दारिद्र्यरेषेखालील महिलांना रेशनकार्ड देण्याच्या योजनेअंतर्गत गेल्या दोन वर्षात केवळ आठच महिलांना सरकारतर्फे रेशनकार्ड देण्यात आले असल्याची बाब दिनांक 13 नोव्हेंबर, 2010 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शहरातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना दरमहा 35 किलोग्रॅम अन्नधान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, दारिद्र्य रेषेखालील महिलांना रेशनकार्ड देण्यात न आल्यामुळे गरीब व गरजू महिलांना या योजनेपासून वंचित राहावे लागत असल्यामुळे दारिद्र्य रेषेखालील महिलांना त्वरीत रेशनकार्ड देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.अनिल देशमुख** : (1), (2) व (3) राज्यात दारिद्र्य रेषेखालील यादीनुसार तसेच, शासनाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार 67.14 लक्ष एवढ्या पात्र लाभार्थ्यांना दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिका वितरित करण्यात आलेल्या आहेत. दिनांक 29.9.2008 व दि.17.1.2011 अन्वये परित्यक्ता व निराधार महिलांचे नाव दारिद्र्य रेषेखालील यादीत नसले तरी त्यांना दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिका व त्यावरील अनुज्ञेय धान्याचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.त्यानुसार आतापर्यंत सुमारे 7504 शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय,या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

"याठिकाणी उपप्रश्न क्र.1, 2 व 3 ला दिलेल्या उत्तरातील शेवटच्या ओळीमध्ये "त्यानुसार आतापर्यंत 7504 शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत." असे उत्तर देण्यात आले आहे. त्याऐवजी "त्यानुसार आतापर्यंत सुमारे 26,970 शिधापत्रिका वितरित करण्यात आल्या आहेत." असे वाचण्यात यावे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मंत्री जी ने निराधार और तलाकशुदा महिलाओं के बारे में बात की है. मंत्री महोदय ने उत्तर में कहा है कि 67.14 लाख बी.पी.एल. कार्डधारक हैं. मेरा पहला प्रश्न यह है कि बी.पी.एल. कार्डधारकों की संख्या के बारे में सर्वे कब हुआ था, क्या बी.पी.एल. कार्डधारकों की संख्या के बारे में रि-सर्वे कराने का शासन का कोई कार्यक्रम है ? सार्वजनिक वितरण प्रणाली को मॉनिटर करने के लिए विधानसभा क्षेत्र के अनुसार दक्षता समिति

. . . K 3

समिति बनाई जाती है. ये दक्षता समितियां काफी समय से नहीं बनी हैं. मेरा दूसरा प्रश्न यह है कि दक्षता समितियां बनाने के बारे में शासन की क्या योजना है ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, राज्यात दारिद्रय रेषेखालील जी यादी आहे, त्यामध्ये 67.14 लाख लाभार्थी आहेत. पण याठिकाणी जो प्रश्न विचारण्यात आलेला आहे, त्याचा प्रामुख्याने असा रोख दिसतो की, ज्या परित्यक्ता आणि निराधार महिला आहे, त्यांच्यासाठी शासनाची कोणती योजना आहे ? महाराष्ट्रामध्ये परितक्ता आणि निराधार महिला आहेत, त्याबाबत आपण 2008 मध्ये निर्णय घेतलेला असून परित्यक्ता आणि निराधार महिलांचे नाव बी.पी.एल.च्या यादीमध्ये नसले तरी देखील त्यांना बी.पी.एल.च्या योजनेचा लाभ द्यावा अशा प्रकारचा निर्णय झाला असून, त्यानुसार आपण जवळजवळ 27 हजार शिधापत्रिकांचे वाटप केलेले आहे आणि पुढील काळामध्ये देखील याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी दक्षता समितीच्या बाबत प्रश्न विचारला. याबाबत सांगावयाचे तर दक्षता समित्या लवकरात लवकर गठीत करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, आपण या योजनेचा लाभ एकंदर 67 लाख 14 हजार एवढया पात्र लाभार्थ्यांना देतो. महाराष्ट्रात एकूण दारिद्र्यरेषेखाली असणाऱ्या कुटुंबांची संख्या किती आहे, या सर्वजणांना लाभ देण्याच्या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय ? कारण दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांची संख्या ही बिहार आणि उत्तर प्रदेश या राज्यांनंतर महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर असून येथे ही संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या दृष्टीकोनातून विशेष बाब म्हणून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन जास्तीतजास्त दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांना या योजनेचा लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करणार आहात काय ? तसेच याबाबतीत रि-सर्व्हे होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण जे पात्र नाहीत ते या योजनेचा लाभ घेतात आणि जे खरोखर दारिद्र्य रेषेखालील लोक आहेत, त्यांना लाभ मिळत नाही अशी स्थिती आहे. या दोन प्रश्नांच्या बाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र.14064...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रात सध्या दारिद्रय रेषेखालील लाभार्थींची संख्या 67.14 लक्ष इतकी आहे. केंद्र शासनाने काही गाईडलाईन्स माहितीसाठी पाठविल्या होत्या. पण आता केंद्र शासनाच्या फायनल गाईडलाईन्स पुढील बीपीएलचा सर्व्हे करण्यासाठी लवकरात लवकर येत आहेत. यापूर्वी बीपीएलच्या यादीमध्ये वर्ग-3 व वर्ग-4 चे शासकीय कर्मचारी होते त्यांना आता या बीपीएलच्या यादीतून रद्द करण्यात आलेले आहे. ज्याचा पगार प्रतिमहा 10 हजार रुपये आहे, ज्यांच्याकडे चार चाकी वाहन आहे त्यांना या यादीतून रद्द करण्यात आलेले आहे. अशा प्रकारचे काही निकष केंद्र शासन नक्की करीत आहे. केंद्र शासनाचे निकष आल्यानंतर महाराष्ट्रात लवकरात लवकर बीपीएलचा सर्व्हे सुरु करण्यात येईल.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, दारिद्रय रेषेखालील लोकांच्या संदर्भातील अटी पूर्ण केल्या पाहिजेत हे ठीक आहे पण जे वृध्द निराधार आहेत ते घराच्या बाहेर पडू शकत नाहीत. या लोकांना रेशनकार्ड दिले जात नाही. किंवा रेशनकार्ड देताना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो. या संबंधात मी स्वत: लढा देत आहे. मी ही गोष्ट मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिलेली आहे. शासनामार्फत दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी अनेक योजना करण्यात येतात पण त्या योजना या लोकांपर्यंत पोहचत नाहीत तेव्हा या संदर्भात शासन वेगळा विचार करणार आहे काय? निराधार लोकांना जे रेशनकार्ड दिले जाते त्या रेशनकार्डवर रॉकेल दिले जाते काय हे पाहिले पाहिजे. कारण माझ्या निदर्शनास असे आले आहे की, एका वृध्द स्त्रीला फक्त एक लिटर रॉकेल दिले जाते. या एक लिटर रॉकेलमध्ये तिला आपला स्टो देखील पेटवता येत नाही, अशी स्थिती आहे. परित्यक्ता व निराधार लोकांना नेमके किती रॉकेल देण्यात येते आणि त्याप्रमाणे ते दिले जात नसेल तर ते दिले जावे यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची एखादी स्पेसिफिक तक्रार असेल तर त्यांनी त्या संबंधीची माहिती द्यावी त्याबाबत शासन निश्चितपणे चौकशी करील. बीपीएलच्या लाभार्थ्यांचे सर्व लाभ सर्व परित्यक्ता महिलांना व निराधारांना देण्यात येतील अशा प्रकारचा निर्णय सन 2008 मध्ये घेण्यात आलेला आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने राज्यातील परित्यक्ता महिलांना व निराधार लोकांना मदत करण्याच्या दृष्टीने ही एक अतिशय लोकोपयोगी आणि महत्वाकांक्षी योजना





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र.14064...

श्री. भाई जगताप....

आहे. उत्तरात असे म्हटले आहे की," दारिद्रय रेषेखालील पिवळया शिधापत्रिका व त्यावरील अनुज्ञेय धान्याचे लाभ तात्पुरत्या स्वरुपात देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तो लाभ कायम स्वरुपी करण्यता येईल काय आणि तो कधी पर्यंत करण्यात येईल?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे केंद्र शासनाने बीपीएलच्या लाभार्थ्यांसाठी निर्धारित कोटा दिलेला आहे. त्या कोटयामध्ये जी पाच-दहा टक्के सेव्हिंग होते त्यातून स्पेशल केस म्हणून परित्यक्ता आणि निराधारांना वाटप करण्यात येते. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात असे उत्तरात म्हटले आहे. परित्यक्ता आणि निराधारांना कायम स्वरुपी बीपीएलच्या लाभार्थ्यांचा फायदा दिला पाहिजे यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या योजनेमध्ये 'परित्यक्ता' असा शब्द वापरण्यात आलेला आहे पण 'परित्यक्ता' म्हणजे काय हे बऱ्याच लोकांना माहीत नाही. या महिला सासरच्या छळामुळे किंवा अन्य काही कारणामुळे एकटया रहात असल्या तरी त्यांचे नाव सासरच्या रेशनकार्डवर असते. म्हणून या महिलांना परित्यक्ता म्हणून वेगळे रेशनकार्ड मिळत नाही तोपर्यंत या महिला या योजनेचा लाभ घेऊ शकत नाहीत, ही यामधील अडचण आहे.

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या परित्यक्ता महिलांच्या पोटगीच्या केसेस प्रलंबित आहेत किंवा ज्या परित्यक्ता महिला एकटया रहातात अशा महिलांना शिधापत्रिका देण्याच्या संदर्भात मोहिम घेण्यात येईल काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सन 2003 साली राज्य शासनाने मानव विकास अहवाल प्रकाशित केला. त्यातील आकडेवारी पाहिली तर महाराष्ट्रात निराधार स्त्रीयांची संख्या 8.8 मिलियन म्हणजे 88 लाख आहे. या पार्श्वभूमीवर दारिद्रय रेषेखालील महिला किती आहेत, हा वेगळा चर्चेचा विषय आहे. पण 8.8 मिलियन महिला या एकटया कुटुंब प्रमुख आहेत त्या सगळयांचा आकडा आणि राज्य शासनाचा यासंबंधीचा आकडा यामध्ये प्रचंड तफावत आहे. म्हणून मला या ठिकाणी दुसरा प्रश्न विचारावयाचा आहे की, या बद्दल एखादी मोहिम घेण्यात यावी व ज्या परित्यक्ता व निराधार महिलांना या लाभाची आवश्यकता आहे त्यासंबंधीची आकडेवारी निश्चित करण्यात यावी. तसेच यासंदर्भात शासनातील अधिकाऱ्यांना ट्रेनिंग देणे आवश्यक आहे अन्यथा ही योजना कागदोपत्रीच राहील.



SMT/ KTG/ KGS/ D/ MMP/ 13:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र.14064...

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, शासनाने परित्यक्ता महिलांची व्याख्या केलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे. "ज्या विवाहित स्त्रीला पतीने सोडल्यामुळे किंवा घरातून काढल्यामुळे पती सोबत रहात नाही व किमान दोन वर्षे जिचा सासरशी काहीही संबंध नाही, मात्र तिचा अधिकृत घटस्फोट झालेला नाही, ती स्वतंत्ररित्या किंवा नातेवाईकांकडे रहाते, ज्यांना आर्थिक उत्पन्नाचा स्वतंत्र स्त्रोत नाही अशा महिला"

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14064 ..... श्री. अनिल देशमुख....

आता याबाबत मोठ्या प्रमाणावर प्रचार करीत आहोत जेणेकरुन अशा लोकांनी याचा मोठ्या प्रमाणावर फायदा घ्यावा. प्रामुख्याने ग्रामीण भागामध्ये ग्रामसेवक, पोलीस पाटील, तलाठी आणि सरपंच यांनी प्रमाणित केले तर त्यांच्या प्रमाणपत्रावर आम्ही त्यांना लाभ देतो. शहरामध्ये जे कर निरीक्षक किंवा टॅक्स कलेक्टर आहेत त्यांना प्रमाणित करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्यांनी जर प्रमाणित केले की, अमुक महिला परित्यक्ता आहे तर त्या प्रमाणपत्रावर, त्यांच्या शिफारशीवर त्यांना 35 किलो धान्य मोफत देतो.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण प्रश्नोत्तराचा वेळ वाढवून दिलेला नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तरासाठी मी पाच मिनिटे वाढवून दिलेली आहेत. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने सुरुवातीला साधारणत: पाच मिनिटे चर्चा झाली. तेवढा वेळ मी वाढवून दिलेला आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, अनुक्रमांक 8 वरील प्रश्न घेण्याबाबत मी आपल्याला विनंती केली होती.

**सभापती** : अनुक्रमांक 8 वरील प्रश्नाच्या अनुषंगाने मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्या अनुषंगाने अन्य कोणत्या मार्गाने चर्चा घ्यावयाची या बाबतीत मी नक्की विचार करीन. मला सभागृहाला एक विनंती करावयाची आहे. आज आपण सहाव्या प्रश्नापर्यंत गेलो. त्यानंतर अनुक्रमांक 7, अनुक्रमांक 8 , अनुक्रमांक 9 वर जे महत्वाचे प्रश्न आहेत ते राहिलेले आहेत. काही वेळा प्रश्न डेव्हलप करण्याच्या निमित्ताने जास्त वेळ घेतल्यामुळे मूळ प्रश्न बाजूला राहतो. मला असे वाटते की, आपल्या सभागृहामध्ये दररोज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान 10 ते 11 प्रश्न उत्तरित व्हावेत, या दृष्टीने आपण प्रयत्न करु. रोज एवढे प्रश्न होतीलच असे नाही. पण आपण 14 प्रश्नापर्यंत गेलो तर आनंदच आहे. कारण या सभागृहामध्ये प्रश्न यावा म्हणून सन्माननीय सदस्य प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. एखाद्या सदस्याचा प्रश्न अनुक्रमांक 7 वर असेल आणि तो प्रश्न जर चर्चेला आला नाही तर त्यांना दु:ख होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**सभापती** ....

संदर्भात अनुक्रमांक 8 वर जो प्रश्न आहे त्याबाबत मी सांगितले की, सगळ्यांच्या भावना लक्षात घेऊन वेगळ्या पध्दतीने आपल्याला सभागृहात चर्चेला वाव देईन. ती चर्चा आपण घेऊ. परंतु माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये किमान 7 मिनिटे घ्यावयाची, असे होऊ नये. आपण दररोज किमान 11 ते 12 प्रश्न चर्चेला घेण्याचा निर्धार करु.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे शहरामध्ये आणि जिल्ह्यामध्ये गरिबांसाठी असलेले एकमेव ससून हॉस्पिटल आहे. त्या ठिकाणी सर्वसामान्य आणि गरीब रुग्णांवर उपचार केले जातात. गेल्या पाच दिवसांपासून म्हणजे शुक्रवारपासून ससून हॉस्पिटलचा पाणी पुरवठा खंडित झालेला आहे. त्या ठिकाणी रोज 50 च्या वर शस्त्रक्रिया केल्या जातात. परंतु पाणी पुरवठा खंडित झाल्यामुळे शस्त्रक्रिया होऊ शकलेल्या नाहीत. त्या ठिकाणी रुग्णांच्या बाबतीत अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणी बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय आहे. त्या महाविद्यालयामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पिण्यासाठी, आंघोळीसाठी पाणी नाही. त्यांची मेस सुध्दा दोन दिवसांपासून बंद झालेली आहे. या गंभीर प्रश्नाकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. नगरविकास खात्याने पुणे महानगरपालिकेकडे तक्रार करुन तीन दिवस झाले तरी अजून पाणी पुरवठा चालू झालेला नाही. तेथील पाणीपुरवठा त्वरित सुरु करण्याबाबत दक्षता घेण्याचे काम नगरविकास खात्याने करावे असा मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

**सभापती** : आपण जातीने या बाबतीत लक्ष घालावे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, ठीक आहे.

---

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "कोयना प्रकल्प व राज्यातील अन्य प्रकल्पांतर्गत बहुसंख्य विस्थापित खातेदारांना अद्यापपर्यंत जाहीर केलेल्या शासन निर्णयानुसार जमीन वाटप, घरांचे प्लॉट तसेच नागरी सुविधा देण्याची अंमलबजावणी न होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "धुळयातील आदिवासी टोकरे कोळी, महादेव कोळी बांधवांवरील दिनांक 10 ऑगस्ट, 2009 रोजी झालेल्या गोळीबार प्रकरणामध्ये संबंधितांवर कारवाई करण्याची फेब्रुवारी, 2011 मध्ये करण्यात आलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 15 मार्च, 2011 रोजी मुंबईहून सोलापूरकडे जाणारा भारत गॅस कंपनीचा टँकर एका झाडाला आदळून गॅस गळती झाल्याने वाहतूक ठप्प झाली, असा ज्वलनशील पदार्थ ने-आण करण्याकरिता वाहतुकीचे नियम व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, पाशा पटेल यांनी "बीड जिल्ह्यासह मराठवाडयात फेब्रुवारी, 2011 च्या महिन्यात झालेला अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2....

**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, धनंजय मुंडे यांनी "दिनांक 9 मार्च, 2011 रोजी 12 वी वाणिज्य शाखेच्या ऑर्गनायझेशन ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट या विषयाच्या इंग्रजी माध्यमाच्या प्रश्न पत्रिकेत झालेल्या चुका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "एचआयव्ही चाचणीसाठी आवश्यक असलेल्या एचआयव्ही कीट्स-1 चा मुंबईच्या 80 टक्के रुग्णालयात असलेला तुटवडा,परिणामी रुग्णांचे होत असलेले हाल" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, धनंजय मुंडे यांनी "दिनांक 14 मार्च, 2010 रोजी अंधेरी (प.) येथील सहानी ग्रुप डेव्हलपर्स यांच्या बांधकाम साईटवर दोन कर्मचाऱ्यांचा झाला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा परिसरातील 159 शाळांमधील शिक्षकांना कधी जनगणना तर कधी अधिवेशनाचे काम या कारणांमुळे शाळेतील वाढत चालेली अनुपस्थिती त्यामुळे ऐन परीक्षेच्या मोक्यावर विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, दिवाकर रावते यांनी "अकोला, वाशिम जिल्ह्यातील धान्य व्यापाऱ्यांची कायदेशीर व लायसन्सवर नोंद करुन साठवण केलेला धान्य साठा, अपर जिल्हाधिकारी, अकोला यांनी जप्त करणे, सदर साठा अत्यंत खराब होण्याच्या परिस्थितीत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

3....



NTK/ MMP/ D/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "संत गोरोबा शिक्षण प्रसार मंडळ, सिडको नवीन नांदेडद्वारा संचालित प्राथमिक आश्रमशाळा, नांदेड या संस्थेचे मुख्याध्यापक यांचेकडून कर्मचाऱ्यांना दिला जाणारा आर्थिक व मानसिक त्रास" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खारेपाटण येथील सुख नदीतील गाळ उपसण्याचे काम काढलेला गाळ सुख नदीच्या काठावरच भराव केल्यामुळे तो पुन्हा नदीत येऊन तेथील लोकांच्या आरोग्यास संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी " जिल्हा उद्योग केंद्रामार्फत बेरोजगारांना उद्योगधंदे करण्यासाठी बीज भांडवल योजनेंतर्गत करण्यात येणारा कर्जपुरवठा, त्याची परतफेड होऊ न शकल्यामुळे निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सर्व 93 च्या सूचना मी दालनामध्ये नाकारलेल्या आहेत.

-----

4....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

**पृ.शी.**: विकास प्रकल्पांतर्गत मुंबईच्या झोपडपट्टीत विस्थापित होत असलेल्या अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांना एसआरए योजनेंतर्गत चार चटई क्षेत्र निर्देशांक मिळण्याची उपनगर शिक्षण संस्थेने केलेली मागणी

**मु.शी.**: विकास प्रकल्पांतर्गत मुंबईच्या झोपडपट्टीत विस्थापित होत असलेल्या अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांना एसआरए योजनेंतर्गत चार चटई क्षेत्र निर्देशांक मिळण्याची उपनगर शिक्षण संस्थेने केलेली मागणी यासंबंधी श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"एसआरए योजनेअंतर्गत अनेक विकास प्रकल्पांमध्ये मुंबईच्या झोपडपट्टीत विस्थापित होत असलेल्या अनेक अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळांचे एसआरएच्या विद्यमान व्यवस्थेत पुनर्वसन होणे निव्वळ अशक्य असल्यामुळे अशा शाळांना चार चटई क्षेत्र निर्देशांक मिळावा अशी मागणी उपनगर शिक्षण संस्था संघाने शासनाकडे गेली चार वर्षे करुनही ती पूर्ण न होणे, परिणामी या संघटनेने दिलेला तीव्र आदोलनांचा इशारा, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दि. १८ ऑक्टोबर, २००७ रोजी झालेल्या बैठकीत याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देऊनही नगरविकास, एसआरए प्राधिकरण आणि मनपा यांच्याकडून कोणतीही ठोस अंमलबजावणी न होणे, शिक्षण हक्क कायदयानुसार स्वतंत्र प्रसाधनगृह, संगणक व विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्टाफ रुम, किमान चारशे फुटाच्या सुसज्ज वर्गखोल्या, क्रीडांगण आदी सुविधा जागे अभावी पुरवता येत नसल्यामुळे या शाळांच्या शैक्षणिक दर्जावर तसेच त्यातील काही लाख विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या शारीरिक आरोग्यावर होत असलेला अत्यंत गंभीर परिणाम, अशा सर्व शाळांना चारपैकी दोन चटई क्षेत्र

५....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.कपिल पाटील.....

विक्री योग्य देऊन त्याचा वापर त्याच जागेत करता येत नसल्यास, विक्री योग्य चटई क्षेत्र अन्यत्र हस्तांतरीत करण्यास परवानगी देऊन या शाळांचे तातडीने पुनर्वसन व विकास करण्याची आवश्यकता असताना, याबद्दल होणारी अक्षम्य हेळसांड आणि त्यामुळे निर्माण झालेला असंतोष व संताप, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

श्री.सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना नगरविकास विभाग व गृहनिर्माण विभाग या दोन्ही विभागांशी संबंधित आहे. त्यामुळे सन्माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री या लक्षवेधी सूचनेला कितपत उत्तर देऊ शकतील अशी मला शंका वाटते. सभापती महोदय, 2007 सालापासून सातत्याने आम्ही हा प्रश्न उपस्थित करीत आहोत. आपण या लक्षवेधीच्या निवेदनातील शेवटून दुसऱ्या परिच्छेदामधील मजकूर वाचावा. ज्या शाळांचे आरक्षण आहे, त्यांच्यासंबंधातील हा परिच्छेद आहे आणि तो अप्रस्तुत आहे. मुंबईतील 500 शाळा झोपटपट्टयांमध्ये आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

त्या शाळांच्या खालची जागा त्या शाळांसाठी आरक्षित नाही. त्या 30-40 वर्षापासूनच्या मान्यताप्राप्त अनुदानित शाळा आहेत. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन होत असताना या शाळांना विस्थापित व्हावे लागते. माझ्या माहितीप्रमाणे अशा प्रकारे 5 शाळा विस्थापित झालेल्या आहेत. बिल्डर अशा शाळांना फक्त 269 चौ.फूट जागा देतात. त्या पेक्षा अधिकची जागा शाळेसाठी दिली जात नाही. मग आधी असलेली जागा या शाळांना सोडावी लागते आणि परागंदा व्हावे लागते.अशा शाळांसाठी 4 एफएसआय मिळावा अशी माझी मागणी होती. या प्रश्नासंबंधी 2 बैठका महानगरपालिका आणि 2 बैठका मंत्री महोदयांच्याकडे झालेल्या आहेत. तेव्हा अशा शाळांना 4 एफएसआय मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, हा प्रश्न समजून घेण्याची आवश्यकता आहे. एसआरए ही झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्याची योजना आहे. सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा हा भविष्यामध्ये शिक्षणाची व्यवस्था करण्याच्या दृष्टीने किंवा इतर सार्वजनिक हिताच्या काही गोष्टी करण्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. बालवाडी असेल, वेल्फेअर सेंटर असेल किंवा काही कार्यालये असतील तर त्यादृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. यामध्ये तीन भाग आहेत. एक तर अस्तित्वात असलेल्या शाळेला संबंधित विकासकाने जागा द्यायलाच पाहिजे कारण त्यांना फ्री-ऑफ एफएसआय दिला जातो. त्याठिकाणी महानगरपालिकेची शाळा असेल किंवा खाजगी शाळा असेल तर त्या शाळेला जागा देणे क्रमप्राप्त आहे. दुसरा निर्णय असा आहे की, पूर्ण भूखंडाच्या 15 टक्के पेक्षा अधिक नाही किंवा त्या भूखंडावर आरक्षित असलेल्या क्षेत्राच्या 25 टक्के क्षेत्र या पैकी जे कमी असेल तेवढ्या क्षेत्रफळाची शाळेची इमारत बांधून ती महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरित करण्यात येते. मात्र असा भूखंडा प्राथमिक शाळेसाठी आरक्षित असल्यास त्याठिकाणी किमान 500 विद्यार्थी क्षमता असलेली इमारत आणि माध्यमिक शाळेसाठी भूखंड आरक्षित असल्यास किमान 800 विद्यार्थी क्षमता असलेली इमारत बांधून हस्तांतरित करण्यात येते. अशा प्रकारची तरतूद असताना हा प्रश्न निर्माण होण्याची आवश्यकता नव्हती. परंतु सन्माननीय सदस्यांनी शाळांसाठी एफएसआय जास्त द्यावा अशी मागणी केलेली आहे. एसआरअेच्या माध्यमातून झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याची संकल्पना आहे. जास्त एफएसआय दिला तर बिल्टअप एरिया

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

कमी होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही बाब एसआरएवर लादण्याची भूमिका घेतली तर त्यामुळे एसआरएची संकल्पना विस्थापित होईल.

श्री. अरुण गुजराथी : सन्माननीय सदस्यांनी 4 एफएसआय देण्याची मागणी केलेली आहे. एकूणच झोपडपट्टयातील विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ? जेथे एफएसआयची मागणी होते त्यासंदर्भात नगरविकास विभाग, गृहनिर्माण विभाग आणि महानगरपालिका या तिघांनी एकत्र येऊन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार स्वतंत्र प्रसाधनगृह, संगणक व विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्टाफ रुम, किमान चारशे फुटाच्या सुसज्ज वर्गखोल्या, क्रीडांगण अशा सुविधा मिळणे आवश्यक आहे. एसआरएच्या माध्यमातून या सुविधा मिळणार नाहीत. म्हणून याबाबतीत शासन नवीन योजना तयार करील काय ?

श्री. सचिन अहिर : एका विभागाचा किंवा वॉर्डचा विचार करता अशा सूचनेचे स्वागत केले पाहिजे. मी आधी सांगितल्या प्रमाणे ही बाब एसआरएवर लादणे योग्य होईल की नाही हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे त्या भागामध्ये शाळेची गरज आहे. त्याबाबतीत काही करता करता येईल का यादृष्टीने नगर विकास खात्याशी चर्चा करण्याचा प्रयत्न होईल.

श्री. कपिल पाटील : मंत्री महोदय सहानुभूती दाखवत आहेत. शाळेची संपूर्ण जागा ही बिल्डरच्या घशात टाकायची आहे काय ? शाळेसाठी जागा द्यावयास पाहिजे हे लेखी निवेदनामध्ये मान्य केलेले आहे. एसआरएच्या नावाखाली झोपडपट्टयांचा पुनर्विकास करीत असताना अनेक शाळा विस्थापित करण्याचा प्रयत्न झालेला आहे. झोपडपट्टीतील शाळा ह्या मान्यताप्राप्त आहेत आणि ऑक्युपाईड जागेवर त्यांचे पुनर्वसन होत नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ल.वे.सू.क्रमांक-1........ श्री.कपिल पाटील........

त्यांना तुम्ही 269 चौ.फुटाची जागा देत आहात. माननीय राज्यमंत्री हे महापालिकेने द्यावयाची जागा आणि आरक्षित भूखंड विकासाबद्दलची माहिती देत आहेत. त्या विषयाचा या लक्षवेधी सूचनेतील विषयाशी सुतराम संबंध नाही. एसआरए प्राधिकरण आणि महापालिकेने यासंबंधीचा अहवाल नगरविकास विभागास सादर केला आहे. वास्तविक या लक्षवेधी सूचनेचे उत्तर नगरविकास विभागाने देणे अपेक्षित आहे. एसआरए प्राधिकरण आणि माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री यांचे धोरण पूर्णपणे बिल्डरधार्जिणे आहे. शाळा विस्थापित करणारे धोरण आहे. लाखो विद्यार्थी आज झोपडपट्टीतील शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. हिंदी, उर्दू, गुजराथी, मराठी भाषांच्या या शाळा आहेत. तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणाचा हक्क मिळाला पाहिजे. त्यांनी दुसरीकडे विस्थापित होऊन जायचे का? त्या शाळांना एफएसआयचा फायदा मिळाला पाहिजे. डी.सी.रुल्स 33(10) मध्ये बदल केल्याशिवाय हे पुनर्वसन अशक्य आहे असे महापालिका आणि एसआरए प्राधिकरण यांनी शासनास कळविले आहे. दिनांक 18 ऑक्टोबर, 2007 रोजी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते. गेल्या वर्षी एसआरए प्राधिकरणाने अहवाल सादर केला. एक वर्ष होऊनही याबद्दल कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शासनाची भूमिका ही शाळा विस्थापित व्हाव्यात आणि बिल्डरांना एफएसआयचा फायदा मिळावा अशी आहे. राज्यमंत्री महोदय उत्तर देऊ शकत नसतील तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. माननीय नगरविकास मंत्री किंवा मुख्यमंत्री यांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्य याठिकाणी विषयांतर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. एसआरए प्राधिकरणाची भूमिका बिल्डरधार्जिणी नाही. उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, तेथे जेवढी जागा शाळेची असेल किंवा ती शाळा महापालिकेची, खाजगी संस्थेची किंवा ट्रस्टची असेल त्या शाळेला तेवढी संपूर्ण जागा देणे तेथील विकासकाला क्रमप्राप्त आहे अशी भूमिका घेतलेली आहे. विकास योजनेप्रमाणे आरक्षण असेल तर त्या आरक्षणाची देखील तरतूद केली जाते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा उत्तराला आक्षेप आहे. निवेदनातील दुसऱ्या परिच्छेदातील माहितीची मंत्री महोदय द्विरुक्ती करीत आहेत, सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी पुरवणी प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी असेही सांगितले की, शाळेचे आरक्षण असेल तर जागा मिळाल्यानंतर ती जागा महापालिकेला शाळा चालविण्यासाठीच दिली जाते. शाळांची बाबतीत भूमिका मान्य आहे. परंतु एसआरए योजनेची मूलभूत संकल्पना आणली आहे ती झ ाोपडपट्टीचा पुनर्विकास करुन घरे उपलब्ध करुन देण्यासाठी आहे. म्हणून मी तसे उत्तर दिले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, गृहनिर्माण विभागाने नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. तसे असेल तर त्यांनी माहिती द्यावी, निश्चितपणे त्या प्रस्तावाची माहिती घेऊन नगरविकास विभागाकडे पाठपुरावा करावयाचा असेल तर ती भूमिका घेतली जाईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी पुन्हा उत्तराला आक्षेप घेत आहे. मी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना ही अनआरक्षित जागेवरील झोपडपट्टीतील शाळांबाबत आहे. आरक्षित भूखंडावर शाळा, महाविद्यालयासाठी जागा राखून ठेवण्याबद्दलचा हा विषय नाही. मुंबई शहरात शाळांसाठी भूखंड न दिल्यामुळे आणि गरज असल्यामुळे झोपडपट्टीमध्ये शाळांची संख्या जास्त आहे. मुंबई शहरात 500 शाळा झोपडपट्ट्यांमध्ये आहेत. शासनाच्या भूखंडावर नाहीत अशा शाळांचा हा विषय आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचा देखील शाळेच्या विकासाचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांच्या विभागाने प्रस्ताव पाठविला आहे का? म्हणजे त्यांच्या विभागाने पाठविलेल्या प्रस्तावाची त्यांनाच माहिती नाही अशी स्थिती आहे. म्हणून मी मागणी केली की, माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आपण गृहनिर्माण व नगरविकास विभागाच्या मंत्री महोदयांसोबत संयुक्तपणे बैठक आयोजित करावी. अन्यथा या विषयाबाबत न्याय मिळणार नाही. निवेदनातील दुसऱ्या परिच्छेदातील नमूद केलेली माहिती ही पूर्णपणे बिल्डरधार्जिणी आहे. एसआरए योजनेमध्ये काय चालले आहे हे मी सांगण्याची गरज नाही. शाळांचे आरक्षण रद्द केले जाते. माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी देखील आक्षेप घेतला आहे. किमान 400 चौ.फुटाची खोली उपलब्ध करुन दिली पाहिजे. कोंडवाड्यासारखी परिस्थिती असते. त्यांना चांगली शाळा मिळण्याचा अधिकार नाही का? यासाठी एक रुपया देखील खर्च येणार नाही. कोणत्याही विकासकाला तुम्ही आदेश दिला तर ते शाळा उभी करु शकतात.

नंतर क्यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.........

एसआरए मधील तरतुदींचा फायदा बिल्डर्स घेतात व 100 कुटुंबामागे एक वेल्फेअर सेंटर आणि 100 लोकांमागे एक बालवाडी देता. त्याचा फायदा शाळेला मात्र मिळत नाही, अशी परिस्थिती आहे. याबाबत शासनाचा काय विचार आहे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील आपण एकटेच बोलत आहात हे योग्य नाही.

श्री. कपिल पाटील : महोदय, आपणच मला बोलण्याची परवानगी दिली म्हणून मी माझा प्रश्न विचारत आहे.

**सभापती** : किमान मंत्री महोदयांचे उत्तर तरी ऐकून घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, राखीव भूखंडासंबंधी मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. एसआरए योजना राबवावयाची असेल तर त्यात शाळांचाही विचार केलाच पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा प्रश्न असा आहे की, जो भूखंड राखीवच नाही पण तेथे शाळा आहे. त्या शाळेचे अस्तित्व त्या भूखंडाच्या विकासामध्ये काय असणार आहे ? त्याचबरोबर त्यांचा दुसरा मुद्दा असा आहे की, एका झोपडीला ज्याप्रमाणे 269 चौरस फुटाचे घर आपण देता तोच रेश्यो शाळेला सुध्दा वापरणार काय ?

श्री. सचिन अहिर : जेवढे क्षेत्रफळ असेल तेवढा भाग आपण शाळेला निश्चितपणे देतो. समजा एक हजार चौरस फुटाची शाळा असेल तर तरतुदीप्रमाणे संबंधित विकासकाला तेवढ्याच क्षेत्रफळाची शाळा त्या संस्थेला द्यावी लागेल. मग ती शाळा खाजगी असो, ट्रस्टची असो किंवा महापालिकेची असो, सर्वच ठिकाणी हाच नियम लागू करण्यात येईल. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी असे एखादे उदाहरण दाखवून द्यावे की अमुक विकासकाने तरतुदीच्या अनुषंगाने शाळा दिली नाही, त्या विकासकावर कारवाई केल्याशिवाय राहणार नाही. ही माहिती निवेदनातील परि. क्र. 2 मध्ये दिलेली आहे. त्यात स्पष्ट म्हटले आहे की, जिकडे आरक्षण नाही पण शाळा आहे तेथे सुध्दा नियमातील तरतुदीनुसार शाळेच्या क्षेत्राएवढे क्षेत्र विकासकाला द्यावे लागेल.

श्री. दिवाकर रावते : मुळात प्रश्न असा आहे की, त्या शाळेत भविष्यात वाढणाऱ्या मुलांचा विचार करुन तशा वर्ग खोल्या वाढविण्याचा हक्क त्या शाळांना मिळणार काय ?

( उत्तर नाही )

16-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : वास्तविक ज्या शाळा आहेत त्यांना संरक्षण देणे आणि त्यांना विकासकाने विकसित क्षेत्रफळ देणे हा खरा मुद्दा आहे. यासंबंधी शासनाची स्पष्टपणे कोणती भूमिका राहणार आहे ? एका बाजूला सरकार तीन-चार गोष्टींबद्दल सातत्याने बोलते पण त्याची अंमलबजावणी मात्र होताना दिसत नाही. शिक्षणाच्या दृष्टीने शासन संवेदनशील आहे पण तसे होत नाही. आरोग्याच्या दृष्टीने सुध्दा विशेष लक्ष दिले जात नाही. अशा बाबींचे उत्तर देताना त्या त्या विभागाच्या मंत्र्यांनी जबाबदारीने व नीट माहिती घेऊन उत्तर दिले पाहिजे. आज एसआरए योजना म्हणजे एक मोठे घबाडच झालेले आहे. किमान आता तरी शाळांच्या दृष्टीने शासन कोणती भूमिका घेणार आहे, याचे स्पष्टीकरण करणार काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिकली तक्रार द्यावी आणि त्यानुसार एखाद्या विकासकाने शाळेच्या ठिकाणी विकसित क्षेत्रफळ शाळेसाठी उपलब्ध करुन दिले नसल्याचे आढळले तर त्या विकासकावर कारवाई करण्यात येईल असे मी अगोदरच सांगितले आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात की, एक हजार चौरस फुटाची शाळा असेल आणि त्या शाळेच्या विकासासाठी चारचा एफएसआय दिला तर एकूण चार हजार चौरस फुटाची शाळा होईल, अशी त्यांची मागणी आहे.........

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा मुद्दा असा होता की, ज्याप्रमाणे एखाद्या भाडेकरुला आपण एसआरएच्या माध्यमातून 269 चौरस फुटाचे घर उपलब्ध करुन देतो त्यानुसारच अस्तित्वात असलेल्या शाळेसाठी भविष्याचा विचार करुन दोन वर्ग खोल्या वाढविण्याचा हक्क देणार काय ? अन्यथा 100 कुटुंबामागे एक वेल्फेअर सेंटर आणि 100 लोकांमागे एक बालवाडी आपण देत आहात आणि ती शाळेला ॲटॅच केली तर बिल्डरला विकता येणार नाही. अशी तरतूद यामध्ये शासन करणार काय ?

डॉ. दीपक सावंत : माझ्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचे पत्र आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, या पत्रात असे म्हटले आहे की, "सन्माननीय श्री. कपिल पाटील यांच्या सूचक भारती या संघटनेने शासनाकडे वाढीव 4 चटईक्षेत्र निर्देशांकाची मागणी केली असून यावर अद्यापि कार्यवाही झालेली नाही. तरी याबाबतीत झोपडपट्टीतील शाळांसाठी शासन स्तरावर निर्णय घेणे अभिप्रेत आहे. प्रयोगशाळा, वाचनालये, संगणक इत्यादी आधुनिक शिक्षणाच्या सुविधा पुरवण्यासाठी झोपडपट्टीतील शाळेच्या इमारतींसाठीच्या अस्तित्वात असलेल्या क्षेत्रफळाखेरीज अधिक चटईक्षेत्र देणे ही बाब धोरणात्मक निर्णयाशी निगडित असल्यामुळे यावर शासनाने निर्णय घेणे अपेक्षित आहे. त्यामुळे असा धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे काय, तसेच अशा प्रकारे अनेक शाळा विस्थापित झालेल्या आहेत परंतु अशा प्रकारे आतापर्यंत अशा विकासकावर एसआरए अंतर्गत कारवाई केलेली आहे काय, कारवाई केली असेल तर आपण उदाहरणासह माहिती द्यावी.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आमच्याकडे आतापर्यंत अशा प्रकारची कोणतीही बाब आलेली नाही. मी यापूर्वीच सांगितलेले आहे की, सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारची बाब माझ्या निदर्शनास आणून दिली तर त्याच्यावर निश्चित कारवाई करण्यात येईल. ज्या ठिकाणी एसआरए अंतर्गत शाळा असताना देखील विकासकाने शाळा बांधलेली नसेल तर यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी योजनेची नावे आणि शाळेची नावे आमच्याकडे दिली व तसे आढळून आले तर संबंधित विकासकावर कारवाई करण्यास आम्ही तयार आहोत एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी वाढीव चटई क्षेत्राचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी स्पष्टपणे माहिती दिलेली आहे. यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जोपर्यंत कलम 33(1) मध्ये जोपर्यंत आपण सुधारणा करीत नाही तोपर्यंत माननीय मंत्री महोदयांनी या विषयाच्या संदर्भात कितीही उत्तरे दिली तरी ते करता येणार नाही. त्यामुळे कलम 33(10) मध्ये शासन सुधारणा कधी करणार आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, एसआरए योजनेची पुनर्बांधणी करण्यात यावी अशी आमची मानसिकता आहे. परंतु सर्व सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेता या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक आयोजित करुन काय मार्ग काढता येईल यासंदर्भात प्रयत्न केला जाईल.

....2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( **सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**पृ. शी.** :माटुंगा येथील ला-सोनारीया इमारतीची लिफ्ट कोसळून 6 मजुरांचा झालेला मृत्यू

**मु. शी.** :माटुंगा येथील ला-सोनारीया इमारतीची लिफ्ट कोसळून 6 मजुरांचा झालेला मृत्यू यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, सतीश चव्हाण, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री. विक्रम काळे, रमेश शेंडगे, अरुण गुजराथी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मांटुगा (मुंबई) येथील ला-सोनारीया इमारतीची लिफ्ट कोसळून दिनांक ९ जानेवारी, २०११ रोजी झालेल्या अपघातात ६ मजूरांचा झालेला मृत्यू, ही इमारत झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत (एसआए) बांधण्यात आली असणे, गेल्या ६ महिन्यापासून लिफ्ट नादुरुस्त असल्याबाबत मजुरांकडून संबंधित ठेकेदारांकडे तक्रार करण्यात येवून सुध्दा त्याकडे करण्यात आलेले दुर्लक्ष, त्यामुळे हा अपघात झाल्याचा तेथील मजुरांनी व्यक्त केलेला संशय, बांधकाम करतेवेळी संरक्षणाच्या दृष्टीने योग्य खबरदारी न घेतल्याबद्दल संबंधित बिल्डर व ठेकेदार यांच्याविरुध्द मांटुगा पोलिसांनी गुन्हा दाखल करणे, आपादग्रस्त मजुरांच्या नातेवाईकांना अद्यापही आर्थिक मदत न मिळाल्यामुळे तेथील मजुरांच्या नातेवाईकांत निर्माण झालेली असुरक्षिततेसाठी भावना, यावर शासनाने त्वरित केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ...3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माटुंगा येथील ला-सोनारीया इमारतीच्या लिफ्टच्या अपघाताच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. या ठिकाणी अग्नीशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी भोगवटयासाठी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. मुंबईमध्ये आता 22-23 मजल्यांच्या अनेक इमारती उभ्या राहत आहेत. उंच इमारती उभ्या राहत असतांना मटेरियल वर खाली नेण्यासाठी केलेली सोय म्हणजे मेटेरियल हॉईस्ट. अशा प्रकारची सुविधा जेव्हा एखाद्या ठेकेदाराला देण्यात येते त्यावेळेला त्या इमारतीला भोगवटा नाहरकत प्रमाणपत्र दिल्यानंतरही अशा प्रकारचा मटेरियल हॉईस्ट वापरण्याचा परवाना त्या ठेकेदाराला असतो क्रय हा महत्वाचा प्रश्न आहे. एकदा मटेरियल हॉईस्ट अस्तित्वात आल्यानंतर व त्या इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणच्या लिफ्टच्या देखभाल दुरुस्तीकडे अजिबात लक्ष दिले जात नाही. या लिफ्ट वापरात आणल्या जातात मात्र त्या देखभालीकडे कोणी लक्ष देत नाही. मुंबई शहरामध्ये उंच इमारती बांधल्या जात असताना लिफ्टच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची काळजी घेतली जात नाही त्यामुळे अशा प्रकारचे अपघात घडत असतात. अशा प्रकारे अपघात झाल्यानंतर त्याची चौकशी होणार नसेल व, मोबदला देऊन प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न केला जाणार असेल तर या मूलभूत प्रश्नाकडे आपले लक्ष अजिबात नाही तसेच या प्रश्नाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

तसेच ही सगळी यंत्रणा काम करीत असताना ज्या प्रकारे सुरक्षिततेची काळजी घ्यावयास पाहिजे होती ती काळजी न घेतल्यामुळे महानगरात जर मृत्यूचे सापळे तयार होत असतील तर त्यावर नियंत्रण राहणार नाही. प्रत्येक वेळेस अपघात होत राहतील व कोठे तरी नुकसान भरपाई दिली जाईल परंतु हा प्रश्न मात्र बाजूला पडेल यासाठी ज्या जबाबदार यंत्रणा आहेत त्यांनी मूलभूत बाबीचा विचार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर इमारत पूर्ण झाल्यानंतर इमारतीमध्ये राहणाऱ्या लोकांनी वापरावयाची जी लिफ्ट आहे त्या लिफ्टची देखभाल आणि दुरुस्ती करणे हा वेगळा विषय आहे.मटेरिअल वाहून नेण्यासाठी जी लिफ्ट वापरण्यात येते ती लिफ्ट कोसळून अपघात झालेला आहे तो देखील महत्वाचा प्रश्न आहे. अशा प्रकारचे अपघात येथून पुढच्या काळात घडता कामा नयेत या दृष्टीने शासनाने निश्चित अशा मार्गदर्शक सूचना देणे आवश्यक आहे. त्या मार्गदर्शक सूचना देण्यात येणार आहेत काय, त्याचप्रमाणे या लिफ्टच्या सुरक्षितते संबंधीचे प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था महानगरपालिका किवा संबंधित खात्याकडून निश्चितपणे केली जाणार आहे काय, त्याचबरोबर भविष्यात अशा प्रकारचे अपघात होणार नाहीत याची पूर्णपणे काळजी घेण्याची हमी सरकार या निमित्ताने देऊ शकेल काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न जो विचारला आहे त्याला "होय" असे उत्तर असून त्याप्रमाणे निश्चितपणे केले जाईल. एवढेच नव्हे तर पार्ट ऑक्युपेशनसाठी परवानगी दिल्यानंतरसुध्दा त्या लिफ्टचा वापर करीत होते किंवा नाही ही बाब देखील त्यांनी निदर्शनास आणून दिलेली आहे. याही बाबतीत पुन्हा माहिती घेण्यात येईल.पार्ट ऑक्युपेशनची परवानगी दिल्यानंतर व बांधकाम चालू असतांना ते एक लिफ्टचा वापर का करीत होते याबाबत देखील विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, मुळामध्ये ही लिफ्ट एका सेलच्या बिल्डींगमधील होती, रिहॅबच्या बिल्डींगमधील नव्हती. सेल बिल्डीगमध्ये मटेरिअल घेऊन जाणा-या लिफ्टमध्ये अपघात घडल्याने 6 कामगारांचा दुर्देवाने मृत्यू झालेला आहे. अशा प्रकारची घटना घडल्यानंतर शासनाने पुढाकार घेऊन संबंधिताविरुध्द एफआयआर नोंदविला आहे. केवळ कंत्राटदारच नव्हे तर विकासक आणि या कंपनीचे सर्व संचालक यांच्याविरुध्द कारवाई करण्याची भूमिका शासनाने घेतली असून त्यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अशा प्रकारे सर्व संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची भूमिका राज्य सरकारने घेतली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर स्वरुपाचा प्रश्न आहे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये.कामगार विभाग आणि सबंधित विभागाकडून ज्याप्रमाणे दोन लिफ्टना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तशाच प्रकारे मटेरिअल वाहून नेण्यासाठी ज्या लिफट वापरण्यात येतात त्यासाठी देखील प्रमाणपत्र देण्याची तरतूद नियमामध्ये आहे काय , जर नियमामध्ये तशी तरतूद नसेल तर अशा प्रकारचा नियम करण्यात येणार आहे काय ? त्या कामगारांना जर माहीत नसेल तर ते कामगार या लिफ्टचा वापर करतील. ही रिहॅबची इमारत नसून वापरात असलेली इमारत होती.त्याठिकाणी प्रत्यक्षात दोन लिफ्ट असतांना तेथील कामगार ही लिफ्ट वापरत होते अशा प्रकारे उत्तरावरुन दिसून येते.परंतु तशा प्रकारची परिस्थिती नाही. त्या ठिकाणी अपघात घडल्यानंतर मी देखील गेलो होतो.हा अपघात घडल्यानंतर संबंधित कंपनीच्या संचालकांनासुध्दा आरोपी करण्यात आले असून शासनाने हे एक चांगले काम केलेले आहे. अशा प्रकारे शासनाने चांगली पावले उचलली असली तरी एवढे करुन हा प्रश्न सुटणार नाही. अशा प्रकारच्या लिफ्टना आपण जोपर्यंत स्कॅनर खाली आणत नाहीत तोपर्यंत हे अपघात टाळता येणार नाहीत. तेव्हा याकरता कोणत्या प्रकारची यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते खरे आहे. हा अपघात घडल्यानंतर विभागाचे सचिव आणि एसआरएचे संबंधित अधिकाऱ्यांबरोबर ज्यावेळी आम्ही आढावा बैठक घेत होतो त्यावेळी आमच्या असे लक्षात आले होते की या लिफ्टचा मेन्टेनन्स योग्य प्रकारे केला जात नाही त्याच बरोबर या लिफ्टची क्वालिटीसुध्दा घसरत चालली आहे. सेलच्या बिल्डींग असो वा रिहॅबिलीटेशनची इमारत असो त्या ठिकाणी कोठल्याही परिस्थितीमध्ये आयएसओ स्टॅन्डर्ड असलेल्या लिफ्ट लावणे बंधनकारक करण्यात येईल.अशा प्रकारचा निर्णय या पुढच्या काळात घेण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर या लिफ्टचे किमान दहा वर्षे मेन्टेनन्स करण्यासाठी लिफ्ट कंपनी, विकासक आणि सोसायटी यांचे ट्रायपार्टी ॲग्रिमेन्ट करण्यास त्यांना भाग पाडण्यात येईल .

यानंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

जेणेकरुन यापुढील काळात लिफ्टचे मेंटेनन्स कोण करील हा प्रश्न शिल्लक राहणार नाही. कंत्राटदारांने पुढील दहा वर्षे सक्तीने लिफ्टचे मेंटेनन्स केले पाहिजे अशाप्रकारची राज्य शासन भूमिका घेईल. याबाबत माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही संपूर्ण जबाबदारी त्या त्या कंत्राटदारांची असते. त्यामुळे मटेरिअल वाहून नेण्यासाठी एका लिफ्टची तरतूद असल्यामुळे त्याबाबतीत आपल्याला काही करता येणार नाही. परंतु त्या ठिकाणी पार्ट ऑक्युपेशन दिल्यानंतर आपण काम कां चालू केले या माननीय सदस्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत निश्चितपणे माहिती घेण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझ्या मुख्य प्रश्नाला बगल दिली गेली आहे. अशाप्रकारच्या अनेक घटना घडत असतांना आपण माणसे मारण्यासाठी हे चालू ठेवणार काय? शेवटी "म्हातारी मेल्याचे दुःख नाही, काळ सोकावतो". याठिकाणी म्हटले जाते की, रिहॅबची लिफ्ट किंवा दुसरी सेलची लिफ्ट असेल त्यांना आयएसओ नाईन थाऊजंड परवाना आपण देता तो दिलाच पाहिजे. परंतु मटेरिअल वाहून नेण्यासाठी ज्या लिफ्टना आपण तात्पुरता परवाना देता त्यांना आपण स्कॅनरखाली आणणार काय असा माझा प्रश्न होता. त्या लिफ्ट सरकारच्याच स्कॅनरखाली आणल्या पाहिजेत. म्हणजेच शासनाची सर्व मार्गदर्शक तत्वे त्यांना लागू होतील व जेणेकरुन जीवितहानी आपल्याला टाळता येईल. याबाबत आपण काहीही वक्तव्य केले नाही. तेव्हा या लिफ्ट आपण स्कॅनरखाली आणून त्यांना नियंत्रणाखाली ठेवणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, होय.

**<u>(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)</u>**

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या लिफ्टचे मेंटेनन्स पहाण्यासाठी राज्य शासनाच्या सेवेत पुरेसे इन्सपेक्टर आहेत काय, या लिफ्टना स्कॅनरखाली आणण्यासाठी आपल्याकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे काय, नसल्यास, तो किती दिवसात उपलब्ध करणार आहात?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, शासनाने याबाबतीत आताच भूमिका ठरविल्यानंतर तात्काळ त्यासाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध करु शकत नाही. या सर्व गोष्टी यापुढील काळात आपल्याला कराव्या लागणार आहेत. आपण एक पाऊल पुढे टाकून रिहॅब लिफ्टसाठी ही उपाय योजना करीत आहोत. इतकेच नव्हेतर यामधील कॉट्रॅक्टरसुध्दा लिस्टेड करणार आहोत. जेणेकरुन व्यवस्थित कामकाज न करणाऱ्या कॉट्रॅक्टरना आपल्याला काळया यादीमध्ये टाकता



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. सचिन अहिर....

येईल. आपण स्पेसिफिक सांगितल्याप्रमाणे या पुढील काळात मटेरिअल हॉईस्ट म्हणून वापरल्या जाणाऱ्या लिफ्टना देखील स्कॅनरमध्ये आणण्यासाठी तरतूद करण्याचे काम केले जाईल.

श्री. हेमंत टकले : ज्यावेळी विकासकाला इमारत बांधण्याची परवानगी दिली जाते त्यावेळी मटेरिअल हॉईस्ट म्हणून ती लिफ्ट वापरली जाते त्यासाठी निश्चित स्वरुपाची कालमर्यादा घातली जाते काय? आपल्याला बांधकामाचा दाखला मिळेपर्यंत मटेरिअल हॉईस्टचा वापर करता येईल. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मटेरिअल हॉईस्ट त्यांनी बंद केली पाहिजे अशी सूचना देण्याची आपल्या कायद्यात तरतूद आहे काय, किंवा ही मटेरिअल हॉईस्ट ज्या कामासाठी आहे त्या कालावधीकरिता परवाना देण्याची सोय आपल्याला करता येईल काय?

श्री. सचिन अहिर : ज्यावेळी एखाद्या इमारतीचे काम सुरु होते त्यावेळी त्यामध्ये या सर्व गोष्टी अंतर्भूत असतात. त्याठिकाणी संपूर्ण काम झाल्यानंतर कंत्राटदाराने या सर्व गोष्टी काढून घेणे अपेक्षित असते. ही घटना घडली त्यावेळी त्या परिसरात काम चालू होते म्हणून हा प्रश्न उद्‌भवत नाही. यापुढील काळात अशी घटना घडू नये म्हणून त्याबाबत दक्षता घेण्यासाठी स्कॅनिंग करण्याचा आपण निर्णय घेणार आहोत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:45

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, आज देखील मुंबईमध्ये अनेक ठिकाणी इमारतींचे काम सुरु आहे. जेथे मटेरिअल हॉईस्ट आहेत. त्याबाबत शासन 30 दिवसामध्ये, 50 दिवसामध्ये ताबडतोब इन्स्पेक्शन करणार आहे काय ? कारण मघाशी स्कॅनरमध्ये आणण्याच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. पण त्यासाठी अवधी लागेल. म्हणून तोपर्यंत सगळया मटेरिअल हॉईस्ट तपासून घेतल्या पाहिजेत, कारण यामध्ये सहा लोकांचा मृत्यू झालेला आहे.याठिकाणी असे सांगण्यात आले की,"म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावत आहे." परंतु म्हातारी नाही तर यामध्ये सहा लोक मेलेले आहेत. अशा वेळी या बाबी थांबविण्याच्या दृष्टीने शासन ताबडतोब इन्स्पेक्शन करणार आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याचा उद्देश असा होता की, माननीय श्री.अशोक चव्हाण मुख्यमंत्री पदावरुन गेले, त्याचे दु:ख नाही पण विद्यमान माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण नीट राहिले पाहिजेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपण पाहिले तर लक्षात येईल की, ही टेक्नीकल ब्रँच असून यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित गोष्टी आहेत. गृहनिर्माण विभागाचा संबंध फक्त रिहॅबिलिटीशन पुरता आहे आणि जी खाजगी स्वरुपातील कामे आहेत ती महानगरपालिकेशी संबंधित आहेत. पण मी अगोदर देखील सांगितले की, आपल्याला याबाबतीत नवीन भूमिका घ्यावी लागेल. कारण अशा प्रकारच्या घटना घडत असताना नेमके कोणाला जबाबदार धरावयाचे हा प्रश्न आहे. म्हणून मी सांगितल्याप्रमाणे आपण पुढच्या काळामध्ये हे स्कॅनरमध्ये घेण्याचा प्रयत्न करु. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत इन्स्पेक्शन करण्याच्या सूचना संबंधित विकासकांना देखील देण्याच्या दृष्टीने भूमिका घेतली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुण्यामध्ये अशाच प्रकारचा अपघात झाला होता. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी सदनामध्ये चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी शासनाने असे जाहीर केले होते की, जे ठेकेदार आहेत, त्यांचा विमा काढल्याशिवाय, त्यांच्याकडे जे मजूर आहेत, त्या मजुरांचा विमा काढल्याशिवाय त्यांना परवाना देण्यात येणार नाही, शासन यापुढे कोणत्याही ठेकेदारांना परवानगी देणार नाही. यादृष्टीने शासनाने कोणते धोरण जाहीर केलेले आहे काय, शासनाने जे धोरण जाहीर केले होते, त्याप्रमाणे या इमारतीसाठी परवानगी दिली होती काय, जर शासनाने अशी परवानगी दिली नसेल आणि जे धोरण जाहीर केल्यानंतरही संबंधित अधिकाऱ्यांनी सदरहू धोरणाचा अभ्यास केला नसेल तर त्याच्यावर शासन कोणती कारवाई



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

कोणती कारवाई करणार आहे, तसेच यापुढे विमा काढल्याशिवाय शासन अशा ठेकेदारांना परवानगी देणार नाही अशा प्रकारचे आश्वासन पुन्हा शासन देणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मला असे वाटते की, आता प्रश्नाची व्याप्ती वाढत चालली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एका खाजगी विकासकामुळे निर्माण झालेला हा प्रश्न आहे. मात्र सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शासनाच्या आणि विशेष करुन कामगार कायद्याच्या अंतर्गत हे सर्व करणे गरजेचे आहे. पण आम्ही गृहनिर्माण विभाग म्हणून ते करण्याबाबतची जबाबदारी घेऊ शकत नाही तर ते कामगार विभागाने करावयास पाहिजे. म्हणून आपण त्यांना वर्क्समेन कॉम्पेनसेशन ॲक्टच्या अंतर्गत प्रत्येकी पाच लाख रुपये देणे क्रमप्राप्त झाले आहे म्हणून तो विषय त्या विभागाकडील आहे. पण सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यापुढे याबाबतीत काळजी घेण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या जातील.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कन्स्ट्रक्शनसाठी लागणाऱ्या इक्वीपमेंटच्या सेफ्टी बाबतचा मूळ प्रश्न आहे.आज जे नवीन तंत्रज्ञान आहे, त्यामध्ये मटेरिअल हॉईस्ट आहेत, वेगवेगळया क्रेन्स् आहेत.आज मुंबईमध्ये दाटीवाटीने उभ्या असलेल्या इमारती आहेत तसेच इतर ठिकाणी इमारती उभ्या करीत असताना टॉवर क्रेन्स्चा वापर केला जातो. प्लॉटचा एरिया, त्या बाजूला असलेल्या रस्त्याची रुंदी या सर्व गोष्टींचा विचार करुन त्याठिकाणी बांधकाम करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या इक्वीपमेंटस् वापरता येतील याकरता काही मार्गदर्शक तत्व, काही गाईड लाईन्स् शासनातर्फे दिल्या जाणार आहेत काय ? असा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, मटेरिअल हॉईस्टच्या बाबतीत सर्रासपणे असे दिसून आले की, याकरता ज्या लिफ्ट असतात त्या रस्त्याच्या बाजूला असतात. त्यामुळे तेथून मटेरिअलची जी उचल केली जाते, ती रस्त्याच्या बाजूने केली जाते. अनेक वेळेला मोठमोठे ट्रक रस्त्याच्या बाजूला उभे रहातात आणि त्यामुळे वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळा येतो. त्यामुळे मटेरिअल हॉईस्टची जी दिशा आहे, ती रस्त्याच्या बाजूला न ठेवता आतल्या बाजूला ठेवावयास पाहिजे. या सर्व गोष्टींचा विचार करुन बांधकामासाठी परवानगी देणार आहात काय ? यासंबंधात शासनाच्या वतीने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने किंवा जे संबंधित विभाग असतील त्यांच्या वतीने मार्गदर्शक तत्वे घालून देणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे नगरविकास

श्री.सचिन अहिर . . . .

विभागाकडे याबाबतीत सुतोवाच करु आणि त्यांच्यामार्फत अशा प्रकारचा प्रस्ताव आणता येईल काय या दृष्टीकोनातून ही बाब निश्चितपणे तपासण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय,मी या विषयाच्या संदर्भात शासनाकडे पत्र दिलेले आहे. मला अशी विनंती करावयाची आहे की, मटेरिअल आतल्या बाजूने न्यावे की बाहेरच्या बाजूने न्यावे हा टेक्नीकल मुद्दा आहे. पण जे सहा मजूर मरण पावले आहेत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे.... 13:50

श्रीमती अलका देसाई....

त्यांच्या कुटुंबीयावर हलाखीची परिस्थिती आलेली आहे. त्याबाबतीत कोण ठेकेदार मंडळी जबाबदार आहेत. त्यांचे कोण संचालक आहेत, कोणाला पकडले आहे, कोणाला सोडले आहे, याबाबतीत मला चर्चा करावयाची नाही. पण शासन या मृत्युमुखी पडलेल्या मजुरांच्या कुटुंबीयांना काय मदत करणार आहे, शासन या बाबतीत काय उपाययोजना करणार आहे, याबाबतीत शासन बांधकाम व्यावसायिकांना काही निर्देश देणार आहे काय, सुरक्षिततेच्या बाबतीत काय उपाययोजना करण्यात येणार आहेत या प्रश्नांची उत्तरे शासनाने द्यावीत

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, वर्क्समेन कॉम्पेन्सेशन ॲक्टच्या अंतर्गत मृत मजुरांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपये मदत करण्यात आली आहे.

. श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, एखादा मोठा अपघात होऊन त्यामध्ये काही लोक मृत्युमुखी पडल्यानंतर त्याबाबतीत धोरणे ठरविली जातात, संबंधितावर कारवाई केली जाते आणि त्याबाबतीतील प्लॅनिंग केले जाते. मुंबई शहरासाठी लिफ्टचा अपघात हा जुना नाही. श्री. वसंत देसाई या फार मोठया संगीतकाराचा मृत्यू लिफ्टच्या अपघातामध्ये झालेला आहे. तेव्हा पासून आतापर्यंत लिफ्टच्या अपघाताच्या बाबतीत कोणत्याही प्रकारची ध्येयधोरणे ठरविण्यात आलेली नाहीत. लिफ्टच्या अपघाताची चौकशी करताना विद्युत विभागाचे म्हणणे असे आहे की, हा विषय गृहनिर्माण विभागाचा आहे, तर कोणी असे सांगतात की, हा विषय म्हाडाचा आहे. अशा प्रकारे टोलवाटोलवी केली जात आहे. लिफ्टचा अपघात कधीही कोणाला जखमी करीत नाही तर त्या व्यक्तीचा जीवच घेत असतो. आज सुध्दा मनोरा आमदार निवासाच्या बाजूला एका इमारतीचे बांधकाम चाललेले आहे. त्या ठिकाणी तेथे मिश्रण घेऊन जाणारी लिफ्ट वेगाने वर जातांना जोराचा आवाज करत असते त्यामुळे ती कधी कोसळेल याची मी बाजूच्या इमारतीतील सदनिकेमध्ये रहात असल्यामुळे मला भीती वाटते. मला या ठिकाणी शासनाला विचारावयाचे आहे की, या ठिकाणी झालेल्या लिफ्टच्या अपघाताची चौकशी करण्यात येईल काय, त्यामध्ये काही बेकायदेशीर आढळून आले तर संबंधितावर कारवाई करण्यात येईल काय? मुंबई शहरात जुन्या इमारतीतील लिफ्टमध्ये कधी अपघात होतील हे सांगता येत नाही. काही ठिकाणच्या लिफ्टमधून प्रवास करताना तर खूप भीती वाटते. त्या लिफ्टमधून जाण्यापेक्षा जिन्याने चालत जावेसे वाटते. म्हणून मुंबई शहरातील सर्व

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

लिफ्टची तपासणी करण्यात येईल काय, ज्या लिफ्ट नादुरुस्त असतील त्यांच्या संबंधात संबंधितावर कारवाई करण्यात येईल काय, संबंधित सोसायटयांना तशा प्रकारच्या नोटिसा देण्यात येतील काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. पण या संदर्भातील धोरणाची व्याप्ती बघून काम करावे लागेल. मी थोडया वेळापूर्वी सांगितल्या प्रमाणे हा विषय नगरविकास खात्याकडे मांडावा लागेल कारण ही जबाबदारी त्यांच्यावर येते. या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या प्रकरणाच्या संदर्भात भा.दं.वि.च्या 304, 114 अन्वये गु.र.क्र.14/2011 अशा प्रकारची कलमे लावण्यात आलेली आहेत. सभापती महोदय, सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ही बाब नगरविकास विभागाच्या निदर्शनास आणून दिले जाईल आणि या निमित्ताने शासनामार्फत एक धोरण तयार करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात थोडया वेळापासून जी प्रश्नोत्तरे सुरु आहेत त्यामुळे मला पुष्कळ मार्गदर्शन मिळालेले आहे. "म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो." कुठलेही धोरण नाही, कामगारांची चिंता नाही, हलाखीची परिस्थिती आहे. सरकारकडे कुठलेही नियोजन नाही, खाते याबाबतीत काहीही कारवाई करीत नाही. माननीय मंत्री महोदय, असे काही उत्तर देत आहेत की, ते नक्की काय करणार आहेत हे कोणालाच कळलेले नाही. शासनाच्या माननीय मंत्र्याडून शासनाची अवहेलना झालेली आहे. माननीय मंत्र्यांची अकार्यक्षमता निर्माण दिसून येत असल्यामुळे या संदर्भात माननीय मंत्री गांभीर्याने आपला राजीनामा देण्याचा विचार करतील काय?

-----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पू. शी.** : मुंब्रा (जि.ठाणे) येथील अलमास्त कॉलनी येथे लहान मुलावर झालेला अमानुष अत्याचार.

**मु. शी.** : मुंब्रा (जि.ठाणे) येथील अलमास्त कॉलनी येथे लहान मुलावर झालेला अमानुष अत्याचार यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंब्रा (जि.ठाणे) येथील अलमास्त कॉलनी येथे राहणाऱ्या नजिया हिने आपल्या भावचा साडेतीन वर्षाचा मुलगा फैजल यास नऊ महिन्यांपूर्वी सांभाळ करण्यासाठी आणल्यानंतर त्याला मारहाण करण्याबरोबर सिगारेटचे चटके तसेच गरम चाकूचे चटके देत असल्याची घटना दिनांक 2 मार्च, 2011 च्या सुमारास उघडकीस येणे, या मुलाला केलेल्या मारहाणीत त्याचा पायही फ्रॅक्चर होणे, अशा प्रकारे लहान मुलांवर अमानुष अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची तेथील नागरिकांकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. "

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ( गृह(शहरे) राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यामध्ये दोन-तीन प्रश्न आहेत. म्हटले तर ही एक छोटी घटना वाटते. परंतु हे जे छोटे मूल आहे त्याचा एका आत्याने, नाही तर दोन आत्यांनी नफिसा आणि मेहजबीन अशा दोघींनी छळ केलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, दोन व्यक्तिंनी छळ केलेला असताना एकाच व्यक्तीवर आरोपपत्र दाखल केलेले आहे की, दुसरी आरोपी मेहजबीन हिच्यावर देखील आरोपपत्र दाखल केलेले आहे, ते मूल आता कोणाच्या ताब्यात आहे? रिहाना या त्या छोटया बालकाच्या आईला आत्यांकडून असे सांगण्यात आले होते की, तू दुसरे लग्न करीत आहेस परंतु हे मूल आमच्या वंशाचा वारस म्हणून आम्हाला सांभाळावयाचे आहे. म्हणून रिहानाने ते मूल आत्यांकडे सांभाळावयाला दिले होते. प्रत्यक्षात त्या मुलाच्या आजोबांनी मानखुर्दमध्ये एक झ ोपडी त्या मुलाच्या नावावर केलेली असल्यामुळे ती बळकावण्यासाठी त्या मुलाला मारुन टाकण्याचा या आत्यांचा हेतू होता. त्या मुलाची आई रिहाना हिने आता ते मूल तिच्या ताब्यात मिळावे अशी मागणी केलेली आहे. या प्रकरणात पोलिसांनी सात दिवस चालढकल केलेली आहे. सात दिवस सुरय्या म्हणजे त्या छोटया बालकाची मावशी पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार करीत होती पण पोलिसांनी सात दिवस तक्रार नोंदवून घेतलेली नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

याबद्दल शासनाने काय कारवाई केली आहे, दुसरी आरोपी मेहजबीन यांच्या विरुध्द आरोपपत्र दाखल केले आहे काय, ते मूल आईच्या ताब्यात दिले आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, फैजल नावाचे जे मूल आहे त्याच्यावर सायन हॉस्पिटलमध्ये उपचार चालू आहेत. 1 तारखेला ही घटना निदर्शनास आल्यावर 2 तारखेला त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आणि चारही आरोपींवर कलम 324, 325 आणि 34 तसेच बाल अधिनियमाच्या कलम 23 प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपल्याकडे नेहमी खून, दरोडे इत्यादी गुन्ह्यांबाबत चर्चा होत असते. परंतु लहान मुलांचा म्हणजे अगदी सात आठ वर्षाच्या आतील जी बालके आहेत त्यांचा छळ करण्याचे प्रकार होतात आणि काही वेळा सावत्र कुटुंबीयांकडून मुलांना चटके देणे किंवा इतर भीषण स्वरुपाचे गुन्हे घडतात. बालक अधिकाराच्या संदर्भात मंत्री महोदयांनी उल्लेख केला. पोलिसांना त्यांच्या कामामधून या गोष्टींकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून या बालक अधिकाराच्या संदर्भात आणि त्यांच्या संरक्षणासाठी ज्या दक्षता समित्या नेमलेल्या आहेत त्यामध्ये बालकांच्या संरक्षणासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये स्पेसिफिक अधिकारी असले पाहिजे आणि त्या ठिकाणी चाईल्ड राईट्स ऑफीसर असा बोर्ड असला पाहिजे, असे आपल्यावर बंधनकारक आहे. पण या प्रकारची पावले शासनाने उचललेली नाहीत. ही सर्व पोलीस स्टेशनमधील वस्तुस्थिती आहे. त्याबद्दल शासन ताबडतोब एक महिन्याच्या आत पावले उचलणार काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, या संदर्भात जरुर पावले उचलली जातील. हा अत्यंत सामाजिक विषय आहे. जगभरामध्ये या प्रकारच्या घटना घडताना दिसून येतात. आदरणीय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. चेन्नईमध्ये म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या शाळांमध्ये चाईल्ड ॲब्यूजच्या संदर्भातील काही बोर्ड लावण्यात आले होते. पालकांनी पहिल्यांदा त्यासंदर्भात विरोध केला. परंतु खऱ्या अर्थाने जागतिक आकडेवारी पाहिली तर मुलींमध्ये दहा पैकी किमान तीन मुलींना या गोष्टीला सामोरे जावे लागते आणि 7 पैकी एका मुलाला या गोष्टीला

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील ....

सामोर जावे लागते. त्या दृष्टीने भविष्य काळात शासनाची देखील भूमिका असेल. कारण मी सांगितल्याप्रमाणे हा सामाजिक प्रश्न आहे. पालकांची भूमिका यामध्ये महत्वाची असणार आहे. कारण 12 वर्षाच्या आतील मुला-मुलींना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श म्हणजे गुड टच आणि बॅड टच याची माहिती आपण प्रबोधनाव्दारे देणे गरजेचे आहे. प्रकरणे बाहेर आल्यानंतर आपण त्यामध्ये कायदेशीर कारवाई निश्चित स्वरुपात करीतच असतो परंतु एकूणच या प्रश्नाच्या दृष्टीने शासनाची निश्चितपणे भूमिका राहील आणि भविष्य काळात प्रबोधनाच्या माध्यमातून हा प्रश्न जास्तीत जास्त सोडविण्याचा प्रयत्न राहील.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा फैजल नावाचा जो मुलगा आहे त्याचा अतिशय अमानुष छळ केलेला आहे. माझे यासंदर्भात दोन प्रश्न आहेत. यामध्ये पोलिसांनी तक्रार घेण्यामध्ये खरोखरच दिरंगाई केली आहे काय ? 7 दिवस दिरंगाई केली असे म्हटले जाते. जर अशा प्रकारची दिरंगाई झाली असेल तर त्यांच्यावर शासन कारवाई करणार का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, याबाबतीत कोणतीही दिरंगाई झालेली नाही. 1 तारखेला आपल्याकडे याची माहिती आल्यानंतर 2 तारखेला ताबडतोब गुन्हे दाखल करुन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : ते मूल आईच्या ताब्यात देणार काय, मूल कोणाच्या कस्टडीमध्ये आहे ? मूल आईच्या ताब्यात देण्यात यावे अशी आमची अपेक्षा आहे. त्याच्या आईची मागणी आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : त्या मुलाला बाल सुधारगृहाकडे पाठवावे की आईकडे द्यावे हा प्रश्न आहे. मुळात आईने या मुलाला सोडून दिले होते. तिचा दुसरा विवाह झाल्यामुळे तिने ते साडेतीन वर्षाचे मूल आपल्या नंदेकडे देण्याचे घोरण स्वीकारले. त्यामुळे निश्चितपणे त्याचा भविष्यकाळ सुरक्षित राहण्यासाठी शासन योग्य तो निर्णय घेईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तिगाव (ता.आमगाव,जि.गोंदिया) येथील नागोसे या आदिवासी गोवारी समाजाच्या कुटुंबातील 13 वर्षीय मुलीची करण्यात आलेली हत्या

**मु. शी.** : तिगाव (ता.आमगाव,जि.गोंदिया) येथील नागोसे या आदिवासी गोवारी समाजाच्या कुटुंबातील 13 वर्षीय मुलीची करण्यात आलेली हत्या यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री पाशा पटेल, नागो गाणार, डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"तिगांव (ता.आमगांव, जि.गोंदिया) येथील नागोसे या आदिवासी गोवारी समाजाच्या "अंत्योदय" या सदराखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबातील सातव्या वर्गात शिकणाऱ्या 13 वर्षीय मुलीची दि.28 फेब्रुवारी 2011 रोजी हत्या करण्यात येणे, यासंदर्भात आमगांव येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या शवविच्छेदन तपासणीत सदर मुलीचा मृत्यू गळफास लावून करण्यात आल्याचा अहवाल सादर करणे, परंतु संतप्त नागरिकांचा रोष आणि दुसऱ्यांदा उत्तरीय तपासणीची होणारी मागणी लक्षात घेता मृत मुलीची गोंदिया येथील केटीएस रुग्णालयात पुन्हा उत्तरीय तपासणी करण्यात येणे, उपविभागीय अधिकाऱ्यांच्या परवानगीने व्हीडीओ चित्रीकरणात झालेल्या या उत्तरीय तपासणीत मुलीवर बलात्कार करुन गळफास लावल्याने तिच्या गळ्यातील नळी तुटल्यामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये रोष उत्पन्न होऊन आमगांव येथील आंबेडकर चौकात मुलीचा मृतदेह रस्त्यावर ठेवून गोवारी समाजबांधव व इतर नागरिकांनी चक्काजाम करणे, निदर्शने करणाऱ्या जवळपास 60 निरपराध नागरिकांवर भादंवि

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. केशवराव मानकर .....

कलम 143,341, सहकलम 135 मुंबई पोलीस कायदा 37(1)(3) अन्वये गुन्हा दाखल करण्यात येणे, या हत्याकांडातील पाच आरोपींना अटक करण्यात आली असून इतर आरोपींचा तपास सुरु असल्याचे पोलीस सुत्रांकडून सांगण्यात येणे, यासंदर्भात सीआयडी चौकशीची तसेच आमगांवचे पोलीस निरीक्षकांना तात्काळ निलंबीत करण्याची व तिगांव येथे सर्रास सुरु असलेले अवैध दारु दुकान आणि वेश्या व्यवसायाची सखोल चौकशी सीबीआय मार्फत करण्याची जनतेची मागणी, या कृत्यातील आरोपींना कठोर शिक्षेस पात्र ठरवून मुलीच्या कुटुंबाला 5 लक्ष रुपये देणे आणि निरपराध आंदोलनकर्त्या नागरिकांवर लावलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेता शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे. अंत्योदय परिवारातील 13 वर्षाची मुलगी सुनिता नागोसे हिच्यावर बलात्कार करुन तिची हत्या केली गेली. आदिवासी गोवारी समाजातील ही मुलगी आहे. यासंदर्भात आदिवासी समाजाने आंदोलन केले. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. प्रत्यक्ष माझ्या घरापासून सहा सात किलोमीटर अंतरावर असलेले हे घर आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

मी तेथे प्रत्यक्षात जाऊन डोळयांनी पाहिलेले आहे. ही घटना मनाला अत्यंत व्यथित करणारी आहे. दारिद्र्यामध्ये असलेले कुटुंब, सातव्या वर्गात शिकणारी ही मुलगी 15 दिवसांपासून शाळेत गेली नाही याची चौकशी तिच्या शिक्षिकेने सुध्दा केली होती. सभापती महोदय, या प्रकरणातील सर्व माहिती सभागृहाला दिल्याशिवाय या प्रश्नाला न्याय मिळणार नाही. ज्यादिवशी ही घटना घडली त्यादिवशी तिचे आई-वडील पोटाची खळगी भरण्यासाठी 8-10 कि.मी.अंतरावर वीटभट्टीच्या कामावर आपल्या कुटुंबाला घेऊन गेले होते. सातव्या वर्गात शिकत असलेल्या या मुलीला बाजूच्या कुटुंबीयांमध्ये ओलिस ठेवलेले होते. त्यामध्ये ठाकरे नावाचा गुन्हेगार सुध्दा आहे. हा ठाकरे दारुचा व्यवसाय करतो. नागोसे या कुटुंबाचा हा शेजारी आहे, त्याने तिला ओलिस ठेवले होते. त्यामध्ये ठाकरे याचा मुलगा सुध्दा सहभागी आहे. त्या रात्री त्या लोकांनी तिच्या घरी पार्टी केली, तिला स्वयंपाक करावयास सांगितले. दारु व कोंबडीची पार्टी झाली. त्या मुलीला दारु पाजण्यात आली असे गावातील लोकांच्या म्हणण्यावरुन समजले आहे. (अडथळा) सभापती महोदय, शासनाने वस्तुस्थिती लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या निवेदनातील माहिती असत्य आहे असा माझ्ा आरोप आहे.

या घटनेचा सुरुवातीपासून ते शेवटपर्यंतचा मी उलगडा करु इच्छितो. 7 लोकांनी तेथे पार्टी केली त्यापैकी 5 आरोपी आहेत हे निवेदनावरुन सिध्द झालेले आहे, पण त्यातील 2 आरोपी कोठे आहेत ? ठाकरे याच्या मुलाने आतून साखळी लावल्यानंतर बाकीचे 6 लोक बाहेर गेले. त्यानंतर तो मुलगाही छोट्याशा जागेतून शिडी लावून बाहेर गेला. पोलिसांनी ती शिडी जप्त केली का, ठाकरे याचा मुलगा आतून साखळी लावून बाहेर आला आणि त्याने सांगितले की, या मुलीने आत्महत्या केली आहे. या प्रकरणाला दडपण्याचे काम होत आहे. राजकीय द्वेषापोटी हे होत आहे. या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे म्हणून तिगावच्या 60 गावकऱ्यांनी आंबेडकर चौकामध्ये आंदोलन केले होते. त्या लोकांविरुध्द पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. पोलिसांनी गोंदिया येथील शल्य चिकित्सकाकडून वैद्यकीय तपासणी केली असता तिच्यावर बलात्कार करण्यात आला, तिच्या मानेची नस तुटली होती, तिचा गळा दाबून हत्या करण्यात आली हे सर्व निष्कर्ष समोर आले आहेत. या दुर्दैवी घटनेबाबत माहिती देत असताना मला अत्यंत दु:ख होत आहे.

2...

NTK/ D/ MMP/ KTG/ KGS/

श्री.केशवराव मानकर....

या निरपराध बालिकेचा दोष काय होता ? ठाकरे याचा दारुचा व्यवसाय आहे. त्याठिकाणी वेश्याव्यवसाय सुरु आहे. (अडथळा) सभापती महोदय, हे कुटुंब गरीब आहे, त्यांना कोठेही न्याय मिळू शकत नाही, गोवारी समाजावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. ही घटना दिनांक 28 फेब्रुवारी, 2011 रोजी घडली आहे. आजची तारीख 16 मार्च, 2011 आहे. परंतु या निवेदनात शेवटी असे नमूद केले आहे की, जिल्हा शल्य चिकित्सक, गोंदिया यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे. म्हणजे ज्यांनी पुन्हा पोस्टमार्टेम केले आहे त्यांच्याबाबत सुध्दा शासनाला संशय वाटत आहे का, या मुलीचे ज्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पोस्टमार्टेम केले होते त्यांनी वस्तुस्थिती लपविण्याचे काम का केले, पोलीस अधिकाऱ्यांनी या मुलीचे बलात्कार झ ाल्यानंतरचे कपडे का राखून ठेवले, याचे मला उत्तर पाहिजे. बाकीच्या आरोपींची नावे सांगू नये यासाठी पोलीस कस्टडीमध्ये असलेल्या आरोपींना मारझोड केली जात आहे. संशयाच्या भोवऱ्यामध्ये ही तपासणी अडकली आहे. त्यामुळे या प्रश्नाला न्याय मिळणार नाही असे मला वाटते. नाहक त्या बालिकेचा जीव गेला आहे. तिच्यावर झालेल्या अन्यायाबाबत न्याय मिळू शकत नाही. त्यादिवशी मी आणि सन्माननीय सदस्य श्री.खुशाल बोपचे प्रत्यक्षात गेलो होतो, त्यावेळी पीएसआय श्री.साखरे यांना सांगितले होते की, यातील 2 आरोपींना अटक करावी. पोलिसांनी त्या आरोपींना अटक केली आहे का ? गोंदिया जिल्हयाचे पालक मंत्री येथे उपस्थित आहेत. ते सुध्दा चौकशीसाठी गेले होते. त्यांच्या आदेशाचेही पालन झालेले नाही हे आमचे दुर्दैव आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 14:05

श्री. केशवराव मानकर....

पोलीस अधिका-याची आजच्या आज बदली करा असे त्यांनी सांगितले होते. वैद्यकीय अधिका-याच्या चौकशीचे आदेशही त्यांनी दिले होते. परंतु ना पोलीस अधिका-याची बदली झाली ना वैद्यकीय अधिका-याची चौकशी झाली. हे प्रकरण संशयाच्या भोव-यात आहे. म्हणून या प्रकरणी सीआयडी चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : सुनिता नागोसे या 13 वर्षाच्या मुलीच्या मृत्यूसंबंधीचा हा प्रश्न आहे. तिचे आई-वडील वीटभट्टीवर काम करतात. जे आरोपी आहेत त्यांचे मुलीच्या घरी येणे जाणे होते. त्यांनी पालकत्व स्वीकारलेले होते, अशी परिस्थिती होती. या सगळया पार्श्वभूमीवर त्या मुलीचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न आरोपींनी केलेला आहे असे दिसून येते. जो पोस्टमार्टेम रिपोर्ट उपलब्ध झाला त्यामध्ये " Death due to asphyxia due to strangulation around neck." असे म्हटलेले आहे. या प्रकरणाची फिर्याद श्री. साखरे नावाच्या पोलीस इन्स्पेक्टरने स्वतःहून दाखल केली. पहिल्या पोस्टमार्टेम रिपोर्ट नंतर लोकांनी रास्ता रोको आंदोलन केले. पहिल्या पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये बलात्काराचा उल्लेख नाही. म्हणून पुन्हा पोस्टमार्टेम करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यावेळी दुस-या पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये "Sexual intercourse might have taken place before death..." असा उल्लेख आहे....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये "Sexual intercourse might have taken place..." असा उल्लेख आहे. याचा अर्थ बलात्कार झाल्याची शक्यता वर्तविलेली आहे. त्यामुळे नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे समजण्याची आवश्यकता आहे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : ज्या पध्दतीने पोस्टमार्टेम रिपोर्ट दिला गेला त्याबाबतीत संबंधित डॉक्टरवर कारवाई करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिलेल्या आहेत.

श्री. केशवराव मानकर : मग अद्याप कारवाई का झाली नाही ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : पहिल्या पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये जी खबरदारी घेण्याची आवश्यकता होती ती घेण्यात आली नाही ही वस्तुस्थिती आहे. संबंधित डॉक्टरवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : या प्रकरणी आमगाव येथे पहिले पोस्टमार्टेम झाले. खरे तर बलात्कार झाल्याचा प्रायमाफेसी रिपोर्ट पहिल्या पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये यावयास पाहिजे होता. परंतु डॉक्टरने जाणीवपूर्वक तो रिपोर्ट देण्याचे टाळले. गुन्हेगारांना आणि डॉक्टरला कठोर शिक्षा व्हावी यासाठी लोकांनी रास्ता रोको आंदोलन केले म्हणून पुन्हा पोस्टमार्टेम करण्यात आले. हा प्रश्न अतिशय गंभीर आहे. एका मागासवर्गीय गोवारी समाजाच्या मुलीवर बलात्कार करुन तिचा खून झालेला असताना पोलीस यंत्रणा आणि वैद्यकीय अधिका-याकडून हा बलात्काराचा प्रकार दडपण्याचा प्रकार झालेला आहे. हे प्रकरण संशयास्पद असल्यामुळे या प्रकरणी सीआयडी मार्फत चौकशी केली जाईल काय,तसेच संबंधित डॉक्टरला ताबडतोब निलंबित केले जाईल काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील : पोलीस यंत्रणेने कारवाई करण्यामध्ये कोणतीही कमतरता दाखविलेली नाही. कायद्याच्या दृष्टीने जी काही अपेक्षित आहे ती सर्व कारवाई पोलिसांनी केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज पाटील.......... लक्षवेधी सूचना क्र.4....

किंबहुना पोस्टमार्टेम अहवालामध्ये स्वत: पोलिसांनी पत्र पाठवून काही गोष्टींचा उल्लेख करावयास लावला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांबाबत तपासणी करुन योग्य ती कारवाई निश्चितपणे केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बलात्काराचा मुद्दा वगळल्याबद्दल संबंधित डॉक्टरांवर कारवाई करण्याची घोषणा मंत्री महोदयांनी ताबडतोब सभागृहात जाहीर करावी. हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर तळमळीने हा मुद्दा मांडत होते, त्यांना आपण देखील थांबविले नाही. ही अत्यंत गंभीर घटना घडलेली आहे. मंत्री महोदय उत्तरामध्ये जर-तरची भाषा वापरणार असतील तर आजच सरकार बरखास्त करावे. हे सरकार तुमच्या आमच्यासाठी नाही. might have taken place असे नमूद करणाऱ्या डॉक्टरांच्या कानफटात लगावली पाहिजे. पोस्टमार्टेम अहवालामध्ये वैद्यकीय अधिकारी असे लिहू शकतो का? बलात्कार झाला किंवा नाही हे पोस्टमार्टेममध्ये लिहिता येते. पालकमंत्री पदाचा प्रश्न आहे. पालकमंत्री घटनास्थळी गेले असतील आणि जनतेच्या असंतोषाला सन्मानित करुन संबंधित डॉक्टर आणि पोलीस अधिकारी यांच्यावर तातडीने कारवाई करावी अशा प्रकारचे त्यांनी निदेश दिले असतील तर पालकमंत्र्यांचे निदेश का पाळले गेले नाहीत? अधिवेशन सुरु होईपर्यंत का वाट पहावी लागली? पालकमंत्र्यांचे ऐकले जात नाही किंवा त्यांना अधिकार नाही असा याचा अर्थ होतो. ज्या जिल्हयाचे पालकमंत्री आहेत तेथे सत्तेतील सहकारी पक्षाने संपर्कमंत्री नेमले आहेत, त्यांच्याकडून दबाव आणला गेला असाही दुर्दैवाने अर्थ निघू शकतो. पालकमंत्र्यांचे निदेश पाळले गेले नाहीत हे स्पष्ट झाले आहे. पालकमंत्र्यांचे निदेश का पाळले जात नाहीत? मंत्री महोदयांनी याठिकाणी अधिक चर्चा करावयास न लावता घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित पोलीस अधिकारी आणि डॉक्टर यांच्या निलंबनाची घोषणा करावी आणि या घटनेबाबत सीआयडी चौकशीची मागणी केली आहे ती सीआयडी चौकशी जाहीर करावी.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ही दुर्दैवी घटना घडली त्यानंतर मी स्वत: दुसऱ्या दिवशी तेथे गेलो होतो. मी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली, गावातील लोकांशी चर्चा केली. जवळजवळ दीड तास मी तेथे होतो. माझ्या असे लक्षात आले की, संबंधित पोलीस

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख.........

अधिकारी आणि मेडिकल ऑफिसर हे या प्रकरणामध्ये दोषी आहेत. त्यांना सस्पेंड करुन शासन त्यांच्यावर कारवाई करेल आणि त्या मुलीचे आई-वडील यांची अत्यंत गरिबीची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना शासनाच्या माध्यमातून 2 लाख रुपये आर्थिक मदत देण्याबाबत मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे. शासनाच्या माध्यमातून ही 2 लाख रुपयांची मदत त्या कुटुंबाला दिली जाईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.दिवाकर रावते : निलंबनाची कारवाई आता सभागृहात जाहीर करावी.

श्री.अनिल देशमुख : शासनाच्या माध्यमातून जे पोलीस अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी या प्रकरणात दोषी आहेत त्यांना सस्पेंड करुन त्यांची चौकशी करण्यात येईल.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.पांडुरंग फुंडकर : या घटनेबाबत आम्ही सीआयडी चौकशीची मागणी केली आहे. गोवारी समाजातील 13 वर्षे वयाच्या मुलीवर बलात्कार होऊनही मेडिकल ऑफिसरने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने कोणाच्या दबावाखाली might have taken place असे शब्द नमूद केले? त्या वैद्यकीय अधिकाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सीआयडी चौकशी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे.

नंतर 2ए.1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, या घटनेची सीआयडी चौकशी करण्यात येईल. दुसरी गोष्ट म्हणजे या मुलीवर बलात्कार झाला की नाही हे पाहणे आवश्यक होते तसेच पहिल्यांदा पोस्टमार्टेम झाले त्यावेळेस देखील हे पाहणे आवश्यक होते. लोकांनी उद्रेक केला म्हणून त्या मुलीला सिव्हील हॉस्पिटलला पाठविल्यानंतर तेथे झालेल्या पोस्टमार्टेममध्ये बलात्कार झाल्याची शक्यता वर्तविली आहे. इन्क्वेस्ट पंचनाम्यात यासंबंधीचा उल्लेख होणे आवश्यक होते. पण ग्रामीण रुग्णालयात ही गोष्ट बघितली नाही ही वस्तुस्थिती मान्य करुन या प्रकरणाचा संपूर्ण तपास सीआयडी करेपर्यंत संबंधित इन्व्हेस्टिगेशन ऑफिसर आणि पोस्टमार्टेम करणारा डॉक्टर यांना निलंबित करण्यात येईल. तसेच ही मुलगी अत्यंत गरीब घरातील असल्यामुळे मुख्यमंत्री निधीतून देखील या मुलीला आर्थिक मदत देण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : या अधिकाऱ्यांना कधी निलंबित करणार आहात ?

श्री. आर.आर.पाटील : निलंबनाचे आदेश ताबडतोब देण्यात येतील व त्यासंबंधीच्या प्रोसिजरला जेवढा वेळ लागेल तेवढाच वेळ निलंबनासाठी लागेल.

श्री. संजय केळकर : महोदय, या प्रकरणी ज्या गावकऱ्यांनी आंदोलन केले त्यांच्यावरील गुन्हे शासन मागे घेणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, ज्या लोकांनी या मुलीला न्याय मिळावा म्हणून आंदोलन केले त्यांच्यावरील गुन्हे ताबडतोब मागे घेण्यात येतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, शासनाच्या वतीने नेहमी सांगण्यात येते की आरोपीची डीएनए टेस्ट केली जाईल पण त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. या निमित्ताने मी असे विचारु इच्छिते की, प्रकरणाचा तपास सुरु असताना आरोपीची डीएनए टेस्ट केलीच नाही तर त्याचा परिणाम पुढे पुरावा नष्ट होण्यात होऊ शकतो. म्हणून या आरोपीची डीएनए टेस्ट घेण्याच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकाऱ्याने नमुने घेतले आहेत काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभागृहात शासनाने उत्तर दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी होत नाही, असे होत नाही. तसेच आपल्याकडे आश्वासन समिती देखील कार्यरत आहे. तिच्या माध्यमातून आपण सभागृहात दिलेल्या आश्वासनांबाबत पुढे आणखी फॉलो-अप करु शकता. या प्रकरणामध्ये शासनाने अत्यंत गांभीर्याने लक्ष घातले असून त्याची संपूर्ण चौकशी करण्यात येईल.

-----

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : कोकणातील बांबू व्यवसायाला विशेष महत्व देणे

**मु. शी.** :कोकणातील बांबू व्यवसायाला विशेष महत्व देणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकणात बांबूचे मोठ्या प्रमाणात उत्पादन आहे. सह्याद्रीच्या पर्वतात बांबूच्या विविध जाती आहेत. शिवकाळापासून कोकण प्रांतात बांबू उत्पादन घेतले जात आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत कोकणाला फार महत्व होते. त्यावेळी सैनिक शस्त्र म्हणून भाल्याचा वापर करीत, या भाल्यांना लागणारा दांडा हा बांबूचा असे. मोठ्या प्रमाणात दांडे उपलब्ध व्हावेत म्हणून स्वत: महाराजांनी प्रत्येकाने बांबूची लागवड करावी असे फर्मान काढले होते, असे इतिहास सांगतो.

सध्या रोजगाराचे नवे दालन म्हणून बांबू व्यवसायाकडे पाहिले जात आहे. त्यामुळे कोकणात नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या बांबूचे उत्पन्न वाढविण्यासाठी राज्य शासनाच्या कृषी व वन विभागाने संयुक्तरित्या मोहीम हाती घेऊन या उद्योगाला विशेष महत्व द्यावे," असे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : केज (जि. बीड) तालुक्यात जलस्वराज्यच्या माध्यमातून योजना घेऊनही पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणे

**मु. शी.** : केज (जि. बीड) तालुक्यात जलस्वराज्यच्या माध्यमातून योजना घेऊनही पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात राज्य शासनाच्या वतीने प्रत्येक तांडे, वस्त्या व गावांना पाणी पुरवठा करण्यासाठी जलस्वराज्य योजना केंद्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणे, तथापि सदर योजना काही गावात यशस्वी झाली असली तरी अनेक गावात राबविण्यात आलेल्या जलस्वराज्य योजनासाठी लाखो रुपये खर्च करुन नागरिकांना कायमस्वरुपी पाण्याची टंचाई भासणे याबाबत सखोल चौकशी करुन टंचाईग्रस्त गावांना पुरेशा प्रमाणात कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. तसेच यासंदर्भात सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कारवाई करावी अशी विनंती या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला करीत आहे."

--------

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील मुलींना पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी एस.टी. महामंडळाच्या बसने मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करुन देणे

**मु. शी.** : राज्यातील मुलींना पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी एस.टी. महामंडळाच्या बसने मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करुन देणे याबाबत श्री.विक्रम काळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात मोठ्या उत्साहाने महिला दिन साजरा करण्यात आला. एवढेच नव्हे तर महिलांचे अधिकाधिक सक्षमीकरण व्हावे, त्या मुख्य प्रवाहात याव्यात, त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देण्यात यावे यासाठी नुकताच राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतलेला आहे. एक प्रकारे आघाडी शासनाने राज्यातील महिलांना महिला दिनाची भेटच दिली आहे. त्यामुळे महिला वर्गात आनंदाचे वातावरण आहे. एवढेच नाही तर केंद्र सरकारनेही मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी पदवी पर्यंतच्या शिक्षणासाठी मुलींना लोकलचा प्रवास मोफत करुन मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहित केले आहे. आज राज्यातील ग्रामीण भागातून मुली शिक्षणासाठी मोठ्या संख्येने शहरात तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी बसने प्रवास करीत असतात तेव्हा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंचे स्वप्न साकार होण्यासाठी मुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी राज्यातील मुलींना पदव्युत्तर पर्यंतचे शिक्षण घेण्यासाठी बसचा प्रवास मोफत करावा अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे माझी मागणी आहे."

--------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

श्री. दिवाकर रावते : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखाद्वारे शिक्षण घेणा-या मुलींना बसने मोफत प्रवास पास सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी हा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो परंतु शिवसेनेच्या काळात शिक्षण घेणा-या मुलींना बसने प्रवास मोफत केला होता परंतु आपले आघाडी शासन आल्याबरोबर युती शासनाचा निर्णय या सरकारने बदलवला. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी युती शासनाने मुलींच्या शिक्षणासाठी जो निर्णय घेतला होता तो निर्णय पुन्हा सुरु करावा असे विशेष उल्लेखाच्या संदर्भात उल्लेख करावयास पाहिजे होता एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात आरोग्य यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे लेप्टोस्पायरोसिसने25 व्यक्तींचा झालेला मृत्यू.

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात आरोग्य यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे लेप्टोस्पायरोसिसने 25 व्यक्तींचा झालेला मृत्यू याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य यंत्रणेची लागलेली वाताहात, शासनाच्या आरोग्य यंत्रणेकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे व प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2010 च्या सुमारास लेप्टोस्पायरोसिसमुळे 25 जण दगावणे, या साथीची ज्या जीवाणूमुळे लागण झाली तो जीवाणू लेप्टोस्पायरोसिस-पायजीनस या जातीतला असल्याचे अंदमान येथील आलेल्या अभ्यास पथकाने या संबंधीचा अहवाल राज्य शासनास माहे मार्च,2011 च्या सुमारास सादर करणे, गेल्या 5 ते 7 वर्षात सुमारे 100 रुग्ण या साथीमुळे दगावणे, कणकवलीत जास्तीत जास्त रुग्ण दगावणे, प्लेटलेट सेप्रेशन युनिटची यंत्रणा येऊन 2 ते 3 वर्षे पडून राहणे, इमारतीचा निधी येऊन इमारत होण्यास 2 ते 3 वर्ष लागणे, या हलगर्जीपणा करणा-या प्रशासन प्रमुखांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे विधानपरिषद सभागृहात वि.प.स. नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनाच्या वेळी 15.12.2010 रोजी माननीय मंत्र्यांनी दिलेल्या उत्तरात नमूद करण्यात आल्यानुसार संबंधित पोलीस स्थानकात या गुन्हयांची नोंद करण्यात आलेल्या गुन्हा क्रमांकाची मागणी केली असता त्यांनी अशा प्रकारचा कोणताच गुन्हा पोलीस स्थानकात दाखल करण्यात आलेला नसल्याचे सांगण्यात येणे, विधानपरिषदेत माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिल्याप्रमाणे सदरहू गुन्हा दाखल करुन जिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ. कुलकर्णी यांची तातडीने बदली करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे. यासाठी मी विशेष उल्लेख मांडलेला आहे.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पेडर रोडचा उल्लेख डॉ. गोपाळराव देशमुख करण्याबाबत

**मु. शी.** :पेडर रोडचा उल्लेख डॉ. गोपाळराव देशमुख करणे याबाबत

श्री. दिवाकर रावते,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, या विशेष उल्लेखामधून सरकारचा नाकर्तेपणा दाखवण्यासाठी मी उभा आहे. मुंबई शहरातील "डॉ गोपाळराव देशमुख" मार्गाचा उल्लेख कायम "पेडर रोड" नावाने केला जातो. हा मार्गाचे नाव "पेडर रोड" नसून "डॉ. गोपाळराव देशमुख मार्ग" असे आहे. "डॉ. गोपाळराव देशमुख मार्ग" हा काही काल परवा झालेला नसून यासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने 1968 साली ठराव केला होता व त्यानुसार या मार्गाच्या नावात बदल करण्यात आला होता व असा फलक सुध्दा त्या ठिकाणी आहे. या ठिकाणी राहणारे जवळपास सर्वच नागरिक आपल्या फलकावर तसेच इमारतीवर "पेडर रोड" असा उल्लेख करीत असतात. पेडर रोड या नावाचा निषेध करण्यासाठी मी सातत्याने या सभागृहात आवाज उठवत आलेलो आहे. गेल्या महिन्यात या ठिकाणच्या सर्व आस्थापनांना "पेडर रोड" हा शब्द काढून त्या ठिकाणी "डॉ. गोपाळराव देशमुख मार्ग" असा उल्लेख करण्यात यावा यासाठी शिवसेनेतर्फे लेखी पत्र पोहचवलेले आहे. माननीय मत्र्यांनी या सभागृहात पुलाच्या संदर्भात "पेडर रोड" असा उल्लेख केल्याबरोबर मी त्यांना पत्र देखील पाठवले होते व तेव्हापासून सरकारी उल्लेखातून "पेडर रोड" हा शब्द काढून टाकण्यात आला होता. परंतु मला दुर्दैवाने एवढयासाठी विषय मांडावा लागत आहे की, शिवतीर्थावर 26 जानेवारी व 1 मे रोजी परेड होत असते. त्यासंदर्भात मला निमंत्रण आले होते व निमंत्रणाबरोबर आम्हाला वाहनतळाचा देखील पास आला होता. परंतु शासनामार्फत देण्यात येणा-या वाहनतळाच्या पासावर "पेडर रोड" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

त्यानंतर महानगरपालिकेने केलेल्या ठरावानुसार स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग हा 1966 साली झाला असून हा मार्ग "स्वातंत्र्य वीर सावरकर मार्ग" म्हणूनच सर्व लोकांना माहीत आहे. परंतु राज्य शासनाच्या मुख्य सचिवांनी " मात्र स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग आणि ( कॅडल रोड )" असे छापले आहे. या लोकांना अशा प्रकारे लिहिण्याची काय हौस आहे हे मला समजत नाही.1966 साला पासून राज्यातील आणि परदेशातील लोकांना या रस्त्यावरुन जात असताना या रस्त्याचे नाव स्वातंत्र्य वीर सावरकर मार्ग आहे हे माहीत असतांना काही अधिका-यांच्या अंगात काही वेगळे भिनले असेल तर ते त्यांच्याकडेच राहिले पाहिजे.परंतु मुद्दाम कंसामध्ये "कॅडल रोड" असा उल्लेख करण्याची अधिका-यांना हौस का आहे हे मला माहीत नाही.माननीय मुख्य सचिवांना मी त्या बाबतीत एक पत्र लिहिले होते. त्या पत्राला मला उत्तर देण्यात आले होते त्या पाकीटावर असा स्टॅम्प मारला होता की, "सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई - 32" त्यावेळी मी त्यांना असे पत्र लिहिले होते की पुढच्या पिढीला त्यांचे नाव आठवावे यासाठीच स्वातंत्र्यासाठी जे लढले होते त्या व्यक्तीची नावे आपण रस्त्यांना देत असतो. मंत्रालयाचा पत्ता लिहित असतांना मात्र मंत्रालय, मादाम कामा मार्ग, राजगुरु चौक, मुंबई - 32 असा लिहिला गेला तर मंत्रालयाच्या पत्याच्या निमित्ताने महाराष्ट्रामध्ये मादाम कामाच्या नावाची कायम आठवण राहील. मादाम कामा यांनी पहिला तिरंगा फडकाविला होता. त्याचबरोबर राजगुरु हे फासावर गेले होते त्यांचीसुध्दा नवीन पिढीला आठवण राहील. तसेच मादाम कामा आणि राजगुरु कोण असा प्रश्न नवीन पिढीकडून विचारला जाणार नाही.परंतु मंत्रालयाचा पत्तासुध्दा पूर्ण लिहिण्याचा आळस काही व्यक्ती का करतात हे समजत नाही. पूर्ण पत्ता लिहित असतांना संबंधित व्यक्तीचे काहीही नुकसान होत नसते.

सभापती महोदय, डॉ.गोपाळराव देशमुख मार्गाच्या निमित्ताने मी पुन्हा एकदा विशेष उल्लेखाची सूचना मांडत असतांना माननीय गृहमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत व मी त्यांना सांगू इच्छितो की, गेल्या दोन वर्षापासून सातत्याने सांगून देखील न ऐकणा-यांना वठणीवर आणण्यासाठी येत्या काही दिवसात सर्व नामकरण मी माझ्या हाताने पुसून टाकण्याचा निर्णय घेतला आहे.याबाबतीत तुम्हाला जी काही कारवाई करावयाची असेल ती जरुर करावी परंतु या नाठाळांना वठणीवर आणण्यासाठी माझ्यासमोर दुसरा कोणताही पर्याय नाही. डॉ.गोपाळराव देशमुख हे कोण होते याचा इतिहास मी या ठिकाणी आता वाचत नाही.महानगरपालिकेने या

श्री.दिवाकर रावते ....

मार्गाला डॉ.गोपाळराव देशमुख यांचे नाव दिले होते. परंतु आता त्यांचे जे नातू आहेत ते समितीसमोर गेले होते आणि पुलाच्या निमित्ताने जे आंदोलन करीत आहेत त्यांना असे सांगितले की तुम्ही पेडर रोड असोसिएशन हे नाव काढा तेव्हा हे सर्व महाभाग कसे आहेत याची डीएनए टेस्ट केली पाहिजे.ते असे म्हणतात की, डॉ गोपाळराव देशमुख यांच्या पेक्षा पेडर हा फार मोठा माणूस होता व तेच नाव आम्ही लावणार आहोत त्यामुळे कोणाचा अभिमान बाळगणारी नवीन पिढी तेथे राहते हे आपल्या लक्षात येईल. त्यांच्याकरिता या पुलाचे काम थांबविण्यात आले आहे.या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, ज्या ज्या भागामध्ये जे रस्त्याचे नामकरण झालेले आहे ते अंमलात आणले पाहिजे आणि डॉ.गोपाळराव देशमुख यांच्या नावाच्या संदर्भात मी लवकरच आंदोलन करणार आहे, त्या बाबतीत मला शासनाने योग्य ते सहकार्य करावे अशी विनंती करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. महाराष्ट्रात गैरबासमती तांदळावरील बंदी तात्काळ उठविणे

मु.शी.:महाराष्ट्रात गेरबासमती तांदळावरील बंदी तात्काळ उठविण्याबाबत

श्री.केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या पूर्व विदर्भातील पाच जिल्हे म्हणजेच गोदिंया ,भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूरचा काही भाग तसेच कोकणामध्ये धानाचे उत्पादन मोठया प्रमाणात होते परंतु 2007 पासून केन्द्र शासनाने गैर बासमती तांदळावर बंदी आणली असून तेव्हा पासून देशांतर्गत तांदळाच्या किंमती मोठया प्रमाणावर कमी झाल्या आहेत त्यामुळे धान उत्पादक शेतकरी चांगलाच संकटात सापडलेला आहे. केन्द्र शासनाने विदेश व्यापार नितीनुसार 1 मार्च 2011 रोजी शासन निर्णय काढला आहे त्यात दक्षिण भारतातील तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ व कर्नाटक या चार राज्यातून एक लाख टन सोनामसुरी, 25 हजार टन पोन्नासाम्बा, 25 हजार टन महाचावल या सर्व गैरबासमती तांदळाला विदेशात निर्यात करण्यास परवानगी दिली आहे. महाराष्ट्रातील एचएमटी म्हणजे दक्षिण भारतातील सोनामसुरी नावाने ओळखल्या जाणा-या तांदळाला केन्द्र शासनाने निर्यात करण्याची परानगी दिली परंतु महाराष्ट्रात मोठया प्रमाणात एचएमटी तांदळाची निर्मिती होत असूनसुध्दा गैरबासमती तांदळावर निर्यातबंदी कायम आहे, त्यामुळे काही ठराविक व्यापारी गैरमार्गाने दरमहा लाखो टन गैरबासमती तांदळावर निर्यात करतात त्यामुळे केवळ विदर्भातील जवळपास 700 राईस मिल बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशा प्रकारच्या शासनाच्या उदासीन धोरणामुळे महाराष्ट्रातील धान उत्पादकाना चांगलाच फटका बसला आहे त्यामुळे
शेतक-यांवर धानाचे उत्पादन बंद करण्याची वेळ आलेली आहे. तसेच भविष्यात शासनावर तांदाळाची आयात करण्याची वेळ आली असून महाराष्ट्रात असलेली गैरबासमती तांदळावरील निर्यात बंदी तात्काळ उठविण्याची आवश्यकता लक्षात घेता शासनाने तातडीने कार्यवाही करण्यासाठी हा अत्यंत महत्वाचा विषय मी विशेष उल्लेखाच्या माध्यामातून मांडत आहे.

-----

नंतर श्री.सरफरे

अध्यक्षित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रायगड किल्ल्यावरील ढासळणाऱ्या भिंतीची डागडुजी करणे

**मु. शी.** :रायगड किल्ल्यावरील ढासळणाऱ्या भिंतीची डागडुजी करणे याबाबत श्री.रामदास कदम,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री.रामदास कदम यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"हिंदवी स्वराज्याच्या इतिहासाचा अनमोल ठेवा म्हणजे रायगड किल्ला. शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी, मात्र पुरातत्व खात्याच्या "मोगलाई" कारभारामुळे किल्ल्यावरील भिंती ढासळत चालल्या असून वेळीच डागडुजी केली नाहीतर रायगडचे वैभव नष्ट होण्याची निर्माण झालेली भीती, रायगडवरील बाजारपेठ, मेघडंबरी, सात राण्यांच्या महालांच्या भिंतीही ढासळण्याच्या मार्गावर आहेत. किल्ले रायगडवरील हे वैभव सुमारे 350 वर्षे पुरातन असून चुना, गूळ आणि मातीचा वापर करुन उभारण्यात आलेल्या दगड-विटांच्या भिंती परकीय आक्रमण, ऊन, वारा, पाऊस झेलत आजही उभ्या आहेत. परंतु आज या भिंतींना देखभाल दुरुस्तीची गरज आहे. पुरातन वास्तूंचे जतन करण्याचे काम ब्रिटीश राजवटीपासून केंद्रीय पुरातत्व विभागाकडे सोपविण्यात आले आहे. परंतु पुरातन वास्तूंच्या भिंती जतन करण्याऐवजी पडल्यानंतर त्या बांधण्याचे काम पुरातत्व विभाग करीत असते, याकरिता शासनाने या पुरातत्व खात्याला या वास्तूंचे जतन करण्याकरिता उपाय योजना करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता आहे. याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे".

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आपण सर्वजण नेहमी घेतो. त्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून या सभागृहाचे कामकाज चालत असते. मला यानिमित्ताने एक गोष्ट अत्यंत खेदाने सांगावीशी वाटते की, ज्या छत्रपतींच्या नावाने आपण राज्य करीत आहोत त्यांची त्यावेळची राजधानी असलेला रायगड किल्ला आज देखील आहे. त्याठिकाणी पुरातत्व विभागाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. रामदास कदम...

"मोगलाई" सुरु आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. त्या किल्ल्यातील भिंतीची मोठया प्रमाणात पडझड झाली आहे, त्याठिकाणी असलेली बाजारपेठ नामशेष होत चालली आहे. या करिता छत्रपतींच्या नावाने कोणतेही राजकारण न करता छत्रपतींची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी पुरातत्व विभागाशी संपर्क साधून त्यांना अधिक निधी प्राप्त करुन देण्याकरिता या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनास विनंती करीत आहे. सभापती महोदय, आपण मला याठिकाणी सूचना मांडण्यास संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितली आहे.त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानते. सीमा भागातील मराठी भाषिकांच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी नुकतेच कन्नड विश्व संमेलन घेण्यात आले होते. कोणत्या भाषेमध्ये विश्व संमेलन घ्यावे हा त्या राज्याचा प्रश्न असला तरीसुध्दा साहित्यिक आणि पत्रकार असलेले श्री. पाटील पुटप्पा यांनी त्या संमेलनामध्ये जी विधाने केली ती निश्चितपणे मराठी भाषिकांना आणि इतिहासाचे प्रेमी असलेल्यांना संताप वाटेल अशाप्रकारची आहेत. ते असे म्हणाले की, बेळोडी मलम्मा या राणीने छत्रपती शिवाजी महाराजांचे प्राण वाचविले होते म्हणूनच शिवाजी महाराज मराठी सत्ता स्थापन करु शकले. त्याचबरोबर ते असेही म्हणाले की, चालुक्य आणि राष्ट्रकुटच्या काळात मराठीचे अस्तित्वही नव्हते, शहाजीराजे बंगळुरु येथे आदिलशहाच्या दरबारामध्ये कामाला होते. त्यामुळे कर्नाटक हा मुंबईपर्यंत पसरलेला होता. महाराष्ट्र हा देखील कर्नाटकाचा भाग आहे. मराठी भाषिक देखील कर्नाटकाचेच आहेत. त्यांनी इतिहास, भाषाशास्त्र आणि भूगोल याचा अभ्यास न करता चुकीच्या पध्दतीने अपमानकारक विधाने केली आहेत. याबाबत मराठी भाषिकांनी बेळगावमध्ये तीव्र भावना व्यक्त करुन त्यांचे पुतळे देखील दहन केले आहेत. त्यामुळे मराठी विश्व साहित्य संमेलन बेळगावमध्ये घेऊन त्या विधानांचा खरमरीत पध्दतीने समाचार घेण्याची जबाबदारी मराठी भाषिक, महाराष्ट्र सरकार आणि आपण सर्वांनी स्वीकारावी. जेणेकरुन त्यांना त्याच भाषेमध्ये कृतीव्दारे सणसणीत उत्तर देण्यात यावे अशी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे शासनाला विनंती करते. सभापती महोदय, आपण नेहमी सीमा प्रश्नाबाबत वेळोवेळी शासनाला निर्देश दिले आहेत, तसेच निर्देश याही बाबतीत आपण ठणकावून द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

-----

**पृ. शी.** : विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. I OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री. डी.पी. सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 1 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. डी.पी. सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 1 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त
आयुक्त (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. II OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LOKAYUKTA AND UPA-LOKAYUKTAS ACT, 1971.)

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय,सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक -2 महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक-2 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन्हा भरेल.

( 2.35 ते 3.15 मध्यंतर)

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा माडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक महत्वाचा विषय सभागृहात उपस्थित करीत आहे. शिक्षण सेवक भरतीच्या संदर्भामध्ये रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या गेटवर प्रचंड असे आंदोलन सुरु आहे. काही लोकांना अटक झालेली आहे आणि काही लोकांना सोडून देण्यात आलेले आहे. बी.एड. शिक्षण सेवक पदवीधारक बेरोजगार संघटना त्या ठिकाणी रस्त्यावर उतरलेली आहे. भरती प्रकियेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे मुलाखती घेण्याच्या कामाला स्थगिती देण्यात यावी यासंबंधीचे तोंडी आदेश देण्यात आलेले होते. माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर माननीय ग्राम विकास मंत्री, सन्मानीय आमदार, जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी, परीक्षा परिषद मंडळाचे आयुक्त श्री. माने या सगळयांची 14 तारखेला एकत्रित बैठक झाली आणि त्यावेळी तोंडी सांगण्यात आले की, ही भरती प्रक्रिया थांबविण्यात येईल. परंतु या संबंधीचा फॅक्स त्या जिल्हा परिषदेला प्राप्त न झाल्यामुळे त्या ठिकाणी मुलाखतीचा कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. एखादा विषय न्यायप्रविष्ट असताना अशा प्रकारची भरती प्रक्रिया चालू करणे हे अयोग्य आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्हा परिषदेसमोर आज सकाळी 11.00 वाजता पासून मोठया प्रमाणात आंदोलन सुरु आहे. त्या ठिकाणी काही लोकांना अटक झालेली आहे. रस्ता रोको आंदोलन सुरु आहे. म्हणून मी या ठिकाणी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला विनंती करु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री आणि माननीय ग्राम विकास मंत्री यांनी जे मान्य केले होते त्यासंबंधीचे लेखी आदेश त्वरित द्यावेत. हा विषय न्यायप्रविष्ट असताना अशा प्रकारे मुलाखत चालू करणे हे बेकायदेशीर आहे त्यामुळे यासंदर्भात जिल्हा परिषदेला तातडीने कळविण्यात यावे, अशा प्रकारची विनंती सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला करु इच्छितो.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, यासंदर्भातील फॅक्स आज केला नाही तर त्याठिकाणी गोंधळ निर्माण होईल. त्या ठिकाणी आंदोलन सुरु आहे. हा विषय न्यायप्रविष्ट आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय ग्राम विकास मंत्र्यांची बैठक झालेली आहे. पण या संदर्भातील लेखी सूचना जिल्हा परिषदेला प्राप्त न झाल्यामुळे त्या ठिकाणी भरती प्रक्रिया सुरु झालेली आहे. जिल्हा परिषदेच्या गेट समोर आंदोलन झाल्यामुळे काही लोकांना अटक करण्यात आलेली आहे. तेथील बी.एड. शिक्षण सेवक, पदवीधारक बेरोजगार संघटना रस्त्यावर उतरलेली आहे. म्हणून यासंदर्भातील फॅक्स तातडीने केला नाही तर तेथील भरती प्रक्रिया चालू राहील आणि ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाचा अवमान होईल.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री यांना ही बाब लगेच अवगत करण्यात येईल.

----

यानंतर श्री. बरवड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात रॉकेल, डिझेल, दूध, औषधे इत्यादी जीवनावश्यक वस्तूंमध्ये प्रचंड भेसळ होत असल्याचे निदर्शनास येणे

**मु. शी.** : राज्यात रॉकेल, डिझेल, दूध, औषधे इत्यादी जीवनावश्यक वस्तूंमध्ये प्रचंड भेसळ होत असल्याचे निदर्शनास येणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, श्री. पाशा पटेल, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, परशुराम उपरकर, वि. प. स. यांचा प्रस्ताव

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"रॉकेल, डिझेल, दूध, औषधे इत्यादी जीवनाश्यक वस्तूंमध्ये प्रचंड भेसळ होत असल्याचे निदर्शनास येणे, या भेसळीच्या माध्यमातून अवैध संपत्ती निर्माण करणारे माफिया जागोजागी तयार होणे, अधिकाऱ्यांनी माफियांच्या कारवायांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करणे व शासनानेही याबाबतीत डोळेझाक करणे, गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट हा बंदी असलेला पदार्थ वापरल्याने सर्वसामान्य जनतेला कर्करोगासारखे आजार होणे, या सर्व बाबीमुळे सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम, शासनाने या प्रकरणी कोणतीही कारवाई न करणे, बांधकामासाठी आवश्यक असलेल्या रेतीचा अवैध उपसा होणे, त्यामुळे शासनाच्या महसूलाचे कोट्यवधी रुपयांचे होणारे नुकसान, या सर्व बाबतीत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, खरे म्हणजे गेल्या 8-10 वर्षापासून या राज्यामध्ये या माफियांनी डोके वर काढलेले आहे. राज्यामध्ये एकाच प्रकारचा माफिया असता तर समजू शकलो असतो परंतु गेल्या 4-6 महिन्यांमध्ये राज्यात अनेक प्रकारचे माफिया समोर आलेले आहेत. पुरोगामी समजला जाणारा महाराष्ट्र, फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र या नावाने देशामध्ये आपल्या राज्याची ओळख होती. देशात पहिल्या क्रमांकाचे राज्य म्हणून

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

श्री. पांडुरंग फुंडकर ....

महाराष्ट्राची ओळख होती. पण गेल्या 7-8 वर्षात ज्या गतीने अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला, मुंबईतील जमिनी विकण्याचा जो सपाटा सुरु झाला त्यातून भूखंड माफिया समोर आले. श्री. यशवंत सोनवणे यांच्या मृत्यूमुळे तेल माफिया समोर आले. राज्यात वाळू उपसा मोठ्या प्रमाणावर होतो. त्या संदर्भात या सरकारने निर्णय घेतला आणि महाराष्ट्रातील नद्या विक्रीला काढल्या. त्यातून वाळू माफिया निर्माण झाले. गोरगरीब माणसे तसेच लहान मुलांपासून ते म्हाताऱ्या माणसांपर्यंत सगळ्यांना दुधाची आवश्यकता असते. मुंबईमध्ये रोज लाखो लिटर दूध येते. त्या दुधामध्ये भेसळ होते. त्यातून दूध भेसळ माफिया निर्माण झाले. आज आपण महाराष्ट्रामध्ये गेलात तर आपल्याला ठिकठिकाणी टोल नाके दिसतात. त्या टोलमधून कोट्यवधी रुपयांची माया जमविणारे टोल माफिया या महाराष्ट्रामध्ये निर्माण झाले. रेशन दुकानातून गोरगरीब, आदिवासी लोकांना रेशन न मिळतातच ते परस्पर मार्केटमध्ये विकले जाते. त्यातून फार मोठे रेशन माफिया या राज्यामध्ये तयार झाले. सावकारी माफिया हा शेवटचा माफिया आहे. या माफियाने गेली 10 वर्षे महाराष्ट्रामध्ये हैदोस घातलेला आहे. कालच या राज्यातील शेतकऱ्यांना माननीय राष्ट्रपतींना भेटावयास जावे लागले. त्यांना कोठेही न्याय मिळत नाही म्हणून शेवटी या राज्यातील शेतकऱ्यांनी काल माननीय राष्ट्रपतींची भेट घेतली. सावकारी माफिया सुध्दा दबले गेले नाहीत. अशा या पुरोगामी महाराष्ट्रात, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आज जणू काही माफियाराज सुरु झाले आहे. सरकार हतबल आहे. यामध्ये प्रशासन गोवले गेले आहे. प्रशासन आणि माफिया यांचे संगनमत झाले आणि सरकारने त्यांना वरदहस्त दिला.

सभापती महोदय, भूखंड माफियांच्या विषयावर मी आज या ठिकाणी बोलणार नाही. कारण तो एक स्वतंत्र चर्चेचा विषय होणार आहे. परंतु सर्वसामान्य माणसाला ज्या जीवनावश्यक वस्तू लागतात त्या त्यांना मिळेनाशा झाल्या आहेत. या माफियांच्या माध्यमातून या वस्तू घेऊन कोट्यवधी रुपयांची हेराफेरी या राज्यामध्ये व्हावयास लागली आहे.

यानंतर श्री. सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आज तेल माफियाबद्दल बोलत असताना मला सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांची आठवण होते. सन 2003-04 च्या दरम्यान अंतिम तोतला नावाच्या माणसाचे प्रकरण त्यांनी बाहेर काढले होते. 4 हजार कोटी रुपयांचा काळा बाजार या तेल माफियाने केला होता. त्यातून जवळपास 400 कोटी रुपये करांचे शासनाचे नुकसान झाले होते. हे सर्व सिध्द झाले होते. त्यावेळी या तेल माफियाचा बंदोबस्त केला असता तर यशवंत सोनवणे या दलित अधिका-यांना आपला जीव गमवावा लागला नसता.

तेल माफियांनी कोणता दिवस हेरला ? प्रजासत्ताक दिन साजरा होत असताना त्याच्या पूर्व संधेला ही घटना घडवून आणली. एका बाजूला राज्यामध्ये प्रजासत्ताक दिनाची तयारी सुरु होते आणि त्याच्या पूर्व संधेला मनमाडजवळ पानवडे गावात भर दुपारी अपर जिल्हाधिकारी यशवंत सोनवणे हे रस्त्यावरुन जात असताना एका ढाब्यावर पेट्रोलच्या टँकरमधून पेट्रोल काढून रॉकेल भेसळ करण्याचे काम चालू असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी त्याची चौकशी केली, ती तेल माफियांना सहन झाली नाही. 50 वर्षामध्ये या राज्यामध्ये अशी घटना घडली नव्हती. राज्यामध्ये सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असताना या सुवर्ण महोत्सवी वर्षात व प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संधेला एका अपर जिल्हाधिकारी तेलाची भेसळ पकडता यावी म्हणून चौकशीसाठी गेले असताना पोपट शिंदे नावाच्या तेल माफियाने यशवंत सोनवणे यांच्या अंगावर 10 लिटर रॉकेलचा कॅन ओतून त्यांना पेटवून दिले. सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करणारे राज्य, फुले, शाहू, आंबेडकर यांचे राज्य, या राज्यात अपर जिल्हाधिका-यांची अंगावर तेल टाकून हत्या होते त्याच दिवशी या राज्याला कलंक लागला. हे कोणाचे अपयश आहे, यशवंत सोनवणे यांची काय चूक होती ? पानेवाडी हे गाव मनमाडपासून खूप लांब नाही. या घटनेच्या तिस-या दिवशी मी तेथे गेलो होतो. हे गाव मनमाडपासून 10 कि.मी.सुध्दा लांब नाही. त्याच्या 5-7 कि.मी.च्या परिसरात तेल कंपन्यांचे डेपो आहेत. त्यातून शेकडो तेलाचे टँकर्स बाहेर निघतात. यशवंत सोनवणे यांची हत्या झालेला ढाबा तर डेपोपासून 1 कि.मी.सुध्दा लांब नाही. मनमाडपासून 10 कि.मी.वर असे अनेक स्पॉट आहेत. तेथे गाडया उभ्या करुन त्याच्यातील पेट्रोल काढून त्यात रॉकेल टाकले

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

जाते, डिझेल काढून रॉकेल टाकले जाते. त्यातून लाखो रुपयांची उलाढाल दिवसाढवळ्या सुरु असते. यशवंत सोनवणे हे चौकशीला गेले म्हणून त्यांना जाळण्यात आले. हा धंदा केवळ त्याच दिवशी सुरु नव्हता. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अंतिम तोतला या तेल माफियाचे प्रकरण बाहेर काढले त्या दिवसापासून या राज्यात तेल माफियांचे राज्य सुरु आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:30

(श्री. पांडुरंग फुंडकर...

हा तेल माफिया आता डेपोपुरता मर्यादित राहिलेला नाही. हा तेल माफिया आता गावापर्यन्त, तालुक्या पर्यन्त आणि जिल्ह्यापर्यन्त पोहोचलेला आहे. हा तेल माफिया गावातील लोकांना घरात लागणारे रॉकेल देत होता काय याची मंत्री महोदयांनी चौकशी करावी. रॉकेलचा जो कोटा वितरित केला जातो तो या तेल माफियाला वितरित केला जातो. लोकांना इमानदारीने तेलाचे वाटप करणा-यांना हा कोटा दिला जात नाही. ज्या दिवशी यशवंत सोनावणेचा मृत्यू झाला त्या दिवशी या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथीराज चव्हाण यांनी असे सांगितले की, "आम्ही घटनेची गंभीर दखल घेत असून दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत." त्यानंतर महसूल मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांनी हल्लेखोरांवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याचे आश्वासन दिले. इतकेच नाही तर नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी देखील "या प्रकरणी कडक कारवाई व्हायला पाहिजे" असे वक्तव्य केले.

सभापती महोदय, हा पोपट शिंदे कोण होता ? तर साधा वडापाव विक्रेता. अल्पावधीत हा तेल माफिया कसा काय बनला ? राज्य शासन यशवंत सोनावणेच्या मृत्यूची चौकशी करणार असले तरी मंत्री महोदय या प्रकरणाच्या खोलात जाणार आहेत की नाही, पोपट शिंदेला कुणाचे वरदान होते ? नाशिकच्या अधिका-यांनी तडीपारीचे आदेश दिलेले असताना ही तडीपार मंत्रालय स्तरावर कशी काय रद्द करण्यात आली, ही तडीपार रद्द करण्याची शिफारस कुणी केली , पोपट शिंदे संबंधी चांगले वक्तव्य गृह खात्याच्या सचिवांसमोर कोणी केले ? या सर्व प्रश्नांची तड लागली पाहिजे. यशवंत सोनावणेच्या मृत्यूचे प्रकरण या शासनाला केवळ 302 कलमाखाली गुन्हा दाखल करुन संपविता येणार नाही. या प्रकरणी सखोल चौकशी झाली पाहिजे. मुंबईपासून जे शेकडो टँकर निघतात ते कोठे जातात, कुणाच्या पेट्रोलपंपावर जातात याची चौकशी आपण करणार आहात काय, वडापाव विकणा-या या पोपट शिंदेची तडीपारी रद्द का करण्यात आली ? त्याची तडीपारी रद्द झाल्यानंतर तो मुजोर झाला. आम्ही चौकशी करु, कठोर कारवाई करु, मोक्का लावू अशा प्रकारची वक्तव्ये मंत्री महोदयांनी केली. मग या प्रकरणी आता पर्यंत काय कारवाई करण्यात आली ? तर 4 लोकांना पकडले. आम्ही तेल माफियांना सोडणार नाही अशी गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी घोषणा केली आणि दोन दिवस संपूर्ण महाराष्ट्रभर धडाधड धाडी पडल्या.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

त्या धाडीत छोट्या छोट्या माणसांना पकडले. एक टमरेल रॉकेल घेऊन जाणा-या गरीब माणसाला रॉकेलच्या प्रकरणात पकडले...(अडथळा) मी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या घटनेकडे गंमतीने पाहू नका. हा अतिशय गंभीर विषय आहे. गृह मंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर 400 लोकांना पकडले. सभापती महोदय, आपल्या ट्रक्टरसाठी 5 लिटर डिझेल घेऊन जाणा-या एका शेतक-याला पकडले. नागपूर येथे एक घटना घडली. एकाला रेशनच्या दुकानाचा कोटा मिळाला होता. त्याला पकडले. त्याबाबतीत विरोध केला म्हणून संपूर्ण पारधी समाजाच्या वस्तीला ठोकून काढले. दोन दिवस हा देखावा निर्माण झाला. सभापती महोदय, पोलिसांना स्वप्न पडते की काय असा मला प्रश्न पडतो. गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी आदेश दिल्याबरोबर 400 लोकांना पकडले.

...नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...........

ही ठिकाणे पोलिसांना कशी समजली, याचे मला आश्चर्य वाटते. याचा अर्थ पोलिसांना या ठिकाणांसंबंधीची माहिती होती. यशवंत सोनवणेचा मृत्यू झाल्यामुळे अशा प्रकारे धाडी टाकून 400 लोकांवर केसेस करण्याचा देखावा शासनाला करावा लागला, असा माझा आरोप आहे. राज्यात आज हा रॉकेल माफिया खेड्यापर्यंत जाऊन पोहचलेला आहे. खेड्यात तेल व रॉकेल गरिबाना मिळत नाही पण ट्रक व काली-पिली टॅक्सी यांना मात्र सर्रास मिळते. अशा प्रकारे हे खेड्यातील तेल व रॉकेल पुन्हा शहरात येते आणि ट्रक व टँकरच्या माध्यमातून लोकांना तसेच पेट्रोल पंपांवर विकले जाते याचा बंदोबस्त शासन करणार आहे काय ? वास्तविक यामध्ये खरे दोषी असलेल्यांना सोडून नको त्या लोकांचे रॉकेलचे परवाने शासनाने सस्पेंड केले. तरी देखील हा रॉकेल माफिया पोलिसांकडून पकडला जात नाही.

महोदय, अशा रॉकेल माफियाचे मुंबईत सुध्दा 50-60 ठिकाणी अड्डे आहेत. त्यात घाटकोपर, गोवंडी, चेंबूर, तुर्भे तसेच नवी मुंबईतील वाशी या प्रमुख शहरांचा समावेश असून अशा ठिकाणी हा धंदा चालतो. या ठिकाणांवरुन हजारो रॉकेलचे टँकर्स निघतात व एकमेकांना फायदा होण्याच्या दृष्टीने दररोज ठरलेल्या वेळापत्रकानुसार या केरोसीन व डिझेलमध्ये एलजीओ कॉस्टिक सोडा मिसळून विकले जाते, याची चौकशी कोण करणार आहे ? वास्तविक हा माफिया इतका खोलवर रुजलेला आहे की त्याची साखळी मंत्रालयापर्यंत येते. याच विषयाच्या संदर्भात आम्ही लक्षवेधी सूचनाही दिलेली आहे. त्या चर्चेच्या वेळी आम्ही सभागृहात सांगणारच आहोत की, कोण कोण व कसे कसे हप्ते घेतले जातात, कोण गोळा करतो आणि कोणापर्यंत जातात ? अशा पध्दतीने या तेल माफियानी संपूर्ण राज्यात धुमाकूळ घातला आहे. त्यात यशवंत सोनवणे या अधिकाऱ्याचा मृत्यू झाला पण शासन अशा किती अधिकाऱ्यांना आणखी या कारणी लावणार आहे याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. राज्यातील हा रॉकेल माफिया इतका जबरदस्त झालेला आहे की, पोलीस यंत्रणा तसेच प्रशासनालाही तो आपल्या खिशात घेऊन फिरतो. पेट्रोल पंपावर दिवसा-ढवळ्या रॉकेलची भेसळ केली जाते तरी जिल्हाधिकारी, एसडीओ, तहसीलदार किंवा पोलीस अधिकारी काहीच बोलत नाही हे आमचे दुर्दैव म्हणावे लागेल. अशा प्रकारे या सरकारला डोळे असून ते आंधळे झालेले आहे, हात असून काम करीत नाही तर पाय असून चालत नाही

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

अशी लुळी-पांगळी प्रतिमा या सरकारची झालेली आहे. शासन म्हणते की, या माफियांच्या विरोधात कडक कारवाई करु. पण यशवंत सोनवणेच्या मृत्यूनंतर शासनाने कोणती कारवाई केली याचा खुलासा झाला पाहिजे. या प्रकरणात दोषी असलेल्या पोपट शिंदेची तडीपारी कोणत्या अधिकाऱ्याने किंवा कोणाच्या आशीर्वादाने रद्द केली, याच्या खोलात शासन कधी तरी गेले आहे काय ? यातून शासनाचे करोडो रुपयाच्या महसुलाचे नुकसान होत आहे आणि आपला सहावा मजला मात्र हे नुकसान उघड्या डोळ्याने पाहत आहे, असे चित्र आहे. जीवनावश्यक बाबींमध्ये तेल हा एक महत्वाचा घटक असून हजारो गरिबांना आज पीडीएसमार्फत रॉकेल मिळत नाही. या रॉकेलचा भाव 25 रुपये लिटरपर्यंत गेला तरी देखील ते मिळत नाही अशी स्थिती आज राज्यात निर्माण झालेली आहे. याकडे शासनाचे लक्ष जाणार की नाही ?

रॉकेल माफियांचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर दोनच महिन्यापूर्वी नगर जिल्ह्यात दुधात भेसळ करणारे रॅकेट उघडकीस आले. मुंबई, पुणे आणि राज्याच्या काना-कोपऱ्यात व विविध ब्रँडच्या पिशव्यातून मिळणारे दूध सप्टेंबर, 2010 मध्ये उघडकीस आले. मुंबईत देखील अनेक ठिकाणी अशी भेसळ करणाऱ्यांचे अड्डे पकडले गेले होते पण कारवाई होत नाही. नेहमीप्रमाणे दुधामध्ये पाण्याची भेसळ होणे हे आम्ही समजू शकतो ......

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आम्ही दुधात पाण्याची भेसळ समजू शकतो परंतु आता दुधात पाण्याची नाही तर रासायनिक भेसळ सुरु झालेली आहे. नगर जिल्हयाच्या एस.पी. यांनी श्रीरामपूर येथे छापा टाकला असता त्यांनी रासायनिक दूध बनविणा-या टोळीला पकडले व त्यातून रासायनिक दुधाचे रॅकेट समोर आले. परंतु यातील मुख्य आरोपी पकडला गेला नाही, तो अजूनही मोकाटच आहे. या रासायनिक दुधाची पुण्याच्या व नागपूरच्या प्रयोगशाळेत तपासणी झाली असता या रासानिक दुधात कॉर्बोलसिंक, ॲलिफॅटिक पॉलिमर, पॅरॅफिन, कॉस्टीक सोडा, युरिया, सोडीअम लॉरेल सल्फेट, डिटर्जंट पावडर, सोयाबीन तेल इत्यादी रसायने दुधात भेसळ करण्यात आल्याचे आढळून आले. या रसायनाच्या बाबतीत प्रयोगशाळेने जो निष्कर्ष काढला त्यामुळे ॲलर्जी, श्वसनक्रियेचे विकार, अस्थमा, वंध्यत्व,नपुंसकत्व, किडनी, लिव्हर खराब होऊ शकतो व कर्क रोग होऊ शकतो असा प्रयोगशाळेने निष्कर्ष काढलेले आहेत. या रासायनिक दुधामुळे मुलांच्या चयापचय क्रियेवर परिणाम होतो. नैसर्गिक दुधातील लाईसीन-प्रोटीन हा घटक नष्ट होतो. या दुधात भेसळ 5 ते 10 टक्के होत असली तरी दुधातील पोषक मूल्य नष्ट होत असतात.

सभापती महोदय, रंग नसलेले दोन लिटरचे रसायन 1100 रुपयांना मिळते. हे रसायन घुसळून त्यामध्ये पाणी मिसळल्यानंतर या दोन लिटर रसायनापासून 18 ते 20 हजार लिटर दूध निर्माण होत असते. या रसायनातील एका रसायनाला जय विरु तर दुस-या रसायनाचे नाव हिरावंता असे आहे. या रसायनात ग्लुकोज पावडर व दूध पावडर मिसळले की, दूध तयार होत असते. कॅास्टीक सोडा, वाहनांना वापरले जाणारे लूप ऑईल, सोप डिटर्जंट व कारवॉश केमिकलचा वापर करुन त्यापासून दूध तयार केले जाते.

सभापती महोदय, रासायनिक दुधाच्या संदर्भात नगर जिल्हयात कारवाई झाल्यामुळे या रासायनिक दुधाचा धंदा थोडा थांबला गेला. नाशिक जिल्हयातील 2 लाख लिटर दुधाचे संकलन घटलेले आहे. मुंबईमध्ये येणा-या दुधाचे चार महिन्याचे आकडे पाहिले तर त्यामध्ये 8 लाख लिटर दुधाची घट झाल्याचे दिसून येईल. भेसळ बंद झाल्यामुळे मुंबईत येणा-या दुधाच्या प्रमाणात घट झालेली आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर या जिल्हयात अद्यापही रासायनिक दुधाची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

निर्मिती सुरु आहे. लोकांच्या आरोग्याशी खेळणारा खेळ बंद करणे आवश्क आहे. दुधाच्या धंद्याशी निगडीत असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या प्रभावशाली नेत्यामुळे ही भेसळ बंद करणे मुश्कील झाले आहे. रासायनिक दुधामुळे लोकांच्या जीवनाशी खेळ चालला आहे. हा सर्व प्रकार सरकार उघडया डोळयाने पाहते आहे. आम्हाला वाटले या राज्यात तेलात भेसळ चालली असेल परंतु या राज्यात तेलातच नाही तर दुधातही भेसळ चालली आहे. महाराष्ट्रात दूध माफिया राज मोठया प्रमाणात सुरु असून त्यातून लोकांच्या जीवनाशी खेळ सुरु आहे. दूध उत्पादकांना रास्त दर मिळावा तसेच दूध ग्राहकांना किफायतशीर किंमतीत दूध मिळावे म्हणून सरकार वाहतूक व्यवस्थापन खर्च म्हणून लिटर मागे 2.50 ते 3.00 रुपये खर्च करीत असते. यासाठी कोटयावधी रुपयांचे अनुदान सरकार देत असते. मात्र खाजगी दूध डेअरी चालक टँकरने रासायनिक दूध खरेदी करुन कोटा पध्दतीचा लाभ उठवत नफेखोरी करीत आहेत. नगर जिल्हयाच्या अतिरिक्त पोलीस अधीक्षकांनी रासायनिक दूध निर्मितीसाठी रसायन विकणा-या मनोहर रामनानी व सुमतीलाल गगराणी यांच्या दुकानावर व गोदामावर छापे घालून रसायनाचे बॅरल, ग्लुकोज, स्टार्च पावडर व कॉस्टीक सोडा अशा प्रकारचा माल जप्त केला आहे. राहूरी, नेवासा, संगमनेर, राहता या तालुक्यातील गावोगावचे दूध प्रकल्पाचे मालक हा माल खरेदी करीत असल्याचे पोलीस चौकशीत आढळून आले आहे. रासायनिक भेसळीच्या दूध धंद्याने अगोदर जे रोडपती होते ते करोडपती झाले आहेत. महानंदा व सरकारी जिल्हा व तालुका संघांना टँकरचा ठराविक कोटा दिला जातो. हा कोटा पूर्ण करण्यासाठी हे संघ खाजगी प्रकल्पातून दूध विकत घेतात.

संगमनेर, गोदावरी, श्रीरामपूर, नेवासा तसेच दिनशा, हल्दीराम असे राज्यातील 22 प्रकल्प आहेत परंतु या 22 प्रकल्पाची शासनाने कधी चौकशी केली आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .......

हे 22 प्रकल्प कशाचे आहेत याबाबतीत शासनाने कधी चौकशी केली आहे काय ? या प्रकल्पातून रासायनिक दूध खरेदी केले असल्यामुळे अहदमनगरच्या पोलीस अधीक्षकांनी नोटीस पाठवली होती. अजूनही हे प्रकरण गुलदस्त्यातच आहे.पोलिसांनी अटक केलेल्या लक्ष्मी माता मिलचा चालक श्री. बाबासाहेब चिडे व स्वामी समर्थ संस्थेचा चालक श्री राजेंद्र बनकर यांनी त्या बाबतीत कबूली दिली असून त्यांच्याकडील जप्त केलेल्या रेकॉर्डमध्ये वरील संघाची नावे आढळून आली आहेत. पोलीस अधीक्षकांनपी त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली होती त्या ठिकाणी छापे टाकून हे पोलीस अधीक्षक रासायनिक कारखान्यापर्यत गेले होते. ज्या कारखान्यातून रसायन तयार केले जाते ते दुधात मिसळले जाते आणि हे दूध जनतेला विकले जाते. दूध माफियाकडून जनतेच्या जीवाशी खेळ खेळला जात आहे.हा प्रकार थांबविण्यात येणार आहे काय , राज्यातून हे दूध माफिया हद्दपार होणार आहेत काय ? हा खरा या चर्चेचा महत्वाचा विषय आहे.राज्यामध्ये तेल माफिया आहेत तसेच दूध माफिया देखील आहेत. अशा प्रकारे राज्यात सगळीकडे माफियाच माफिया आहेत. गेल्या वर्षापासून राज्यात वाळू माफियांनी डोके वर काढले आहे.या विषयावर माझे अन्य सहकारी बोलणार असल्यामुळे मी थोडक्यात माझे विचार व्यक्त करणार आहे. युतीचे राज्य असतांना सर्व सामान्य माणसाला सहजपणे वाळू मिळत होती.100 रुपयांची रॉयल्टी भरल्यानंतर एक ट्रॅक्टर वाळू त्याला नदीतून मिळत होती.परंतु ही पध्दत नंतर बंद करण्यात आली होती.सरकारचे उत्पन्न वाढावे यासाठी निसर्गाची देण असलेल्या नद्या शासनाने विकावयास काढल्या होत्या. त्याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेऊन नदीतील वाळू काढण्यासाठी लिलाव पध्दत सुरु करण्यात आली होती.महाराष्ट्रातील वाळू ठेकेदारांची यादी जर आपण पाहिली तर वाळूचे लिलाव सर्व टग्यांनीच घेतले आहेत असे आपल्याला दिसून येईल. या ठिकाणी मी मुद्दाम टगे हा शब्द वापरत आहे. हे टगे कोण आहेत याची शासनाने चौकशी करावी.सर्व सामान्य माणसाने वा प्रामाणिक माणसांनी वाळूचा ठेका घेतलेला नाही. जे गुंड आहेत, जे दादागिरी करतात, ज्यांची दहशत आहे, अशाच लोकांनी हे ठेके घेतलेले आहेत. त्यामुळे राज्यात सर्वसामान्य गरीब माणसाला वाळू मिळत नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली आहे.त्याला जर वाळू घ्यावयाची असेल तर वाळू विक्रेता जो भाव सांगेल त्या भावाने त्याला वाळू विकत घ्यावी लागते.दहा हजार रुपये ब्रास या दराने त्याला वाळू विकत घ्यावी लागते वास्तविक निसर्गाने दिलेली ही देण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.नदी ही गोर गरिबांची आई असून ही नदी जनावरांना आणि माणसांना पाणी व वाळू देते अशा प्रकाराची नदी शासनाने विकावयास काढली आहे. वाळू महाग झाल्यामुळे राज्यातील बांधकाम देखील थांबले आहे. ग्रामीण भागामध्ये दोन हजार रुपये ब्रास या भावाने वाळू विकली जात आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : आमच्याकडे दहा हजार रुपये ब्रासने वाळू विकत मिळते.

श्री.पांडुरंग फुंडकर : ग्रामीण भागात दोन हजार ते दहा हजार रुपये ब्रास या भावाने वाळू विकत मिळते. वाळू इतक्या महाग विकली जाते असे आतापर्यत आपण कधीही पाहिलेले नव्हते.दहा हजार रुपये ब्रास या दराने वाळू विकली जात असल्यामुळे वाळू माफियांनी करोडो रुपये कमावले आहेत.महसूल 800 कोटी रुपयांवरुन 1400 कोटी रुपयापर्यत जाणार आहे म्हणून वाळूचे लिलाव करण्याची पध्दत सुरु करण्यात आली होती.फेब्रुवारी महिन्यापर्यत वाळूपासून 800 कोटी रूपयांचा महसूल गोळा करण्यात आला होता. वास्तविक 1400 कोटी रुपयांचे टारगेट निश्चित करण्यात आले होते. परंतु ते साध्य झाले नाही. वाळू माफियांनी मात्र करोडो रुपये कमावले आहेत याची कोणीही चौकशी केली नाही. नदी किती खोल खोदावी, त्याने भरलेल्या लिलावाच्या रकमेच्या तुलनेत किती पट वाळू तो विकत आहेत, याची कोण चोकशी करणार आहे.? वाळूचा लिलाव करण्यात आला याचा अर्थ त्याला नदी दान दिल्यासारखे शासनाने केलेले आहे.यातून गोर गरीब माणसाला वाळू विकत घेता येत नाही अशी स्थिती राज्यात निर्माण झाली आहे. या वाळूमध्ये देखील आता मोठया प्रमाणावर भेसळ सुरु झाली आहे.

नतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आज रेतीमध्ये भेसळ सुरु असून लोकांना बांधकाम करण्याकरिता रेती मिळत नाही. त्यामुळे आज गिट्टी बारीक करुन ती रेती म्हणून विकली जात आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये काय चालले आहे? हे प्रकार थांबणार आहेत की नाहीत, या माफियांच्या पाठीशी कुणाचा वरदहस्त आहे? दूध माफिया, तेल माफिया, वाळू माफिया आणि त्याचबरोबर गुटखा माफिया या राज्यामध्ये तयार झाले आहेत. गुटखा आणि त्यामधील भेसळीचा विषय या सभागृहामध्ये कित्येक वेळा मी उपस्थित केला. कधी माननीय सर्वोच्च न्यायालयाचे नाव सांगून तर कधी कारवाई चालू आहे असे सांगून वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न केला गेला. खरे तर गुटखा माफियांचे असे काय संबंध आहेत की, इतक्या वेळा सभागृहात विषय उपस्थित करुन व त्यावर कारवाईचे आश्वासन घेऊनही राज्यातील अनेक गावे, वाडया, वस्त्यांमधील पान टपऱ्या, ढाबे, सिनेमा टॉकिज परिसर, शाळा मंदिर व अन्य ठिकाणी सर्रास गुटखा विक्री सुरु आहे? या गुटख्याची तपासणी केली असता त्यामध्ये आरोग्यास घातक असलेल्या नायट्रोसामाईन्स, हायड्रोकार्बन्स, अल्कलोइडन्स, मॅग्नेशिअम हायड्रोक्साईडस, मॅग्नेशियम सल्फेट इत्यादी घटकांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले व हे घटक शरीरातील पेशींमध्ये अपायकारक फेरबदल करीत असल्यामुळे गुटखा व तंबाखूंचे सेवन करणाऱ्यांमध्ये मुख कर्करोगाचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. भारतात दरवर्षी 7 लाख कर्करोग पीडित रुग्णांची नोंद होत असून त्यापैकी मुख कर्करोग झालेल्या रुग्णांची संख्या 3 लाख एवढी आहे. भेसळयुक्त व आरोग्यास अपायकारक अन्न पदार्थाचे उत्पादन, वितरण, साठा व विक्री करण्यास बंदी असतांनाही संपूर्ण राज्यात गुटख्याची विक्री आजही सर्रास सुरु आहे. आता सुध्दा या पवित्र सभागृहाच्या परिसरातील पानपट्टयाकडे आपण गेलात तर मॅग्नेशियम कार्बोनेटयुक्त गुटखा आपणास आढळून येईल. भेसळयुक्त व आरोग्यास अपायकारक घटकांचे प्रमाण असलेल्या गुटख्याच्या विक्रीस पायबंद घातल्यास राज्यातील गुटखा सेवन करणाऱ्या युवा पिढीचे प्राण व वैद्यकीय सुविधांवर होणारा खर्च वाचण्यास मदत होणार आहे. ज्याअर्थी आज हा भेसळयुक्त गुटखा सर्व ठिकाणी सहजरित्या उपलब्ध आहे याचाच अर्थ भेसळयुक्त गुटख्यावर कारवाई करणारी शासनाची जी यंत्रणा आहे ती एक तर कमकुवत आहे किंवा त्यांचे या भेसळखोरांशी अर्थपूर्ण संबंध आहेत. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्याने 1 एप्रिल 2009 ते नोव्हेंबर 2010 या कालावधीमध्ये गुटख्याचे 115 नमुने तपासण्यासाठी घेतले त्यापैकी 113 नमुने अप्रमाणित दर्जाचे घोषित करण्यात आले. याचाच अर्थ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

बाजारात उपलब्ध असलेल्या गुटख्यापैकी 99 टक्केपेक्षा जास्त गुटखा हा भेसळयुक्त आहे व शासनाने कारवाईच्या नावाखाली दीड वर्षात केवळ 2 कोटी 65 लाख किंमतीचा गुटखा जप्त केला. परंतु प्रत्यक्षात या दीड वर्षात 5 हजार कोटींचा गुटखा महाराष्ट्रात विकला गेला. आज हा गुटखा कॉलेजमध्ये जाणाऱ्या तरुणांच्या, लहान लहान मुलांच्या तोंडामध्ये असतो. याबाबत कारवाईचे प्रमाण जर काढले तर 01 टक्क्यापेक्षाही कमी आढळून येईल. सभापती महोदय, याबाबतीत हे शासन काय करीत आहे? आम्ही अनेक वेळा मागणी केली आहे की, गुटखा निर्माण करणाऱ्या मालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करा. परंतु एकीकडे गुटखा विक्रेत्यांवर छोटया छोटया केसेस केल्या जातात आणि दुसऱ्या बाजूला छोटया छोटया टपऱ्यांवर सर्रासपणे गुटखा विकला जात आहे. अशाप्रकारे गुटखा माफिया या राज्यामध्ये निर्माण झाले आहेत.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे औषधामध्ये देखील भेसळ केली जात आहे. पामोलीन तेलामध्ये भेसळ करुन ते ग्रामीण भागामध्ये विकले जात आहे. या सर्वांची तपासणी कोण करीत आहे? माझे तर असे म्हणणे आहे की, हे माफियांचे राज्य चालले आहे. या राज्यातील माफिया सर्व सामान्य माणसांच्या जीवाशी खेळत आहेत. आज जीवनावश्यक वस्तूंपासून प्रत्येक क्षेत्रामध्ये माफिया शिरला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 15:55

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

आज प्रत्येक गोष्टीमध्ये भेसळ होत आहे.या राज्यातील भेसळ माफिया संपला नाही तर महाराष्ट्रातील जनजीवन संकटामध्ये येणार आहे.म्हणून आमची अशी मागणी आहे की, या राज्यातील माफिया नावाचा जो अजगर आहे,ज्याने 10 कोटी जनतेच्या जीवनाला विळखा घातलेला आहे, त्याला कसे ठेचण्यात येणार आहे याचे महाराष्ट्रातील जनतेला शासनाकडून उत्तर हवे आहे. या राज्यामध्ये प्रत्येक दिवशी एखादे भेसळीचे प्रकरण समोर येत आहे. त्याबाबत चर्चा झाल्यानंतर थातूरमातूर लोकांना पकडले जाते. परंतु या सर्व माफियांचा जो सरदार आहे, त्याला मात्र पकडले जात नाही.त्यामुळे खरोखरच जर या राज्यातील जनतेला समाधानाने जगू द्यावयाचे असेल तर हा माफियारुपी अजगर ठेचण्याची आवश्यकता आहे आणि जर शासनाकडून हे काम होत नसेल तर आपण राज्य करण्यासाठी लायक नाही असा आमचा आरोप आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या जीवनाची जबाबदारी शासनाची असतानाही जर ती जाणीवपूर्वक टाळणार असाल, पैशाच्या मोहापायी टाळणार असाल आणि त्यातून जर जनतेच्या जीवनाशी खेळणार असाल तर ही जनता तुम्हाला कधीही माफ करणार नाही अशा प्रकारचा मी इशारा देतो आणि माझे वक्तव्य संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----

. . . .2 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : याठिकाणी मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे, त्यावरील चर्चा ही 05 वाजून 50 मिनिटांनी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासह आपल्याला पूर्ण करावयाची आहे.सदरहू प्रस्तावावर भाषण करण्यासाठी माझ्याकडे एकंदर 20 सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. मला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना अशी विनंती करावयाची आहे की, या सभागृहातील आपल्या सर्व सहकाऱ्यांना भाषण करण्यासाठी वेळ मिळावा यासाठी सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार मांडले तर सर्वांना या चर्चेमध्ये सहभाग घेणे शक्य होईल.

श्री.सुरेश नवले : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेसाठी पक्षनिहाय किती वेळ देण्यात आलेला आहे हे समजले तर सन्माननीय सदस्य आपल्या भाषणाचा वेळ निश्चित करु शकतील.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी भाषण सुरु करावे.

. . . .2 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी विरोधी पक्षाच्यावतीने नियम 260 अन्वये प्रस्ताव देण्यात आलेला आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.भाऊसाहेब फुंडकरजी यांनी भाषण करीत असताना हे माफियांचे शासन कसे आहे त्याबाबत सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांनी गुटख्याबाबत उल्लेख केला. पण त्याच्यापुढे जाऊन मी सांगेन की, आपण झोपलेल्या माणसाला जागे करु शकतो, पण झोपेचे सोंग घेतलेल्या माणसाला जागे करु शकत नाही. त्याप्रमाणे या शासनाने झोपेचे सोंग घेतलेले आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी गुटख्याच्या बाबतीत उल्लेख केला. मी आपल्या माध्यमातून एक गोष्ट संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, कै.विजय साळसकर हे शहीद झाले आणि हे पाप शासनकर्त्यांचे आहे. त्यांची चूक काय होती ? गुटखा किंग जोशी पाकिस्तानमध्ये सर्व यंत्रणा घेऊन चालला होता.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ KGS/ D/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे..... 16:00

श्री. रामदास कदम.......

श्री. विजय साळसकर यांनी हे सगळे पकडले. या गुटखा किंगला मोक्का लावण्याचा प्रयत्न केला त्यामुळे त्यांच्यावर दबाव आणण्यात आला. त्यांना मोक्का लावू नका, त्यांच्यावर मोक्का लावला तर तुम्हाला स्वत:च्या संरक्षणासाठी दिलेली एके-47 काढून घेतली जाईल असे सांगण्यात आले. मला या ठिकाणी सांगण्यास अतिशय दु:ख आणि वेदना होत आहेत. मंत्री महोदयांनी यासंबंधीची चौकशी करावी. मी देखील गृह राज्य मंत्री म्हणून काम केलेले आहे. मी या ठिकाणी जबाबदारीने बोलत आहे. श्री. विजय साळसकर यांनी मोक्का लावला म्हणून त्यांना त्यांच्या स्वत:च्या संरक्षणासाठी दिलेली एके-47 काढून घेण्यात आली. ज्या दिवशी अतिरेक्यांनी एके-47 च्या माध्यमातून श्री. विजय साळसकर यांच्यावर गोळया घातल्या त्यावेळी श्री. विजय साळसकर यांच्याकडे एके-47 असती तर चित्र नेमके उलटे पहावयास मिळाले असते. श्री. विजय साळसकर वाचले असते. श्री. करकरे आणि श्री. कामठे देखील वाचले असते. भेसळ करणारे सरकारमध्येच बसलेले आहेत. " कालचा गोंधळ बरा होता." या उक्तीप्रमाणे शासनाचे काम फक्त बोलण्याचे आहे. रेकॉर्डवर आले की, त्यांचे काम झाले. आम्ही या ठिकाणी जेवढे मोठयाने बोलू तेवढा अधिक ताकदीने अधिक भ्रष्टाचार करण्याचे काम शासनाकडून केले जाते हा आतापर्यंतचा माझा अनुभव आहे. सभापती महोदय, मी अधिक बोलून सभागृहाचा वेळ घेणार नाही. पण तेल माफियांच्या बाबतीत मी दिनांक 20 सप्टेंबर, 2008 रोजी शासनाला एक पत्र पाठविले होते त्याची एक प्रत माझ्याजवळ आहे. सदर पत्र मी गृह मंत्री, पोलीस महानिरीक्षक तसेच वाशीच्या कमिशनरांना दिले आहे. या पत्रामध्ये भेसळ माफिया कोण आहेत आणि कुठे भेसळ होते याची यादीच मी दिलेली आहे. पण जेवढे पत्र आम्ही देऊ तेवढा हप्ता अधिक वाढतो. हे मी फार जबाबदारीने बोलत आहे. सदर पत्रामध्ये मी संशयीत भेसळ माफियांची नावे व ठिकाणे दिलेली आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील (बसून) : ती नावे या ठिकाणी वाचण्यात यावीत.

श्री. रामदास कदम : ठीक आहे, मी ती नावे वाचतो.

1) श्री. महम्म्द अली, हा म्हमद्या म्हणून प्रसिध्द आहे. आज तो करोडपती, अब्जोपती झालेला आहे. खरी सुरुवात या महम्मद अलीने केली आहे. खालच्या स्तरापासून वरच्या स्तरापर्यंत या माणसाचे लागेबांधे आहेत. त्याचे खोपटा येथे मोठया प्रमाणात ऑईल भेसळीचे काम आहे. मी हे जबाबदारीने बोलत आहे.

..2...

श्री. रामदास कदम.....

2) श्री. सब्रुद्दीन खान, ठाणे, पुणे, पनवेल, गोवा येथे ऑईल भेसळीचे काम

3) श्री. चांदभाई, नेरुळ, बेलापूर येथे ऑईल भेसळ व भंगार

4) आन्टी ( आप्पालाईन), डिझेल भेसळ व मोठया प्रमाणात भंगार

5) श्री. मदन शेठ, कळंबोली ऑईल भेसळ व गोडाऊन

6) श्री. दत्तु शेठ, तुर्भे येथे मोठया प्रमाणात ऑईल भेसळीचे काम.

7) श्री. हरनाम राजा, ऑईल भेसळ व भंगार

तसेच शत्रुघ्न व अन्य व्यक्ती

ही नावे व ठिकाणे मी दिलेली असताना ते पोलिसांना सापडत नाहीत. अधिकाऱ्यांना सापडत नाहीत.

सभापती महोदय, या अगोदर मी लक्षवेधी सूचना दिली होती त्यामध्ये नेरुळ, बेलापूर, कळंबोली, खोपटा, तुर्भे येथे मोठया प्रमाणात ऑईल भेसळ कशी होते याचा उल्लेख केला होता. सदर लक्षवेधी सूचनेची प्रत माझ्याकडे आहे.

तसेच दिनांक 20 एप्रिल, 2010 रोजी मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या सूचनेतील काही भाग मी या ठिकाणी वाचून दाखवितो :-

"पेट्रोल-डिझेलचा पुरवठा करणारा मोठा टर्मिनल पुण्या शेजारी लोणी काळभोर या ठिकाणी असून या टर्मिनलला मुंबईवरुन पाईपलाईनद्वारे पेट्रोल-डिझेलचा पुरवठा होतो. सदर टर्मिनलमधून रोज सरासरी चारशे टँकर्स मधुन पेट्रोल-डिझेल भरुन सातारा, सोलापूर व अहमदनगर आदि शहरांना पुरवठा केला जातो. सदर पुरवठा होत असताना टर्मिनलच्या बाहेर शेवाळवाडी जकात नाक्यावर काही पेट्रोल डिझेलची चोरी करणाऱ्या संघटित टोळया कार्यरत असून जवळपास प्रत्येक टँकर्समधून शंभर ते दीडशे लिटर्स इंधनाची चोरी प्रतिदिनी होत आहे.

यानंतर श्री. बरवड....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ...

प्रत्येक टँकरमागे रु. 8000/- किमतीचे पेट्रोल-डिझेल चोरीला जात आहे तसेच अडीचशे टँकर्समधून दर दिवशी 20 लाख रुपये किमतीच्या पेट्रोल-डिझेलची चोरी खुलेआम होत आहे." मी नावे दिलेली आहेत, ठिकाणे दिलेली आहेत. सदर पेट्रोल-डिझेल चोरी प्रकरणी पुणे पेट्रोल-डिझेल असोसिएशनने पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी, पुणे तसेच पुणे येथील तेल कंपन्यांचे पदाधिकारी या सगळ्यांना पत्रे दिली पण काहीही कारवाई झाली नाही. श्री. यशवंत सोनवणे यांचे प्रकरण घडले आणि शासनाला एकदम जाग आली. त्यानंतर ही सगळी ठिकाणे एका रात्रीत कशी माहीत पडली ? लगेच नागपूरला धाड टाकली आणि भेसळ पकडली. भिवंडीमध्ये धाड टाकली. पुण्यामध्ये धाड टाकली. त्यानंतर प्रत्येक वर्तमानपत्रामध्ये 200 लोकांना पकडले, 300 लोकांना पकडले असे मथळे छापून आले. एका रात्रीत ही ठिकाणे यांच्या स्वप्नात आली होती का, यांना ही ठिकाणे माहीत असल्याशिवाय हे होईल का ? ही सगळी देवाणघेवाण, पोलिसांचे हप्ते, संबंधित अधिकाऱ्यांचे हप्ते चालू असल्यामुळे हे सर्व होते.

सभापती महोदय, या शासनाने झोपेचे सोंग घेतलेले आहे. आता माननीय गृह मंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी पुन्हा जाहीर केले आहे की, जो भेसळ माफियांची माहिती सांगेल त्याला बक्षीस देण्यात येईल. पण मी माहिती सांगितली होती. आबा आता म्हणत आहेत की, जो भेसळ माफियांची माहिती देईल त्याला बक्षीस देण्यात येईल. मी तर अगोदरच माहिती दिली होती. बक्षीस जाऊ द्या पण त्याबाबतीत काहीही कारवाई झालेली नाही. अधिकाऱ्यांना प्रमोशनचे बक्षीस मिळाले. जितकी अधिक भेसळ, जितका अधिक भ्रष्टाचार तेवढे मोठे प्रमोशन असे चालले आहे. आमच्या कोकणामध्ये 'बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात' अशी म्हण आहे. त्या पध्दतीचे या सरकारचे काम चालले आहे. एक गोष्ट मला आपल्याला सांगितली पाहिजे. श्री. यशवंत सोनवणे यांच्या बाबतीत प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी घटना घडली. हे या संपूर्ण महाराष्ट्राला शोभादायक नाही. एखाद्या अधिकाऱ्याला एखाद्या माफियाने जिवंत जाळण्याचे काम केले असे इतिहासामध्ये कधी घडले नव्हते. आतापर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये एखाद्या अधिकाऱ्याला माफियाने जिवंत जाळण्यापर्यंत त्यांची कधी मजल गेली नव्हती. ही हिंमत कशी काय होते ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, माझ्याकडे माहिती आहे. साधारणत: 25 हजार कोटी रुपयांचा भेसळ बाजार महाराष्ट्रामध्ये होतो. त्यामध्ये 7 हजार कोटी दूध व दुग्धजन्य पदार्थ, 4 हजार कोटी रुपये सौदर्य प्रसाधने, 7 हजार कोटी खाद्य तेल व मसाला मार्केट, 2 हजार कोटी फळे आणि 5 हजार कोटी मद्य अशा प्रकारे जवळजवळ 25 हजार कोटी रुपयांची भेसळ दरमहा होते. दूध भेसळीच्या संदर्भात मी मुद्दाम सांगेन. पोपट शिंदे यांच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले. त्यांच्या किती केसेस होत्या ? त्यांच्या इतक्या केसेस असताना मंत्रालयातून त्याची तडीपारी रद्द होते. मंत्रालयामध्ये त्याच्या पाठीमागे कोण आहे, शासन का थांबले आहे, त्याची चौकशी का होत नाही, त्याच्यावर कारवाई का केली नाही ? आज सकाळी भू माफियांच्या बाबतीत पाहिले. वायूसेनेची जागा आहे. मी नकाशा दाखविला, प्लॅन दाखविला, नगरविकास विभागाची टिप्पणी दाखविली तरीही 'तो मी नव्हेच' अशा प्रकारचे उत्तर आले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

किती खाणार ? मला याठिकाणी न्याय मिळाला नाही त्यामुळे मी कोर्टात जाणार आहे. मी कोणालाही सोडणार नाही. सगळीकडच्या जागा हडप करुन झाल्या, आता वायू सेनेची सुध्दा जागा सोडण्यास तयार नाहीत. पोपट शिंदे याच्यावर 8 गुन्हे दाखल झाले होते, त्याची यादी माझ्याकडे आहे. त्याची तडीपारी का रद्द केली ? त्याची तडीपारी रद्द केली नसती तर एक मागासवर्गीय अधिकारी वाचू शकले असते. दुधाची भेसळ पकडण्यासाठी माननीय गृह राज्यमंत्र्यांनी एक पथक निर्माण केले आहे अशी मला माहिती मिळाली आहे. दुधाची भेसळ करणाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणावर उत्तर भारतीयांच्या टोळया आहेत. मी स्वत: गृह राज्यमंत्री असताना एका टोळीला पकडले होते. महानंदा, गोकुळ या दुधाच्या डयुप्लीकेट पिशव्या तयार केल्या जातात. त्यांचे प्रिंटिंग कोठे तयार होते, पिशव्या कोठे भरतात ते शोधून काढण्यात यावे. दूध भेसळ करणाऱ्या माफियांची युनियन आहे. त्यामध्ये कर्नाटकातील लोकांचा सुध्दा समावेश आहे. भेसळ करण्याच्या ठिकाणी धाड टाकली आणि तेथील लोकांना अटक केली तर सगळेजण पैसे काढून त्यांना सोडविण्यासाठी जातात. हे कदाचित माननीय राज्यमंत्र्यांना माहीत नसेल. याबाबतची खोल तपासणी करावी, हे शासन झोपलेले आहे. दूध भेसळ करणाऱ्यांकडून सर्व स्थानिक पोलीस ठाण्यांना हप्ते जातात. मी अतिशय जबाबदारीने बोलत आहे. पोलिसांच्या आशीर्वादाशिवाय हे काम होऊ शकत नाही. मुंबई, पुणे, अहमदनगर, ठाणे ही मोठमोठी शहरे आहेत. या सर्व शहरांमध्ये दूध भेसळ होत असल्याचे पहावयास मिळते.

सभापती महोदय, रॉकेलच्या भेसळीबाबत मी सांगेन की, एका रॉकेलच्या गाडीमध्ये 12 हजार लिटर रॉकेल असते. गोरगरीब माणसांना हे रॉकेल मिळावे म्हणून सबसिडी दिलेली असते. 1 लाख 12 हजार किंमतीचा रॉकेलचा टँकर ग्रामीण भागामध्ये जाण्यासाठी निघतो. हा टँकर ग्रामीण भागामध्ये जात नाही. त्यासाठी पेपर बनविले जातात, त्यात महसूल विभागाचे अधिकारी असतात, अन्न व नागरी पुरवठा खात्याचे अधिकारी असतात. रॉकेलचा टँकर जात असल्याचे पोलिसाने पाहिले तर तो सुध्दा त्या टँकरच्या मागे जातो, त्याच्या हातामध्ये काही तरी ठेवल्यावर तो सुध्दा गप्प बसतो. पुण्याहून निघालेला 1 लाख 12 हजार किंमतीचा टँकर कोल्हापूर

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रामदास कदम....

पोहोचेपर्यंत भेसळीमुळे 5 लाख 50 हजाराचा होतो. ज्यावेळी ग्रामीण भागात दुकानावर हे रॉकेल जाते त्यावेळी तेथील सर्व लोकांना रॉकेल दिले जात नाही, ही एक साखळी आहे. जेएनपीटी बंदरावर बोटीतून क्रुड ऑईल उतरवितात. तेथून पाईप लावून तेल चोरले जाते आणि ते खुल्या बाजारात विकले जाते. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे हा म्हमद्या आज करोडपती, अब्जोपती झाला आहे. त्याच्यावर भेसळ माफिया म्हणून 14-15 केसेस दाखल झाल्या होत्या, त्याला तडीपार केला असता, त्याला मोक्का लावला असता तर हे सर्व थांबले असते. शासनाने हे पाप आता थांबवावे. आता अति झाले आहे.

सभापती महोदय, वाळू माफियांबद्दल सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील बोलतील. चिपळूण, खेड येथील आमदार असताना माझ्या मतदार संघातील सावित्री नदीतून रात्री 2-2 वाजता वाळू काढत असल्याच्या सी.डी. सन्माननीय बंदरे मंत्र्यांना दिली होती. त्याबाबत काहीच कारवाई झाली नाही. याठिकाणी भेसळ करणाऱ्यांच्या विरोधात आवाज उठवू तेवढा अधिक हप्ता तेथे चालू असतो, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. हे सर्व माफिया मंत्रालयात बसलेले आहेत. तेथूनच त्यांना पाठिंबा मिळतो असा मी आरोप करीत आहे. माझी शासनकर्त्यांना विनंती आहे की, हे पाप आता थांबवावे. सर्वसामान्य माणूस स्वत:चे घर बांधू शकत नाही, इतके वाळूचे दर वाढलेले आहेत. एका वर्षात वाळू तयार होत नाही. पूर्वी 200 रुपयात एक ब्रास वाळू मिळत होती, आता 10 हजार रुपये द्यावे लागतात. वाळूचे लिलाव उचलण्यात आले आहेत त्यामध्ये दाऊदची माणसे आहेत काय ते शासनाने तपासून पहावे. त्या लिलावात दुबईचा पैसा गुंतविला आहे का ते पहावे, मी हे जबाबदारीने बोलत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:15

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, हे ठेके कोण चालवतोय, आज सर्वसामान्य गरीब माणसाला वाळू मिळत नाही. मी जे जे काही मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत चौकशी व्हायला पाहिजे. तेल माफिया, वाळू माफिया, दुधात भेसळ करणारे दूध माफिया हे सगळे माफिया मंत्रालयामध्ये बसलेले आहेत. या माफियांना जनता घरी बसविल्या शिवाय राहाणार नाही एवढे बोलून मी माझे भाषण संवपितो.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये या ठिकाणी गंभीर विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे म्हणजे किती विघातक गोष्टी राज्यात घडत आहेत यासंबंधीची ही चर्चा आहे. या चर्चेला मी राजकीय वळण देणार नाही. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी देखील आता सरकारने हे पाप थांबवावे अशी विनंती केली. केवळ सरकारने या गोष्टी थांबवायला पाहिजेत असे नाही तर आपण सर्वांनी त्यादृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, घटना अत्यंत दुःखद असली तरी याबाबतीत प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली या गोष्टीचा मला आनंद झाला आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी दूध कमी प्रमाणात यावयास लागले असे सांगितले. याचा अर्थ दुधात कमी प्रमाणात भेसळ व्हायला लागली आहे. किमान आमचा कुणी एखादा मंत्री पेट्रोल पंपावर धाड टाकायला गेला नाही. प्रशासनाचे काम हे प्रशासनानेच करावयास पाहिजे. प्रशासनावर वचक राहाणाच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांनी कडक धोरण स्वीकारलेले आहे. त्यांनी प्रशासनाला इशारा दिलेला आहे. याठिकाणी अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री श्री. अनिल देशमुख बसलेले आहेत. त्यांनी इगतपुरी येथे धाड टाकली आणि कोटयवधीचा माल जप्त केला. ही चांगली बाब आहे. या कारवाईचा टेम्पो जाता कामा नये. हे लोक काही काळ गप्प बसतील आणि पुन्हा आपले अवैघ धंदे चालू करतील. या विषयी मी हिंदू-मुस्लिम असा उल्लेख करणार नाही. जे जे अशा प्रकारचे अवैध धंदे करणारे आहेत ते पापी आहेत. त्यांना पकडल्यानंतर कोर्टकचे-या होऊन ते सुटतात. ते जरी जेल मध्ये असले तरी बाहेर त्यांचे धंदे चालू असतात. हे सर्व प्रकार बंद होण्याच्या दृष्टीने सर्वांची देखरेख असली पाहिजे. गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितले की, जो कोणी अशा घटना निदर्शनास आणून देईल त्याला बक्षीस दिले पाहिजे. याबाबतीत समाजामध्ये वातावरण निर्मिती होत असेल तर ती चांगली गोष्ट आहे.

सभापती महोदय, रॉकेलच्या बाबतीत मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, रेशनवर रॉकेल मिळत नाही. आमच्या घरी 27 वर्षे काम करणारी बाई म्हातारी झाली म्हणून ती गावी असते. मी तिला भेटण्यासाठी गेल्यावर, "मला गॅस द्या" असे तिने मला सांगितले. मी म्हणालो, "तू आता म्हातारी झालेली आहेस, गॅस वापरणे धोकादायक आहे म्हणून तुला वातीचा स्टोव्ह देतो." मग ती

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

म्हणाली, "त्या वातीच्या स्टोव्हमध्ये काय टाकणार ? रेशनवर रॉकेल मिळत नाही." माझा प्रश्न असा आहे की, ग्रामीण भागातील लोकांना रेशनवर किती रॉकेल देण्यात येते, निराधार बाईला कमी रॉकेल दिले जाते काय ? ग्रामीण भागात एक लिटर रॉकेल देखील मिळत नाही. रेशनवर दिले जाणारे रॉकेल लोकांपर्यन्त वितरित होत नाही. ते भेसळीसाठी दिले जाते. हे रॉकेल भेसळीसाठी जाणार नाही ते लोकांना कसे मिळेल हे पाहिले पाहिजे. सरकारच्या योजना अत्यंत चांगल्या आहेत. परंतु त्या नीट चालत नाहीत.

...नंतर श्री. खर्चे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. शिगम ...... 16:20

श्री. हुसेन दलवाई ........

हे रॉकेल भेसळ करण्यासाठी वापरले जाणार नाही, त्याची वाहतूक केली जाणार नाही, याची दक्षता शासनाने घेतली पाहिजे. तसे पाहिले तर शासनाच्या सर्वच योजना अतिशय चांगल्या आहेत पण त्यांची अमलबजावणी नीटपणे होत नाही. दुधाच्या संदर्भात सांगावयाचे तर मला भीतीच वाटते. मी जेव्हा मंत्री होतो तेव्हा माझ्या शेजारीच आताचे माननीय अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील बसत होते. सभागृहात दुधावर चर्चा सुरु असताना ते एकदा म्हणाले होते की, दुधामध्ये युरिया सुध्दा भेसळ करुन टाकतात, तेव्हा मला धक्काच बसला. आमच्या घरात काही परंपरा आहेत व त्यानुसार आम्ही नेहमी "आरे" चेच दूध घेत होतो. पण दुधात केमिकल्सची भेसळ करुन विकले जाते हे किती भीषण कृत्य आहे ? हे ऐकल्यानंतर मात्र असे वाटले की, आम्ही मुलांना काय पाजत होतो ? आपण आज ज्या जैतापूर अणू ऊर्जा प्रकल्पाबाबत चर्चा करतो त्यासंदर्भात देखील मला भीती वाटते. कारण आपल्या अधिकाऱ्यांवर आपण किती विश्वास ठेवावयाचा ? या प्रकल्पासाठी वापरणारे मटेरियल तरी चांगले वापरले जाईल की भेसळयुक्त वापरले जाईल अशी भीती वाटते. त्या प्रकल्पाचा जपान तर होणार नाही ना ? आज आईसक्रीम मध्ये सुध्दा वेगवेगळ्या प्रकारची केमिकल्स भेसळ केली जातात. त्यासाठी लागणाऱ्या मसाल्यात घोड्याची लीद टाकतात असेही ऐकायला मिळते. औषध कंपन्यांकडून औषधांमध्ये भेसळ केली जाते. माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधी नुकतीच ऑर्डर काढलेली आहे की, अशी भेसळयुक्त औषधे मिळणारी दुकाने अथवा कंपन्या असतील तर त्या चालू द्यावयाच्या नाहीत. माझे तर असेही म्हणणे आहे की, 15-20 दिवस ही औषधाची दुकाने बंदच ठेवावीत, जेणे करुन त्या भागातील सर्व लोकांना समजेल व त्या दुकानातून कोणीही औषध विकत घेणार नाही. अशा प्रकारची कडक कारवाई शासनाने केली तरच भेसळ करणाऱ्यांवर जरब बसेल. यामध्ये कोणाला फासावर चढवा वगैरे मी म्हणणार नाही पण त्यांची संपूर्ण मालमत्ता जप्त करण्याची कारवाई करणे आवश्यक आहे, पण दुर्दैवाने तसे आपल्याकडे होत नाही.

महोदय, मनमाड तालुक्यातील तेल माफिया पोपट शिंदे याची तडीपारी रद्द करण्याच्या संदर्भात मी कोणत्याही पक्षाचे नाव घेणार नाही पण ही वस्तुस्थिती आहे की, ही तडीपारी रद्द करण्यासाठी एका आमदारानेच प्रयत्न केला होता......अडथळा.........मी नाव घेऊ इच्छित नाही, कारण आपलीच अडचण होईल म्हणून मी नाव सांगणार नाही.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई .....

सभापती महोदय, रेतीच्या संदर्भात बोलायचे तर बुडीने रेती काढणे किती त्रासाचे आहे हे आपणा सर्वांनाच माहीत आहे. अवैध रेती उत्खनन या गोष्टीचा किती उहापोह झाला हे देखील आपणास माहीत आहे. माझे असे म्हणणे आहे की, कोणत्याही गोष्टींचा बॅलन्स साधला पाहिजे. "बंद करा रेती, बंद करा रेती" अशा प्रकारचे नारे लावून रेती वाहतूक बंद केली पण त्याचा परिणाम गरीब माणसाला घर बांधता येणार नाही याकडे मात्र कोणीच लक्ष देत नाही. अप्रत्यक्षपणे जे बिल्डरला पाहिजे तेच आपण करीत आहोत. म्हणून अशा गोष्टींचा विचार करुन एक बॅलन्स अशी चर्चा केली पाहिजे आणि त्याला पूरक असेच शासनाचे धोरण असले पाहिजे.

महोदय, दुधाच्या संदर्भात होत असलेल्या भेसळीबाबत सांगावयाचे तर डायरेक्टली मुलांना मारण्याचेच काम या राज्यात होत आहे. त्यात सुरुवातीला डेअरीमध्ये भेसळ केली जाते, नंतर टँकर आणि शेवटी मुंबई शहरात दूध आल्यानंतर भेसळ केली जाते. अशा प्रकारे ते दूध असते की काय हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे, याची चौकशी केली पाहिजे. यामध्ये महसूल व गृह विभागाचा संबंध येतो. गृह विभाग तर मंत्री महोदयांच्या हातातच राहिला नाही असे वाटते......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई.....

नागरी पुरवठा खाते तसेच तेल कंपन्यातील अधिका-यांबरोबर संबंधित विभागाच्या मंत्र्यांनी एकत्र बसून भेसळीचे प्रकार त्वरित थांबवण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्राला समृध्दी बरोबर सुदृढता मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. आपल्या मुख्य सचिवांनी या विषयाच्या संदर्भात अतिशय चांगले काम केलेले आहे. त्यांनी नाशिकची घटना घडल्याबरोबर आयएएस अधिका-यांची बैठक घेतली व या बैठकीमध्ये हे सर्व प्रकार थांबले पाहिजेत असे विचार व्यक्त केले. आयएएस अधिका-यांच्या फोरममध्ये सर्व ते प्रयत्न करु व यासंदर्भात शासन जे काही निर्णय घेईल त्याची अंमलबजावणी करु असा निर्णय घेण्यात आला. या फोरममध्ये जो निर्णय झाला तो अतिशय चांगला झालेला आहे. एकंदरच हा सर्व भेसळीचा प्रकार आहे. भेसळीमुळे जीवन उध्वस्त होत आहे, समृध्दी उध्वस्त होत आहे, विकास थांबला जात आहे, खालच्या वर्गाला मारणारा हा प्रकार आहे, त्यामुळे हा प्रकार थांबवणे अतिशय आवश्यक आहे. या ठिकाणी विरोधी पक्ष नेत्यांनी जे विचार मांडलेले आहेत ते विचार सर्व सदस्यांचे आहेत असे समजून शासनाने उपाययोजना करावी व त्याला समाजानेही पाठिंबा द्यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद. -----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी केवळ दोन मुद्यावर विचार मांडून माझे भाषण संपवणार आहे. नाशिक जिल्हयातील, नांदगाव तालुक्यातील पानेवाडी येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी सोनावणे यांचे प्रकरण का घडले याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. आपल्या समोर आतापर्यंत सोनावणे यांची एकच बाजू आलेली आहे. श्री. सोनावणे हे नाशिक जिल्हयामध्ये 22 वर्षापासून कार्यरत होते. एकाच जिल्हयात ही व्यक्ती इतके वर्ष कशी काय राहू शकते, हा संशोधनाचा विषय आहे. श्री. सोनावणे यांना ज्यांनी जीवंत जाळले त्यांच्या मुलीने जे वक्तव्य केलेले आहे ते मी पाहिलेले आहे. सोनावणे हा दर महिन्याला पोपट शिंदेकडे हप्ता मागण्यासाठी येत होता असे पोपट शिंदेच्या मुलीने सांगितलेले आहे. या घटनेमध्ये दोन व्यक्तींचा मृत्यू झालेला असून श्री. सोनावणे आणि श्री. पोपट शिंदे हे दोघेही दलित समाजातीलच होते. यातील एक व्यक्ती जरी दलित समाजाची नसती तर वेगळेच चित्र निर्माण झाले असते. त्यामुळे याचा गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. सोनावणे हे गेल्या 22 वर्षापासून नाशिक जिल्हयामध्ये कार्यरत होते. श्री. सोनावणे यांनी आपल्याला मोजता येणार नाही एवढी मालमत्ता जमा केलेली आहे. या ठिकाणी मी जे काही विचार मांडत आहेत ते गांभीर्याने मांडत आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या घटनेत एका दलित अधिका-याची निर्घृण हत्या करण्यात आलेली आहे. सबंध महाराष्ट्राने या घटनेच्या संदर्भात हळहळ व्यक्त केलेली आहे. अशा रीतीने मृत्यू पावलेल्या अधिका-याबद्दल सभागृहात अशा प्रकारे बोलणे चुकीचे आहे. या ठिकाणी आदरणीय श्री. जयंत पाटील यांनी कै.सोनावणे यांच्याबाबत जे विचार मांडलेले आहेत ते त्यांनी मागे घ्यावेत अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझे बोलणे अजून पूर्ण झालेले नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मी जरी मार्क्सवादी असलो तरी सुध्दा मी आंबेडकरवादी आहे. मी स्वत:ला आंबेडकरवादी समजतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे माझ्या आजोबांचे मित्र होते तसेच ते वर्षातून किमान 15 दिवस तरी आमच्या घरात राहत असत. घटनेची काही पाने डॉ. बाबासाहेबांनी माझ्या घरात लिहिलेली आहेत. डॉ. बाबासाहेबांनी आमच्या घरात वास्तव्य केलेले असल्यामुळे हे घर आम्ही अजून तसेच ठेवलेले आहे. आंबेडकर वादाबद्दल आणि दलितांबाबत आम्ही आमचे राजकीय नुकसान सोसून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुरस्कार करणारा मी एक र्यकर्ता आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

मी आपल्याला सांगू इच्छितो की,आम्ही आमचा विचार कधीही सोडला नाही. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना मला असे सांगावयाचे आहे की,आमचे कितीही नुकसान झाले तरी आम्ही आमच्या विचाराशी पक्के राहिलो. म्हणून आम्ही येथेच राहिलो. सन्माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम आम्हाला नेहमीच बोलतात परंतु ते सुध्दा आमच्या बरोबर मार्क्सवादामध्ये होते आणि त्यांना सगळया गोष्टींची माहिती आहे. कै.सोनावणे यांना जाळून मारण्यात आले परंतु कै.पोपट शिंदे यांच्या घरामध्ये कोणाचा तरी मृत्यू झाला असल्यामुळे त्यांचा दिवस होता, त्यावेळी दर महिन्याला हप्ता मागावयाला येणा-या कै.सोनावणे याला कै.पोपट शिंदे यांने असे सांगितले की,माझ्या घरातील व्यक्तीचे निधन झाले असून त्याचे कार्य चालू असतांना मी आज हप्ता न देता चार पाच दिवसानंतर हप्ता देतो परंतु तरीही त्याने ऐकले नाही.सोनावणेला जर धाड टाकावयाची होती तर त्याने पोलीस बंदोबस्तात धाड टाकावयास पाहिजे होती परंतु ते एकटे कशासाठी तेथे गेले होते , धाड टाकण्याची पध्दत काय आहे , खरे माफिया कोण आहेत ? वास्तविक हे अधिकारीच माफिया आहेत. कोणत्या माफियांची या ठिकाणी चर्चा केली जात आहे ? आज प्रशासनामध्येच माफिया बसलेले आहेत. मंत्री वगैरे कोणीही नाहीत. ते फक्त सहयांचे धनी आहेत, त्या व्यतिरिक्त त्यांना कोणतें अधिकार आहेत हे मला माहिती नाही. सगळे मंत्री हतबल आहेत.अधिका-यांच्या नेमणुका मात्र दिल्लीवरुन होत असतात, त्यांच्यावर राज्यकर्त्याचे देखील नियंत्रण नाही. त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. इतकेच नव्हे तर त्यांना कोणाचीही भीती वाटत नाही. या ठिकाणी वेगळया पध्दतीने चर्चा केली जात आहे.मला असे सांगावयाचे आहे की,कै. सोनावणे यांच्या प्रकरणा पासून चर्चेला सुरुवात केली पाहिजे.त्यांच्या मालमत्ते संबंधीची चर्चा केली पाहिजे. तसेच सध्या जी सिस्टीम सुरु आहे ती सुध्दा बदलण्यात आली पाहिजे. ही सिस्टीम बदलण्याची वेळ आपल्यावर येऊन पडली आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी एक चांगला विषय या निमित्ताने मांडला, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या ठिकाणी आपण सर्व मंडळी येथे चर्चा करण्यासाठी बसतो परंतु आपण सर्वजण हतबल आहोत तसेच माननीय मंत्री सुध्दा हतबल आहेत. मंत्री महोदय खाजगीमध्ये आमच्याशी बोलतांना असे सांगत असतात की, "सेक्रेटरी आमचे ऐकत नाहीत." मला त्या पदावर बसवा मग सेक्रेटरी कसे ऐकत नाहीत हे मी पाहतो. मी आमच्या विचाराशी पक्के राहिलो असल्यामुळे मी येथेच राहिलो आणि मंत्री पद मिळाले नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

सभापती महोदय, या सभागृहातील एका सन्माननीय सदस्याला घेऊन मी परवाच्या दिवशी एका अधिका-यांकडे गेलो होतो त्यावेळी त्याने आम्हाला असे सांगितले की," बघतो,करतो, होऊन जाईल "वगैरे वगैरे. मी आमदार आहे. या शासनाचा मी एक पार्ट ॲन्ड पार्सल आहे.त्यामुळे मला काही तरी वेगळी ट्रिटमेन्ट दिली पाहिजे. सभापती महोदय, आमदार होणे काही सोपे नाही.तुम्हाला तर दिल्लीहून आमदार होता येते परंतु आम्हाला तसेही होता येत नाही. तेव्हा आम्ही काय करावयाचे ?

डॉ.पतंगराव कदम :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांचे विधान गांभीर्याने घेऊ नये.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी कोणत्याही प्रकारची मोघम चर्चा करता कामा नये . सन्माननीय महसूल मंत्री श्री बाळासाहेब थोरात या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांची प्रतिमा चांगली असून ते एक सज्जन गृहस्थ आहेत. आपण त्यांच्याकडे एखादे काम घेऊन गेलो आणि ते काम जर होणार नसेल तर स्पष्टपणे हे काम होणार नाही असे ते सांगत असतात आणि एखादे काम जर होणार असेल तर ते काम होईल असे ते सांगतात म्हणूनच ते मला आवडतात. तेव्हा मी त्यांना सांगू इच्छितो की, तुमच्या कारकिर्दीमध्ये एक चांगला इतिहास घडवा. तुमच्या वडिलांचा इतिहास चांगला आहे. कै.भाऊसाहेब थोरात यांच्याकडे आम्ही अत्यंत आदराने पाहत असू. संगमनेरला आल्यानंतर आम्ही त्यांना अत्यंत आदराने वाकून नमस्कार करावयाचो. या ठिकाणी मी आपल्याला सांगू इच्छितो की, कै. भाऊसाहेब थोरात यांची परंपरा आपण महसूल मंत्री म्हणून पुढे चालू ठेवावी आणि हीच परंपरा आपण महाराष्ट्राला दाखवावी. माफियांना वठणीवर आणण्यासाठी आपण वेगळया प्रकारची यंत्रणा निर्माण कराल अशी माझी अपेक्षा आहे.सन्माननीय महसूल मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या प्रामाणिकपणामुळे आणि कर्तृत्वामुळे आपल्याला हे मंत्री पद मिळालेले आहे. मंत्री पद येईल आणि जाईल परंतु हे सगळे माफिया बंद झाले आहेत अशा प्रकारच्या चांगल्या कामाची नोंद आपण करावी. मंत्री आज आहेत आणि उद्या नाहीत अशी त्यांची स्थिती आहे त्यांना फारसे अधिकार नाहीत.खरे अधिकार अधिका-यांनाच आहेत. सन्माननीय सदस्य श्री हुसेन दलवाई जे बोलले ते बरोबर आहे.

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

माननीय सदस्य श्री. हुसेनभाई दलवाई आणि मी एकत्र चळवळीमध्ये काम केले आहे. आम्ही निपाणीच्या तुरुंगामध्ये होतो. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या देखील आमच्याबरोबर होत्या.

सभापती महोदय, मी माझा शेवटचा मुद्दा सांगून माझे विचार संपविणार आहे. अपर जिल्हाधिकारी श्री. यशवंत सोनवणे जळीत प्रकरणाची दुसरी बाजू सुध्दा आपण तपासली पाहिजे. यामध्ये पोपट शिंदेच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. याचे कारण असे की, जेव्हा एखाद्याच्या घरामध्ये मयत होते, कुणाचे तरी निधन होते आणि घरामध्ये क्रियाकर्म केले जातात त्यावेळी आपण पक्षीय भेद बाजूला ठेवतो, घराण्याचे मतभेद बाजूला ठेवतो आणि आपण माणुसकीच्या नात्याने त्या विधीमध्ये सहभागी देखील होतो. परंतु याठिकाणी शासनाने सोनवणे यांना हुतात्मा केले, त्यांना शहीद ठरविले याबद्दल मला खेद होत आहे. त्याला माझा आक्षेप आहे, माझा कडकडून विरोध आहे. जो माणूस लुटारु होता, राजरोसपणे पैसे मागत होता म्हणून त्याला मारुन टाकला याचे मी समर्थन करीत नाही. परंतु त्या मारण्यामागील वेगळा इतिहास आहे. पोपट शिंदे याने नाईलाजास्तव स्वत:च्या अंगावर रॉकेल ओतून जाळून घेतले त्यावेळी सोनवणे त्याला मिठी मारायला गेले व त्यामध्ये जळाले. या संदर्भात पोलीस खाते चौकशी करीत असल्यामुळे मी त्या संदर्भात अधिक बोलणार नाही. जर सोनवणे यांना शहीद करणार असाल तर पोपट शिंदे याला सुध्दा आपण शहीद करा. या निमित्ताने जी वस्तुस्थिती आहे ती मला याठिकाणी सांगितली पाहिजे.

सभापती महोदय, रेती-वाळूच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आज लोकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. लोक बोलायला घाबरत आहेत, मला बोलू नका म्हणत आहेत. परंतु या रेती आणि वाळूच्या बाबतीत आपणाकडून वेगळया धोरणाची अपेक्षा आहे. त्याकरिता आपण एक पारदर्शक धोरण ठरविले पाहिजे. माननीय मत्री श्री. हर्षवर्धन पाटील साहेब आपणास सांगू इच्छितो की, शासनाच्या महसूल विभागाने वाळूचा लिलाव जाहीर केला त्यावेळी सर्व कागदपत्रांची तपासणी करणे, पर्यावरण विभागाची परवानगी घेणे इत्यादी सर्व बाबी महसूल विभागामार्फत पार पाडल्या जातात. कोणत्या परिसरामध्ये ड्रेजिंग करावयाचे आहे ते ठरविले जाते व त्याठिकाणी वाळूचा लिलाव करण्यासाठी परवानगी घेतली जाते. त्याठिकाणी परवानगी देण्याचे काम आपण अधिकाऱ्यांच्या हातामध्ये दिले आहे. ज्या विभागामध्ये महसूल विभागाने परवानगी दिली आहे त्याच विभागामध्ये ड्रेजिंग करण्यास आपण परवानगी दिली पाहिजे कोणत्या एरीयामध्ये ड्रेजिंग



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. जयंत प्र. पाटील....

करावयाचे आहे तो एरीया जाहीर करुन टाका. आज आपण कोणताही धंदा करावयास गेलो तर आपल्याला माफिया म्हणून ठरविले जाते. आमच्या कोकणामध्ये सावित्री नदीला दरवर्षी पूर येतो. त्यामुळे संपूर्ण महाड शहर पाण्याखाली असते. त्याचप्रमाणे चिपळूणच्या वशिष्ठी नदीला पावसाळयात पूर आल्यानंतर संपूर्ण चिपळूण शहर पाण्याखाली असते. अशीच परिस्थिती खेडमध्ये आहे. तेव्हा अशा नद्यांमध्ये आपण पर्यावरण विभागाची परवानगी घेऊन वेळीच ड्रेजिंग केले तर ही शहरे पावसाळयामध्ये पाण्याखाली येणार नाहीत. परंतु त्याठिकाणी ड्रेजिंग करण्यास परवानगी देणारी फाईल अडवून ठेवली जाते.

सभापती महोदय, वाळूच्या टंचाईचा फटका मला देखील बसला आहे. मी माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील साहेबांच्या पुण्याहून 18 हजार रुपये ब्रासने रेती विकत घेऊन आणली आहे. या रेती विक्रीच्या व्यवहारामध्ये मधले दलाल पैसे कमावीत आहेत. तेव्हा ही दलाली आपण थांबविली पाहिजे. आपल्याला या प्रकरणाची चौकशी करावयाची असेल तर रेतीचे लिलाव थांबवून महाराष्ट्रामध्ये ज्या ज्याठिकाणी बांधकामे करण्यात आली त्यांची आपण चौकशी करावी. त्यांनी ते बांधकाम करण्यासाठी रेती कोठून आणली, पाकिस्तानातून आणली कां?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

त्यांनी राजस्थानमधून आणली काय, असे असेल तर त्याला बांधकाम खात्याकडून बिल का देण्यात आले, जर रेती उत्तम प्रकारची नव्हती तरी देखील हे बांधकाम करण्यात आलेले आहे काय, याची आपण चौकशी करणार आहात काय? माझ्याकडे भरपूर मुद्दे आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी एक चांगला मुद्दा मांडलेला आहे आणि आपण सर्वांनी गंभीरपणे घेतला पाहिजे. आज भेसळयुक्त रेती वापरुन बांधकाम केले जात आहे. या विषयाच्या संबंधात विचार व्यक्त करण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना कमी वेळ मिळाला. पण अशा प्रकारची रेती वापरुन जे बांधकाम करण्यात येत आहे, त्याचा दर्जा चांगला नाही. त्या इमारती केव्हाही पडण्याची शक्यता आहे. याचा देखील आपण विचार केला पाहिजे. म्हणून माझी माननीय महसूल व खार जमीन मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकडून वेगळी अपेक्षा आहे. मला वाटते की, माननीय श्री.बाळासाहेब थोरात हे वेगळ्या तऱ्हेने महसूल विभागाचा कारभार करतील. बिचारे माननीय डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे हा विभाग होता. पण तुम्ही लगेच त्यांच्या कडून तो विभाग काढून घेतला आणि त्यांना वनवासामध्ये पाठविले. पण तुमच्याबद्दल माझ्या मनात एक वेगळा आदर आहे. मला तुम्हाला पाहिल्यानंतर भाऊसाहेबांना पाहिल्यासारखे वाटते. नाहीतर काय, कारण कधी दुसऱ्या पिढीतील मुलगा चांगला निघत नाही अशी महाराष्ट्रामध्ये परंपरा आहे. आम्ही त्यातले आहोत. आमच्या तीन पिढ्या आहेत. आमच्या तीन पिढ्या गरिबांसाठी, कष्टकऱ्यां- साठी काम करीत आहेत हे तुम्हाला सर्वांना माहिती आहे. पण मी सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांना सांगतो की, आम्ही विचार बदललेला नाही. बाकी सगळे सोडून द्यावे. ते सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना बोलतात, आपल्याकडे सगळे पुरावे आहेत. मला सन्माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांच्याबद्दल आदर आहे. प्रत्येक ठिकाणी यापध्दतीची चर्चा होता कामा नये.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्राला बाळासाहेब यांनी एक वेगळा संदेश द्यावा आणि सर्वसामान्य माणसांना . . . .

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी असे म्हणावे.

श्री.जयंत प्र.पाटील : या सदनामध्ये एकच बाळासाहेब आहेत.मला याठिकाणी दोन मुद्यांच्या बाबतीत विचार मांडावयाचे होते. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब यांनी दोन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चांगल्या विषयांबाबत चर्चा घडवून आणली आणि त्याकडे महाराष्ट्रातील जनता वेगळया आशेने आपल्या या सभागृहाकडे, शासनाकडे पहात आहे. अशा वेळी शासनाने या चर्चेच्या निमित्ताने एक ठोस निर्णय जाहीर करावा अशी विनंती करुन मी माझे विचार संपवितो. मला याठिकाणी भाषण करण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

----

. . . .2 डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी 289 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याच्या समर्थनार्थ बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत आणि हे करीत असताना महाराष्ट्र राज्य रयतेचे आहे की माफियांचे आहे हे मी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना विचारु इच्छितो. येथील सामान्य व प्रामाणिक माणसाला देखील हाच प्रश्न राज्याच्या निर्मितीला 50 वर्षे पूर्ण होत असताना पडलेला आहे. तेल माफिया असेल, भू-माफिया असेल, वाळू माफिया असेल, दूध भेसळ माफिया, अशी माफियांची एक रांगच्या रांग निर्माण झालेली आहे. राज्याच्या निर्मितीला 50 वर्षे पूर्ण होत असताना जर आपण मागे वळून पाहिले तर प्रामाणिकपणे सांगावयाचे तर यामध्ये राजकीय शब्दांचा वापर नाही पण ही वास्तविकता आहे, ही वस्तुस्थिती आहे. तेल माफियांच्या विषयावर चर्चा झाली, दूध भेसळीबाबत चर्चा झाली, वाळू माफियांच्या बाबत चर्चा झाली आणि हे सगळे अचानक कै.यशवंत सोनावणे यांना जाळल्या नंतर सर्व काही बाहेर आले आहे काय ? तर त्या घटनेनंतर याबाबतीत अधिक चर्चा होऊ लागली. हे सर्व अगोदरपासून चालू आहे की नाही ? मला असे वाटते की, कै.यशवंत सोनावणे यांना जाळल्यानंतर बहुदा गृह विभागाकडून पोलीस स्टेशनला आदेश गेले असतील की, आता धाडी टाका.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे..... 16:45

श्री. विनोद तावाडे......

त्यावेळी पोलीस स्टेशनने असे केले असणार की, धाडी टाकणार कोठे, तर आपली डायरी काढा, कोणा-कोणाचे हप्ते आपल्याकडे येतात, त्यांना जाऊन सांगा की, तीन दिवस धाडी टाकल्याचे दाखवायचे म्हणजे आपले संपले. मी हे बोलत आहे असे नाही. डी.जी.श्री. शिवानंद साहेब निवृत्तीच्या चार दिवस आधी परभणीत असे बोलले की, हा केवळ देखावा होता. हा केवळ देखावा करण्यात येत आहे असे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. खडसे साहेब, तसेच सन्माननीय सदस्य श्री. मुनगंटीवार, विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर तसेच मी याठिकाणी सांगितल्यानंतर मंत्री महोदय, श्री. आर.आर. आबा पाटील यांनी असे सांगितले की, आम्ही ठोस कारवाई करीत आहोत. श्री. शिवानंद यांनी सेवानिवृतीच्या चार दिवस आधी स्वत:च सांगितले की, आम्हाला काही अधिकारच नाही. आम्ही ही धूळफेक करीत आहोत. हे फक्त नाटक आहे. पण रोज चॅनेल्सवर कशा प्रकारे धाडी टाकण्यात आल्या या संदर्भात दाखविण्यात येत होते. कोपरा पासून ढोपरा पर्यंत.......याप्रमाणे आदल्या दिवसा पर्यंत सर्व काही नीट चालू होते. पण एका श्री. सोनावणे यांचा मृत्यू झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून धडाघड धाडी टाकण्याचे सत्र चालू आहे असे चॅनेल्सवर दाखविण्यात येत होते. धाडी टाकून ज्यांना पकडण्यात आले त्याबाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते यांनी म्हटल्याप्रमाणे पोलीस खऱ्या गुन्हेगारापर्यंत पोहचलेच नाहीत.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु पोर्टट्रस्टपासून या सगळया तेल माफियांची सुरुवात होते. आज सुध्दा त्याठिकाणी कस्टमने 100 कंटेनर सीझ केलेले आहेत. हे कंटेनर युनायटेड अरब अमिराती मधून आले आहेत. ते हायड्रो कार्बन ऑईलच्या नावाने आले. नॅचरल बिटुमिनच्या नावाने आले. बेस ऑईलच्या नावाने आले. अल्काईल बेंझिनच्या नावाने आले. एस.एन.500 ऑईल, एस.एन.300 ऑईल या नावाने आले. या सगळया नावाने केमिकल्स जे.एन.पी.टी.ला येते. युनायटेड अरब अमिराती या सगळया भागातून येणारे हे सगळे केमिकल्स एक प्रकारे मिक्सिंगसाठीचे डिझेल आहे. जे तेथे 12 रुपये लिटर या प्रमाणे मिळते. या सगळया ऑईल्सला कस्टम डयुटी दोन ते चार रुपये लागल्यानंतर त्याची किंमत 16 रुपये प्रती लिटर इतकी होते आणि ते 40 ते 45 रुपये या दराने विकले जाते. या पध्दतीने हा सगळा कारभार चालतो. हे मी नव्याने सांगत आहे अशातला भाग नाही. सत्ताधारी पक्षातील आणि विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

सदस्यांना माहीत आहे कारण या विषयामध्ये सगळयांचा सगळया ठिकाणी मुक्त संचार असतो. हे मी माहितीच्या आधारे या ठिकाणी बोलत आहे. कस्टम विभागाने या विषयाच्या संदर्भात धाडी घातल्या आहेत. श्री. रबाळे यांच्या एका कंपनीमध्ये, त्या कंपनीचे नाव मंत्री महोदयांना चांगले माहीत असेल. तेथील डी.सी.पी. आणि पोलीस अधिकाऱ्यांनी तेथे धाड घालून ऑईल पकडले. त्यानंतर त्यांच्यावर काय कारवाई झाली याची माहिती ना गृह खात्याला आहे ना यांच्या खात्याला आहे. ज्या श्री. रबाळे यांच्या कंपनीमध्ये या पध्दतीचे ऑईल पकडले गेले, त्यामध्ये इम्रान नावाच्या व्यक्तीला पकडले गेले. त्याला मोक्का लावल्यानंतर त्याला मोक्का लागू नये यासाठी कोणी प्रयत्न केले, कशासाठी केले? हे एक उदाहरण मी या ठिकाणी सांगत आहे. या सगळया गोष्टीमध्ये शासन कुठे तरी गंभीर असेल तरच हे थांबण्याची शक्यता असते. पण दुर्दैव असे आहे की, याबाबतीत शासन कुठेही गंभीर दिसत नाही. श्री. अमित शर्मा नावाच्या इन्फॉर्मरची पनवेलमध्ये हत्या झाली. त्याच्या मारेकऱ्याचा शोध लागला काय, त्या केसचे पुढे काय झाले हे विचारण्यात आले तर कोण कशासाठी माहिती देईल. म्हणजे यांचे वर्किंगच असे आहे की, या वर्किंगमध्ये इम्पोर्ट, एक्स्पोर्टची खोटी लायसन्स मिळविण्यात येतात. श्रीमंत लोक पाचशे ते हजार लोकांच्या नावाने लायसन्स मिळवितात. मी यासंदर्भातील सात ते दहा नावे देऊ शकतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी जी नावे वाचून दाखविणार आहे त्यांनी गेल्या काही महिन्यात इम्पोर्ट, एक्स्पोर्ट व्दारे जे काही आणलेले आहे ते आपल्या राज्यात गेले असणार. त्यांनी त्याचा सेल्स टॅक्स भरला असणार. त्यांनी ते आपल्या राज्यात आणून विकले असेल तर ते सेल्स टॅक्स देतील. त्यांनी जर सेल्स टॅक्स दिला असेल तर त्यांनी खरोखरच ते केमिकल्स आणले असे होईल. त्यांनी जर सेल्स टॅक्स दिला नसेल तर तो पदार्थ महाराष्ट्राचा बाहेर कोणत्या तरी राज्यात गेला असेल. ओरिएंट इंटरप्रायझेस - उस्मान कपाडिया, जॉय इंटरनॅशनल - फरिदा खान, रॉयल इंटरप्रायझेस - अश्रफ उस्मान खान, प्रतिज्ञा एक्स्पोर्टस्- मुकेश शर्मा, प्रतिज्ञा एक्स्पोर्टस् प्रायव्हेट लिमिटेड - सुरेश शर्मा, ग्रीन वर्ल्ड ट्रेडिंग कंपनी - अमनदीपसिंग गांधी, भंडारी केमिकल्स - देवेंद्र भंडारी, रॉयल इंटरप्रायझेस - मोहमद कपाडिया ही सर्व नावे घेऊन मी सांगतो की, जर आपल्या सरकारमध्ये हे थांबविण्याची हिंमत असेल तर जी नावे मी आता घेतली आहेत या नावांचा जर आपण शोध घेतला तर हे कोणी मागविले, जे मागविले ते कोठे गेले, कोठे गेले नसतील तर कोठे मिक्सिंगमध्ये वापरले याची माहिती शासनाला सहज मिळू शकते. ही जी लिंक आहे ती जर आपण पकडू शकलो तर यात नियमाने आपल्याकडे जे काही इम्पोर्ट केले जाते आणि ते कोणत्या पध्दतीने पुढे जाते या सगळ्याची माहिती शासनाला मिळू शकते.

सभापती महोदय, यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये कस्टमने माल पकडल्यानंतर कस्टम विभागाने आपल्या गृह खात्याच्या सायबर सेल विभागाला विनंती केली की, झुलेर ॲट जिमेल डॉट कॉम वरुन या तस्करी केलेल्या डिझेल-ऑईलचा व्यवहार होतो. विक्रांत नावाचा एजंट आहे त्याचा मोबाईल नंबर 9820300835 आहे. जो मागवतो तो कानपूरमधील गृहस्थ आहे. कस्टम विभागाने आपल्या सायबर सेलला सांगितले की, झुलेर ॲट जिमेल डॉट कॉमची माहिती आम्हाला द्या आणि काय काय व्यवहार झाले हे शोधून काढा. आपले सायबर सेल त्यांच्याशी को-ऑपरेट करीत नाही. कस्टमवाले त्यांची डयुटी बुडाली म्हणून त्यांचे काम करतील पण हे जे देशविघातक कृत्य चालले आहे, हे जे देशविरोधी कृत्य चालले आहे त्याबाबत त्यांनी आपल्या पोलिसांकडे मदत मागितली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. विनोद तावडे .....

त्यामध्ये जी मदत करावयास्ssा पाहिजे ती करुन त्यातून कोठे या सगळ्याच्या मुळाशी आपण पोहचू शकतो. पण आपल्याला तिथपर्यंत पोहोचावयाचेच नाही. मला असे वाटते की, कस्टमवाले त्यांच्यापुरते त्यांचे काम करतील आणि तो विषय सोडतील पण खऱ्या अर्थाने त्याबाबतीत शेवटपर्यंत जावयास पाहिजे. तिथपर्यंत जाण्याची आपली तयारी असल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, या सगळ्या इंधन भेसळीच्या बाबतीत दोन तीन मुद्दे मांडतो. ज्यावेळी श्री. सोनवणे यांची हत्या झाली त्याच्या दुसऱ्या दिवशी पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, आपल्या महाराष्ट्र सरकारचा एक जी.आर. निघाला होता. श्री. बी.बी.पारखी यांच्या सहीने 24 जानेवारीला तो जी.आर.निघाला आणि त्यानंतरची ही घटना आहे. या विषयाच्या बाबतीत मी आजही ठाम आहे. मंत्री महोदयांनी सी.आय.डी. मार्फत चौकशी करावी. कोणी, कोठे, कधी, किती वाजता, कोठल्या बॅगेत पैसे दिले, पोहोचविले हे त्या सी.आय.डी. चौकशीमध्ये सांगण्याची जबाबदारी माझी आहे. कोणी दिले त्यांची नावे घोषित केलेली आहेत. मी माझ्या विधानावर ठाम आहे. ते लोक जे बोलले त्याच्या सीडीज माझ्याकडे आहेत. त्या लोकांना बोलवावयाचे आणि त्यांच्या आवाजाची तपासणी करावयाची हे काम सी.आय.डी.चे राहील. बाकी ठिकाणी आपण नार्वेकर, गोरे यांच्या आवाजाची तपासणी करतो त्याप्रमाणे त्या आवाजांची तपासणी करा आणि सगळी माहिती बाहेर काढा. हा जी.आर. काढण्यासाठी कोणत्या मजल्यावर किती पैसे दिले याची सत्यता बाहेर येऊ शकते. मी केवळ राजकीय आरोप करावयाचा म्हणून बोलत नाही तर ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील जे म्हणाले त्याच्याशी मी सहमत नाही. खरे-खोटे काय आहे ते गृह खाते बाहेर काढील. पण या पध्दतीने जर होणार असेल आणि मंत्रालयातून जर असे आशीर्वाद मिळणार असतील तर ही भयानक बाब आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ MMP/ यापूर्वी श्री.बरवड 16:55

श्री.विनोद तावडे....

त्यानंतर ताबडतोब मंत्री महोदयांचे उत्तर आले की, आम्हाला श्री.मुरली देवरा यांचे पत्र आले होते, हे गुजरात राज्यात निघाले, कर्नाटक राज्यात निघाले होते. म्हणून एकदा शासनाने सीआयडीची चौकशी मान्य करण्यात यावी. मग किती दिवस कोण कोणाला भेटले, किती दिवस कोणी किती प्रयत्न केले ते सांगावे. याबाबतची माहिती सत्ताधारी पक्षाकडून बाहेर येऊ द्या, मग मी सुध्दा आमच्या बाजूकडून माहिती बाहेर काढतो. कोणी, काय म्हटले होते ती सगळी माहिती सीआयडीकडे देण्यास तयार आहे. परंतु सीआयडी चौकशी प्रामाणिकपणे केली जाणार असेल तर याबाबतीत आपण ठोस काही तरी करता येईल. याठिकाणी भेसळीचे उदाहरण मांडण्यात काही पॉईण्ट नाही. हे कोठे तरी थांबावे अशी शासनाची प्रामाणिक इच्छा असेल तर जसे अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा, 1954 आहे. दूध भेसळीसाठी वेगळा कायदा आहे. तसा इंधन भेसळीसाठी स्वतंत्र कायदा आपल्याकडे नाही. हे सर्व राजरोसपणे चालू आहे तरी पण त्या कायद्याबाबत काहीही ठोसपणे केलेले नाही. अन्न व नागरी पुरवठा विभागाला जवळपास 1 कोटी टन इतके रॉकेल विविध कंपन्यांकडून पुरविले होते. आपण जर किरीट पारीख समितीचा अहवाल पाहिला तर महाराष्ट्रात 19 टक्के केरोसिनच्या वापरात घट झालेली आहे. ही घट विचारात घेता पुरवठ्यात वाढ झाली आहे की, घट झाली आहे ते शासनाने सांगावे. तत्कालीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री होते ते विद्यमान अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांच्याच पक्षाचे होते. त्यांनी केंद्र सरकारकडून काही विशिष्ट 2-3 जिल्ह्यांसाठी रॉकेलचा कोटा वाढवून आणला होता तो कोटा कोठे गेला त्याची चौकशी करावी. केंद्र सरकारमध्ये आपल्याच पक्षाचे मंत्री होते म्हणून कोटा वाढवून घेणे सोपे होते. त्यामुळे कोटा वाढवून मिळाल्यावर त्याचे कोठे वाटप झाले ते शासनाने सांगावे. हे सर्व रॅकेट आहे. तेथील राजकीय नेता, तेथील एखादे अतिरिक्त जिल्हाधिकारी, तेथील रेशनिंग ऑफिसर एका ठिकाणी बसतात. त्यामुळे रॉकेलच्या गाडया रेशनिंग दुकानापर्यंत जातच नाहीत. परस्पर बाहेर माल विकला जातो. लोकांना पुरवठा केल्याचे कागदावर दाखविले जाते. हे सर्व थांबविण्याची प्रामाणिक इच्छा असेल तर थांबू शकते. तत्कालीन सचिव श्रीमती लीना मेहंदळे यांनी यासंबंधी एक अहवाल शासनाला सादर केला होता, त्या अहवालाच्या बाबतीत शासनाने 4

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ MMP/

श्री.विनोद तावडे....

पावले पुढे टाकली पाहिजेत. तो अहवाल योग्य वाटत नसेल तर शासनाने तसे म्हणावे. शासनाने सांगितल्यामुळे एक आयएएस अधिकारी शासनाला अहवाल सादर करतात. तो अहवाल विचारात सुध्दा घेतला जात नाही. यासंदर्भात दक्षता समित्या नेमल्या जातात, त्यातील सदस्य कोणकोण आहेत ते एकदा शासनाने तपासावे. या दक्षता समित्यांवर पोपट शिंदे यांचे सर्व भाऊबंद आहेत. आज या दक्षता समित्यांची स्थिती कशी आहे, त्याच्यातील वास्तविकता काय आहे, त्यात कोणकोण सदस्य आहेत ?

सभापती महोदय, बिहार राज्यामध्ये श्री.नितीशकुमार शासनाने बारकोड पध्दत आणली आहे. आता महाराष्ट्र राज्याला बिहार राज्याकडून शिकावे लागत आहे. हे आम्हाला सांगावे लागते. तेथे आमच्या पक्षाचे सरकार आहे म्हणून मी हे सांगत नाही. पण महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याला यशवंतराव चव्हाणांचा वारसा लाभलेला आहे. माननीय केंद्रीय अर्थमंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांनी अर्थसंकल्पीय भाषणात असे म्हटले आहे की, केंद्र सरकार खालच्या स्तरावर सरळ सबसिडी देणार आहे. या सिस्टिममधून ती जाऊ शकते, ही वास्तविकता सर्वजण मान्य करीत आहेत. मारकरमध्ये पाणी घातल्यावर ते कसे घालविता येते हे सर्व किस्से आहेत. ते सगळयांना माहीत आहे. दुधाच्या भेसळीबाबत मला प्रामाणिकपणे एवढेच बोलावयाचे आहे की, सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्या नगर जिल्हयात दुधाचे संकलन मोठया प्रमाणात होते. त्यामुळे त्यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे जिल्ह्यात नाव झाले आहे. त्या जिल्हयात प्रभावीपणे चळवळ चांगल्या पध्दतीने चालविली आहे. पण आज नगर जिल्हा हा दूध भेसळीचे केंद्र झालेले आहे. ते कसे झाले, का झाले याची माहिती जो राजकीयदृष्ट्या सक्षम आहे त्याला यातील सर्व गोष्टी कळतात.

सभापती महोदय, मी 1970 साली शाळेत होतो त्यावेळी आम्ही मिल्क सेंटरवर रांग लावून दूध घेत होतो. त्यानंतर धवल क्रांती झाली, त्यामध्ये गुजरात राज्य पुढे गेले, नंतर महाराष्ट्र राज्य पुढे गेले. हा दुधाचा इतिहास सगळयांना माहीत आहे. गुजरात राज्यामधील 5 जिल्ह्यांमधून अन्य राज्यांना दूध निर्यात करता येईल इतक्या प्रमाणात दुधाची निर्मिती होत आहे. आपल्या राज्यात 61 दूध संघ आहेत, त्यापैकी 10 संघ चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. त्यात महानंद आहे.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:00

श्री. विनोद तावडे...

आपल्या राज्यात दूध उत्पादनाचा खर्च प्रति लिटर 10 रुपये आहे. मी ज्या काही चार-पाच राज्यांचा अभ्यास केला त्या राज्यांमध्ये दूध उत्पादनाचा खर्च प्रति लिटर 4 ते 5 रुपये आहे. मग आपल्या राज्यात दूध महाग का मिळते ? या सगळया गोष्टींचा आढावा घेतला पाहिजे. भेसळ करण्यासाठी जे पदार्थ वापरले जातात ते शरीराला अत्यंत घातक आहेत. मिक्सिगचे दोन प्रकार आहेत. एक मालाफाईड मिक्सिग आणि दुसरे बोनाफाईड मिक्सिग. प्रश्न असा आहे की, मालाफाईड मिक्सिग करणा-यावर कारवाई होत नाही. मात्र बोनाफाईड मिक्सिग करणा-यावर अधिक कारवाई होते. भेसळ प्रतिबंधक कायदा 1954मध्ये करण्यात आलेला आहे. त्यामध्ये आता सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. भेसळीसंबंधी चर्चा होत असताना भेसळ होऊ नये म्हणून सरकार कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना करणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, मंत्री महोदयानी वाळू उपसा धोरणाचा उल्लेख केला. वाळू माफियांच्या बाबतीत कारवाई करायची झाली तर गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या गावातच डंपर अंगावर घालण्याचे धाडस वाळू माफिया करतात. वाळू उपशाचे नवीन धोरण ठरविताना निसर्गाचे संवर्धन आणि संरक्षण कसे होईल हे कटाक्षाने पाहिले पाहिजे. निसर्ग आपल्या गरजा भागवतो असे म.गांधीनी म्हटलेले आहे. आज सत्ताधारी पक्ष म. गांधीना विसरला आहे. त्यांच्या नावाने राज्य करणारे राज्यकर्ते त्यांना विसरायला लागले आहेत. मला हे सांगायचे आहे की, जे नवीन वाळू धोरण राबविले जाणार आहे त्याचे विश्लेषण केले पाहिजे. आपल्या राज्यातील नद्यांमध्ये, खो-यांमध्ये असलेली वाळू ही राज्याची नैसर्गिक संपत्ती आहे. गुजराथ राज्याने वाळू बाहेरच्या राज्यात पाठविणे थांबविलेले आहे. आपल्या राज्यात किती वाळू आहे, पुढच्या 10 वर्षात आपल्याला किती वाळू लागेल याचा अभ्यास करुन वाळू धोरण ठरविले पाहिजे. पण आपले धोरण काय सांगते ? वाळू बाहेरच्या राज्यात पाठवायची नाही असे आपले धोरण सांगत नाही. पाणलोट क्षेत्रात कोणत्या योजना राबविणार हे आपले धोरण सांगत नाही. या ठिकाणी भेसळीसंबंधीची चर्चा उपस्थित करताना माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कोणत्या लाँगटर्म उपाययोजना शासन करणार अशी विचारणा केली. आता परिस्थिती अशी आहे की, गृह मंत्री वेगळे सांगतात आणि पोलीस





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

महासंचालक श्री. शिवानंदन वेगळे सांगतात, अन्न व नागरी पुरवठा खात्याचे मंत्री श्री.अनिल देशमुख हे एक सांगतात आणि जिल्हा पुरवठा अधिकारी दुसरे सांगतात. शासनातील आणि सत्ताधारी पक्षातीलच काही माणसे आम्हाला माहिती पुरवितात. ही माहिती मिळविण्यासाठी आम्हाला फार काही प्रयत्न करावे लागत नाहीत. आमच्याकडे दिलेली माहिती विकली जाणार नाही असा विश्वास अधिका-यांना आहे. आम्ही हे काम प्रामाणिकपणे करु शकतो. कोल्हापुरातील कोण तो रॉकेल माफिया ? त्याला अटक करण्याची सरकारची हिंमत आहे काय ? नियम 260 अन्वये आणलेल्या या प्रस्तावाचे समर्थन करीत असताना ही भेसळ बंद होण्यासाठी सरकार ठोस अशी उपाययोजना करील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये भेसळीच्या संदर्भात मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

...नंतर श्री. खर्चे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .......

या राज्यात जशी हरितक्रांती झाली, तशी गेल्या 30 वर्षापूर्वी धवल क्रांती सुध्दा झाली. तेव्हा ग्रामीण भागात शेतीला जोड धंदा मिळावा असे अपेक्षित होते. पूर्वी राज्यात सिंचनाची सुविधा पाहिजे तेवढ्या प्रमाणात झालेली नव्हती म्हणून शेतकऱ्यांची क्रयशक्ती कमी होती, उत्पन्नही कमीच होते, त्यातून दुधाच्या व्यवसायाला शासनाने चालना दिली. त्यासाठी जास्तीत जास्त दूध मिळावे यासाठी संकरित जनावरे कशी मिळतील यासाठी शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान पुरविले आणि त्यातून राज्यात दुधाचा महापूर आला. साधारणपणे एका कुटुंबात एक जनावर असेल तर त्या कुटुंबाचे 25 टक्के अर्थकारण या जोड धंद्यातून पूर्ण होत होते, एवढी शक्ती या जोड व्यवसायामध्ये होती. दुधाची गरज ही सामान्य माणसासाठी असते, मुलांसाठी असते तसेच त्यापासून तयार होणाऱ्या पदार्थासाठी असते, म्हणून शेतकऱ्यांना सशक्त करण्यासाठी आपण आणलेली ही व्यवस्था आहे. परंतु त्यामध्ये भेसळीचा प्रकार होतो हे अत्यंत गंभीर आहे. माझ्या माहितीप्रमाणे ज्याप्रमाणे बाजारात सिंथेटिक, कॉटन, पॉलिस्टरचा कपडा असतो त्याप्रमाणेच सिंथेटिक दूध सुध्दा आता राज्यात विकले जात आहे. त्यात सोडियम लोरेल सल्फेट आणि रिफाईन्ड ऑईलचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. त्यानुसार 0.01 टक्के ॲड करुन 99.99 टक्के पाणी टाकले तरी दूध तयार होते. अशा प्रकारे कितीही कमी केमिकल्सचे प्रमाण वापरले तरी ते दूध माणसाला घातकच असते. 180 मि.लि. सॉर्बीटॉल आणि 50 मि.लि. पाणी वापरले तरी 50 लिटर दूध तयार होते. यापासून तयार होणाऱ्या दुधाचा फॅट व स्निग्धता ज्याप्रमाणे गाय व म्हैस यांच्या ओरिजिनल दुधात आढळून येतो तेवढाच फॅट आणि स्निग्धता या केमिकलच्या दुधात सुध्दा आढळते. त्यामुळे गिऱ्हाईकांची फसवणूक होते.

महोदय, ऑरगॅनिग केमिस्ट्रीमध्ये डॉक्टरेट केलेल्या एका डॉक्टरने अशा सिंथेटिक दुधाचा फॉर्म्युला तयार करुन मेहता नावाच्या माणसाला विकला आणि त्या मेहता नावाच्या इसमाने एजंटांच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात हे सिंथेटिक दूध विकण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. अशा प्रकारे राज्यात 30 वर्षापूर्वी सुरु झालेल्या धवल क्रांतीचा हेतू पूर्णत: संपलेला आहे. अशा प्रकारे या मेहता नावाच्या माणसाने सिंथेटिक दूध तयार करुन ते राज्याच्या काना-कोपऱ्यात, घरा घरापर्यंत पोहचविले आहे त्याकडे शासनाने गांभीर्याने पाहिले, याबद्दल संशय नाही. पण अशा

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे.......

लोकांविरुध्द कारवाई म्हणून ठिकठिकाणी ज्या धाडी टाकल्या होत्या, त्यानंतर चार दिवस ते गप्प बसतात आणि पुन्हा आपला धंदा सुरु करतात अशी परिस्थिती आहे व त्याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, अशी भेसळ फक्त दुधातच होते असे नाही तर बीड जिल्ह्याचा क्रमांक खव्यात भेसळ करण्यात अग्रेसर आहे. ज्याप्रमाणे दुधामध्ये भेसळ करणारे अहमदनगर आणि बीड हे दोन जिल्हे आहेत, त्याप्रमाणे खव्यात भेसळ करणारा आमचा बीड जिल्हा आहे. बीडची माणसे कुठल्याच क्षेत्रात मागे राहणारी नाहीत. ज्यावेळी शासनाने अशा भेसळ करणाऱ्यांवर धाडी टाकल्या त्यानंतर खव्याची दुकाने एक महिना अक्षरश: ओस पडली होती. पण एक महिन्यानंतर पुन्हा तशीच भेसळ सुरु झाली आणि मिठाईची दुकाने पुन्हा जोरात चालू झाली. अशा भेसळीचा माणसाच्या आरोग्यावर, शरीरावर अत्यंत विपरित परिणाम होतो

महोदय, वाळू माफियांच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, वाळू माफिया कुठल्या तरी स्थानिक पक्षाच्या, शक्तीशाली माणसाच्या वरदहस्ताशिवाय उभा राहू शकत नाही. त्या ठिकाणी काय चालते याकडे शासनाने बारकाईने लक्ष देणे आवश्यक आहे. यामध्ये महसूल व गृह विभाग हे सिरियसली बघत असले तरी ते अशी वाळू डम्प करुन कृत्रिम टंचाई निर्माण करतात व नंतर भाव वाढविले जातात. त्यामुळे सामान्य माणसाला स्वत:चे घर बांधण्यापासून रोखले जाते व त्याचा फायदा बिल्डरला कसा होईल यादृष्टीने प्रयत्न करणे संपूर्ण राज्यात चालू आहे, ते अत्यंत धोकादायक आहे. अशा प्रकारे वाळू माफिया राज सरकारने संपविले पाहिजे. या प्रकरणात धाडी टाकत असताना महसूल अधिकाऱ्यांवर हल्ल झाले, त्यातून यशवंत सोनवणे सारख्या अधिकाऱ्याची हत्या झाली, पोपट शिंदे किंवा यशवंत सोनावणे हे महत्वाचे नसून जी परिस्थिती निर्माण झाली व त्यातून माणूस माणसाला जाळायला लागला, त्यातून माणुसकीचाच कोळसा झाला......

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

या सर्व गोष्टी रोखण्यासाठी आपल्याला लक्ष देण्याची आवश्यकता आहे. वाळूमध्ये आणि दुधामध्येच भेसळ होते असे काही नाही. आमच्या बीडमध्ये ट्रॅव्हल्सच्या ज्या गाडया चालतात त्यामध्ये सर्रास रॉकेल वापरले जाते. बीडच्या एस.पी. यांनी रॉकेल वापरणा-या ट्रॅव्हल्स गाडयांवर कारवाई करुन त्या गाडया 8 दिवस बंद ठेवल्या होत्या. परंतु 8 दिवसानंतर त्यांना बेल मिळाल्यामुळे त्या गाडया पुन्हा रोडवर आल्या व त्यांनी पुन्हा रॉकेल वापरण्यास सुरुवात केली. आपण कोठल्याही पेट्रोल पंपावर गेलात आणि गाडीमध्ये डिझेल भरले तर त्या डिझेलला रॉकेलचा वास येत असल्याचे आपल्याला आढळून येईल. डिझेलमध्ये रॉकेल किती प्रमाणात आहे याचे ॲनलिसीस करण्याची आपल्याला माहिती नसते. परंतु यासाठी दक्षता समित्या निर्माण करुन त्यावर कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. भेसळीच्या संदर्भात शासनावर ठपका ठेवून चालणार नाही कारण विरोधी पक्ष सुध्दा सत्तेवर राहिलेला असल्यामुळे यामध्ये खरी परिस्थिती काय आहे हे विरोधी पक्षाला सुध्दा माहिती आहे. त्यामुळे भेसळीच्या संदर्भात आपण सर्वांनी एकत्र मिळून काम करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, भेसळीच्या संदर्भात आपल्याकडे अनेक कायदे आहेत, महिलांच्या संदर्भात सुध्दा अनेक कायदे आहेत, अध्यादेश आहेत परंतु त्याची अंमलबजावणी करण्याची मानसिकता अधिका-यांमध्ये निर्माण झालेली नाही. सर्वच अधिकारी भ्रष्टाचारी आहेत असे मला म्हणावयाचे नाही. काही चांगलेही अधिकारी आहेत. कर्मचा-यांमध्ये, अधिका-यांमध्ये भेसळीच्या संदर्भात मानसिकता निर्माण करण्याची, मनोबल वाढविण्याची खरी गरज निर्माण झालेली आहे असे मला वाटते. भेसळीच्या संदर्भात ॲक्शन घेत असतांना अधिका-यांना व कर्मचा-यांना राजकीय सपोर्ट दिल्याशिवाय ते सुध्दा चांगल्या प्रकारे काम करु शकणार नाहीत.

सभापती महोदय, केवळ डिझेलमध्ये, दुधामध्ये भेसळ होते असे नाही तर औषधामध्ये सुध्दा आज मोठया प्रमाणात भेसळ होत आहे. आपण सरकारी दवाखान्यात गेलो तर तेथील डॉक्टर सुध्दा आपल्याला सरकारी औषधे न वापरता बाहेरील औषधे वापरण्याचा सल्ला हळूच कानामध्ये देत असतात हे आपण विसरुन चालणार नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

सभापती महोदय, लाल मिरचीत लाल रंग मिक्स केला जातो, हळदीमध्ये पिवळा रंग मिक्स केला जातो, पेट्रोलमध्ये रॉकेल मिक्स केले जाते आहे. आता कुठल्याही गोष्टीत भेसळ केली जात आहे. जे भेसळ करतात ते कोणत्याही पक्षाचे नसून ते जनतेची लूट करणारे लुटारु आहेत, ते कोणत्याही जाती धर्माचे नसतात ते केवळ जनतेचे रक्त पिण्याचे काम करीत असतात. या सर्वांवर आळा घालण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे त्यामुळे आपण सर्व शासनाच्या पाठीशी आहोत असे समजून आपली रजा घेते व माझे विचार येथेच थांबवते.

धन्यवाद.

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ): नियम 260 च्या प्रस्तावाला 5.30 वाजता मंत्री महोदय रिप्लाय देण्यास सुरुवात करतील. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, जयंत जाधव तसेच डॉ. दीपक सावंत विचार व्यक्त करणार आहेत त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले विचार थोडक्यात म्हणजे पाच मिनिटात पूर्ण करावेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी थोडा वेळ वाढवून देण्यात यावा अशी विनंती आहे.

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, मैं एक पाइंट ऑफ आर्डर यहां पर उपस्थित करना चाहता हूं. मेरा कहना है कि यह प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेता द्वारा लाया गया है, यह बात स्वागत योग्य है. लेकिन जब बहुत सारे माननीय सदस्य इस प्रस्ताव पर बोलना चाहते हैं तो प्रत्येक पार्टी के लिए या प्रत्येक माननीय सदस्य के लिए एक समय सीमा निश्चित की जानी चाहिए. ताकि सभी माननीय सदस्यों को बोलने का मौका मिल सके. लेकिन यहां पर ऐसा हो नहीं पाता है. इस बारे में सभागृह में अनुशासन लाना बहुत जरुरी है. आपके द्वारा बैठने के लिए कहने के बाद भी माननीय सदस्य अपना भाषण समाप्त नहीं करते तथा आपकी तरफ से माईक भी बंद नहीं किया जाता है. इसके बारे में आपके द्वारा कोई रुलिंग देना बहुत आवश्यक है या कामकाज सलाहकार समिति में इस बारे में कुछ नियम निश्चित किया जाना चाहिए. जो लोग शुरु में बोलते हैं उनको ज्यादा समय मिल जाता है और जो माननीय सदस्य आखिर में बोलते हैं उनको बहुत कम समय मिल पाता है. ऐसा नहीं होना चाहिए. इसलिए मैं विनम्रता पूर्वक कहना चाहूंगा कि यदि सभी माननीय सदस्यों को बोलने के लिए उचित समय नहीं दिया गया और यहां पर सभी माननीय सदस्यों द्वारा अनुशासन का पालन नहीं किया गया तो फिर हम भी अनुशासन नहीं दिखा पाएंगे और हम भी यहां पर खड़े होकर बोलना शुरु कर देंगे.

(यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्यास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून हा प्रस्ताव मांडण्यात आला असून या प्रस्तावावर बोलत असताना सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी सांगितले की, हा प्रश्न विरोधी पक्षाचा वा सत्ताधारी पक्षाचा नसून सर्वानी मिळून भेसळीचे प्रकार होता कामा नयेत या दृष्टीने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, राजाश्रय मिळाल्याशिवाय या माफियांकडून गैरप्रकार होऊ शकतात काय ? आज राज्यामध्ये माफिया मोकाट सुटलेले आहेत . त्यांना कायद्याचे वा पोलिसांचे भय वाटत नाही. त्यांना राजाश्रय असल्याशिवाय ते मोकाट सुटू शकत नाही. दूध, खवा, लाल मिरची, मसाला, हळद, औषधे, चहा, पेट्रोल इत्यादीमध्ये भेसळ होत आहे असे त्यांनी सागितले . त्याचबरोबर वेगवेगळया प्रकारचे रंग फळांना दिले जातात इतकेच नव्हे तर गाजराला सुध्दा रंग दिला जातो . यावर जर शासनाला उपाययोजना करावयाची असेल तर सभागृहात भाषणे करुन वा कायदे करुन काही उपयोग होणार नाही आणि सध्याची जी सिस्टीम आहे ती सिस्टीम सक्षम बनविता येणार नाही.

सभापती महोदय, माझ्याकडे काही आकडेवारी असून ती आकडेवारी मी या ठिकाणी देऊ इच्छितो. एखाद्या पदार्थामध्ये भेसळ आहे हे प्रयोगशाळेत तपासणी केल्यानंतरच सिध्द होऊ शकते. आपल्याकडे 17 प्रयोगशाळा असून त्यातील 11 बंद आहेत. त्याचबरोबर एखाद्या पदार्थामध्ये एखाद्या व्यक्तीने भेसळ केली आहे हा गुन्हा प्रयोगशाळेत पदार्थाच्या नमुन्याची तपासाणी केल्यानंतरच सिध्द होईल ? परंतु 17 पैकी 11 प्रयोग शाळा बंद असून सहा प्रयोग शाळेतूनच फक्त पदार्थाचे नमुने तपासले जातात.बाकीच्या 11 प्रयोग शाळामध्ये पदे रिक्त असल्यामुळे बंद पडल्या आहेत. पिण्याचे पाणी तपासणारी यंत्रणा फक्त कार्यरत आहे. त्या व्यतिरिक्त बाकीची सर्व यंत्रणा बंद आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या फक्त 25 प्रयोग शाळा सुरु आहेत.अशी जर प्रयोगशाळांची अवस्था असेल तर पदार्थामध्ये भेसळ आहे हे आपल्याला कसे कळू शकेल , भेसळ करणा-या विरुध्द गुन्हे कसे दाखल करता येतील आणि माफियांना कशा प्रकारे शासन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

करता येईल? मघाशी बोलत असतांना सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी गेल्यानंतर तेथे रॉकेलचा वास येतो. पेट्रोलमध्ये किती प्रमाणात रॉकेलची भेसळ करण्यात आली आहे हे कसे तपासावयाचे हे तुम्हा आम्हाला वा सर्वसामान्य माणसाना माहीत आहे काय ? यासबंधी जागरुकता कशी निर्माण होईल या दृष्टीने शासन काहीही प्रयत्न करीत नाही त्यामुळे लोकांमध्ये अजिबात जागरुकता नाही. त्यामुळे भेसळ आहे किंवा नाही हे त्यांना कसे समजणार आणि ते कोणाची तक्रार करतील ? कोठे तरी अधिकारी छापे टाकतात आणि पदार्थाचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठवतात तेथे भेसळ झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर कोणाला तरी शिक्षा केली जाते.

सभापती महोदय, औषधाच्या भेसळी संबंधी कोणीही बोलले नसल्यामुळे मी तेवढयाच मुद्या पुरते बोलणार आहे.औषधात भेसळ केल्याचा गुन्हा जर सिध्द झाला तर तो मनुष्यवधा इतकाच भयानक आहेत. माननीय गृह मंत्री या ठिकाणी उपस्थित असून ते माझ्या मताशी सहमत होतील असे मला वाटते.एखाद्या रुग्णाला चुकीचे औषध दिल्यामुळे त्याला जर पॅरेलिसीस झाला,वा तो मृत पावला तर ......

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

तर त्यावर मनुष्य वधाशिवाय दुसरे कोणतेही कलम लावता येणार नाही. त्याप्रमाणे आपल्याला गुन्हा दाखल करावा लागेल. त्याचप्रमाणे मुदतबाह्य औषधे वापरणे ही सुध्दा एकप्रकारची औषधामधील भेसळ आहे. सभापती महोदय, औषधामध्ये भेसळ कशी केली जाते? जेनरीक औषधे वापरण्याची आज एक नवीन टूम बाजारात आली आहे. एखादे औषध सिप्ला कंपनी बनवीत असेल तर त्याचप्रकारचे औषध दुसऱ्या औषधाच्या कंपनीमध्ये बनविले जाते. माननीय श्री. दिलीप वळसे पाटील हे वैद्यकीय शिक्षण मंत्री असतांना त्यांच्याबरोबर हिवाळी अधिवेशनामध्ये माझा एकदा वाद झाला होता. सभागृहामध्ये खूप मोठे भांडण झाले होते आणि त्यानंतर आम्ही एकमेकांची माफी मागितली होती. त्यावेळी त्यांनी सभागृहामध्ये सर्व औषध कंपन्यांना डब्लूएचओ-जीएमपी लागू करण्याबाबत विधेयक आणले होते. आज बऱ्याच लहान लहान कंपन्यांकडून औषधे घेतली जातात. म्हणून मला आपल्याला विचारावयाचे आहे की, आपण डब्लूएचओ-जीएमपी लागू असलेल्या कंपन्यांकडून औषधे घेतो काय? याचे उत्तर "नाही" असे आहे. या संदर्भात राज्य सरकारने एक जी.आर. काढला होता. श्रीमती चंद्रा अय्यंगार या सार्वजनिक आरोग्य खात्याच्या प्रधान सचिव असतांना त्यांनी 4 किंवा 5 पब्लिक सेक्टर अंडरटेकींग असलेल्या कंपन्यांकडून औषधे घेण्यात यावीत अशाप्रकारचा जी.आर. काढला होता. या राज्यामध्ये पीएसयू कंपन्यांची फक्त कार्यालये आहेत. त्या कंपन्या उत्तर प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश आणि वसई येथून औषधे घेतात. ज्या कंपन्यांकडे फक्त औषध निर्मितीचे लायसन्स आहे त्यांच्याकडे डब्लूएचओ-जीएमपीचे सर्टिफिकेट नाही. त्या कंपन्यांमार्फत या राज्याला मोठया प्रमाणात औषधे पुरविली जातात. शेकडो, करोडो रुपयांची औषधे या चार पीएसयू कंपन्यांमधून या राज्यामध्ये येतात. त्यामध्ये कर्नाटकची ॲटीबायोटिक्स फार्मास्युटिकल कंपनी आहे, आयडीपीएल कंपनी आहे.

मध्यंतरी या राज्यामध्ये ॲटी-रेबीज व्हॅक्सीनबाबत मोठा वाद निर्माण झाला. कुत्रा चावल्यानंतर रेबीज होऊ नये म्हणून हे व्हॅक्सीन दिले जाते. रेबीज हा आजार किती भयानक आहे याची आपल्याला कल्पना आहे. श्वानदंश झालेल्या रुग्णाला जर हे इंजेक्शन दिले नाही तर तो मनुष्य दगावतो. तसेच, त्या रुग्णाची शुश्रूषा करणाऱ्याला सुध्दा रेबीज होण्याची शक्यता असते म्हणून त्याला सुध्दा इंजेक्शन घ्यावे लागते. हे अँटी रेबीज व्हॅक्सीन आपण चायनीज कंपनीकडून विकत घेतले आहे. आपण लोकांच्या आरोग्याशी कां खेळत आहोत? हे इंजेक्शन बनविणाऱ्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

डॉ. दीपक सावंत....

अनेक कंपन्या असतांना ज्या चायनीज कंपनीला ब्लॅक लिस्ट केले होते त्या कंपनीला प्रकाशामध्ये आणून तिच्याकडून अँटी रेबीज व्हॅक्सीन खरेदी करण्यात आले. यामध्ये ज्या तीन कंपन्या सहभागी होत्या त्यांना सारख्या प्रमाणात साठा वाटून देण्यात आला आणि अगोदरच्या कंपनीकडून वेळेवर पुरवठा करण्यात आला नाही म्हणून आम्ही त्यांना बाद केले असे त्याबाबत कारण सांगण्यात आले. ज्या औषधांचे रिझल्ट आपल्याजवळ नाहीत, ज्या औषधांचे दुष्परिणाम आपण पाहिले नाहीत अशी औषधे घेणे म्हणजे एकप्रकारची भेसळच आहे असे मी मानतो. जे औषध प्रमाणित नाही, त्या औषधांचा दर्जा आपल्याला समजलेला नाही अशी औषधे वैद्यक शास्त्राच्या दृष्टीने भेसळ ठरतात.

सभापती महोदय, आपण एखादी गोष्ट तपासणीसाठी एफडीएकडे सुपूर्द केली . ती केल्यानंतर त्या तपासणीचे निकाल तीन ते सहा महिन्यानंतर येतात त्यानंतर त्यावर कारवाई होते. ज्याप्रमाणे औषधांमध्ये भेसळ आहे त्याप्रमाणे सौदर्य प्रसाधनांमध्येही भेसळ आहे हे आपण विसरतो. तरी देखील ही सर्व सौदर्य प्रसाधने आपण वापरीत आहोत. पेट्रोल भेसळीनंतर, सोनवणे प्रकरणानंतर काय झाले? त्यानंतर तात्काळ आपण सर्व ठिकाणी छापे घालून कारवाई केली व तेवढयापुरता विषय संपला असे आपणास वाटत असले तरी हा विषय अजून संपला नसून त्या विषयाच्या मुळापर्यंत जाण्याची आवश्यकता आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:25

डॉ.दीपक सावंत . . . .

केंद्र शासनाने काय केले ? या देशामध्ये यासाठी पाच कायदे आहेत आणि 2006 मध्ये फूड सेफ्टी ॲण्ड स्टॅण्डर्ड ॲक्ट हा नवीन कायदा आणलेला आहे. मात्र राज्य शासनाने अजून त्याची अंमलबजावणी केलेली नाही, ती का करण्यात आली नाही ? याबाबत मला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे. याबाबत सांगावयाचे तर आपल्याकडे हा कायदा राबविण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नाही. 2006 मध्ये हा कायदा केंद्र शासनाने पारित केला आणि आज 2011 सुरु आहे. परंतु अजूनही हा कायदा महाराष्ट्रामध्ये पारित झालेला नाही.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, औषधांमध्ये आपण कफ सिरप वापरतो. त्यामध्ये कशाचे प्रमाण किती असावे याचे स्टॅण्डर्ड ठरलेले आहे. त्यामध्ये झोप येण्याचे औषध किती असेल ? त्यामध्ये कॅफीन किती असेल ? त्यामध्ये क्लोअरफ्लेन्रामाईट ग्लेरिअन्ट किती असावे या सगळयाचे प्रमाण ठरलेले आहे. पण हे प्रमाण इकडे-तिकडे करुन म्हणजे 2 मि.ग्रॅ.इकडे 1 मि.ग्रॅ.तिकडे असे वाढवून अशा तऱ्हेने आज राज्य शासनाच्या दवाखान्यामध्ये चार-चार प्रकारची औषधे विकली जातात म्हणजेच लोकांना दिली जातात. अशा प्रकारे एकाच कंपनीची चार औषधे इकडे-तिकडे करण्याची आवश्यकता नाही. यामुळे दुष्परिणाम होतात. यामध्ये एखादी कंपनी डम्प करण्यासाठी राज्य शासन असे प्रकार करीत आहेत. आज प्रायमरी हेल्थ सेंटर, हॉस्पिटल यांच्यासाठी जी डिस-इन्फेक्टंन्ट वापरली जातात आणि ज्याच्यावर आपण भरवसा करतो की, ही डिस-इन्फेक्टंटमुळे इकडचे सर्व बॅक्टेरियाज किंवा सगळे व्हायरस मरुन जातील. पण त्या डिस-इन्फेक्टंटचे किती प्रमाण असते तर फक्त साबणाचा फेस असतो, बाकी काही नसते. आज राज्य शासन अशी करोडो रुपयांची डिस-इन्फेक्टंट घेत आहे आणि ज्याचा काही उपयोग नाही. आज अनेक मार्केटमध्ये वजन कमी करण्यासाठी, डायबेटीस कमी करण्यासाठी, कॅन्सर बरा करण्यासाठी अनेक औषधांच्या जाहिराती येतात. माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख साहेबांना आठवत असेल की, त्यांनी अशा प्रकारच्या जाहिराती देणाऱ्यांच्या बाबतीत देखील एक कायदा केला होता. राज्यातील लोक या जाहिरातींना बळी पडतात. यामध्ये भेसळ असते, त्यामध्ये औषधाचा तथ्यांश देखील नसतो. त्यावेळी माननीय मंत्री श्री.अनिल देशमुखसाहेब यांनी मला प्रॉमीस केले होते की, अशा प्रकारच्या जाहिराती आल्यानंतर आम्ही याची सुमोटो चौकशी करु आणि औषधांमधील जो तथ्यांश आहे ते तपासून पाहू आणि त्याप्रमाणे ती औषधे प्रमाणित करु किंवा अशी औषधे मार्केटमधून बाहेर काढण्यासाठी कार्यरत राहू. पण आपण ते कसे करणार आहात. कारण आपल्याकडे तपासणीची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

सोय नाही तर आपण काय करणार ? त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, हे सर्व करीत असताना शासनाचे जी.आर.तपासत असताना आपल्याला एकच गोष्ट पाहिली पाहिजे की, याबाबतीत लवकर चौकशी होऊन रिझल्ट कसे मिळतील हे पहाणे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, वाळू माफियांच्या बाबतीत सांगू इच्छितो. मी वैतरणा येथे नेहमी जातो. आजही दिवसाढवळया वैतरणा नदीतील वाळू काढली जाते आणि याबाबत सदनामध्ये देखील प्रश्न उपस्थित केला होता. वैतरणा नदीवरील पूल खंगत चालला आहे, तो कधीही खाली येऊ शकतो. त्यामुळे मुंबईहून विरारकडे किंवा गुजराथकडे जाणारी जी वाहतूक आहे ती कधीही धोक्यामध्ये येऊ शकते. त्या वाळू माफियांवर कधी कारवाई करण्यात येणार आहे ? एवढेच माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. जय हिंद  जय महाराष्ट्र.

-----

यानंतर कु. थोरात . . .. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा ( महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित ): माननीय सभापति महोदय, जिस प्रकार अभी आपने माननीय सदस्य को 5 मिनट के बजाय 10 मिनट बोलने का समय दिया है. उसी प्रकार मैं आपसे निवेदन करुंगा कि आप मुझे भी 2-4 मिनट ज्यादा बोलने का समय दें.

सभापति महोदय, यहां पर माननीय विरोधी पक्ष नेता ने जो प्रस्ताव लाया है उस प्रस्ताव के पीछे उनकी भावना और उद्देश्य बहुत ही अच्छा है. लेकिन ऐसा भी लगता है कि वे सरकार को कॉर्नर करना चाहते हैं. वे बताना चाहते हैं कि यहां पर सब माफिया राज है. लेकिन मुझे कहना है कि माफिया राज के पीछे मुख्य कारण करप्शन या भ्रष्टाचार ही है.

मैं कहना चाहूंगा कि चाहे पॉलिटिशन्स हों, ब्युरोक्रेट्स हो, ज्युडिशरी के लोग हों या मीडिया के लोग हों, सभी लोगों को अब सावधान होना पड़ेगा क्योंकि अब लोगों में जागरुकता आयी है और भ्रष्टाचार के खिलाफ आवाज उठने लगी है. इस तरह का वातावरण अब हमारे देश में बन गया है.

मैं यही कहूंगा कि माफिया राज के पीछे मुख्य कारण करप्शन ही है. यह माफिया राज किसी एक सरकार या किसी एक राज्य तक सीमित नहीं है. आजकल हमारे देश में एक अच्छी बात यह है कि अब मिलीजुली गवर्नमेंट का समय है. किसी भी राज्य में किसी भी पार्टी की सरकार हो, सब जगह करप्शन के विरोध में आवाज उठने लगी है.

चूंकि सभी जगह सरकार चलाने की सिस्टम एक ही है. इसलिए करप्शन हमारे सिस्टम में एकदम अन्दर तक चली गयी है और वह नीचे के स्तर तक फैल गया है. ग्राम पंचायत स्तर से लेकर हमारे मंत्रालय तक कोई भी विभाग ऐसा नहीं है, जहां पर भ्रष्टाचार नहीं है.

मेरा कहना है कि महाराष्ट्र राज्य एक बहुत ही प्रगतिशील राज्य है और हमें भ्रष्टाचार के खिलाफ बहुत ही कड़े कदम उठाने पडेंगे. अभी पिछले महीने ही माननीय प्रधानमंत्री जी ने सभी राज्यों के मुख्य सचिवों की एक मीटिंग बुलायी थी. वहां पर उन्होंने करप्शन के बारे में कुछ चर्चा की हैं. मैं महाराष्ट्र सरकार से अनुरोध करुंगा कि वे उस मीटिंग की प्रोसीडिंग मंगाएं. वह मीटिंग हमारे राज्य के चीफ सेक्रेटरी साहब ने भी अटेंड की है. उस मीटिंग में क्या-क्या सिफारिशें की गयी हैं, उन सिफारिशों की जानकारी जनता को दी जाये. ताकि लोगों को मालूम हो सके कि

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा....

भ्रष्टाचार के बारे में केंद्र सरकार क्या-क्या योजना बना रही है.हमारी केन्द्र सरकार करप्शन के के बारे में और लोकायुक्त से संबंधित एक बिल ला रही है. उस बारे में भी हमारे सदन के सभी माननीय सदस्यों को ध्यान देना चाहिए और मुझे लगता है कि हमारे महाराष्ट्र राज्य में जो एन्टी करप्शन ब्युरो है, वह भी पुलिस विभाग जैसा ही एक विभाग है. यदि किसी डिपार्टमेंट में कोई बाबू 5 सौ रुपए की रिश्वत ले रहा है तो वे लोग उसको पकड़ते हैं. यहां पर हमारे गृह मंत्री महोदय बैठे हुए हैं. मैं बताना चाहूंगा कि हमारे एन्टी करप्शन ब्युरो में कोई दम नहीं है, उसके अंदर कोई ताकत नहीं है, उनके पास मजबूत मशीनरी नहीं है. मेरा कहना है कि या तो कोई नयी एजेंसी बनायी जाये या फिर एन्टी करप्शन ब्युरो को ही मजबूत किया जाये. क्योंकि यहां पर माननीय सदस्यों ने जो बड़े-बड़े माफिया लोगों की बात की है, उन माफिया लोगों की गतिविधियां एन्टी करप्शन ब्युरो की नजर में आनी चाहिए. वे गतिविधियां उनकी नजर में क्यों नहीं आती हैं. आज यहां पर ऑयल माफिया हैं, मिल्क माफिया हैं, इस तरह के माफिया हमारे यहां पर हैं, यहां तक तो बात समझ में आती है. इन माफियाओं को लोग टॉलरेट कर लेंगे. लेकिन मिलावट को सहन नहीं किया जा सकता. आज हमारे खाने का कोई भी सामान ऐसा नहीं है जिसमें मिलावट न होती हो. चाहे मावा हो या मेवा हो और यहां तक कि सब्जियों में भी मिलावट होती है. सब्जियों को भी इंजेक्ट किया जाता है. यहां तक कि लाइफ सेविंग ड्रग्स में भी मिलावट होती है. सार्बिट्रेट नाम की गोली बुजुर्ग लोग जेब में रख कर घूमते हैं. ताकि उन्हें कभी हर्ट अटैक आया तो उस गोली को खाकर वे लोग हास्पीटल तक पहुंच सकते हैं. लेकिन उस लाइफ सेविंग ड्रग्स में भी यदि मिलावट होती हो तो मेरा कहना है कि मिलावट करने वाले ऐसे लोगों को फांसी की सजा क्यों नहीं दी जाती है ? मैं सदन के सभी राजनीतिक पार्टी के माननीय सदस्यों से अनुरोध करुंगा कि यदि खाने के समान में और दवाई में मिलावट होती है तो फिर इस बारे में एक केपीटल पनीशनमेंट होना चाहिए. आप फास्ट ट्रेक कोर्ट बनाएं और जो लोग मिलावट करते हुए पकड़ जाएं उनको आप फांसी की सजा दीजिए. आप देखेंगे कि ऐसा करने से मिलावट करने की 80 प्रतिशत गतिविधियां बंद हो जाती हैं या नहीं. प्रजातंत्र के नाम पर हम केपीटल पनीशमेंट नहीं दे रहे हैं. यदि हमने केपीटेशन पनीशमेंट दिया तो कम से कम दवाईयों की मिलावट पर तो

रोक अवश्य लग जाएगी

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा...

मैं अब यहां पर पब्लिक डिस्ट्रीब्युशन सिस्टम के अंदर जो त्रुटियां हैं उसके बारे में बोलना चाहूंगा. हमारी महाराष्ट्र सरकार में माननीय मुख्यमंत्री जी और उप मुख्यमंत्री जी तथा अन्य मंत्रियों की एक अच्छी टीम केबिनेट के रुप में है. इसी प्रकार केंद्र सरकार की केबिनेट भी बहुत अच्छी है. हमारे विरोधी पक्ष के माननीय सदस्य चाहें जो भी कहें लेकिन महाराष्ट्र की जनता में यह विश्वास जरुर बढ़ा है कि यह सरकार काम करना चाहती है. निष्पक्ष रुप से तथा पारदर्शी ढंग से यह सरकार काम करना चाहती है तथा हमारे समाज में जो भी बुराईया हैं चाहे वह करप्शन की बुराई हो, मिलावट करने की बुराई हो या माफिया राज जैसी बुराई हो, इसके खिलाफ यह सरकार कार्रवाई जरुर करेगी. मैं कहना चाहूंगा कि ट्रांस्पोर्ट पॉलिसी बनाने के बारे में महराष्ट्र सरकार ने कोई निर्णय नहीं लिया है. सरकार ने एक जी. आर. निकाला और हाई कोर्ट ने उस पर स्टे दे दिया. मुझे कहना है कि जब हमारे ट्रक तेल लेकर निकलते हैं तो उस पर ग्लोबल पोजीशनिंग सिस्टम लगानी चाहिए. इस बारे में कोई स्पष्ट नीति सरकार ने अभी तक नहीं बनायी है. हमारी केंद्रीय सरकार के मंत्रियों ने भी माना है कि हमारे पीडीएस का जो अनाज है या तेल है उसका 70 प्रतिशत भाग बाहर ही जाता है, उसके जो सही उपभोक्ता हैं, उनको वह सामान नहीं मिलता है. इतनी गंभीर परिस्थिति में भी यदि हम कोई कड़ा कदम नहीं उठाएंगे तो वह कहां तक ठीक है. हमारे माननीय मंत्री श्री अनिल देशमुख जी ने आधुनिकीकरण का काम चालू किया है. लेकिन हमें ग्लोबल पोजीशनिंग सिस्टम लागू करना पड़ेगा. बायोमेट्रिक सिस्टम का इस्तेमाल करना पड़ेगा, स्मार्ट कार्ड का इस्तेमाल हमें करना पड़ेगा. सरकार ने एक युनिक कमीशन बनाया है. नेशनल इन्फॉर्मेशन सिस्टम की मदद लेकर कुछ काम हमें तेजी से करने चाहिए. माननीय प्रधानमंत्री जी ने कहा कि करप्शन के खिलाफ हमें जो कुछ करना है, वह ठोस रुप से करना है और जल्दी करना है. क्योंकि करप्शन के बारे में ज्यादा बर्दाशन करने की क्षमता अब लोगों में नहीं बची है. इसलिए मैं चाहता हूं कि हमारे पब्लिक डिस्ट्रीब्युशन सिस्टम को टाइम बाउंड तरीके से मजबूत बनाया जाये.

अंत में एक ही बात मैं कहूंगा कि मिलावट करने वाले लोगों को फांसी की सजा होनी चाहिए. इस संबंध में एक कानून हमारी सरकार द्वारा बनाया जाना चाहिए, इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

-0-

श्री. सय्यद पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या संदर्भात रात्रभर आणि दोन दिवस जरी चर्चा झाली तरी यातून काहीही सोल्यूशन निघणार नाही. माननीय श्री. अनिल देशमुख यांना नाव ठेवून उपयोग नाही. माननीय श्री. आर. आर. पाटील यांना नाव ठेवून उपयोग नाही. पण आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, जोपर्यंत डिझेलच्या आणि रॉकेलच्या भावामध्ये तफावत आहे तोपर्यंत देवाला जरी मंत्री केले तरी यातील भ्रष्टाचार जाणार नाही. हे कोण-कोण करतो, कसे-कसे करतो हे सगळ्यांनाच माहीत आहे. ते नव्याने सांगण्याची गरज नाही. रॉकेल गरिबांना पाहिजे म्हणून आपण त्याची किंमत कमी ठेवतो. परंतु ते गरिबांना मिळत नाही. पण गरिबांच्या नावाने टगेच मोठे होऊ लागले आहेत. त्यामुळे ' ना तुला ना मला, घाल कुत्र्याला' अशी अवस्था आहे. त्यामुळे सगळ्यात महत्वाची गोष्ट अशी आहे की, घासलेट किंवा रॉकेलमधील सबसिडीचे जे पैसे आहेत ते आपण गरिबांना डायरेक्ट द्यावेत. रॉकेलची किंमत वाढविली तर ही भेसळ कमी होईल. नाही तर ही भेसळ अजिबात कमी होण्याची शक्यता नाही. जर आपल्याला इमानदारीने काही बदल करावयाचा असेल तर ही पध्दत सुरु करावी. त्यामुळे लोक मरणार नाहीत आणि कोणी मारणार नाहीत. कोणी पैसे घेणार नाही आणि देणारही नाही. त्यामुळे ही गोष्ट जेवढ्या लवकर करता येईल तेवढ्या लवकर करावी.

सभापती महोदय, सध्या पेट्रोल पंप जास्त झाले आहेत. हजारो लिटर पेट्रोल विकले गेले. मी सुध्दा घेतले होते. त्यामुळे मला अधिकारी म्हणाले की, आपण मूर्ख आहात. आपण मिसळण्याचा आणि मिसळून घेण्याचा त्रास कशाला घेता त्यापेक्षा आम्हीच मिसळून पाठवतो असे ते म्हणाले. डेपोमध्ये जे पेट्रोल-डिझेल येते ते इकडे मिसळण्याची गरज नाही. ते विचारतात की, किती-किती मिसळून पाठवू ते सांगा. हे जर एवढे खोलात गेले असेल तर त्याबाबत हा एकच इलाज आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल....

याबाबत काही करता येते काय ते पहावे. एका बॅरलपासून ज्याला 60-60 लोड मिळतात अशा सगळ्या लोकांना मी बघितले आहे. 60 लोडवाला असे म्हणाला की, एक टँकर डेपोमधून काढून बाहेर पाठविला की, सव्वा लाख रुपये मिळतात. मी म्हणालो वाहरे गब्रू. एवढे लायसन्स कोणी दिले असे मी विचारले. त्यांचे वेगळे चॅनेल आहे.

यानंतर श्री. खंदारे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

मला यानिमित्ताने शासनाला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ही दरी काढून त्यातील नगदी पैसे गरिबांना दिले जातील काय ? दुधामध्ये सध्या जी भेसळ सुरु आहे ती कोणाकडून होत आहे ते सगळयांना माहीत आहे. त्यातील एकाला तरी शासनाने कारवाईचा दणका दिला पाहिजे. सन्माननीय गृह मंत्र्यांचे नाव, दरारा हळूहळू कमी होऊ लागले आहे, हे मी शपथपूर्वक सांगतो. कारण आपण सभागृहात केवळ बोलता, पण प्रत्यक्षात कोणालाही झटका देत नाही. कोणाला का होईना पण एक दोन लोकांना झटका दिला पाहिजे. हा झटका 1000 लोकांना देण्याची गरज नाही. पण एक दोन लोकांना झटका दिला तर सगळे सूतासारखे सरळ होतील. परंतु तशी कारवाई शासनाने करावी. या सर्व प्रकरणांबाबत अनेक वर्तमानपत्रातून बातम्या येत आहेत, नावे छापून येत आहेत, फोटो छापून येत आहेत. बाकीच्या वर्तमानपत्रातील बातम्या असत्य आहेत असे आपण समजू. परंतु 'सकाळ' या वर्तमानपत्रात छापून येणाऱ्यांची नावे अधिकृत धरुन त्यापैकी काही जणांना झटका दिला तर सगळे आपोआप सरळ होतील.

सभापती महोदय, जिल्हा पुरवठा अधिकारी ह्या जमातीकडे शासनाने जरा लक्ष दिले पाहिजे. 5 वर्षे आमदार होऊन काही उपयोग होत नाही. जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून एका ठिकाणी 3 वर्षे काम केले असेल तर त्यांना प्रमोशन मिळते. मी एकदा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्याच्या घरी गेलो होतो त्याने मला बसण्यासाठी वाकळ टाकली होती. मी त्यांना विचारल्यावर मला ते असे म्हणाले की, आपण गरीब शेतकरी आहोत. हे असेच चालू राहणार आहे. त्यावर मी त्यांना म्हणालो होतो की, असे होत नाही. त्यावर ते बघू पुढे असे मला म्हणाले. त्यानंतर आमच्याच जिल्ह्यात जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून कार्यरत होते. ते अधिकारी 9 वर्षांनी पुन्हा जिल्हा पुरवठा अधिकारी म्हणून त्याच जिल्ह्यात आल्यानंतर मला त्यांनी घरी जेवण्यासाठी बोलविले होते. त्यावेळी वाकळीऐवजी जमिनीवर गालिचा अंथरल्याचे दिसले. त्याबाबत मी त्यांना विचारले असता मला ते म्हणाले की, येथे जर लोकांप्रमाणे वागले नाही तर ही व्यवस्था जगू देत नाही. म्हणजे व्यवस्थाच सडलेली आहे. त्यासंबंधी शासनाला काही करता येत असेल तर करावे अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

2....

श्री.सय्यद पाशा पटेल.....

सभापती महोदय, आता वाळूला काळे सोने असे म्हटले जाते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे सन्माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्याविषयी बरेच काही बोलले. जर आपल्याला कोणाला मारण्याची भीती वाटत असेल तर चांगले राहून उपयोगाचे नाही. चांगल्या माणसाने चांगलेच रहावे, पण वाईटाला कोठे तरी चपराक देण्याचे शिकले पाहिजे. शासनाने अधिक करण्याची आवश्यकता नाही. प्रातिनिधीक स्वरुपात एकेका जिल्ह्यातील सरळ केले तर संपूर्ण जिल्हा दुरुस्त होईल. त्याबाबत शासनाला काही करता येत असेल तर करण्यात यावे अशी मी विनंती करतो. अन्यथा राज्यातील नद्या वाळत जातील. त्याचे गंभीर परिणाम होतील. वाळूच्या बाबतीत मी माहिती वाचल्यानंतर जपानचा भूकंप परवडला, पण नद्यातील वाळू काढणे भविष्यात परवडणार नाही. राज्याचे वाळवंट होऊन जाईल, एवढे भयानक चित्र डोळयासमोर असताना शासनाने गप्प बसणे हे मला बरोबर वाटत नाही.

सभापती महोदय, बियाण्यांमध्ये सुध्दा भेसळ होत आहे. एखाद्या शेतकऱ्याने भेसळयुक्त बियाणे जर त्याच्या शेतात पेरले तर त्यामुळे संपूर्ण वर्षभर शेत काळे राहते. त्या शेतातून त्याला काहीच उत्पादन घेता येत नाही. जर अशाप्रकारे एखाद्या शेतकऱ्याला बोगस बियाणे पुरविण्यात आले असेल आणि त्यामुळे त्याचे शेत काळे पडले असेल तर त्याच्या शेतामध्ये जेवढे उत्पादन होणार होते तेवढा दंड त्या लोकांना लावला तर पुन्हा असा गंभीर प्रकार कोणी करणार नाही. शासन कायद्याच्या बाबतीत चूका करीत आहे असे मला वाटते. त्यामुळे मी केवळ 2-3 प्रश्न यानिमित्ताने शासनाला विचारु इच्छितो. दुधामध्ये भेसळ करणाऱ्या किती लोकांना शासनाने पकडले आहे त्यापैकी किती लोकांवर कारवाई करण्यात आली आहे. शासन यासंबंधाच्या कायद्यात बदल करणार आहे का, रॉकेलबाबत मी सूचना केली आहे त्याची शासन अंमलबजावणी करणार आहे काय, वाळूची व्यवस्था लोकांच्या हातात देण्याऐवजी स्वत:च्या ताब्यात घेणार का व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे बनावट औषध खाऊन आपल्यापैकी कोणी तरी मेले तर चालेल का ? मघाशी शहरातील अनेक सन्माननीय सदस्य दुधाच्या भेसळीबाबत तावातावाने बोलत होते, ते आता दिसत नाहीत. भेसळयुक्त दूध आपल्यापैकी

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

कोणाच्या मुलांनी प्यायले आणि ते दगावले तर आपल्याला किती त्रास होईल ? आपल्या घरात असा प्रसंग येऊ नये असे वाटत असेल तर दूध भेसळ करणाऱ्यांना शिक्षा करणार काय, बनावट औषधे तयार करणाऱ्यांना कडक शिक्षा करणार काय ? मला सगळयांना विनंती करावयाची आहे की, या भेसळीबाबत नाटक करु नये, शासनाने कायद्याची अंमलबजावणी करावी. कायद्यांची अंमलबजावणी केली तरच देश सुधारणार आहे. दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, बिहार राज्याचे मुख्यमंत्री श्री.नितीशकुमार यांनी सरकारी कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी आपली मालमत्ता जाहीर करणे सक्तीचे केले आहे. तशा प्रकारचा निर्णय आपले राज्य सरकार का घेत नाही ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ 17:45

श्री. पाशा पटेल....

आपण तसे का नाही करु शकलो ? पहिल्यांदा बिहार हे वाईट राज्य म्हणून ओळखले जात होते. आता ते चांगले राज्य म्हणून ओळखले जाते. आपले राज्य हे चांगले आहे. आपल्या राज्याचा चांगुलपणा टिकविण्यासाठी काही करता येईल का ते पहावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये भेसळीच्या संदर्भात जी चर्चा या ठिकाणी उपस्थित केली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अन्न भेसळी पासून इंधन भेसळी पर्यन्तची सगळी चर्चा येथे झालेली आहे. दुधाच्या भेसळीचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, गायीला किंवा म्हशीला पान्हवण्यापासून दुधातील भेसळीला सुरुवात होते. गाय किंवा म्हैस हाताने पान्हवावी लागते. परंतु आता ती हाताने न पानवता त्यांना ऑक्स्टोजीन नावाचे इंजेक्शन दिले जाते. इंजेक्शन दिल्यानंतर लगेच ती गाय किंवा म्हैस पान्हावते. हे इंजेक्शन दिल्यामुळे त्या इंजेक्शनचा अंश दुधामध्ये उतरतो आणि त्याचे साईड इफेक्टस् शरीरावर होतात. त्यामुळे हाडे ठिसूळ होण्यापासून कॅन्सर सारखे गंभीर आजार होतात. खव्याच्या बाबतीत बोलायचे झाले तर एक किलो खवा तयार करण्यासाठी 5 लिटर दूध लागते. साधारणपणे लिटरला 40 रुपयापर्यन्त चांगले दूध मिळते. 5 लिटर दूध घेण्यासाठी 200 रुपये लागतात. तसेच खवा करण्यासाठी मजूर लागतो. त्याच्या मजुरीचा खर्च असतो. ह्या गोष्टी लक्षात घेतल्या आणि मिठाईचा भाव लक्षात घेतला तर ब-याच गोष्टी आपल्या लक्षात येतात. एक किलो मिठाई 200 रुपयापासून मिळते. जर चांगला दर्जेदार खवा 200 रुपयाला विकला जात असेल तर मिठाई 200 रुपयाला कशी काय विकली जाते याची देखील चौकशी अन्न व नागरी पुरवठा विभागाने करुन होणा-या भेसळीला प्रतिबंध केला पाहिजे, भेसळ करणा-यांवर कठोर कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, इंधन भेसळीच्या संदर्भात सर्व संबंधितावर कारवाई झाली पाहिजे असे बोलले जाते. परंतु इंधन डेपोतील अधिका-यांच्या बाबतीत मात्र कुठे बोलले जात नाही की चर्चा होत नाही. मी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी 2004 सालामध्ये काढलेल्या जी.आर.ची पुनर्तपासणी करावी. अन्न व नागरी पुरवठा विभागाने 2004 साली काढलेल्या जी.आर.मध्ये सर्व ठिकाणी कारवाई करण्याचे अधिकार पोलीस उप अधीक्षक दर्जाच्या अधिका-याला दिलेले आहेत. पोलीस उप अधीक्षक दर्जाचा अधिकारी कोठे कोठे तपासणी करण्यासाठी जाईल आणि कारवाई करील हा देखील प्रश्न आहे. अशा प्रकारचा जी.आर. का काढावासा वाटला याचा देखील शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी

.3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंतराव जाधव...

रॉकेलच्या संदर्भात सबसिडी दिली पाहिजे असे सांगितले. सबसिडी देण्याच्या बाबतीत शासनाने नुकताच निर्णय घेतलेला असून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. दुसरे असे की, अन्न व नागरी पुरवठा विभागाने संगणकीकरणाचा विषय तातडीने हाती घेतला तर संपूर्ण गाव आणि तालुका पातळीपर्यन्त रॉकेलचा पुरवठा व्यवस्थित होईल आणि वितरण प्रणालीमध्ये पारदर्शकता येईल. त्याचा परिणाम काळाबाजार रोखण्यामध्ये होईल. बिहार आणि मध्यप्रदेश राज्यामध्ये बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब केला गेला आहे. या पध्दतीमुळे ख-या अर्थाने लाभार्थीला लाभ होत असेल तर त्याही पध्दतीचा अवलंब आपण केला पाहिजे. या बायोमेट्रिक पध्दतीसंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असून तो शासनाने मंजूर केला तर मला आनंदच होईल.

सभापती महोदय, मला ब-याच गोष्टी सांगावयाच्या आहेत. रॉकेलचा जो काळाबाजार होतो त्यामध्ये आपल्या राज्याचा क्रमांक वरचा आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.........

मला प्राप्त झालेल्या माहितीनुसार धुळे जिल्हाधिकाऱ्यांनी केरोसीनचा पुरवठा कमी करावा अशी शासनाकडे मागणी केली असताना ती मागणी अद्याप का अंमलात आणली जात नाही? शासन आज या वस्तूंचा काळाबाजार रोखू पहात असताना त्यावर चर्चा करण्यापेक्षा ठोस उपाययोजनांकडे लक्ष दिले तर अधिक परिणामकारक होईल असे मला वाटते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावावर माझे मुद्दे मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, काही मिनिटांपूर्वी आपल्यापैकी बहुतेकांना मोबाईलवर एसएमएसद्वारे माहिती कळली की, माजी केंद्रीय दूरसंचार मंत्री श्री.ए.राजा यांच्या सहकाऱ्यांनी आत्महत्या केली. यशवंत सोनावणे जळीत घटनेमध्ये देखील यशवंत सोनावणे मृत झाल्यानंतर जो आरोपी होता त्याचाही मृत्यू झाला. अशा वेळेला दोन्ही माणसे हयात नसताना एकमेकांवर ज्यावेळी आरोप होतात त्याबाबतचा हा प्रश्न आहे. कशासाठी सोनावणे तिकडे गेले होते? मला याचे दुर्दैव वाटते की, शासकीय वाहनचालक त्याठिकाणी उपस्थित नव्हते. त्यांना मारहाण केल्यामुळे तेथून पळून जावे लागले. त्यानंतर सोनावणे यांच्यावर हल्ला झाला. सोनावणे तेथेच मृत झाले. पोपट शिंदे यांचा मृत्यूपूर्व जबाब घेण्यासंदर्भात सरकारने काय प्रयत्न केले हे स्पष्ट झाले तर अधिक चांगले होईल. पोपट शिंदे यांची तडीपारी रद्द करण्याच्या संदर्भात शासनाने खुलासा केला पाहिजे. गृह सचिव श्रीमती चंद्रा अय्यंगार यांना मी माझी वैयक्तिक मैत्रीण मानते. परंतु प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. पोपट शिंदे यांची तडीपारी रद्द का झाली? शरमेने मान खाली जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तडीपारी रद्द झाली नसती तर सोनावणे यांच्यावर हल्ला झाला नसता. सोनावणे तेथे कशासाठी गेले याची शहानिशा पुढील काळात होणार आहे. परंतु एखादी व्यक्ती मृत झाल्यानंतर आपण निवाडा करणार असू तर प्रशासनाला चुकीच्या मार्गावर नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. म्हणून सोनावणे जळीत घटनेच्या संदर्भात आमची अपेक्षा आहे की, मृत्यूपूर्व जबाब नोंदविण्यापूर्वी जे परिस्थितीजन्य पुरावे समोर आले आहेत त्यानुसार घटनेला कोण जबाबदार आहे हे शासनाने जाहीर केले पाहिजे. माननीय गृहमंत्र्यांनी जाहीर केले की, सीबीआय चौकशी करण्याची शासनाची तयारी आहे. शासनाची तयारी कशासाठी आहे हा प्रश्न येथे उपस्थित होत नाही. जे सामान्य अधिकारी आज प्रशासनामध्ये काम करीत आहेत, चांगले काम करीत आहेत त्यांच्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे की, उद्या सोनावणे यांच्याप्रमाणे त्यांच्यावर कशावरुन हल्ला होणार नाही? ज्या अधिकाऱ्यांचे नितीधैर्य खच्ची झाले आहे ते कशा रितीने वाढविता येईल हा महत्वाचा भाग आहे.

..3..

डॉ.नीलम गोऱ्हे........

सभापती महोदय, नगर जिल्हयातील दूध भेसळीचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. महाराष्ट्र टाईम्सच्या दिनांक 10 जानेवारी, 2011 च्या दैनिकांमध्ये अपर पोलीस अधीक्षक श्री.सुनील कडासने यांनी 36 आरोपी पकडले. भेसळीचे दूध कसे तयार होते याचे प्रात्यक्षिक केले. अपर पोलीस अधीक्षकांकडून हे प्रकरण काढून घेण्यात आले. प्रोबेशनरी ऑफिसर श्रीमती ज्योती प्रिया सिंग यांच्याकडून या प्रकरणाची फाईल 33 दिवसानंतर परत आली. नगर जिल्हयातील दूध भेसळीच्या संदर्भातील 84 पैकी 48 आरोपी आज मोकळे आहेत. केमिकल पुरविणाऱ्या आरोपींबाबत काय कारवाई केली जाणार आहे?

नवी मुंबई, ठाणे येथे मोबाईल टेलिफोन व मोटार पार्टचे ग्रे मार्केट चालविले जाते. मॅकपॅडपासून प्रत्येक गोष्ट सहजासहजी उपलब्ध होते. ही संघटित स्वरुपाची गुन्हेगारी आहे. आटा, हळद, मसाला, सोफ्रामायसीन, शाम्पू आदी वस्तूंच्या निर्मितीमध्ये सर्रास भेसळ केली जाते. महाराष्ट्रात असे भेसळ करणारे मोठमोठे कारखाने आहेत. उल्हासनगरपासून अनेक ठिकाणी असे कारखाने आहेत. बिस्किट कंपनीकडून तयार केले जाणारे बिस्किट आणि भेसळीद्वारे तयार झालेले बिस्किट यामध्ये खूप फरक असतो. पार्लेपासून मारी बिस्किटापर्यंत भेसळ केली जाते. असा भेसळ केलेला माल दुकानांमध्ये ठेवलेला असतो.

नंतर 3एल.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे..........

बऱ्याच ठिकाणी मला माहिती मिळाली की, अगदी चपात्या सुकवून त्याची पावडर तयार केली जाते व त्याचा उपयोग करुन बिस्किटे तयार करणारे कारखाने अनेक ठिकाणी आहेत. ही नकली बिस्किटे छोट्या गावांमध्ये तसेच ग्रामीण भागात डुप्लिकेट नावे देऊन विकली जातात. हा प्रश्न केवळ दुधाच्या भेसळीपुरताच मर्यादित नाही तर खव्याच्या संदर्भात सुध्दा निर्माण झालेला आहे. खव्यामध्ये भेसळ करणाऱ्यांवर दिवाळीच्या अगोदर धाडी सुरु झाल्या. अशा भेसळीमुळे सामान्य व मध्यमवर्गीय माणसामध्ये भीती निर्माण झाली की अशा भेसळयुक्त खव्यापासून तयार होणारी मिठाई किंवा खवाच विकत घ्यायला नको. पण त्याऐवजी चॉकलेट आणि सुका मेवा यांचे मार्केट तेजीत आले होते. परप्रांतातून येणारा भेसळयुक्त खवा पकडला गेला ते योग्य आहे परंतु आपल्या राज्यातील खवा उत्पादकांचे त्यामुळे कंबरडे मोडले व कोट्यवधीचे नुकसान झाले. त्यानंतर अनेक ठिकाणी चॉकेलेटच्या जाहिराती झाल्या. तेव्हा असा प्रश्न निर्माण झाला की खव्याला रिप्लेसमेंट म्हणून ही चॉकलेटची जाहिरात दिली की काय, व त्यासाठी एखादी लॉबी काम करते की काय अशीही शंका येऊ लागली. अशा प्रकारची भेसळ पकडून देणाऱ्यासाठी एखादे षडयंत्र आहे की काय अथवा एखादी कॉर्पोरेट लॉबी यामागे आहे काय असाही प्रश्न निर्माण झाला, याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. आपण इंग्रजी वर्तमानपत्र पाहिले तर दिसून येईल की, एखाद्या औषधाचा फायदा आणि साईड इफेक्ट दाखविणारी जाहिरात असते त्याचप्रमाणे भेसळ पकडत असताना अशा भेसळ करणाऱ्या संघटित गुन्हेगारांच्या विरोधातही कठोर पावले उचलली पाहिजेत.

माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख हे नेहमी सरकारने कोणती पावले उचलली हे सभागृहात सांगत असतात. वैयक्तिक टीका न करता मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, माननीय श्री. देशमुख साहेब काही महिन्यापूर्वी सांगली जिल्ह्यात गेले होते. या निमित्ताने मी त्यांना असे सांगू इच्छितो की, अशा कार्यक्रमांना आपण जाता तेव्हा तेथील जेवणाचा कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांचे रेकॉर्ड तपासून पहावे. कारण बऱ्याच जिल्ह्यांमध्ये ज्या लोकांवर अशा केसेस असतात असेच लोक प्रथम स्वागतासाठी हजर असतात. अशा वेळेस पोलिसांनाही मान खाली घालायला लागेल अशा पध्दतीचे लोक असतील तर त्यांच्याविरुध्द कारवाई कशी होईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )

डॉ. नीलम गोऱ्हे.........

याकडे लक्ष दिले पाहिजे. अर्थात ते लोक कोणत्या पक्षाचे आहेत हा प्रश्न नाही. अशा प्रकारे लोकहिताला हानीकारक होईल असे कृत्य अधिकाराच्या पदावर असलेल्यांकडून घडणे यामध्ये कोणाचे षडयंत्र असेल किंवा काही असेल त्याकडेही लक्ष दिले पाहिजे. यासंदर्भात एकदा वृत्तपत्रांनी आवाज उठविला आणि सभागृहात सुध्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की पोलिसांनी धाडी टाकाव्या की कसे अशा प्रकारे सत्तासंघर्ष होण्याची वेळ बऱ्याच वेळा आली आहे. प्रश्न असा आहे की, डोके दुखत असेल तर ते क्रोसीनने थांबले काय किंवा पॅरॉसिटॅमलने थांबले याला महत्व नाही की यामध्ये अजून काही फॅक्टर्स आहेत हा महत्वाचा प्रश्न आहे. अशा प्रकारे या भेसळ माफियांना रोखण्यासाठी संघटित पध्दतीने शासनाची राजकीय इच्छाशक्ती उभी राहिली पाहिजे, एवढेच सांगते आणि माझे भाषण पूर्ण करते.

---------

.....3....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सभागृहात नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव आणला त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या मौलिक सूचना केल्या, त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

अन्न व औषध प्रशासनाच्या संदर्भात काही मुद्दे येथे मांडण्यात आले तसेच वेगवेगळ्या पदार्थांमधील भेसळीच्या संदर्भात विस्तृतपणे चर्चा झालेली आहे. त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, सन 1955 मध्ये शासनाने जो निर्णय घेतला त्यानुसार दुधात एसएलएफ चे प्रमाण आणि फॅटचे प्रमाण किती असावे याचे गणक ठरवून देण्यात आले होते. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मालाफाईड भेसळ आणि बोनाफाईड भेसळ असे वर्गीकरण करण्याचाही प्रयत्न येथे केला. शासनाने ठरवून दिलेल्या निकषांप्रमाणे दुधात एसएलएफचे प्रमाण 8.5 आणि फॅटचे प्रमाण 3.5 असावे, असे त्या कायद्यात आहे. त्यानंतर ग्रेडिंगमध्ये बदल झाला आणि फॅटच्या संदर्भात सुध्दा घट झाल्याचे दिसून येते. मधल्या काळात शासनाने एक बैठक घेऊन दुधातील फॅटच्या प्रमाणाबद्दल काय करावे याबद्दल एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील ....

मला वाटते ब-याच अंशी कायदेशीर रित्या हा प्रश्न सुटू शकेल. नगर जिल्यातील दूध भेसळीला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न अन्न व औषधी प्रशासनाने चांगल्या प्रकारे केलेला आहे. या ठिकाणी भेसळ होतांना कारवाई करुन संबंधितांवर गुन्हे देखील दाखल करण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, औषधी खात्याच्या वतीने ज्या ज्या ठिकाणी परवाना नसतांना औषधे विकली जात होती किंवा बेकायदा औषधी विक्री होत होती त्यासंदर्भात कारवाई करण्यात आलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, आपल्याकडे नवीन अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा येतो आहे. केंद्र शासनाने हा ॲक्ट आणलेला आहे. मनुष्यवधाची तरतूद या ॲक्टमध्ये करण्यात आलेली आहे. या ॲक्टच्या संदर्भात केंद्र शासनाने राज्याला सूचना करण्याची विनंती केलेली आहे. हा कायदा आम्हाला मान्य आहे असे केंद्र शासनाला राज्य शासनाच्या वतीने कळविण्यात आलेले आहे. लवकरच हा ॲक्ट देशभरात लागू होणार असून या कायद्याच्या माध्यमातून जबर शिक्षेची तरतूद करण्यात आलेली असल्यामुळे भेसळ रोखण्याच्या कामी ब-याच अंशी शासनाला मदत होणार आहे. आपल्या कायद्यामध्ये आपल्याला जे अधिकार आहेत त्या अधिकाराच्या माध्यमातून आपण कारवाई करीतच आहोत. परंतु भविष्य काळात या कायद्याच्या वतीने मनुष्यवध किंवा जन्मठेपेची शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी गुटख्याच्या संदर्भात विषय उपस्थित केला होता. गुटख्याला बंदी करणारा पुरोगामी निर्णय महाराष्ट्र राज्यानेच घेतला होता. परंतु या निर्णयाला सुप्रीम कोर्टात स्टे देण्यात आला होता.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी "मनुष्यवध" हा जो शब्द वापरलेला आहे त्या शब्दाऐवजी फाशी शब्द वापरला तर तो अधिक चांगला होईल असे मला वाटते.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या कायद्यातील शब्दाचाच मी उच्चार केलेला आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदय, गुटख्याच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा हवाला देत आहेत. सुप्रीम कोर्टाने गुटखा बंदीला स्टे दिलेला असला तरी त्यांनी मॅग्नेशियम कार्बोनेट गुटख्यात मिक्स करु नका असे आदेश दिलेले आहेत. गुटख्याचे नमुने तपासण्यात आले असून 115 नमुन्यापैकी 113 गुटख्यामध्ये मॅग्नेशियम कार्बोनेट आढळून आलेले आहेत. आता गुटख्याच्या संदर्भात राज्य शासनाने धाडी टाकण्याचे काम सुध्दा बंद केलेले आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशा प्रमाणे गुटख्यात मॅग्नेशियम कार्बोनेट आढळले तर तो गुटखा बंद केला पाहिजे.

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गुटख्यामध्ये मॅग्नशियम कार्बोनेट हा पदार्थ आढळून आलेला आहे. इतर पदार्थात काही प्रमाणात मॅग्नशियम कार्बोनेट टाकण्याची परवानगी आहे परंतु ज्या गुटख्यामध्ये मॅग्नशियम कार्बोनेट आढळून आलेले आहे त्यांच्यावर आपण कायदेशीर कारवाई केलेली आहे. केंद्राच्या टोबॅको ॲक्टच्या माध्यमातून राज्यभर मोहीम उघडली असून, शाळेच्या परिसरातील 100 मीटरमध्ये गुटखा विक्रीवर बंदी आणलेली आहे व त्याला चांगला प्रतिसाद देखील मिळालेला आहे. अनेक ठिकाणी कारवाई करुन गुटखा विक्री बंद करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, दुधाच्या संदर्भात एनजीओंची बैठक घेतली असून दुधातील भेसळ रोखण्यासाठी दूध संस्थांना टॅम्पर प्रुफ पिशव्या देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. पुढील 8-10 दिवसात ज्या दूध उत्पादक संस्था आहेत त्यांना एकत्रित बोलावून टॅम्पर प्रुफ पिशव्या सर्वच दूध संस्थांनी वापरात आणाव्यात याबद्दलच्या सूचना दिल्या जाणार आहेत. त्याच बरोबर अन्न व औषधी प्रशासनाच्या वतीने कायमस्वरुपी हेल्पलाईन सुरु करण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला असून कोठे जर गैर प्रकार होत असेल व त्यासंदर्भातील माहिती आम्हाला हेल्पलाईन वरुन मिळाली तर संबंधितावर कारवाई करणे सोपे जाणार आहे.

सभापती महोदय, प्रयोगशाळा सक्षम करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जाणार आहे. दुधाच्या किंवा गुटख्याच्या संदर्भात जी भेसळ होते त्याबाबत शासनाची सकारात्मक भूमिका असणार आहे. या गुन्हयात गुंतलेली व्यक्ती कितीही मोठी असली तरी तिच्या विरुध्द कारवाई करण्यास शासन कमी पडणार नाही एवढे मी या प्रसंगी ग्वाही देतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----

यानंतर श्री. गायकवाड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख ( अन्न व नागरी पुरवठा मंत्री ): सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्यावरील चर्चेत भाग घेत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त केली व चांगल्या सूचना केल्या आहेत त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की दूध, पेट्रोल , रॉकेल ,औषधे यामध्ये भेसळ होत असून ती समाजाला लागलेली कीड आहे. या पार्श्वभूमीवर मध्यंतरी कै. यशवंत सोनावणे यांची जाळून हत्या करण्यात आली, ती अत्यंत दुर्दैवी घटना होती.त्याचे कोणीही समर्थन करणार नाही परंतु भेसळ थांबविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता आहे.या प्रस्तावावर बोलत असतांना सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी फर्नेस ऑईलच्या जी.आर संबंधी उल्लेख केला होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, फर्नेस ऑईल सबंधीचा जी.आर. केन्द्र सरकारने काढला असून केन्द्र सरकारच्या गॅझेटमधून देशातील सर्व राज्यांना असे कळविले होते की फर्नेस ऑईल शेडयुल वन मधून वगळण्यात यावे.त्यानुसार बहुतेक सर्व राज्य सरकारांनी तशा प्रकाराचे आदेश काढले होते. त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारने देखील तशा प्रकारचे आदेश काढले होते .सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की गुजराथमध्ये आपल्या पक्षाचे सरकार आहे तेव्हा तेथील मुख्यमंत्र्यांकडून किंवा कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून जर आपण माहिती घेतली असती तर आपल्याला अधिकची माहिती मिळू शकली असती. महाराष्ट्र सरकारने जर आदेश काढले तर त्याबाबतीत आपण येथे आरोप करीत असतांना कर्नाटक व गुजराथ राज्याच्या मुख्यमंत्र्याना आपण विचारावयास पाहिजे होते की हे आदेश आपण कसे काय काढले होते ?

श्री.विनोद तावडे : मी सगळी माहिती देण्यास तयार आहे आपण त्याची सीआयडी मार्फत चौकशी करणार आहात काय ?

श्री.अनिल देशमुख :महाराष्ट्र राज्याने आदेश काढले आहेत परंतु गुजराथ आणि कर्नाटक राज्याने सुध्दा आदेश काढले आहेत ,त्याची प्रत मी आपल्याला देतो आपण त्या बाबतीत त्यांच्याकडे विचारणा करावी. निष्कारण राजकीय आरोप करणे बरोबर नाही. आरोप करीत असतांना त्यांनी संपूर्ण माहिती घेतली पाहिजे. या बाबतीत केन्द्र सरकारने गॅझेट प्रसिध्द केले होते. हे गॅझेट कधी प्रसिध्द झाले होते, त्यांनी कधी आदेश काढले होते आणि केन्द्र सरकारच्या आदेशाप्रमाणे कोण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख ....

कोणत्या राज्य सरकारांनी आदेश काढले होते याची माहिती घ्यावी एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यात स्वस्त धान्य आणि रॉकेलचे जवळजवळ 1 लाख 10 हजार दुकाने आहेत या दुकानातून धान्याचे तसेच रॉकेलचे वाटप करण्यात येते. केन्द्र सरकारकडून राज्य सरकारला जे काही रॉकेल मिळत असते ते रॉकेल राज्य सरकारच्या माध्यमातून पुरवले जाते परंतु शेवटच्या लाभधारकापर्यत यातील किती रॉकेल जाते हा अभ्यासाचा मुद्दा आहे. काही ठिकाणी रॉकेलचा काळाबाजार केला जातो काही ठिकाणी भेसळीसाठी त्याचा वापर केला जातो ही वस्तुस्थिती आहे. नवीन तंत्रज्ञान वापरुन त्यावर कशा प्रकारे नियंत्रण आणता येईल या दृष्टीने शासन कार्यवाही करीत आहे..रॉकेलचा टँकर रॉकेलच्या डेपोतून निघाल्यानंतर त्यावर ग्लोबल पोझि ाशनिंग सिस्टीम म्हणजेच जीपीएस लावण्यात येणार आहे .त्या माध्यमातून रॉकेलचा टँकर डेपोमधून निघाल्यानंतर विशिष्ट तालुक्यामध्ये वा विशिष्ट गावामध्ये तो जातो किंवा नाही याचे ट्रॅकींग केले जाणार असून राज्यामध्ये जवळजवळ 1107 रॉकेलचे टँकर असून त्यापैकी 1018 टॅकरवर जीपीएस लावण्यात आले आहेत.बाकीच्या टॅकरवर लवकरात लवकर जीपीएस बसवून त्याचे जिओ फेन्सिग करुन तसेच त्याचे सॅटेलाईट झोनिंग करुन चांगल्य ाप्रकारे यावर कन्ट्रोल ठेवण्याचा राज्य सरकार प्रयत्न करणार आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख....

यशवंत सोनवणेची घटना घडल्यानंतर राज्याच्या मंत्रिमंडळाची पहिली बैठक झाली त्यावेळी मी स्वत: त्याठिकाणी विषय मांडला की, केंद्र सरकारतर्फे प्रति लिटर 29 रुपये 26 पैसे प्रत्येक राज्याला सबसिडी मिळते. राज्यासाठी केरोसीनचा जो एकंदर वर्षभराचा कोटा मिळतो त्यावर केंद्र सरकारकडून 4600 कोटींची सबसिडी मिळते. ही सबसिडी बीपीएलचे जे लाभधारक आहेत त्यांच्या खात्यामध्ये जमा करणे हा एकमेव उपाय आहे. जेणेकरुन केरोसीनच्या वाटपावर नियंत्रण आणणे, व्हाईट केरोसीन पुरविणे अशाप्रकारे उपाय योजना केली तर केरोसीनच्या काळ्या बाजारावर चांगल्या पध्दतीने नियंत्रण आणता येईल. त्यासंबंधी राज्य सरकारकडून केंद्र सरकारला सूचना करण्यात आली आहे. आनंदाची गोष्ट अशी की, केंद्रीय वित्त मंत्र्यांनी आपल्या बजेटच्या भाषणामध्ये त्यासंबंधी सूतोवाच केले आहे. नंदन निलकेणी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून प्रत्येक राज्यामध्ये केरोसीन वाटपाची अंमलबजावणी कशापध्दतीने करता येईल यासंबंधी या समितीने अभ्यास करुन तीन महिन्यात अहवाल द्यावयाचा आहे, अशा प्रकारची सूचना त्या समितीला देण्यात आली आहे. अशा रितीने संपूर्ण राज्यामध्ये केरोसीनच्या वितरणावर 100 टक्के चांगल्या प्रकारे नियंत्रण आणता येईल. यामध्ये कोणताही पक्षीय भेदभाव असण्याचे कारण नाही. मला सर्वच पक्षांचे लोक प्रतिनिधी भेटण्यास येतात. सांगली, सातारा येथे अनेक लोक मला भेटण्यास आले, त्यांनी मला हार घातले. परंतु मला आपणास सांगावयाचे आहे की, आपण यामध्ये पक्षीय भेदभाव करु नका. मला कोणत्या पक्षांचे आमदार भेटायला येतात याची यादी माझ्याजवळ आहे. तसेच, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि इतर अनेक पक्षांच्या आमदारांनी दिलेली पत्रे माझ्याजवळ आहेत त्यांची नावे मी सांगणार नाही.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये आपण प्रती व्यक्ती 2 लिटर केरोसीन देतो आणि शहरी भागामध्ये प्रति व्यक्ती 5 लिटर केरोसीन देतो. तेव्हा दोन्ही ठिकाणी केरोसीनचे समान वाटप कशा पध्दतीने करता येईल याबाबत आपण लवकरात लवकर निर्णय घेत आहोत. त्याचप्रमाणे केरोसीनच्या टँकरना लेव्हल सेन्सर कसे लावता येईल, त्यामधील केरोसीनचे मेजरमेंट आपल्याला कसे घेता येईल तसेच आपल्याला लोड सेन्सर कसे लावता येईल, यापुढे महाराष्ट्रामध्ये एकाच रंगाच्या केरोसीनच्या टँकरमधून केरोसीनेच वाटप कसे करता येईल अशाप्रकारच्या उपाय योजना आपण करीत आहोत. सभापती महोदय, अन्न व नागरी पुरवठा खात्याचा मंत्री म्हणून मी महसूल खात्याच्या माझ्या सहकारी मंत्री महोदयांबरोबर याबाबत सविस्तर

DGS/ KTG/ KGS/

श्री. अनिल देशमुख...

चर्चा केली आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे 5 हजार कर्मचारी आहेत. त्यापैकी 235 कर्मचारी आमच्या खात्याचे काम पहात आहेत, बाकीचे सर्व कर्मचारी हे महसूल विभागाच्या अखत्यारीत आहेत. त्यामुळे हा कर्मचारी वर्ग आपल्याला एकत्रितपणे कसा वापरता येईल याबाबत एकत्र बसून लवकरात लवकर निर्णय घेणार आहोत. जेणेकरुन या संपूर्ण यंत्रणेवर त्यांचे नियंत्रण राहील. आज आमच्याकडे 100 टक्के कर्मचारी नसल्यामुळे आम्ही फक्त 235 अधिकाऱ्यांच्या बदल्या व त्यांच्यावर कारवाई करु शकतो. त्यामुळे लवकरात लवकर याबाबत तोडगा काढू. जेणेकरुन अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मंत्र्यांकडे काही अधिकार येतील आणि माझ्या खात्याच्या माध्यमातून काही कडक कारवाई करता येईल. आम्ही दरवर्षी मोठया प्रमाणात धाडी टाकून तपासणी करण्याचे काम करीत असतो. माझ्याकडे सन 2009-10 ची आकडेवारी आहे. इतकेच नव्हेतर सन 2011 ची जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च महिन्यापर्यंतची आकडेवारी आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . . .

त्यामुळे तपासणी करण्याचे, धाडी टाकण्याचे प्रमाण देखील जास्त आहे आणि आम्ही याबाबतीत कठोर कारवाई देखील केलेली आहे. 2010 मध्ये जवळजवळ 4614 ठिकाणी धाडी टाकलेल्या आहेत आणि त्यामध्ये एकंदर 28 लोकांना अटक केलेली असून जवळजवळ 80 कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : दुकाने किती जप्त करण्यात आली ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, त्याचबरोबर याठिकाणी स्वस्त धान्य दुकानांच्या बाबतीत विषय उपस्थित करण्यात आला. ही गोष्ट खरी आहे की, गहू असो, तांदूळ असो हे सुध्दा शेवटच्या माणसापर्यंत व्यवस्थितपणे पोहोचले पाहिजे. पण त्यामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात काळा बाजार होतो ही वस्तुस्थिती आहे. या विभागाचा मंत्री म्हणून मी विधान परिषदेमध्ये सांगत आहे की, धान्य शेवटच्या माणसापर्यंत पोहोचू शकत नाही. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून जिल्ह्यापर्यंत व्यवस्थित धान्य पुरवठा होतो, जिल्ह्यामधून तालुक्यापर्यंत जाते पण तालुक्यामधून शेवटी गावांमध्ये किती टक्के जाते हा सुध्दा अभ्यासाचा प्रश्न आहे.त्यामुळे आम्ही एक नवीन योजना आणलेली असून, त्यानुसार एकाच वेळी तीन महिन्याचे धान्य गावामध्ये न्यावयाचे आणि चावडीवरुन बी.पी.एल.च्या लाभार्थ्यांना वाटप करावयाचे जेणेकरुन त्याच्या हक्काचे तीन महिन्याचे धान्य त्याला खात्रीपूर्वक 100 टक्के मिळू शकेल. अशा प्रकारची आम्ही योजना सुरु केलेली आहे आणि त्याला अनेक जिल्ह्यातून अतिशय चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळत आहे. तसेच मोठया प्रमाणात अनेक गावातील जे लाभार्थी आहेत ते पुढाकार घेऊन तीन महिन्याच्या धान्य वाटपाची योजना आमच्या गावामध्ये लवकरात लवकर लागू करावी अशी मागणी करीत आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये तीन महिन्याचे धान्य एकाच वेळी देण्याच्या योजनेची पुढच्या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये आम्ही अंमलबजावणी करु. ज्याच्या माध्यमातून लाभार्थ्यांना 100 टक्के धान्य मिळू शकेल, ही एक चांगल्या प्रकारची योजना आहे. तसेच एखाद्या गावामध्ये किंवा तालुक्यामध्ये आजच्या तारखेला 100 क्वि.गहू, 50 क्वि.तांदूळ, 10 क्वि.साखर वाटप करण्यासाठी पाठविण्यात येत असेल तर त्याबाबत एस.एम.एस.च्या व्दारे गावातील लोकांना माहिती देण्याची सोय करण्यात आलेली आहे. एकदा अशा प्रकारचा एस.एम.एस.गावामध्ये गेल्यानंतर त्याची लोकांमध्ये चर्चा होते. अनेक वेळा संपूर्ण धान्य गावामध्ये वितरणासाठी आल्यानंतर त्याचे वाटप व्यवस्थितपणे होते की नाही याकडे देखील लोक लक्ष ठेवतात. त्यामुळे या योजनेच्या बाबतीत लोकांकडून देखील अतिशय चांगल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल देशमुख . . ..

प्रकारे सहकार्य मिळत आहे. यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला संपूर्ण सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने आणि कॉम्प्युटरायझेशन हे संपूर्णपणे बायोमेट्रीक पध्दतीने करण्याच्या दृष्टीने देखील आम्ही कार्यवाही सुरु केलेली आहे. आम्ही याची सांगड यु.आय.डी.च्या माध्यमातून घातलेली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये यु.आय.डी.च्या बाबतीत काम सुरु झालेले आहे आणि यामध्ये संबंधितांच्या दोन्ही हातांचे ठसे घेतले जातील, त्याच्या चेहेऱ्याचा, डोळयाचा फोटो घेतला जाईल आणि त्याचबरोबर प्रत्येक कुटुंबाची संपूर्ण माहिती घेतली जाईल. अशा प्रकारे पुढच्या एक वर्षाच्या काळामध्ये याचे कॉम्प्युटरायझेशन करुन संपूर्ण बायोमेट्रीक पध्दतीने संबंधितांना स्मार्ट कार्ड देणार देणार आहोत. सध्या ज्याच्याकडे स्वस्त धान्य दुकानांच्या शिधापत्रिका आहेत त्या रद्द करुन पुढच्या एक वर्षाच्या काळामध्ये कॉम्प्युटराईज् स्मार्ट कार्ड देणार आहोत. त्या माध्यमातून आपल्याला सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर चांगल्या प्रकारे नियंत्रण ठेवता येईल.

सभापती महोदय, त्याच बरोबर याठिकाणी पोलीस विभागाच्या बाबतीत व अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या बाबतीत काही जी.आर.च्या बाबत उल्लेख करण्यात आला. मी एवढेच सांगतो की, मधल्या काळामध्ये काही कन्फ्युजन होते. 2004 मध्ये असा एक जी.आर.निघाला होता. परंतु आम्ही 2005 मध्ये त्याला रिस्टोअर केले. त्यामुळे याबाबतीत मधल्या काळामध्ये जे काही कन्फ्युजन होते ते दूर झालेले आहे आणि जेव्हा आम्हाला दोन्ही विभागांच्या माध्यमातून एखाद्या ठिकाणी कारवाई करावयाची असते, तेव्हा पोलीस विभागाचे अधिकारी, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी आणि महसूल विभागाचे अधिकारी एकत्र येऊन धाडी टाकण्याचे, तपासणी करण्याचे काम करतात. त्यामुळे आम्ही यानिमित्ताने अनेक प्रकारच्या सुधारणा करीत आहोत. सर्वात मोठी सुधारणा म्हणजे केंद्र शासनाने केरोसीनच्या बाबतीत परवानगी दिली तर केरोसीनच्या बाबतीत जे काही गैरप्रकार होतात त्याबाबत आपल्याला अतिशय चांगल्या प्रकारे आळा घालता येईल. अशा प्रकारे सर्व लाभार्थ्यांपर्यंत या गोष्टी चांगल्या प्रकारे पोहोचण्यासाठी आमचा विभाग अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहे. या ठिकाणी झालेल्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केलेल्या आहेत, त्याची सुध्दा या निमित्ताने दखल घेण्यात येईल. आजच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो आणि माझे दोन शब्द

संपवितो.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, आतापर्यंत रॉकेलचे वितरण करणाऱ्या किती लायसन्स धारकांवर कारवाई झालेली आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, आतापर्यंत रॉकेलचे वितरण करणाऱ्या लायसन्स धारकांवर केलेल्या कारवाई बाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

----

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ( महसूल व खार जमीन मंत्री ) :सभापती महोदय, नियम 260 अन्वये सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी चर्चा या ठिकाणी उपस्थित केली त्या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन अत्यंत चांगल्या प्रकारे चर्चा घडवून आणली आणि या निमित्ताने काही सूचना सुध्दा केलेल्या आहेत.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये महसूल विभागाकडे असणारा वाळू हा विषय आहे आणि त्यावर या प्रस्तावाच्या निमित्ताने चर्चा झालेली आहे. महसूल विभागामध्ये असलेल्या विषयामध्ये गौण खनिज हा एक विषय आहे. त्यावर शासनाला रॉयल्टी मिळत असते. आज वाळू हा विषय संपूर्ण महाराष्ट्रात गाजत आहे हे मी नाकारित नाही. आज अनेक महत्वाच्या प्रश्नामध्ये वाळूचा समावेश निश्चितपणे आहे. गेल्या एका वर्षात वाळूच्या संदर्भात काही बदल झाले, त्यावर चर्चा झाल्या, त्याबाबतीत मी सभागृहाला सहज अवगत करु इच्छितो कारण त्यामुळे आजच्या चर्चेमध्ये सभागृहात काही मुद्दे उपस्थित झालेले आहेत. वाळूच्या लिलावाच्या धोरणाला मागच्या वर्षी न्यायालयाने दिनांक 23/09/2010 रोजी स्थगिती दिली. लिलाव प्रक्रिया सुरु होण्याच्या कालखंडातच ही स्थगिती देण्यात आली. त्यामुळे याबाबतीत काही धोरण निश्चित करावे अशा प्रकारच्या सूचना न्यायालयाने राज्य शासनाला दिलेल्या होत्या. या बाबतीत राज्य शासनाने मंत्रिमंडळाची उप समिती गठीत केली होती. त्या उप समितीपुढे तो विषय गेला, त्यावर या समितीमध्ये चर्चा झाली. या समितीचे अध्यक्ष तत्कालीन महसूल मंत्री हे होते. त्यानंतर मंत्रिमंडळापुढे तो प्रस्ताव ठेवण्यात आला. मंत्रिमंडळाने मान्य केलेला प्रस्ताव पुन्हा न्यायालयापुढे गेला. त्यानंतर न्यायालयाने काही सूचना केल्या. अशा पध्दतीने एकत्रित रीतीने दिनांक 25/10/2011 ला शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. परंतु शासन निर्णयाच्या संदर्भात जी प्रक्रिया निश्चित करण्यात आली होती, त्यामुळे सुध्दा मोठया प्रमाणात वेळ गेलेला आहे. त्यामुळे तहसीलदार असेल किंवा उप विभागीय अधिकारी असेल यांनी वाळूचे गट निश्चित करणे, गट निश्चित झाल्यानंतर ग्रामसभा घेणे, ग्रामसभेची शिफारस असणे/नसणे, शिफारस नसेल तर पुन्हा उप विभागीय अधिकाऱ्यांनी जाऊन त्याबाबतची चौकशी करावयाची ही या बाबतीतील प्रक्रिया झाली. या शिवाय त्यामध्ये आणखी काही गोष्टी आहेत. छोटा गट असेल तर पर्यावरण विभागाची मान्यता घेणे, मोठा गट असेल तर राज्य स्तरीय पर्यावरण विभागाची मान्यता घेणे, त्यानंतर बसाक समिती अशा निरनिराळया समित्यांपुढे जाणे, अशा प्रकारच्या सगळया गोष्टी आल्या. जी.एस.डी.ए. हे देखील त्यामध्ये आले. या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

सगळयाचा परिणाम असा दिसतो की, या वर्षी वाळूचे धोरण निश्चित करण्यासाठी ही सगळी प्रक्रिया करण्यामध्ये बराचसा वेळ गेला. आजही अशी परिस्थिती आहे की, काही गटांचे लिलाव झाले आहेत परंतु बाकीच्या मान्यता झाल्या नाहीत म्हणून ते प्रक्रियेमध्ये आले नाहीत. आजची परिस्थिती अशी आहे की, वाळूच्या लिलावाचे 4834 गट होते त्यापैकी ग्रामसभेने 3785 गटांना मान्यता दिली. लिलावास 3470 गट उपलब्ध झाले परंतु बाकीच्या मान्यता वगैरे हे सगळे करण्यामध्ये फक्त 1906 गटांचा लिलाव होऊ शकला आणि बाकीचे गट प्रक्रियेमध्ये आहेत अशी वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, एकंदर या सगळयाचा स्पष्टपणे परिणाम असा दिसतो की, वाळू ही महत्वाची गोष्ट आहे. विकासाच्या सगळया वाटचालीमध्ये बांधकामाचे महत्व आपण नाकारु शकत नाही आणि बांधकामामध्ये वाळू नाकारु शकत नाही, अशी आजची परिस्थिती आहे. वाळू उपलब्ध नसेल तर अनेक ठिकाणची बांधकामे थांबतात आणि पर्यायाने वाळूचा शोध सुरु होतो आणि वाळूच्या बाबतीत अवैध उत्खनन सुरु होते. आपल्याला वाळूचे महत्व नाकारुन चालणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. वाळूशिवाय बांधकाम होत नाही, विकासाचे काम होत नाही. जेथे ज्यावेळी जास्त विकास होतो त्या त्या कालखंडामध्ये वाळूचा वापर जास्त होतो ही वस्तुस्थिती आहे. एका बाजूला पर्यावरणाचा ऱ्हास थांबवावयाचा आहे आणि दुसऱ्या बाजूला शासनाला उत्पन्न मिळाले पाहिजे. तिसऱ्या बाजूला जनतेला मदत झाली पाहिजे या सगळया दृष्टिकोनातून वाळूचे धोरण ठरविण्यात येत असताना त्यामध्ये होणारा विलंब, विलंबामुळे वाढलेली मागणी, त्यामध्ये पडलेली तफावत यामुळे वाळूचे अवैध उत्खनन होते, हे अवैध उत्खनन थांबविण्याचा शासनाने सातत्याने प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये जवळ जवळ 18946 प्रकरणावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. 607 प्रकरणांच्या बाबतीत गुन्हे दाखल करण्यात आले. 12 हजार पेक्षा जास्त वाहनांवर कारवाई करण्यात आली. त्यातून 30 कोटी रुपये उत्पन्न मिळाले, हे सगळे खरे आहे. असे असताना सुध्दा आज वाळूची परिस्थिती अशी आहे. काही ठिकाणी काही घटना सुध्दा घडलेल्या आहेत. ज्यावेळी वाळूची अवैध वाहतूक चालू असते त्यावेळी शासनाचे अधिकारी कारवाई करण्यास पुढे जातात तेव्हा त्यांच्यावर कधी हल्ले होतात या सगळया गोष्टी निदर्शनास येत आहेत.

यानंतर श्री. बरवड....

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

आजचा जो शासन निर्णय आहे त्यामध्ये अशा बाबतीत मोक्का लावण्यासंबंधीची सुध्दा तरतूद आहे. त्या पध्दतीने असा प्रकार ज्या ठिकाणी आढळून येतो त्या ठिकाणी मोक्का लावण्याचा निर्णय घेतलेला आहे. काही घटनांच्या बाबतीत निर्णय सुध्दा झालेले आहेत. या सगळ्या प्रक्रियेमध्ये मला असे वाटते की, आपल्याला वाळू तर पाहिजेच पण पर्यावरणाचा ऱ्हास न होता वाळू कशी पुरवावयाची, हा विषय आपल्या समोर आहे. म्हणून यामध्ये दोन तीन गोष्टींचा विचार करावा लागणार आहे. शेवटी बांधकामे चालू राहणारच आहेत आणि त्यासाठी वाळू लागणार आहे. म्हणून मध्यंतरी आम्ही एक निर्णय घेतला आणि त्या बाबतीत आमच्या विभागाने परिपत्रक काढले. परराज्यातून वाळू येत असेल तर आमची हरकत नाही. त्या पध्दतीने आम्ही मेसेज दिला की, परराज्यातून वाळू येत असेल तर कोणी त्याची अडवणूक करु नये. परराज्यातून वाळू येऊ द्यावी.

दुसरी बाब अशी की, वाळूला पर्याय शोधणे महत्वाचे आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक विषय मांडला होता की, वाळूमध्ये सुध्दा भेसळ होत आहे. यामध्ये पर्याय शोधत असताना दगडापासून कृत्रिम वाळू बनविणे हा एक पर्याय आहे. ते करीत असताना पर्यावरण विभाग सुध्दा त्यामध्ये येणार. त्यामध्ये अडचणी येणार, ही वस्तुस्थिती मी नाकारत नाही. परंतु त्यामध्ये जर आपण मदत करु शकलो तर त्या दृष्टीने आमचा असा प्रयत्न राहील की, दगडापासून कृत्रिम वाळू बनविण्याकरिता प्रोत्साहन देणे, त्यासाठी मदत करणे याबाबतीत सुध्दा आम्ही धोरण ठरवित आहोत. कारण वाळूला पर्याय शोधणे आवश्यक आहे. नाही तर काही दिवसांमध्ये नदीचे पात्रे संपून जातील, अशा प्रकारचे चित्र आपल्याला दिसते. शेवटी बांधकामासाठी आपल्याला वाळू लागणार आहे. कृत्रिम वाळूची गरज लागणार आहे. म्हणून तो एक प्रयत्न आम्ही करीत आहोत.

सभापती महोदय, याशिवाय काही गोष्टी आम्हाला दिसतात. त्यामध्ये न्यायालयीन प्रकरणानंतर माननीय उच्च न्यायालयाच्या माध्यमातून हा सगळा जी.आर. फायनल झाल्यानंतर सुध्दा त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर परवानग्या आलेल्या आहेत. जीएसडीएची मान्यता, त्यांचे सर्वेक्षण त्यामध्ये आलेले आहे. त्याचबरोबर मेरीटाईम बोर्ड यामध्ये आलेले आहे. पर्यावरण विभागाच्या निरनिराळ्या कमिट्या आलेल्या आहेत. या सगळ्यामध्ये सुलभता आणणे आवश्यक आहे. जरी हा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. बाळासाहेब थोरात ....

जी.आर. आताच आलेला असला तरी बदल ही निरंतर चालणारी प्रक्रिया असते. म्हणून एका बाजूला पारदर्शक स्वरुप कसे आणता येईल, हाही विचार आम्हाला करावा लागणार आहे. त्यामध्ये होणारे लिलाव, त्यामध्ये होणारे व्यवहार यामध्ये पारदर्शकता आणणे, सुलभता आणणे हा प्रयत्न आम्हाला करावा लागेल, असे मला वाटते. म्हणून सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्या निश्चितपणे विचारात घेऊ अशी ग्वाही मी या निमित्ताने सभागृहाला देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी वैतरणा खाडीच्या संदर्भात एक मुद्दा सभागृहामध्ये उपस्थित केला. त्यांनी रेल्वे पुलाच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाल्याचे सांगितले. त्या ठिकाणी वाळू खाली गेल्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो असे सांगितले. त्याची सुध्दा आम्ही नोंद घेऊ आणि तशा प्रकारच्या सूचना देऊ. पुढच्या कालखंडामध्ये वाळूला पर्याय निर्माण करणे, वाळूच्या धोरणामध्ये पारदर्शकता आणणे, सुलभता आणणे आणि जनतेला सुध्दा सहजतेने कमी दरात वाळू उपलब्ध होणे या दृष्टीने आमचा प्रयत्न राहील, याची ग्वाही मी या निमित्ताने देतो. सर्व सभागृहाचे आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. आर. आर. पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, राज्यामध्ये ज्या प्रश्नाची खूप गांभीर्याने आणि चिंतने चर्चा सुरु आहे तो प्रश्न सभागृहाचे कामकाज चालू होत असताना पहिल्यांदाच सभागृहामध्ये चर्चेला येणे निश्चितपणे स्वाभाविक होते आणि त्याप्रमाणे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला आणलेला आहे. मध्यंतरीचे काही दिवस राज्यामधील सगळ्या चर्चा बघितल्या तर जणू काही महाराष्ट्रामध्ये माफियांचेच राज्य आहे अशा पध्दतीची चर्चा आपल्याला सगळीकडे ऐकावयास येत होती. काही ठिकाणी पोलिसांनी धाडी घातल्यानंतर 9 लिटर रॉकेल मिळाले पण ज्याच्याकडे 9 लिटर रॉकेल मिळाले त्याचा उल्लेख सुध्दा रॉकेलमधील मोठा माफिया असेच सगळीकडे आपल्याला एकंदरीत बघावयास मिळत होते. या शब्दाचा सारखा सारखा वापर करुन माफिया शब्द सुध्दा अलीकडच्या काळामध्ये आपण सगळ्यांनी मिळून एवढा गुळगुळीत केला आहे की, आता मोठ्या गुन्हेगारांसाठी नेमका कोणता शब्द वापरावयाचा याचा सुध्दा आपल्याला विचार करावा लागेल, अशी एकंदरीत स्थिती आहे.

**उप सभापती** : आपल्याला महामाफिया असा शब्द वापरता येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यशवंत सोनवणे यांच्याबाबतीत नाशिक जिल्ह्यात घटना घडली आहे ती निश्चितच गंभीर स्वरुपाची आहे. त्याबाबत शासनाने सुध्दा त्या घटनेची अतिशय गांभीर्याने दखल घेऊन पुढील सर्व कारवाया केलेल्या आहेत. या घटनेमुळे काही प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्याबाबत दोन्ही बाजूने वेगवेगळया दृष्टीकोनातून चर्चा झालेली आहे. यशवंत सोनवणे यांचा बराच कार्यकाल नाशिक जिल्ह्याच्या सेवेत गेलेला आहे आणि त्यांच्या नेमणुका त्याच जिल्ह्यात झाल्या होत्या, ही वस्तुस्थिती आहे. ही सर्व माहिती चौकशीतून पुढे आली आहे. पोपट शिंदे व सोनवणे हे दोघेही एकमेकाला ओळखत होते. ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. सोनवणे यांना जाळताना नेमके काय घडले ते सगळे संदर्भ तपासातून पुढे आलेले आहेत. पोपट शिंदे त्या परिसरात रॉकेलची चोरी करुन अवैधपणे रॉकेल विकत होते ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोनवणे यांना अत्यंत अमानुषपणे मारले, या केसची अत्यंत गांभीर्याने दखल घेऊन 15 जणांविरुध्द मोक्कासारखी कडक कारवाई करुन शासनाने एकप्रकारे संदेशच देण्याचा प्रयत्न केला आहे. जर शासकीय कर्मचाऱ्यांवर कोणी हात घातला तर शासन बघ्याची भूमिका घेणार नाही. राज्य सरकारच्या हातामध्ये जो जास्तीत जास्त कडक कायदा आहे त्या कायद्याचा अंमल या घटनेमध्ये केलेला आहे. याबाबत चर्चा होत असताना हाही प्रश्न उपस्थित करण्यात आला की, पोपट शिंदे यांच्यावर तडीपारीची केस होती तिला मंत्रालयातून का स्थगिती देण्यात आली ? ॲक्टप्रमाणे या देशात जे कायदे केलेले आहेत त्यानुसार काही अधिकार शासनातील मंत्र्यांना दिलेले आहेत तर काही अधिकार विभागाच्या सचिवांना दिलेले आहेत. तडीपारीच्या संदर्भातील अधिकार गृह सचिवांना कायद्यानुसारच दिलेले आहेत. त्यांना दिलेले अधिकार हे अर्धन्यायिक अधिकार आहेत. प्रांताधिकाऱ्यांनी निर्णय घेतल्यानंतर अपिल त्यांच्यासमोर चालतात. दोन्ही बाजूने वकील येतात, साक्षी पुरावे तपासले जातात त्यानंतर मेरिटवर त्यासंदर्भातील निर्णय होतात. हे निर्णय देत असताना रिसेंट सुप्रीम कोर्टाने किंवा हायकोर्टाने यासंदर्भात दिलेली जज्जमेंटस् ही सुध्दा अवलोकनार्थ घेऊन निर्णय द्यावे लागतात.

सभापती महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास मुद्दाम आणू देऊ इच्छितो की, मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी श्री.रॉय असताना एका व्यक्तीला एमपीडीए लावल्यानंतर त्याच्या व्यक्तिगत

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.आर.आर.पाटील.....

हक्कावर गदा आणली म्हणून त्या व्यक्तीने सुप्रीम कोर्टात अपील केले होते. सुप्रीम कोर्टाने पोलीस आयुक्तांविरुध्द एफआयआर नोंदवावा असे आदेश दिले. या सगळया अधिकारांचा वापर करीत असताना घटनेने जे अधिकार दिलेले आहेत त्यावर निर्बंध येणार नाहीत, कोर्टाचे रिसेंट डिसिजन्स आहेत त्याच्या उलट निर्णय होणार नाहीत हे सुध्दा निर्णय देणाऱ्या ॲथोरिटीला पहावे लागते. शिंदे यांच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर त्यांच्याविरुध्द 2003 साली गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा दाखल झाला नव्हता. 2003 सालानंतर कोणताही गुन्हा झ ाालेला नसताना त्यांना 2010 मध्ये 2003 सालात केलेल्या गुन्ह्याबाबत हद्दपार करणार असू तर ही ऑर्डर कोर्टात टिकली असती का आणि न्यायिक होती का याचाही विचार त्यावेळी गृह सचिवांनी केला असावा. त्यामुळे त्यांनी शिंदेच्या तडीपारीला स्थगिती दिली असावी. त्यांच्या पुष्ठ्यर्थ हा दलित कार्यकर्ता आहे असे सांगून नगरपालिकेतील अनेक नगरसेवकांनी स्वत: येऊन साक्षी दिलेल्या होत्या. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही, त्यांनी मोठी गुन्हेगारी स्वरुपाची कृत्ये केलेली नाहीत. तरी सुध्दा राजकीय हेतूने त्यांना तडीपार केलेले आहे. खालच्या अधिकाऱ्यांनी डुख धरुन तडीपार केले आहे. मी शिंदे यांची केस तपासल्यानंतर 2003 नंतर त्यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा रजिस्टर झालेला नसल्यामुळे त्या काळात गृह सचिवांनी निर्णय घेतला असावा असे दिसून आले आहे. पण हे अधिकार कायद्याने दिलेले असल्यामुळे, अर्धन्यायिक अधिकार असल्यामुळे हे अधिकार वापरण्याचे स्वातंत्र्य देण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय शासनाकडेही नसतो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 18:35

श्री. आर.आर.पाटील....

सभापती महोदय, कोणीही गृहमंत्री असले किंवा कोणतेही सरकार असले तरी संबंधित ॲथॉरिटीला दिलेले अधिकार हे अशा पध्दतीने वापरले जातात. त्यामुळे "कशा पध्दतीने सोडले" अशा प्रकारच्या ज्या चर्चा मध्यंतरी झाल्या त्यामध्ये फार काही तथ्य होते अशातला भाग नव्हता. पण एक घटना घडल्यानंतर राज्यभरातल्या अशा प्रकारे चुकीने वागणा-या लोकांची प्रकरणे एका पाठोपाठ एक बाहेर यायला लागली. या चर्चेला खतपाणी घालण्याचे काम वेगवेगळया लोकांनी वेगवगळया पध्दतीने केले आणि आपला यामध्ये संबंध कसा नव्हता आणि बाकीच्यांची जबाबदारी कशी होती असे जे दाखविले जात होते त्याचा दोष विरोधी पक्षाकडे जात नाही तर तो दोष आमच्याकडे अधिक येतो. एका बाजूने हा प्रकार होत असताना शासनातील वेगवेगळया यंत्रणांनी आणि यंत्रणातील अधिका-यांनी देखील अशाच पध्दतीची वक्तव्ये करुन चालू असलेल्या चर्चेमध्ये पुन्हा तेल ओतण्याचे काम या निमित्ताने केले.

सरकारच्या वतीने मला एक गोष्ट स्पष्ट करायला पाहिजे की, वेगवेगळया विभागामध्ये ज्या पध्दतीचा समन्वय आणि एकोपा अशा लोकांच्या विरोधात कारवाई करताना असायला पाहिजे होता तो नव्हता ही गोष्ट मी प्रांजळपणे कबूल केली होती. आता अन्न व नागरीपुरवठा खात्याचे मंत्री श्री. अनिल देशमुख यांचे भाषण आपण ऐकले आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या कर्मचा-यावर माझ्या विभागाचे नियंत्रण नाही. याबाबतीत आमच्या सविस्तर चर्चा झालेल्या आहेत. पण यावर आता चर्चा करण्यापेक्षा कृती करण्याची आवश्यकता आहे. ही स्थिती आताचीच आहे अशातला भाग नाही. विरोधी पक्ष देखील 5 वर्ष सत्तेमध्ये होता त्यावेळीही हीच स्थिती होती आणि प्रशासनतली पध्दतही अशा प्रकारची होती. सभापती महोदय, एखाद्या अतिरिक्त जिल्हाधिका-याला दिवसा ढवळया जाळून मारण्या इतपत, महसूल खात्याच्या अधिका-याला ट्रकखाली घालून चिरडण्या इतपत या माफियांची हिंमत होत असेल तर त्यांच्या विरुध्द सरकारला कठोर पावले उचलण्याची आवश्यकता होती. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले की, फक्त घोषणा होत आहेत आणि दरारा कमी होत आहे. बोलून काम केले तर जास्त बोलतात म्हणून विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य टीका करतात. आता या वर्षामध्ये शांतपणे मला जे करायचे आहे, जो अजेण्डा मला राबवायचा आहे तो मी राबवत निघालो. आता बोलत का नाही असे विचारले जाते. सभापती महोदय, विरोधक दोन्ही बाजूने बोलतात. मी नेमके कसे वागावे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 18:35

श्री. आर.आर.पाटील...

आणि किती बोलावे याची आचारसंहिता घालून दिली आणि एवढे केले तर आम्ही टीका करणार नाही अशी भूमिका त्यांनी घेतली तर मला त्या मर्यादेत बोलता येईल.

सभापती महोदय, बाहेरच्या वक्तव्याची इथे दखल घेण्याची आवश्यकता नाही. परंतु सचिवांनी घेतलेल्या निर्णयाबद्दल गृह मंत्र्यांना 302 कलम लावा अशा पध्दतीच्या मागण्या जबाबदार नेते मंडळीकडून व्हायला लागल्या तर मी विनम्रपणे सांगेन की, 302ची कलमे मला फार कमी ठिकाणी लागतील पण अनेकांना ती इतक्या ठिकाणी लागतील की अंगावर 302 कुठे चिकटवायचे हाही प्रश्न पडू शकेल. म्हणून लोकशाही पध्दतीमध्ये काही सुधारणा करायला जात असताना काही दोषही निर्माण होत आहेत. केवळ टीका करुन हा प्रश्न संपणार नाही. तसेच आम्ही आमच्या चुका रेटून हा प्रश्न संपणार नाही. शेवटी राज्याच्या हितासाठी आपण काही गोष्टी केल्या आणि आपल्या व्यवस्थेतील दोष दूर केले तर त्याचे लोकांना चांगले फायदे होऊ शकतील आणि लोकांपर्यन्त निकोपपणे सेवा पोहोचू शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी केलेले भाषण मी अतिशय महत्वपूर्ण मानतो. आमच्या व्यवस्थेत दोष ठेवून आपण काही करायला निघालो तर लोकापर्यन्त निकोपपणे वस्तू पोहोचत नाहीत. आज डिझेल आणि रॉकेलच्या दरामध्ये इतकी तफावत आहे की रॉकेलचे मिक्सिग काही ठिकाणी पेट्रोलमध्ये केले जातेय आणि काही ठिकाणी डिझेलमध्येही केले जातेय. पेट्रोल, डिझेल हे वाहनासाठी वापरले जाते तर रॉकेल गोरगरीब लोकांसाठी वापरले जाते. सर्वांना आपण गॅसची कनेक्टिव्हिटी दिली नाही. केन्द्र आणि राज्य सरकार सबसिडीवर कोटयवधी रुपये खर्च करुन हे रॉकेल अल्प उत्पन्न गटातील लोकांना आणि गरीब लोकांना स्वस्तात मिळावे म्हणून प्रयत्न करीत आहे. ही गोष्ट आता लपून राहिलेली नाही की, गरिबांच्या नावावर कोटयवधी रुपये खर्च होत असूनही ते गरिबांपर्यंत पोहोचत नाहीत. हे खरे असेल तर एक चांगला पर्याय ज्याची आम्ही मंत्रिमंडळामध्ये चर्चा केली आणि मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात केन्द्र सरकारकडे मागणीही केली.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 18:40

श्री.आर.आर.पाटील...

या सोनावणे प्रकरणाची दखल घेऊन, महाराष्ट्र सरकारची विनंती लक्षात घेऊन केंद्र सरकारने या योजनेचे सुतोवाच केले की, आता थेट प्रत्येक कार्डधारकाच्या खात्यावर सबसिडी जमा करुन सगळ्या वस्तू मार्केटमध्ये सारख्या भावाने मिळतील, तेथे सबसिडी असणार नाही. 10 वस्तू घेतल्यामुळे त्यांचा जो लॉस होईल त्याची प्रतिपूर्ती रोखीने त्यांच्या खात्यावर पैसे देऊन केली गेली तर आज जो काळाबाजार होतो आणि या गोष्टीला प्रोत्साहन मिळते त्यावर आपोआप निर्बंध येतील. अशा प्रकारचा विचार आपल्या राज्यातून पुढे आला. आपण अपेक्षा करुया आणि आग्रही भूमिका घेऊया. लवकरात लवकर ही योजना अंमलात येईल आणि रॉकेल, धान्य यासारख्या वस्तूंबाबत जो मोठया प्रमाणात काळाबाजार होतो, या वस्तू रेशन दुकानांवर न मिळता त्या खुल्या बाजारात मिळतील आणि दरामध्ये जी तफावत असेल तेवढी रक्कम त्यांच्या खात्यावर वर्ग केली जाईल. मोठया कंपन्यांना सबसिडी देण्याऐवजी प्रत्येक गरीब माणसाला सबसिडी दिली तर अधिक लाभ होईल अशा निष्कर्षाप्रत आपण आलो आहोत. लवकरच केंद्र सरकार तशा पध्दतीची भूमिका घेईल असा राज्य सरकारला विश्वास आहे. आपण आपल्या पध्दतीमधील दोष दूर केले तर या गोष्टी दूर होऊ शकतील.

सभापती महोदय, रॉकेलबाबत माननीय महसूल मंत्र्यांनी सविस्तरपणे उत्तर दिले आहे. याबाबत मी अधिक सांगण्याची आवश्यकता नाही. माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी तासगावचा उल्लेख केला. तासगावमध्ये मोठ्या संख्येने चांगले लोक आहेत. परंतु 100 टक्के लोक चांगले असावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. 100 टक्के लोक चांगले होतील आणि कोणताही कायदा हातात घेणार नाहीत.

सभापती महोदय, ओढ्यातून, नद्यातून वाळू काढली जाते. एखाद दुसरा अधिकारी तेथे गेल्यानंतर आज या लोकांची हिंमत एवढी वाढली आहे की, त्यांच्यावर हल्ले केले जातात. हेही खरे आहे की, सरकारने जास्तीत जास्त पारदर्शीपणा आणून लिलाव करण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी यांनी रिंग केले. आज काही ठेकेदार पाहिले तर रोज उठून पोलीस स्टेशनला हजेरी लावली पाहिजे असे लोक त्यातून पुढे आले आहेत. शासनाचा प्रयत्न आहे आणि चर्चाही झ ाली आहे. लवकरच याबाबतचा निर्णय कॅबिनेटमध्ये घेऊ. आज जी वाहने सातत्य ठेवून शासकीय किंवा कोणत्याही मालमत्तेच्या चोरीसाठी वापरली जातात ती जप्त करणे, असे वाहन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

त्यांना परत मिळणार नाही अशा प्रकारची व्यवस्था करणे, त्याचबरोबर वाळू वा चुकीच्या गोष्टीसाठी वाहन न वापरणे आणि ज्यांची गुन्हेगारी प्रवृत्ती आहे, आज फक्त जास्त पैसे देतो तो ठेकेदार बनतो, त्यांना वाळू मिळणे बंद करणे यादृष्टीने विचार करीत आहोत. दोन्ही बाजूंनी आज अडचणी आहेत. एका बाजूला सरकारचे उत्पन्न वाढत असले तरी जनतेला वाळू लागतेच. ती काय दराने मिळते हे पाहिल्यानंतर कल्पना करता येत नाही. वृत्तपत्रातील बातमी तर अधिक धक्कादायक आहे. आयात केलेली वाळू महाराष्ट्रात स्वस्त पडते अशा पध्दतीची बातमी इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. आता पाकिस्तानातून आयात केलेली वाळू आपल्या राज्यात स्वस्त मिळणार असेल तर घर फक्त श्रीमंत बांधत नाही, सरकारची विकासाची कामे होत असतात आणि गरीब माणूस देखील घर बांधत असतो. यातून मिळणारा पैसा ठेकेदारांना अधिक मिळणार असेल तर यामध्ये गुन्हेगार लोक कसे येणार नाहीत आणि लोकांना कायदेशीर दराने वाळू कशी मिळेल याचे मेकॅनिझम वर्कआऊट करावे लागेल. याबाबत महसूल विभाग विचार करीत आहे. गृहमंत्री आणि शासन म्हणून आम्ही याही सूचना दिल्या आहेत.

सभापती महोदय, सदनाला मी सांगू इच्छितो की, अनेक ठिकाणी महसूल खात्याचे अधिकारी चांगले काम करीत असताना त्यांच्यावर दबाव आणण्याचे, त्यांना धमकावण्याचे प्रयत्न या जगतामध्ये काम करणाऱ्या गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांकडून केले जातात. याबाबत आम्ही स्पष्ट सूचना दिल्या आहेत. ज्या ज्याठिकाणी धाडी टाकण्यासाठी महसूल विभागाचे लोक जातील त्या त्याठिकाणी आवश्यक असलेले सर्व प्रोटेक्शन देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सोनावणे प्रकरण असेल किंवा दोन तहसीलदारांच्या अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला असेल....

नंतर 3व्ही.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.........

या गोष्टी स्पष्ट झालेल्या आहेत की, धाडी टाकायला जात असताना पोलिसांना पूर्वकल्पना न देता निव्वळ स्वत:च्या धाडसाने धाडी टाकण्यासाठी गेले आणि त्याचा परिणाम काही ठिकाणी त्या अधिकाऱ्यांवर हल्ले झाले तर काही ठिकाणी हल्ल्यांचा प्रयत्न झाला. या अनुषंगाने मी संबंधित विभागांना तशा सूचनाही दिलेल्या आहेत की, आपल्याला धाडी टाकायच्या असतील आणि प्रोटेक्शनसाठी त्याच जिल्ह्याचे किंवा तालुक्याचे पोलीस प्रोटेक्शन नको असतील तर दुसऱ्या जिल्ह्यातून अथवा तालुक्यातून पोलीस प्रोटेक्शन सुध्दा पुरविण्यात येईल. कारण अशा प्रकारे पोलीस प्रोटेक्शनमध्ये धाडी टाकल्या तर त्या त्या विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील हल्ले तरी थांबतील. यापुढील काळात कुठल्याही यंत्रणेला धाडी टाकायच्या असतील, अगदी लोकप्रतिनिधींना सुध्दा एखाद्या ठिकाणी पाहणी करायला जायचे असेल तर त्यांनाही पोलीस बंदोबस्त सोबत घेऊन जावा अशी माझी सूचना आहे. त्याचप्रमाणे पत्रकारांना सुध्दा एखाद्या ठिकाणी शुटिंग करायची असेल, स्टिंग ऑपरेशन करावयाचे असले तरी त्यांनाही त्यांच्या इच्छेप्रमाणे इतर जिल्ह्यातून पोलीस प्रोटेक्शन पुरविण्याची भूमिका हे शासन घेईल.

महोदय, सभागृहात बोलत असताना काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शासनाने अशा प्रकारे बेकायदेशीर कृत्य केली जातात त्या ठिकाणी धाडी टाकल्या की नाटक केले ? परंतु मी यासंबंधीची आकडेवारी सभागृहात सांगणार आहे. ती पाहिल्यानंतर सभागृहाच्या लक्षात येईल. यशवंत सोनवणेच्या हत्येची घटना घडल्यानंतर इतर यंत्रणा एकमेकांवर ढकलत होत्या पण धाडी टाकण्यासाठी प्रथम पोलिसांनीच पुढाकार घेतला, हे देखील मला येथे नमूद करावेसे वाटते. या घटनेनंतर सर्वच यंत्रणा जागरुक झाल्या आणि राज्यातील धाडीची एकंदरित आकडेवारी पाहिली तर वाळू माफियांवर टाकलेल्या धाडीत एकूण 357 लोकांना अटक करण्यात आली. तेलात बेकायदेशीर भेसळ करणे व चोरलेले तेल विकणे अशा केसेसमध्ये 414 लोकांना अटक करण्यात आली. यातून 10 कोटी, 12 लाख 74 हजार एवढ्या किंमतीची वाळू आणि ट्रक जप्त करण्यात आला आहे. तर 11.61 कोटी किंमतीचे तेल जप्त करण्यात आले आहे. ही कोट्यवधीची मालमत्ता आणि शेकडो आरोपींना अटक केली आहे. या धाडी केवळ देखावा किंवा दिखाऊपणा पुरत्याच टाकलेल्या नाहीत तर शेकडो लोकांवर गुन्हे सुध्दा दाखल करण्यात आले आहेत.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील............

मी या निमित्ताने एवढेच सांगू इच्छितो की, दूध भेसळ करणाऱ्यांचे रॅकेट पकडण्यासाठी पोलिसांनी रात्र रात्रभर जागून धाडी टाकण्याचे काम केले आहे. मी स्वत: काही धाडी टाकल्या आहेत. मला असे वाटते तसेच तांत्रिकदृष्ट्या बघायचे तर दुधाच्या भेसळीबाबत धाडी टाकण्याचे काम केवळ गृह विभागाचेच काम नव्हे तर अन्न व औषध प्रशासन विभागाचे सुध्दा काम आहे. तीच परिस्थिती अन्य माफियांच्या बाबतीत देखील आहे. तरी सुध्दा शासनाने केवळ उघड्या डोळ्याने बघण्याचे काम न करता धाडी टाकून गुन्हे दाखल करण्याचे काम केले आहे. यातून अशीही माहिती समोर आली की, दुधात अत्यंत घाण पाणी मिसळले जाते. काही ठिकाणी सिंथेटिक दूध तयार करुन विकणाऱ्या टोळ्या सुध्दा कार्यरत आहेत. त्यांचा पर्दाफाश आपल्याच पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केला आहे. हे सर्व करीत असताना तसेच वेगवेगळ्या प्रकारे दडपण किंवा प्रेशर येत असताना तांत्रिक आणि शास्त्रीय माहिती घेऊन त्याचा पाठपुरावा करण्यामध्ये पोलीस दलाला यश आले आहे. गुजरातमधून येणारे भेसळयुक्त दूधही निदर्शनास आले असून त्याचे काही नमुने टेस्ट केले व त्यात भेसळ केली असल्याचे आढळून आली आहे. खव्यासारखा प्रकार इतर राज्यांमधून आपल्या राज्यात आला त्यातही भेसळ आढळून आली व महाराष्ट्रामध्ये तेवढे सगळे वाईट आहे आणि बाकीच्या ठिकाणाहून येणारा माल चांगला आहे असा अर्थ काढून आपल्याच शेतकऱ्यांवर एक प्रकारे गैरविश्वास दाखविण्यासारखे आहे. काही गुंड प्रवृत्तीचे लोक, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोकच असे काम करु शकतात. आपल्या राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि सामान्य माणूस हा खूपच साधा व सरळ आहे.

याबाबतीत आम्ही गृह विभागाच्या माध्यमातून एक कार्यक्रम हातात घेतला आहे. त्या माध्यमातून अन्न भेसळ यावर प्रतिबंधक उपाययोजना करावयाची झाली तर त्यासाठी स्टाफ कमी आहे. तरी देखील भेसळ ज्या ज्या ठिकाणी होते अशा ठिकाणी सर्वांनी जायचे आणि अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना पूर्ण ताकदीने वठणीवर आणण्याचा प्रयत्न पोलीस करतील. तसेच पोलिसांना शास्त्रशुध्द माहिती मिळावी यादृष्टीने वेगवेगळ्या ठिकाणी वर्क शॉप घेऊन दुधातील भेसळ शोधणे व त्याचा तपास कसा करावा हे नवे काम पोलिसांना करावे लागणार आहे. राज्यातील भेसळीचे अनेक अड्डे आजपर्यंत पोलिसांनी बहुतांशी उद्ध्वस्त केले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

तसेच अन्न व औषध प्रशासन आणि गृहविभाग यांचा समन्वय ठेवून संबंधित विभाग कार्यरत झालेला आहे. राज्यामध्ये सर्व वस्तू भेसळ युक्त आहे अशा निष्कर्षाप्रत कोणी येता उपयोगाचे नाही. आता भेसळ करणा-यांचे धाबे दणाणले आहेत, अनेकांनी पळ काढला आहे. आम्ही आमच्या सिस्टीममधील त्रुटी दूर केलेल्या असून ज्यांना आपण माफिया माफिया म्हणतो ते आता आपल्याला उध्वस्त झालेले दिसून येतील. जोपर्यत भेसळ करणारे उध्वस्त होत नाही तोपर्यंत मी स्तब्ध बसणार नाही. या ठिकाणी मी मोठया घोषणा करणार नाही. राज्यातील जनतेला सर्व गोष्टी भेसळीशिवाय मिळतील, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी उठावे आणि कोणावरही हात टाकावा इतकी त्यांची मजल वाढली असेल तर कायद्यामध्ये जे बदल करणे आवश्यक असतील तसे बदल निश्चित केले जातील.

सभापती महोदय, माझे एक वाक्य विरोधी पक्षाच्या सदस्यांनी किती काळ ध्यानात ठेवावे यालाही काही मर्यादा आहेत. मी विरोधी पक्षाच्या स्मरणशक्तीला दाद देतो. विरोधी पक्ष सत्तेवर असताना शिवशाही, शिवशाही म्हणत होते परंतु ते सिम्बॉलीक होते. तुम्ही जेव्हा शिवशाही शिवशाही म्हणत होता तेव्हा तुम्ही घोडयावर बसून सचिवालयात येत होता काय, तुमच्या कमरेला तलवारी लावलेल्या होत्या की, रात्री उठून कोठल्या गडावर हल्ला करण्यासाठी जात होता ? आपण केवळ शिवशाही असे नाव दिले होते, त्या पध्दतीचे राजकारण आपल्याला अभिप्रेत होते. माननीय गोपीनाथ मुंडे हे उडया मारुन मारुन एन्रॉन अरबी समुद्रात बुडवले जाईल असे म्हणत होते म्हणून काय एन्रॉन अरबी समुद्रात बुडवला काय, बुडवला तर तो काय पुन्हा क्रेनने वर काढला काय ? याचा अर्थ आम्ही सत्तेवर आलात तर एन्रॉन बंद करु एवढया पुरता तो शब्द मर्यादित होता. प्रत्यक्ष एन्रॉन समुद्रात बुडवू अशातला काही भाग नव्हता व शिवशाही म्हणजे अगदी माननीय श्री. मनोहर जोशी घोडीवर बसून पुढे चालेले आहेत, त्यांच्या पाठीमागे माननीय श्री. गोपीनाथराव मुंडे यांच घोडे आहे असे काही नव्हते. सरकारचा एक संकल्प सांगण्यासाठीच्या तुमच्या ज्या भावना होत्या त्या महत्वाच्या होत्या. या ठिकाणी "शब्द" महत्वाचे नव्हते तर तुम्हाला काय म्हणावयाचे होते तो भाग महत्वाचा होता.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, काही वर्षापूवी मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व खासदारांची एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीमध्ये भाजपाच्या एका खासदाराने मुद्दा उपस्थित केला की, एका कास्तकाराने सावकाराच्या कर्जाची फेड केली नाही म्हणून त्याच्या बायकोला आणि मुलीला गहाण ठेवले आहे. मी संवेदनशील आहे. ज्यावेळी खासदाराने माहिती सांगितली तेव्हा मिटिंगमध्ये माझे लक्ष लागेना, शेवटी ज्या व्यवस्थेतून आपण आलेलो आहोत त्यांच्या बायका-मुले सुरक्षित नसतील तर कसल्या मिटींगा करीत बसायच्या ? मी मिटिंगमधून उठून बाहेर आलो आणि एस.पी.ला फोन करुन विचारले की, ही गोष्ट खरी आहे काय? त्यावेळेस एस.पी.नी सांगितले की, "दुर्दैवाने अशा प्रकारचा गुन्हा नोंद झालेला आहे" असे सांगितले त्यावेळच्या मिटिंगमध्ये मी एक शब्दही बोललो नव्हतो. मिटिंग संपल्या बरोबर माध्यमांच्या प्रतिनिधींनी मला गाठले आणि त्यांनी विचारले की, असा प्रकार जर होत असेल, शेतक-याची बायको आणि मुलगी सावकार गहाण ठेवत असेल तर ते योग्य नाही. मी नेहमी स्पष्ट बोलतो परंतु वाईट फारसे बोलत नाही आणि मारामारीचे तर कधीच बोलत नाही व माझ्यावर एकाही गुन्हयाची नोंद नाही. त्यावेळच्या परिस्थितीमुळे मी बोलून गेलो की, यापुढच्या काळात अशा लोकांना आम्ही "कोपरापासून ढोपरा पर्यंत सोलून काढल्याशिवाय राहणार नाही". गृह खात्याच्या भाषेत व ग्रामीण भागातील भाषेत बोललो. (अडथळा) कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढणे याचा अर्थ कडक कारवाई करणे असा घेतला पाहिजे. नाही तर तुम्ही म्हणाल,"आपण कोणाला कोपरापासून सोलून काढले आहे "? ढोपरपण दाखवा असे कोणी म्हटले तर आम्ही काय काय बघावे हा देखील प्रश्न येईल. त्यामुळे यासंदर्भात शब्दश: अर्थ घेण्याची गरज नाही. माझ्या म्हणण्यामागील भावना, भावार्थ आपण समजून घेतला पाहिजे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी मंत्री महोदयांनी जेवढे वाक्प्रचार वापरलेले आहेत त्यावर खरे म्हणजे एक वेगळीच चर्चा ठेवण्याची आवश्यकता आहे. आपण डान्स बारच्या विषयाबाबत, तमुक विषयाच्या बाबत जे वाक्प्रचार वापरलेले आहेत ते फार चांगले आहेत. खरे म्हणजे आपण येथल्यापेक्षा साहित्य संमेलनात अधिक चांगले बोलू शकाल. आपण जे बोलता ते आम्हाला मान्य आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

परंतु सुप्रीम कोर्टाने जे काही म्हटले आहे ते आम्ही म्हटले तर आपण आमच्यावर रागवावयास नको. आपण जर कडक कारवाई केली असती तर "इंग्रजांसारखी आपल्या सरकारची राजवट चालू आहे की, काय"? असे सुप्रीम कोर्टाला म्हणावे लागले नसते. आम्ही तुमच्या संदर्भात बोललो नाही परंतु हे कोणी केले आहे ते आम्हाला माहिती आहेत, संबंधितांना अजून वरचे पद मिळालेले आहे, त्याचीही आम्हाला माहिती आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

कोणी ते केले हे देखील आम्हाला माहीत आहे. केन्द्रामध्ये ते अजून वरच्या पदावर गेलेले आहेत हे देखील आम्हाला माहीत आहे.मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, तुमच्या मनात जे काही करण्याची इच्छा आहे ती इच्छा जर कोणी पूर्ण करु देत नसेल तर ते सुध्दा आम्हाला ॲक्सेप्टेबल आहे परतु सुप्रीम कोर्टाने जो काही रेफरन्स दिला होता त्याला उद्देशून आमचा आक्षेप होता.

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, आज राज्यामध्ये त्यासाठी कायदा नसतानासुध्दा महाराष्ट्रामध्ये 2175 सावकाराच्या विरुध्द कारवाया करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात तसेच देशातील अन्य कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रामध्ये सावकारांच्या विरुध्द सर्वात जास्त कारवाया करण्यात आल्या आहेत. लोकांनी विश्वासाने सावकारांना जमिनी दिल्या परंतु त्या जमिनी सावकारांनी नावावर करुन घेतल्या आहेत, त्याची खरेदी पत्रे केलेली आहेत. अशा प्रकाराच्या जमिनी परत घेण्याचा कोणताही अधिकार आज कोणत्याही कायद्यान्वये सरकारकडे नाही. म्हणून त्यासंदर्भात विधान सभा आणि विधान परिषदेने जो कायदा पास केलेला आहे तो कायदा केन्द्र सरकारच्या मान्यतेसाठी त्यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. सन्माननीय सदस्य श्री विनोद तावडे यांना मी एवढेच सांगतो की, आपल्या सभागृहाने कायदा पास केलेला असल्यामुळे आज ना उद्या या कायद्याला केन्द्र सरकारची मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये सावकारांनी शेतक-यांच्या जमिनी परत करण्याच्या बोलीवर घेतलेल्या आहेत, परंतु आज त्या जमिनी मात्र परत करीत नाहीत त्या जमिनीतील गुंठान गुंठा जमीन शेतक-यांना परत मिळवून दिल्या शिवाय स्वस्थ बसण्याचे राजकारण मी देखील करणार नाही. आपण जो कायदा केलेला आहे त्याला केन्द्र सरकारची मान्यता मिळवावी लागेल, पोलिसांना ते अधिकार द्यावे लागतील, त्यासाठी शासनाला सुध्दा ते अधिकार असावे लागतील परंतु आज कायदा नसतांना सुध्दा 2175 सावकारांना अटक केलेली आहे तसेच माझ्याकडे यादी असून कायदा नसतांना , आपण ठरविले म्हणून तसेच पोलिसांच्या भीतीमुळे 70 हजार एकरापेक्षा अधिक जमीन सावकारांनी अल्प किंमतीत किंवा मूळ जेवढे कर्ज घेतले होते तेवढे कर्ज त्या व्यक्तीकडून घेऊन शेतक-यांना परत दिल्या आहेत.अशा प्रकारे आपल्या भूमिकेचा निश्चितपणे काही प्रमाणात तरी चांगला फायदा झालेला आहे.परंतु पूर्ण फायदा होण्यासाठी कायदा मंजूर होणे आवश्यक आहे.असे मला आपल्याला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2..

अर्थात मी जे काही बोललो होतो त्याचा शब्दश: अर्थ आपणसुध्दा घ्यावयास नको. तसे बोलण्या मागच्या माझ्या भावना आपण लक्षात घेतल्या पाहिजे. कोटयावधी रुपयाचा जप्त केलेला माल आणि शेकडो लोकांना केलेली अटक आपण विचारात घ्यावयाला पाहिजे.

सभापती महोदय, सगळया माफियांवर कारवाई करण्यासाठी आमच्या यंत्रणांमध्ये को-ऑर्डिनेशन ठेवण्यात येईल त्याचबरोबर वेगवेगळया यंत्रणांना आवश्यक असलेले सर्व पोलीस संरक्षण दिले जाईल. महाराष्ट्र हे माफियांचे राज्य आहे अशा प्रकारे राज्याची बदनामी आपण स्वत: देखील करुन घेता कामा नाही तसेच कोणीही करता कामा नाही. महाराष्ट्र हा महाराष्ट्रच राहिला पाहिजे आणि माफियांना योग्य धडा शिकविण्याचे काम, यंत्रणात असलेल्या त्रृटी दूर करण्याचे काम, योग्य समन्वय साधणे इत्यादीच्या माध्यमातून आम्ही करुनच दाखवू असा विश्वास मी आपल्या माध्यमातून जनतेला देतो आणि ज्यांच्यावर कारवाई करण्याचे अजूनही बाकी आहे त्या व्यक्ती कितीही मोठया असल्या, त्यांचा पक्ष कोणताही असला तरी त्यांच्यावर कारवाया आम्ही करुनच दाखवू अशी सुध्दा मी ग्वाही देतो. या प्रस्तावाच्या निमित्ताने जे काही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले आहेत त्यातील काही प्रश्नांना मी आपल्याला लेखी सुध्दा उत्तर नंतर देईन सर्वच प्रश्नांना मी या ठिकाणी उत्तर देण्याची आवश्यकता नाही. जे महत्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले होते त्याबद्दल मी शासनाची भूमिका सांगितलेली आहे. रोज उठून शासनाची बदनामी करुन आपले प्रश्न सुध्दा संपत नाहीत.

सभापती महोदय, काल मुंबईमध्ये मोर्चा आयोजित करण्यात आला होता त्या मोर्चाचे आयोजन करणा-यांच्या म्हणण्यानुसार मोठा मोर्चा काढण्यात आला होता. अर्थात हा मोर्चा मोठा होता असे प्रसार माध्यमेसुध्दा म्हणत नाहीत. त्या बाबतीत आमचा काही दावा नाही. प्रसार माध्यमे जर नि:पक्षपातीपणाने काही म्हणत असतील तर त्यांना दोष देऊन कसे चालेल ? त्या मोर्चासाठी किती माणसे जमली होती यापेक्षा त्या माणसांच्या भावना काय होत्या आणि एवढे लोक जमविण्यासाठी किती प्रयत्न केले होते या गोष्टी सुध्दा विचारात घेतल्या पाहिजेत. दुसरे लोक जर आपल्या बरोबर असते तर आझाद मैदान भरले असते .कालच्या मोर्चाच्या निमित्ताने सर्वात जास्त त्रास पोलिसांना झाला होता. काम केल्यानंतर जर त्रास झाला तर त्यांना त्याचे काही वाटत नाही.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु फार मोठया संख्येने लोक मोर्चाला येतील असे आपले भाषण ऐकून आम्ही पोलीस बंदोबस्त जास्त ठेवला परंतु पोलिसांना मात्र बसून रहावे लागले. मोर्चाला किती लोक येतील याबाबातीत तुमचा अंदाज चुकला .मोर्चाला आम्ही येऊ असे लोकांनी सांगणे स्वाभाविक आहे. आपल्या नेत्यांनी मोर्चाला या असे सांगितल्यानंतर लोक तरी " नाही " कसे म्हणतील ? परंतु माझ्या एसआयडीच्या बाबतीत विचार करण्याची वेळ आलेली आहे

नंतर श्री.सरफरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ...

कारण आपल्यापेक्षा आमचे अंदाज साफ चुकले. त्यामुळे एसआयडीमध्ये सुध्दा आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्या लागतील, त्यांचे नव्याने प्रशिक्षण करण्याची गरज आपण आमच्यासाठी निर्माण केली आहे ते प्रशिक्षण सुध्दा आम्ही देऊ.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी भाषण करीत असतांना थोडे विनोदी, थोडे राजकीय चिमटे घेतले होते तेवढयापुरते उत्तर देणे क्रमप्राप्त होते. मी पुन्हा एकदा माननीय विरोधी पक्षनेत्यांना आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना आवाहन करतो की, माफियांचे राज्य अशी या राज्याची ओळख होऊ नये, अशी या राज्याची प्रतिमा निर्माण व्हावयास नको. कुणीतरी फुटकळ माणसे प्रयत्न करीत आहेत म्हणून त्यांचे हे राज्य नाही तर देशाला मोठे करणाऱ्या या राज्यातील दहा कोटी जनतेचे हे राज्य आहे. आपण सर्वजण एक झालो तर या गोष्टी अधिक लवकर करणे शक्य होईल. त्यामुळे हे लोक कोणत्या बिळामध्ये पळून जातील याचा पत्ताही लागणार नाही. आपण सर्वांनी याठिकाणी राजकीय दृष्टया नाहीतर या लोकांच्या विरोधात, या प्रश्नासाठी एक झाले पाहिजे. माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख साहेबांनी पक्षनिहाय यादी तयार केली असल्याचे सांगितले. आपण एका बाजूंनी रेशनिंगवरुन लोकांना चांगले धान्य मिळत नाही म्हणून तक्रार करतो त्यावेळी रेशनिंग इन्सपेक्टर ते धान्य दुकान बंद करण्याची कारवाई करतो. अशावेळी ती कारवाई थांबविण्याबाबत जर पक्षनिहाय आमदारांकडून पत्रे देण्यात येत असतील तर त्यावेळी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सुध्दा दबाव येतो. म्हणून प्रत्येक टप्प्यावर आपण यामध्ये कोणते काम करु शकतो इथून सुरुवात होण्याची आवश्यकता आहे. आपण अधिकाऱ्यांनी नि:पक्षपातीपणे काम केले पाहिजे असे सांगतो त्यावेळी चुकीच्या मार्गाने न जाता नि:पक्षपातीपणे काम करण्याची दक्षता प्रत्येकाने घेतली तर आपल्या शासकीय यंत्रणा देखील चांगल्या होतील.

सभापती महोदय, मी याठिकाणी इतकेच सांगतो की, हे माफियांचे राज्य आहे अशाप्रकारची या राज्याची ओळख तुम्हाला आणि आम्हालाही न परवडणारी आहे. हे अधिवेशन आणखी सव्वा महिना चालणार आहे. मी आपल्याला याठिकाणी झालेल्या कारवाईची आकडेवारी दिलेली आहे. तरीसुध्दा शेवटच्या दिवसापर्यंत कारवाईमध्ये सातत्य ठेवले जाईल. सर्व शासकीय यंत्रणा एकत्रितपणे सातत्य ठेवून याबाबत कारवाई करतील आणि अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आम्ही या कालावधीमध्ये कोणत्या कलमांचा वापर करुन किती जणांवर कारवाई केली, किती माल जप्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

केला याची संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची ग्वाही देतो. शासन याबाबतीत अतिशय गंभीर असून ते आणखी गंभीर होईल हे या निमित्ताने सांगतो. माननीय विरोधी पक्षनेते व माननीय सदस्यांनी एका महत्वाच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा नियम 260 अन्वये प्रस्ताव मी सभागृहापुढे मांडला होता. माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील साहेब आपण नेहमी फार चांगले बोलता. वाक्चातुर्यामध्ये आपल्या मंत्रिमंडळाची स्पर्धा लावली तर त्यामध्ये आपला पहिला नंबर लागेल. आपण ॲडव्होकेट आहात, आपण जर कोर्टामध्ये गेला असता तर आर्ग्युमेंट करणारे एक चांगले वकील म्हणून तुमचा नंबर लागला असता. आपण नेहमीच चांगले बोलत असल्यामुळे आपल्या बोलण्यावर आमची हरकत नाही.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये एका अत्यंत गंभीर अशा चर्चेला आम्ही सुरुवात केली. महाराष्ट्राची प्रतिमा दिवसें दिवस बिघडत चालली आहे म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे हा विषय या ठिकाणी मांडला. त्यामुळे माफिया राज हे केवळ आम्ही बोलत नाही तर लहान लहान मुले सुध्दा म्हणू लागली आहेत. पूर्वी बोफोर्सचे प्रकरण झाले त्यावेळी एखाद्या पटवाऱ्याने 10 रुपये घेतले की, बोफोर्स म्हटले जायचे तशाप्रकारची माफियांची ओळख या राज्यामध्ये निर्माण झाली आहे. लहान लहान मुले सुध्दा छोटया छोटया गोष्टींसाठी माफिया बोलू लागली आहेत. त्यामुळे या राज्याची होत असलेली बदनामी आपण रोखणार आहोत की नाही? आज आपण अनेक उपाय योजना करण्याची आश्वासने दिली. मंत्री महोदय, आपणास माहीत आहे की, सावकाराच्या मुद्यावर मी तासभर बोलू शकतो. सावकाराचे उगम स्थान माझ्या गावामधून झाले आहे. मंत्री महोदय, या सभागृहामध्ये या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी तुमच्या खात्यावर अतिक्रमण करीत राज्याच्या पोलीस स्टेशनला आदेश दिले की, या सावकारांवर 50 केसेस दाखल झालेल्या आहेत त्यामुळे मी सांगेपर्यंत त्यांच्यावर कारवाई करु नका. परंतु तेथील एका चांगल्या पोलीस अधिकाऱ्याने माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयामधून आलेल्या आदेशाची आपल्या स्टेशन डायरीमध्ये नोंद करुन ठेवली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

त्याप्रमाणे कारवाई झाली नाही. माननीय श्री.आर.आर.पाटील साहेब, मी तुम्हाला दहा वेळा भेटलो. त्यानंतर तुम्ही माझ्यासमोर एस.पी.यांना फोन केले. पण त्या सावकाराला अटक न होता ॲन्टीसिपेटरी बेल कशी मिळेल अशा प्रकारची व्यवस्था मंत्रालयातून करण्यात आली. मी माननीय मंत्री महोदयांना त्या स्टेशन डायरीची प्रत दाखविली. नंतर त्याठिकाणी संबंधित कलेक्टर यांना वर्षा बंगल्यावर बोलावून बैठक घेऊन संबंधितांना आदेश देण्यात आले की, "मी सांगेपर्यंत त्या सावकारावर कोणतीही कारवाई करु नका". आमचा कलेक्टर देखील महान होता. त्याने तुमच्या एस.पी. यांना एक लेखी पत्र दिले. श्री.कृष्णप्रसाद हा तुमचा आवडता एस.पी.होता. त्याने मला कळविले की, "साहेब, मुझे ऐसा ऐसा लेटर कलेक्टर ने भेजा है."आम्हाला तेही पत्र मिळाले आणि मी ते माननीय गृह मंत्री महोदयांना दाखविले. त्यावेळी आपण मला सांगितले होते की, याबाबत कारवाई करतो. परंतु मी माननीय गृह मंत्र्यांना सांगू इच्छितो की, याबाबत कारवाई झाली नाही. मला माझ्या तालुक्यातील अध्यक्षाच्या नावाने हाय कोर्टमध्ये जावे लागले. मग हाय कोर्टाने निर्णय दिल्यावर ती केस सुप्रीम कोर्टामध्ये गेली आणि त्याठिकाणी त्याचा निकाल लागला. सावकारांना कोपरापासून ढोपरा पर्यंत सोलून काढण्याची भाषा मी शब्दश: घेत नाही. पण जर तुम्ही दंड भरला नसता तर मी म्हटले असते की,या राज्याचा गृहमंत्री मर्द आहे. जरी सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेला असला तरी व्यक्तिगत रित्या एखाद्याने जर चूक केली असेल तर तो दंड आम्ही भरणार नाही. मग आम्ही म्हटले असते की, तुमची प्रामाणिक इच्छा आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये कोणी अवाक्षर काढले नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांचे चुकीचे वक्तव्य रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, गृह विभागाला हा दंड भरण्याबाबत सांगितल्या नंतर जर तो भरला नसता तर कोर्टाचा अवमान झाला असता आणि अशा प्रकारे कोर्टाचा अवमान होणे हे योग्य झाले असते काय ? त्यामुळे विधी व न्याय विभागाला विचारुन, विधी तज्ज्ञांकडून माहिती घेऊन कोर्टाचा अवमान होऊ नये म्हणून सरकारने हा दंड भरलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मग तो वसूल का करण्यात आला नाही ? जे दंड भरण्यास पात्र झाले होते, आपण त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करण्याची कार्यवाही का सुरु केली नाही ? कोर्टाच्या अवमानाचा विषय नंतरचा आहे. पण ज्यादिवशी सुप्रीम कोर्टाने हा निर्णय दिला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

त्याच दिवशी जर आपण संबंधितांना नोटीस दिली असती की, तुमच्यामुळे राज्य सरकारला दंड करण्यात आलेला आहे आणि त्यामुळे तो तुम्हीच भरला पाहिजे. अशा प्रकारचे पत्र, एखादी नोटीस दिली आहे काय ? तर त्याचे उत्तर "नाही" असे आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, माफिया राज .....

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : त्यांनीही आमच्यावर टीका केली. दंड भरावयास गडबड केली म्हणून . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज जीवनावश्यक वस्तूंमध्ये भ्रष्टाचार होत आहे, भेसळ होत आहे. यामुळे सर्वसामान्य माणसाचे जीवन वेठीला धरण्यात आले आहे. लोकांच्या जीवनाशी खेळत आहेत. आपण कधीतरी ही बाब गांभीर्याने घेणार आहोत की नाही ? नेहमी सिस्टीम बाबत उल्लेख केला जातो. पण इंग्रजांच्या काळापासून चालत आलेली सिस्टीमच अजून पुढे सुरु आहे. अजूनही आपण 1954 मध्ये करण्यात आलेले कायदे वापरत आहोत. या राज्याच्या निर्मितीला 50 वर्षे झालेली असतानाही अजूनही इंग्रजांच्या काळापासूनचे कायदे येथे वापरले जात असतील तर मग सिस्टीममध्ये कशी दुरुस्ती होणार आहे. त्यामुळे आम्ही यामध्ये दुरुस्ती करु असे आपण सांगू नये, तर ही दुरुस्ती अमुक दिवसाच्या आत करुन माफियांचां बंदोबस्त करु, त्यांच्या मुसक्या बांधू आणि या महाराष्ट्रातील माफिया मातीत घालू अशा प्रकारचे माननीय गृहमंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा गमतीने बोलले आणि माननीय गृहमंत्र्यांनी ते गमतीने घेतले. पण माननीय गृहमंत्र्यांनी आत्मपरिक्षण करावे. आपण गृह मंत्री झाल्यानंतर या राज्यामध्ये जे काही चालले आहे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. माफियाने डोके वर काढलेले आहे.

सभापती महोदय, मघाशी माननीय श्री.अनिल देशमुख यांनी सांगितले की, एकंदर स्टाफ कमी आहे. मग मंत्री काय करणार आहेत ? अशा वेळी तुम्ही सिस्टीम का बदलत नाही असा प्रश्न आहे. जर त्यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा विभाग दिलेला असेल तर अशा वेळी राज्यातील जनतेला स्वस्त दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी दिली असेल तर केवळ 256 कर्मचाऱ्यां बरोबर ते कसे काम करणार आहेत ? असा प्रश्न आहे. ही सिस्टीम कधी बदलणार आहात ? ज्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार हजारो कोटी रुपये खर्च करीत आहे, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जर 256 कर्मचारी उपलब्ध असतील तर तो विभाग नीट काम करु





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

शकणार नाही. तसेच विभागांमध्ये समन्वय राहिलेला नाही.श्री.शिवानंदन यांनी केलेले स्टेटमेंट ऐकले. त्यांनी सांगितले की, आम्हाला धाडी टाकण्याचे अधिकारच नाहीत. आपल्या विभागाचे डी.जी. या पध्दतीने बोलले आहेत. महसूल विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, गृह विभाग यांच्यामध्ये समन्वय नाही. आमचे असे म्हणणे आहे की, या विभागांमध्ये समन्वय निर्माण करा.

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आमचे असे म्हणणे आहे की, ही बदनामी टाळावयाची असेल तर ताबडतोबीने युध्दपातळीवर निर्णय घेऊन ज्या माफियांचा उगम या मुंबईत झालेला आहे आणि मुंबईपासून ग्रामीण भागामपर्यंत हे माफिया गेलेले आहेत या सर्व माफियांचा बंदोबस्त करण्यात येईल असे स्पष्ट आश्वासन द्यावयास पाहिजे होते पण अशा प्रकारचे स्पष्ट आश्वासन या ठिकाणी देण्यात आलेले नाही. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी या ठिकाणी स्पष्टपणे सांगितले की, कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे, अशी आपली असमर्थता व्यक्त केली. माननीय महसूल मंत्री यांनी या रेतीच्या बाबतीत पर्याय शोधावा लागेल असे सांगितले. माननीय महसूल मंत्री, 10 हजार रुपये प्रती ब्रास या दराने रेती विकली जात असेल तर हे रेती माफिये किती कमवत आहेत याचा अभ्यास करावा. माननीय श्री. आर.आर.पाटील आपण सत्य बोललात की यामध्ये टगे घुसलेले आहेत. मी माझ्या भाषणातही उल्लेख केला की, रेतीच्या व्यवसायामध्ये टगे घुसलेले आहेत. मग यासंदर्भात संशोधन करण्यात येणार आहे काय? एखाद्याने एखाद्या नदीचा लिलाव एक करोड रुपयात घेतलेला असेल आणि आज जर तो दहा करोड रुपये कमवत असेल तर नऊ कोटी रुपयांचे नुकसान या राज्याचे होत आहे. याकडे कोण पहाणार आहे? त्या ठिकाणी त्यांची दादागिरी चालू आहे. त्या ठिकाणी त्यांचा दहशतवाद चालू आहे. या दहशवाद्यांना आणि दादागिरी करणाऱ्यांना रेतीचे मूल्य ठरविण्याचा अधिकार शासनाने दिलेला आहे. या राज्यामध्ये 10 हजार रुपये प्रती ब्रास या दराने रेती कशी विकली जाऊ शकते, या संबंधात शासन काही करणार आहे काय? गोरगरीब माणूस रेतीपासून वंचित होत चाललेला आहे. आज घर बांधण्यासाठी त्याला रेती मिळत नाही. असे असताना आज या संदर्भात या सभागृहात गुळमुळीत उत्तर देण्यात आलेले आहे, या उत्तराने काहीही पर्याय निघणार नाही. या राज्याची व्यवस्था दुरुस्त होणार नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. आर.आर. पाटील, आपण महात्मा फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर,शाहू महाराज व छत्रपती शिवरायाचे नाव घेता. या राज्यात जर असे धंदे पुन्हा फोफावले आणि मग लोकांनी माफिया राज असे म्हटले तर जो महाराष्ट्र पुरोगामी महाराष्ट्र होता त्या पुरोगामी महाराष्ट्राची ओळख या देशात माफिया राज्य अशी झाली तर त्याचे जबाबदार हे शासन राहील, एवढेच या ठिकाणी सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, भेसळ, शासकीय मालमत्तेच्या चोऱ्या आणि शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले याबाबतीतीले मुद्दे या ठिकाणी उपस्थित करण्यात आले आणि त्याबाबतीत उत्तर देण्यात यावे असे सांगण्यात आले म्हणून मी एवढेच सांगू इच्छितो की, भेसळ, शासकीय मालमत्तेच्या चोऱ्या आणि शासकीय अधिकाऱ्यावर होणारे हल्ले या ज्या गंभीर घटना आहेत याबाबतीत शिक्षेची तरतूद वाढविणारे विधेयक पुढच्याच अधिवेशनात आणण्यात येईल.

श्री. विनोद तावडे (बसून) :सदर विधेयक याच अधिवेशनात आणण्यात यावे, त्याला आम्ही सहकार्य करु.

श्री. आर. आर. पाटील : यासंबंधीचे विध्येयक पुढच्या अधिवेशनात आणण्यात येईल आणि मधल्या काळात जर या संबंधात वटहुकुम काढावा लागला तर तो काढण्यात येईल पण लवकरात लवकर शिक्षेच्या तरतुदी वाढविल्या जातील, त्यासाठी कायदे कडक केले जातील आणि या संदर्भातील गुन्हे लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने फास्ट ट्रेक कोर्ट वाढविण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी माननीय मंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या भाषणात नऊ लिटर पकडले तरी माफिया.... असा उल्लेख झाला. जसे ते तुमचे कोपरा पासून ..... आहे तेच येथे लागू होते. तुम्ही तुमच्या संदर्भात लॉजिक लावता. मालेगावला बॉम्ब स्फोट झाला त्यावेळी जो बॉम्ब आणील त्याचा कोपरापासून हात उखडून टाकू असे म्हटले होते त्याबाबतीत आम्ही काही बोललो नाही.

श्री. आर.आर. पाटील (बसून) : मी न बोलले माझ्या नावावर कशासाठी टाकता?

श्री. विनोद तावडे : आपण सभागृहात बोलला आहात. मी तुम्हाला ते दाखवू शकतो.

श्री. आर. आर. पाटील (बसून) : दाखवा.

श्री. विनोद तावडे : ठीक आहे, मी तुम्हाला ते नक्की दाखवितो. मुळासकट हात उखडले जातील असे आपले वक्तव्य आहे.

श्री. आर. आर. पाटील :सभापती महोदय, मी जे बोललो ते का बोललो असे मला आता वाटते. कारण मी जे बोललेले आहे तेच मला पुन:पुन: सांगण्यात येत आहे आणि मी न बोललेले सुध्दा माझ्या नावावर खपविण्यात येत आहे असे असेल तर तो बोजा मला पेलवणार नाही. मी नेमके जे बोललो आहे तेवढेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले तर माझी त्याला काही हरकत नाही.

..3..

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदय, श्री. आबांची फटकेबाजी एवढी चालते की, ते काय बोलले हे विसरतात ही त्यांची अडचण आहे.  मला या विषयाबद्दल एवढेच सांगावयाचे आहे की, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक एकत्र येऊन जो दरोडा घालतात ते माफिया. हे सामान्य माणूस बोलतो, मीडिया बोलतो असे नाही. माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, बिल्डर्स, ब्युरोक्रॅट्स आणि राजकीय नेते एकत्र येऊन मुंबई विकायला निघाले आहेत. ही जी सिंडिकेट होते याला माफिया म्हणतात. ही सिंडिकेट भू-माफिया, तेल आणि वाळू या विषयात आहे. त्यामुळे हा माफिया शब्द रुढ झाला याचे कारण ब्युरोक्रॅट्स, राजकीय नेते आणि त्या त्या ठिकाणचे ठेकदार यांची सिंडिकेट झ ाली आणि हे थांबविणारी शासन यंत्रणा कमकुवत झाली त्यामुळे शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र माफिया राजवटीखाली चालू आहे हे आम्ही बोलत आहोत किंवा आणखी कोणी बोलत आहेत असे नाही तर  अशी चर्चा सर्वसामान्य माणसामध्ये सुरु झालेली आहे. श्री. आर.आर. पाटील आणि दादा यांची मते वेगवेगळी असतात हे आम्ही बाहेर ऐकून होतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

पण काल दादांनी सगळ्यांसमोर कौतुक केले की, इतका मोठा मोर्चा निघाला. तो मोर्चा दादांना तसा वाटला पण आबांना तसा वाटत नाही. कॅबिनेटमध्ये मीडियाला परवानगी द्या असे आम्ही वर्तमानपत्रात वाचले होते. मला वाटले होते की, ते तेवढ्यापुरतेच असेल पण एकूणच असे दिसते की, इतकी वेगवेगळी मते यावयास लागली आहेत. त्यामुळे कसे व्हावयाचे, काय व्हावयाचे हा प्रश्न आहे. त्यामुळे आबा, मोर्चाला किती संख्या होती हे जाऊ द्या. दादा वेगळे बोलले आणि आबा वेगळे बोलले त्यामुळे आम्ही खरे कोणाचे समजावयाचे, हा प्रश्न आहे. जो त्या खुर्चीवर जाईल त्यांचे जरा जास्त खरे मानले पाहिजे. आमच्या मोर्चाचे जे काही यश आहे ते आपल्यामुळेच आहे. कारण आपण अशी राजवट चालवली म्हणून मोर्चाला लोक आले. त्यामुळे आम्ही आपले आभारच मानतो. आमचा मोर्चा मोठा होता याचे कारण आपणच तशी राजवट चालवली. आपण अशी राजवट चालविली नसती, असे तेल माफिया, वाळू माफिया मंत्रालयाच्या मजल्यापर्यंत आले नसते तर मोर्चाला एवढ्या संख्येने लोक कसे आले असते ? त्यामुळे आम्ही आपले मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, यातील राजकारण सोडा. माननीय विरोधी पक्ष नेते जे म्हणाले ते खरे आहे की, कोठे तरी या अधिवेशनामध्ये या चर्चेतून माफियाराज या मातीत गाडण्याची आम्ही या ठिकाणी प्रतिज्ञा करीत आहोत. आबांनी आपल्या भाषणामध्ये थोडे अपयश इकडच्याच सत्ताधारी बाकाकडे आहे असे सांगितले. त्यांनी मोकळेपणाने मान्य केले की, आमच्यामध्ये समन्वय नव्हता, आम्हीच काही करु शकत नव्हतो. आपले हे अपयश आपण मान्य करता, ही चांगली गोष्ट आहे. आपल्या मनाचा हा मोकळेपणा आणि उमदेपणा पुढे जाऊन हा माफियाराज थांबविण्यासाठी मदत करील. जी कोणी सगळी मंडळी आहेत ती जर तुमच्या बरोबर राहिली तर ते होईल. मी टगेशाही वगैरे बोलणार नाही कारण पुन्हा त्यांचा काही तरी अर्थ निघेल. मी असे ऐकले आहे की, कोणत्या तरी चॅनेलने 'महाराष्ट्रातील टगा' यावर एसएमएस स्पर्धा लावली आहे. खरे काय आहे ते मला माहीत नाही. अशी एका चॅनेलवर स्पर्धा लागली आहे. आपल्याला त्यावर बंदी आणावयाची असेल तर आणावी. मला असे वाटते की, आबांनी मोकळेपणाने जे मान्य केले त्या कमतरता दूर करावयाचा हा निर्धार जर विधिमंडळाच्या या वरिष्ठ सभागृहातून

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. विनोद तावडे .....

गेला तर ही चर्चा उपस्थित करण्यामागचा जो उद्देश आहे तो सफल होईल. केवळ दोष दाखवणे असे नाही. ते आम्ही लोकांना दाखवतच आहोत पण आपण कोठे तरी त्यावर प्रतिबंध करु शकू आणि खरोखर छत्रपती शिवराय आणि शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील माफिया राज याच मातीत गाडला जाईल आणि पुन्हा कोणी यशवंत सोनवणे जाळला जाणार नाही हा निर्धार जर सरकारकडून आला तर खऱ्या अर्थाने ते या चर्चेचे फलीत आहे. म्हणून ही चर्चा आम्ही उपस्थित केली आहे.

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या गुरुवार, दिनांक 17 मार्च, 2011 रोजी, सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल. उद्या सकाळी 11.00 ते 12.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये दर्शविलेल्या सत्तारुढ पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 17 मिनिटांनी, गुरुवार दिनांक 17 मार्च, 2011 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही